

# सावित्रीबाई फुले

## काल आणि कर्तृत्व

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

क्रांतिज्योती

# सावित्रीबाई फुले

(काल आणि कर्तृत्व)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ




ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले

जन्म—३ जानेवारी १८३१ निधन—१० मार्च १८९७



महात्मा जोतीराव फुले व दत्तकपुत्र चि. डॉ० यशवंत




युगपुरुष जोतिराव फुले व युगस्त्री सावित्रीबाई फुले



सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख त्यांच्या
शाळेतील दोन विद्यार्थिनींसह
( शंभर वर्षांपूर्वीच्या निगेटिव्हवरून तयार केलेले दुर्मिळ छायाचित्र )





सावित्रीबाई फुले यांच्या ' काव्यफुले '
या काव्यसंग्रहावरील मुखपृष्ठ




साविञीबाईंनी दुष्काळात उघडलेल्या अन्नछत्राचे दुर्मिळ छायाचित्र



महात्मा फुले यांनी हरिजनांसाठी खुली केलेली विहीर




नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील सावित्रीबाईंचे जन्मघर



अस्पृश्यांसाठी म० फुले यांनी काढलेली भारतातील पहिली शाळा
अहिल्याश्रम



तात्यासाहेब भिडे यांचा बुधवार पेठेतील वाडा.
फुले दांपत्याने भारतातील पहिली मुलींची शाळा याच वाड्यात सुरू केली.



पुणे येथील विश्रामबाग वाडा. या ठिकाणी इ. स. १८५२ मध्ये ब्रिटिश
सरकारकडून म० जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचा सत्कार करण्यात आला.

क्रांतिज्योती

# सावित्रीबाई फुले

## (काल आणि कर्तृत्व)

संपादक

*प्राचार्य डॉ. मा. गो. माळी (निमंत्रक)*

*श्रीमती नीला उपाध्ये, उपाध्यक्षा*

*डॉ. निर्मलकुमार फडकुले*

*डॉ. सुभाष सावरकर*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ४८-क

- पहिली आवृत्ती : मार्च १९९८
- दुसरी आवृत्ती : जुलै, २००६


© महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.


- **प्रकाशक :**

  सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
  तिसरा मजला, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
  दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  कोल्हापूर-४१६ ००३.

- **मुखपृष्ठ :** बाळ ठाकूर

- मूल्य : रुपये १२५/-

# निवेदन

''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, — काल आणि कर्तृत्व'' हे पुस्तक प्रकाशित करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला साभिमान समाधान लाभत आहे. स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करणारा हजारो वर्षांपूर्वीचा वेदांचा काळ लगेच संपला. पुरुषप्रधान संस्कृतीचे जणू तमोयुगच मध्यंतरी अवतरले. वेदांचे अध्ययन स्त्रीशूद्रादी सर्व मानवांनी करावे असे सांगणारे यजुर्वेदाचे आदेशही हे तमोयुग विसरले आणि स्त्री व शूद्र ह्यांचे नशिबी दुर्दैवाचे दशावतार भोगणे आले. उच्चवर्णीयात मोडणाऱ्या जातींनी स्त्री व शूद्र ह्यांना पशूहूनही हीन दर्जाची वागणूक दिली. वंदनीय सावित्रीबाईंनी प्रथमच ह्या उच्चवर्णीय जातीच्या वर्तनाविरुद्ध क्रांतीचे निशाण फडकविले. स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांना हात घालणाऱ्या ''सावित्रीबाई'', पुन्हा निर्माण झाल्या नाहीत हे आजवरचे विदारक सत्य आहे. वाणी आणि करणी ह्यांचा अंत:करणी मेळ घालणाऱ्या सावित्रीबाई वंदनीय होत.

त्यांच्या चरित्राचे व चारित्र्याचे विविध पैलू सोदाहरण उकलून दाखविणारे लेख ह्यात अंतर्भूत केलेले आहेत. सावित्रीबाईंची केवळ स्मृती जागवणे नव्हे तर स्मृतीत अभिप्रेत असलेली कृती देखील घडावी हा हेतू ह्या पुस्तक प्रकाशनामागे आहे. ह्या पुस्तकाच्या संपादकांचे, ह्या पुस्तकातील लेखकांचे मी व्यक्तिश: व मंडळातर्फे आभार मानतो. श्री. हरि नरके, समन्वयक, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन यांनी या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर छापण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे मान्यता दिलेले सावित्रीबाई फुले यांचे छायाचित्र उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. मंडळाचे सचिव, श्री. चंद्रकांत वडे व मुद्रक स्नेहेश प्रिंटर्स, मुंबई आणि मुद्रिते शोधक श्रीमती शकुंतला मुळ्ये ह्यांचे परिश्रम पुस्तकाला अधिक नीटनेटके करण्यास उपयुक्त ठरले. एतदर्थ त्यांचेही आभार मानतो. समाज या पुस्तकाचे स्वागत करेल, ह्यातील विचारांना आचारात परिवर्तित करेल अशी आशा बाळगतो.

**मधुकर आष्टीकर,**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# निवेदन

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचा आलेख मराठी जनतेसमोर या ग्रंथाच्या रुपाने ठेवला व या अपूर्व ग्रंथाला वाचकांचाही तसाच अपूर्व प्रतिसाद लाभला. त्यामुळे या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग आलेला आहे. या ग्रंथामध्ये ज्या ज्या अभ्यासू लेखकांनी सावित्रीबाईंच्या विचारांचे विविध पैलू प्रगट करणारे महत्त्वपूर्ण लेख लिहिले त्या सर्व लेखकांचे मंडळ मनापासून मन:पूर्वक आभार मानीत आहे.

(मधु मंगेश कर्णिक)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : १४ जुलै, २००६

# संपादकीय

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे महानिर्वाण दि. १० मार्च १८८७ रोजी झाले. १९९६-९७ हे त्यांच्या स्मृतिशताब्दीचे वर्ष आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने सावित्रीबाईंच्या जीवन-कार्याचा थोडक्यात आलेख ग्रंथस्वरूपात मराठी जनतेसमोर ठेवण्याचा निर्णय घेतला, ही आमच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी घटना होय. या कालोचित निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

सावित्रीबाई फुले ह्या, थोर समाजक्रांतिकारक महात्मा जोतिराव फुले यांच्या सहधर्मचारिणी. आपल्या देदीप्यमान ज्योतीने जोतिबांनी सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची ज्योत प्रज्वलित केली; आणि स्त्रीसुध्दा पुरुषांच्या बरोबरीने युगप्रवर्तक कार्य करू शकते, हे जगाला सिध्द करून दाखविले.

एकोणिसाव्या शतकात स्त्रिया आणि शूद्र यांची स्थिती पशूपेक्षाही हीनदीन होती. देवाच्या व धर्माच्या नावाखाली बहुसंख्य समाज हा सर्व प्रकारच्या गुलामगिरीत गटांगळ्या खात होता. स्त्रीचा जन्मच मुळी अशुभ मानला जाई. आजही फारशी वेगळी स्थिती नाही; परंतु ज्या काळात स्त्रीने शिकणे हे महापाप मानले जाई, त्या काळात मुळात निरक्षर असलेल्या सावित्रीबाईंनी आवश्यक तेवढे शिक्षण विवाहानंतर घेतले. प्रारंभी पतीच्या आग्रहास्तव आणि काळाच्या ओघात स्वयंप्रेरणेने, स्वाध्यायाद्वारे. स्वतःच्या अखंड कार्यकर्तृत्वाने त्या आद्यशिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, दीनदलितांच्या उध्दारक; इतकेच नव्हे, तर आधुनिक मराठी कवितेच्या गंगोत्री बनल्या; आणि जोतिबांच्या मृत्यूनंतर तर सत्यशोधक समाजाचे नेतृत्वही त्यांनी सांभाळले. म्हणूनच थोर चरित्रलेखक कै. धनंजय कीर यांनी 'सावित्रीबाईंचे कार्य म्हणजे युगकार्यच आहे-' असे गौरवाने म्हटले आहे. किंबहुना जोतिरावांनी प्रतिगाम्यांच्या आणि सनातन्यांच्या प्रचंड कडव्या विरोधाला ठोकरून सनातन्यांच्या थेट बालेकिल्ल्यात - म्हणजे पुणे

परिसरात - जे शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक सेवेचे क्रांतिकार्य केले, त्यामध्ये सावित्रीबाईंचा सिंहाचा वाटा होता हे मान्य करणे भाग आहे.

तत्कालीन राजकीय ऋषी म्हणून मान्यता पावलेले कै. मामा परमानंद यांनी, आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या फुले दांपत्याला आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून महाराज सयाजीराव गायकवाड यांना ३१ जुलै १८९० रोजी जे पत्र पाठविले त्या पत्रात ते म्हणतात- 'आपले सारे जीवन जनतेच्या नि:स्वार्थ सेवेसाठी वेचणाऱ्या जोतिबांच्या आणि त्यांच्या पत्नीच्या निष्काम सेवेची जाणीव ठेवून त्यांना जीवन वेतन मिळत जाईल अशी व्यवस्था कृपा करून महाराजांनी करावी. जोतिबापेक्षाही त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले व त्यांच्याबरोबर राहून वाट्यास येतील त्या हालअपेष्टा भोगल्या. उच्चवर्णीयांतील उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशा प्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. ह्या उभयतांनी लोककार्यात आपले सारे जीवन खर्च केले'... यावरून जोतिरावांप्रमाणेच सावित्रीबाईंच्याही कार्याची महती कळून येते.

सावित्रीबाईंचा जन्म, एका गरीब शेतकरी कुटुंबात शिरवळनजीकच्या नायगाव या खेड्यात दि. ३ जानेवारी १८३१ ला झाला. शे-दीडशे उंबरा असलेल्या त्या छोट्या खेड्यात, शिक्षणाची परंपरा किंवा संस्कार नसलेल्या घरात जन्मलेल्या सावित्रीबाईंनी लग्नानंतर शिकून, जोतिरावांच्या खांद्याला खांदा लावून समाजक्रांतीचा रथ आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत अव्याहतपणे चालू ठेवावा, याचेच नवल वाटते. सुधारणांचा हा रथ अंधश्रध्दांच्या व रुढीपरंपरांच्या काट्याकुट्यांच्या, खाचखळग्यांच्या अवघड मार्गावरून चालत राहिला. समाजक्रांतीच्या त्या रथाचे एक चाक जोतिराव आणि दुसरे चाक सावित्रीबाई होत्या.

सावित्रीबाईंनी मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा काढणे, आपल्या घरातच बालहत्या-प्रतिबंधक गृह चालविणे, गोरगरीब कामगारांसाठी रात्रशाळा काढणे, दुष्काळात अन्नान्नदशा झालेल्या गरिबांसाठी अन्नछत्रे सुरू करणे, केशवपन - विधवाविवाहबंदी - देवदासी पध्दती इ. दुष्ट प्रथांचे उच्चाटन करणे म्हणजे एकोणिसाव्या शतकातले या देशातील चमत्कारच होत! फुले दांपत्याच्या कार्याचा हा संपूर्ण इतिहासच रोमांचकारी आहे. या सर्व कार्यात सावित्रीबाईंनी त्या काळात जोतिरावांना ज्या धैर्याने साथ दिली, त्यास तोड सापडत नाही.

या छोट्या ग्रंथात सावित्रीबाईंच्या महान् क्रांतिकार्याचे थोडक्यात दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ग्रंथासाठी ज्या मान्यवरांनी वेळात वेळ काढून सावित्रीबाईंच्या जीवनातील महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकणारे लेख

अगत्याने लिहून पाठविले; त्यांचे मनापासून आभार मानले पाहिजेत. डॉ. सुधीर रसाळ, डॉ. य. दि. फडके, डॉ. सरोजिनी वैद्य, डॉ. बाबा आढाव, डॉ. भा. ल. भोळे, कॉम्रेड शरद पाटील, डॉ. जनार्दन वाघमारे, वि. वि. चिपळूणकर या मान्यवर अभ्यासकांनाही आम्ही लेखन सहाय्यासाठी पत्रे पाठवली होती. त्यातील काहींनी लेखनास असमर्थता दर्शवली. ग्रंथाच्या मुखपृष्ठासाठी ठाणे येथील 'सन्मित्र'चे संपादक स. पां. जोशी यांनी १९७२चा विशेषांक मंडळाला मुद्दाम उपलब्ध करून दिला. त्यांचे मन:पूर्वक आभार.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष माननीय कै. विद्याधर गोखले यांनी प्रथम या ग्रंथाची योजना उचलून धरली. त्यानंतर विद्यमान अध्यक्ष माननीय डॉ. मधुकर आष्टीकर यांनी तिचा पाठपुरावा केला. उपाध्यक्षा श्रीमती नीला उपाध्ये यांनी हे काम तातडीने व्हावे म्हणून सर्व प्रकारचे सहकार्य दिले. मंडळाचे सर्व सन्मान्य सदस्य, सचिव श्री. चंद्रकान्त वडे तसेच मंडळाचे कर्मचारी यांनीही वेळोवेळी योग्य सहकार्य दिले. स्नेहेश प्रिंटर्सचे श्री. प्रमोद भोगटे यांनीही काम उत्तमप्रकारे करून या ग्रंथाच्या प्रकाशनास सहाय्य केले.

या सर्वांचे मनापासून आभार.

—संपादक मंडळ

# अनुक्रमणिका


१. सावित्रीबाई - (काव्य) १
*फ. मुं. शिंदे*

२. बोधप्रद सहजीवन २
*विद्या बाळ*

३. एकोणिसाव्या शतकातील स्त्री-जीवन ९
*नीला उपाध्ये*

४. स्त्री-जीवनाला नवी दिशा देणारी कार्यकर्ती २०
*डॉ. निर्मलकुमार फडकुले*

५. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व २९
*डॉ. मा. गो. माळी*

६. समाजक्रांतीच्या अग्रणी ४०
*नीलकंठ गोपाळ मेंढे*

७. सत्यशोधक समाजाच्या नेत्या : सावित्रीबाई फुले ५१
*फुलवंताबाई झोडगे*

८. शिक्षणशास्त्रज्ञ सावित्रीबाई ६०
*प्रा. अनिल प्रांजळे*

९. स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ७०
*डॉ. लीला पाटील*

१०. सावित्री व जोतिबा : दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे ७६
*द. स. झोडगे*

११. सावित्रीबाईंची साहित्यनिर्मिती ८७
*डॉ. सुभाष सावरकर*

१२ अशी जगली सावित्रीबाई १०८
*नलिनी लडके*

१३. सावित्रीबाई फुले यांची काव्यरचना ११८
*डॉ. श्रीराम गुंदेकर*

१४. सावित्रीबाईंची भाषाशैली १३५
*डॉ. रा. गो. चवरे*

१५. जनप्रबोधनाचे आविष्कार : सावित्रीबाईंची पत्रे, भाषणे व संकलने १४७
*निरंजन माधव*

१६. सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या चळवळीचे यशापयश १५७
*प्रा. चंद्रकान्त घुमटकर*

१७. शतकांची शिदोरी : सावित्रीबाई फुले १६८
*हरि नरके*

१८. सावित्रीबाईंच्या कार्याचे द्रष्टेपण १८६
*मनोहर कदम*

परिशिष्ट १ - सावित्रीबाई फुले : जीवन, कालपट व कार्य १९८

# सावित्रीबाई

*तारणारी तूच*
*विचाराची माय*
*जीव असहाय*
*पंखाखाली ॥*

*सूर्यज्योतीचेच*
*ललाटीचे कुंकू*
*समाज त्रिशंकू*
*मानभावी ॥*

*मन जिथे आहे*
*बंडाचे माहेर*
*आतला बाहेर*
*ज्वालामुखी ॥*

*अंगावर तुझ्या*
*येशूचेच खिळे*
*नीतीचा न ढळे*
*भाव काही॥*

*तुझ्या हृदयाचे*
*शरणार्थी मोह*
*सृष्टीचे विद्रोह*
*अंतरंगी ॥*

*मनमुक्त केली*
*तूच तलवार*
*नवी दिली धार*
*तेजोमय ॥*

*दसऱ्यास आता*
*पूजितो आयुधे*
*सालभर साधे*
*नाव नाही!*

—फ. मुं. शिंदे

# बोधप्रद सहजीवन

**विद्या बाळ**

श्रीमती सावित्रीबाई फुल्यांची स्मृतिशताब्दी असताना, शंभर-दीडशे वर्षांपूर्वीच्या काळात, त्या काळाच्या पुढच्या शंभर-दीडशे वर्षांनंतरचा विचार करणाऱ्या सावित्रीबाईंच्या आठवणींनी मन भरून येतं. जे समाजात आजही घडत नाही, जे बोलताना आजही जिवाचा धडा करून बोलावं लागतं, ते सारं सावित्रीबाई बोलून, करूनही गेल्या! स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे कुटुंबसंस्था नष्ट होते आहे, कोसळते आहे असा कांगावा करणाऱ्यांपुढेही जोतिबा-सावित्रीबाईंचं सहजीवन, त्यांनी जबाबदारीनं निभावलेलं व्यक्तिगत आणि सामाजिक पालकत्व हेही खणखणीतपणे ठेवणं महत्त्वाचं आहे.

सावित्रीबाईंच्या जीवनाविषयी विचार करताना म. जोतिबांचा विचार वेगळा किंवा दूर काढताच येणार नाही. याचं कारण हेच की, जोतिबा स्वत: विचारवंत आणि समाजपरिवर्तनासाठी प्रयत्नशील होते आणि त्यांच्या या जीवनात सावित्रीबाई त्यांच्या सहचरी झाल्या होत्या. त्यामुळे सावित्रीबाईंचा विचार आणि कृती यांच्यामागे जोतिबांचा वैचारिक पाया होता हे निर्विवाद! जोतिबांचं वैशिष्ट्य हे की, ते सामाजिक कामात समाजातील लोकांना घेऊन एकटेच काम करीत राहिले नाहीत. त्यांनी सावित्रीबाईंसह स्वत:च्या घरापासून, या कामांना सुरुवात केली; पत्नीला कामातही आपल्याबरोबर घेतलं.

विशेष म्हणजे, सावित्रीबाईंही पतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत, त्यांच्या विचारात, कामात सहभागी झाल्या. महाराष्ट्रात अनेक विचारवंत आणि समाजसुधारक होऊन गेले. तरी याप्रकारे समाजाच्या विचारांचा ढाचाच बदलायला निघणारं जोतिबा-सावित्रीबाई हे बहुधा पहिलंच जोडपं असावं! त्यातही सावित्रीबाईंचा सहभाग केवळ 'मम' म्हणणारा किंवा शोभेचा नव्हता! विचार समजून घेत, प्रश्न विचारत, प्रश्नांना हात घालत स्वतंत्रपणेही त्या जोतिबांबरोबर वाट चालत होत्या. स्त्रीला माणसासारखं जगता यावं यासाठी तिला शिक्षणाची संधी हवी; हा विचार जोतिबांनी केला. त्यासाठी, आपल्या घरापलीकडच्या, घराघरातल्या स्त्रियांना जे सांगायचं, त्याची सुरुवात स्वत:च्या घरापासून व्हायला हवी, याची जाण असलेल्या जोतिबांनी प्रथम सावित्रीबाईंना साक्षर केलं, शिक्षिका म्हणून तयार केलं आणि स्त्री-शिक्षणाच्या कामात सहभागी करून घेतलं.

या शिक्षणाचा परिणाम स्वत: सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वावर स्वाभाविकपणेच दिसायला लागला. त्यांना शिक्षणाचं महत्त्व पटलं, त्यांचा आत्मविश्वास जागा झाला. लोकांच्या विरोधाला, टीकेला, दगडाच्या किंवा शेणफेकीला न घाबरता शाळेचा परिपाठ त्यांनी चालू ठेवला; कुणा धटिंगणानं रस्ता अडवला तेव्हा त्याचा मुकाबला केला. शिक्षणानं आणि जोतिबांबरोबरच्या सहजीवनानं त्यांचं आत्मबळ वाढत गेलं असावं. त्यातूनच त्यांना गेल्या शतकातल्या स्त्रियांच्या असह्य जिण्यातला जीवघेणेपणा पोचला! नदीवर जीव द्यायला गेलेल्या गरोदर विधवेला जोतिबांनी दिलेला धीर अशा गोष्टी सावित्रीबाईंनीही अंगिकारल्या. आज विधवाच नव्हे तर, तरुण मुली चंगळवादाच्या आणि वासनाकांडाच्या भोवऱ्यात सापडल्या, तर कितीजणींचे जन्मदाते आईबाप तरी जोतिबा-सावित्रीबाईंची माणुसकी सांभाळताना दिसतात? सावित्रीबाई जोतिबांच्या बरोबर उभ्या तर राहिल्याच, पण त्यातून त्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केलं. तेही गुपचूप-चोरटेपणानं नव्हे, चक्क जाहिरात देऊन. 'येथे येऊन बाळंतपण करून जा' असं जाहीरपणे आवाहन करून स्त्रियांच्या चळवळीवर स्वैराचाराचे आरोप करणारे किंवा 'घटस्फोटाच्या कायद्याच्या सोपेपणामुळे स्त्रिया भराभरा घटस्फोट घेतात' म्हणणारे लोक जोतिबांनी केलेल्या या जाहीर आवाहनावर काय म्हणाले असते, हा विचार मनोरंजक ठरेल! बालहत्या प्रतिबंधकगृहाचं हे काम सावित्रीबाईंनी केवळ अंगावर पडलं म्हणून किंवा केवळ कर्तव्यभावनेनं निभावलं नाही तर, अतिशय प्रेमानं आणि काळजीनं त्यांनी या कात्रीत सापडलेल्या, गरोदर, विधवा किंवा अन्य पतित स्त्रियांची सुटका आणि देखभाल केली.

बालहत्या प्रतिबंधकगृह ठाम भूमिकेतून चालवलं, हे तर विलक्षण आहेच; पण त्यातलंच एक मूल स्वत: दत्तक घेणं ही कृतिशीलतेची आणखी एक महत्त्वाची पायरी आहे. लग्नानंतर योग्य त्या कालावधीनंतरही या जोडप्याला मूल होत नाही हे बघून, त्यावेळच्या वातावरणानुसार घरातल्या वडीलधाऱ्यांचा जोतिबांमागे दुसऱ्या लग्नाचा लकडा चालू झालाच होता. यावेळी जोतिबांनी केलेल्या सवालाला फार धार आहे आणि त्याला मोठे परिमाणही आहे. 'पुरुषाला जर एकाहून अधिक लग्नं करण्याची मुभा असेल तर स्त्रीलासुध्दा अनेक नवरे करण्याची परवानगी का असू नये?' या सवालात स्त्री पुरुष समतेच्या मूल्याचा विचार आहेच; त्याशिवाय जोडप्याला मूल झाले नाही तर, दोष एकट्या स्त्रीचाच असतो, या गृहितालाही यात प्रश्न विचारला गेला आहे. नवऱ्याच्या दोषामुळे मूल होत नसेल तर मुलासाठी किंवा अन्यही कारणासाठी स्त्रीने दुसऱ्या लग्नाचा विचार

करायला काय हरकत आहे, असं जोतिबा विचारू शकले. त्यांच्यानंतर, आज विसावं शतक संपत आलं असतानाही, घरीदारी पुरूषाच्या दुसऱ्या विवाहाइतकी सहज मान्यता स्त्रीच्या दुसऱ्या विवाहाला मिळताना दिसत नाही, हे वास्तव नजरेआड करून चालणार नाही.

विधवांची स्थिती-विशेषत: उच्च जातीतील विधवांची स्थिती गेल्या शतकात आजच्याहून भीषण होती. वय कोणतंही असो, नवरा वारला की त्याच्या विधवेचं केशवपन करणं ही; तिच्या खाण्यापिण्याच्या आणि वस्त्रप्रावरणाच्या निर्बंधाबरोबरची दुष्ट परंपरा विधवांच्या बाबतीत पाळली जात असे. केशवपनामुळे स्वत:चे तोंड लपवावेसे वाटावे अशी परिस्थिती त्यांच्यावर लादली जायची आणि त्याचवेळी दरमहा वाढणारे केस कापण्यासाठी, अंधाऱ्या आडोशाला बसून न्हाव्याला सामोरं जावं लागायचं! यावर सावित्रीबाईंनी जोतिबांबरोबरच्या चर्चेतून एक विलक्षण कल्पना लढवली. त्यांनी मुळी न्हाव्यांनाच आवाहन करणारी परिषद घेतली. केशवपनाच्या रुढीतून स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराचं स्वरूप न्हावीबंधूना समजावून सांगून, त्यांनी न्हाव्यांचा संप घडवला. या संपाचं वेगळेपण हेच त्यातले मोठेपण आहे. हा संप न्हाव्यांच्या दरवाढीसारख्या मागण्यांसाठी नव्हता; उलट या संपामुळे एका परीने त्यांच्या दरमहाच्या उत्पन्नात कायमची कपात होण्याचीच खात्री होती. तरीसुध्दा विधवा स्त्रियांबाबतच्या बंधुभावातून हा संप झाला. यामुळे ही रुढी कायमची नाहिशी झाली नसली, तरी तिच्या क्रूरतेकडे लक्ष वेधण्याचं, संवेदनाशीलतेला जाग आणण्याचं आणि रुढीचा फेरविचार करण्यासाठी आवाहन करण्याचं बळ, या न्हाव्यांच्या संपानं निश्चितच गोळा झालं असणार! यातही फुले दांपत्याच्या दृष्टीचं विशालपण हे की, आपल्या जातीपुरता कोता विचार न करता, ते मानवतेचा विचार करत होते. माळी समाजात विधवांच्या केशवपनाची चाल नसताना, ब्राह्मणांसारख्या उच्च जातीमधल्या या अमानवी प्रथांवरही हल्ला चढवत होते.

अनेकदा बालविवाहाच्या प्रथेमुळे, तरूणवयातच पतिनिधनाचा आघात स्त्रियांच्या वाट्याला येत असे. कधी-कधी तर विवाह म्हणजे काय हे कळण्यापूर्वीच मुली विधवा होत असत. इतक्या लहान वयातल्या या दु:खद प्रसंगानंतर उभं आयुष्य एकटेपणानं, कुटुंबातलं ओझ्याचं गाढव होऊन, अपमानित आणि दिवाभीतासारखं, विधवांना जगावं लागायचं. म्हणूनच त्यांचा पुनर्विवाह व्हावा यासाठी विधवा विवाह सभेची स्थापना सावित्रीबाईंनी केली होती. समाजमनात खोलवर रुतलेले परंपरागत विचार, एकट्यादुकट्याच्या प्रयत्नांनी दूरही होत नसतात आणि त्यांनी केलेली उपाययोजनाही पुरी पडण्यासारखी नसते. हे लक्षात

घेऊनच, विधवांच्या विवाहासाठी प्रयत्न करण्यासाठी, सावित्रीबाईंनी विधवा विवाह सभेच्या सहाय्याने हा उपक्रम आखला.

महाराष्ट्रात १८९६ साली दुष्काळ पडला, तो जोतिबांच्या निधनानंतरचा दुष्काळ. त्यापूर्वीच्या दुष्काळात सावित्रीबाई-जोतिबांनी बरोबरच काम केलं होतं. दुष्काळग्रस्तांसाठी अन्नछत्र चालवण्याचं काम कष्टाचं आणि जबाबदारीचं होतं. त्यापूर्वीच्या १८७६-७७ मधील दुष्काळात, जोतिबांनी जनतेला दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचं आवाहन केलं होतं. मिळेल तिथून अन्नधान्य जमवून सावित्रीबाईंच्या पुढाकाराने अन्नछत्राची देखभाल होत होती. ठिकठिकाणी छात्रालयं उघडून जवळपास दोन हजार मुलामुलींसाठी जेवणाची सोय करण्यात आली होती. छात्रालयांची जबाबदारीही सावित्रीबाई सांभाळत होत्या. दुष्काळातील सामाजिक परिस्थितीचं मार्मिक वर्णन सावित्रीबाईंच्या ओव्यांमध्ये सापडतं ते असं-

*''दुष्काळ ही पापाची गती । शूद्रादि अतिशूद्र भोगती ।*
*चमचमीत खाऊन वदती । पुण्यातले पुण्यवान ।*
*नाना कथा चित्रविचित्रे । दावती खोटी पुराण सूक्ते ।*
*धर्मकर्माची भयचित्रे । सर्वांपुढे करूनिया ।''*

दुष्काळासारखं संकट असो की प्लेगसारखी साथ असो - आपल्या घराच्या पलीकडे, समाजाची परिस्थिती ओळखून मदतीला धावून जाण्याचा या दांपत्याचा परिपाठ होता. त्यामुळे जोतिबांच्या निधनानंतरच्या १८९७ च्या प्लेगच्या साथीमध्ये रुग्णांची सेवा करता-करताच रोगाची लागण झाल्यामुळे सावित्रीबाईही या साथीच्या बळी ठरल्या! एखाद्या सैनिकाने किंवा सेनानीने युध्दात लढता-लढता मरण स्वीकारावे तसेच मरण सावित्रीबाईंनी स्वीकारले! जोतिबांच्या हयातीत, त्यांच्या बरोबरीनं आणि त्यांच्या पश्चात् एकटीने-पण त्याच बांधिलकीने सावित्रीबाईंनी काम केले. १८९३ च्या सत्यशोधक परिषदेचं अध्यक्षपद सावित्रीबाईंनी भूषवले होते. त्यांच्या स्वतंत्र, आत्मनिर्भर व्यक्तिमत्वाचं दर्शन, जोतिबांच्या निधनानंतरच्या त्यांच्या वाटचालीत अधिक स्पष्ट झालं!

जोतिबा-सावित्रीबाईंच्या रुपाने, सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे एक धडा घालून देणारं सहजीवन या साऱ्या घटनांच्या प्रवासामधून बघायला मिळतं. जोतिबांकडे येणाऱ्या माणसांचं घरात केवळ स्वागत आणि जेवणखाण करण्यापुरती सावित्रीबाईंची भूमिका सीमित दिसत नाही. शिक्षण, परिषदा, विचारप्रसार, रुग्णसेवा, बालहत्या प्रतिबंधकगृह, दुष्काळग्रस्तांची देखभाल यासारख्या कामांत जोतिबांच्या बरोबरीने त्या स्वतः कामात उतरलेल्या दिसतात. निपुत्रिकतेची खंत न करता मुलगा दत्तक घेणे, त्याच्या विवाहातून मित्र विवाहाची कृती करून एक

नवे पाऊल टाकणे, हेही त्यांचे वेगळेपणच! पण 'यशवंता' पुरतेच आपले पालकत्व बांधून न ठेवता, एका परीने साऱ्या समाजाचंच पालकत्व या जोडप्याने शिरावर घेतले, हे विशेष! या कामाचे व्यापक स्वरूप लक्षात घेता, समाजातला विरोध बघता, जोतिबा, सावित्रीबाई, यशवंता - हे कुटुंब का फुटलं नाही? कुटुंबातला मुलगा रक्ताच्या नात्याचा नव्हता, तरी हे कुटुंब एकसंघ का राहू शकलं? तर्क असं सांगतो की, खांद्यावर घेतलेल्या घरादाराच्या, समाजाच्या जबाबदारीत, सर्वांनी समजदारीने वाटा उचलला! सावित्रीबाईंच्या स्वातंत्र्याचा, विकासाचा विचार करत, त्याविषयी जोतिबांनी आदर बाळगला. त्यासाठीचं आपलं योगदान आनंदानं स्वीकारलं!

स्त्री-स्वातंत्र्याच्या आणि स्त्रीपुरुष समानतेच्या चळवळीतून जाग्या झालेल्या, 'सचेतन' झालेल्या कार्यकर्त्या घरं फोडतात, कुटुंब मोडतात, असं आजही लोक म्हणतात; तेव्हा माझे डोळे जोतिबा-सावित्रीबाईंकडे वळतात. जोतिबांसारखा समंजस जोडीदार असेल तर त्याची सहचरी माणूस म्हणून उमलत जाते, कर्तृत्वाच्या सुगंधाचं दान समाजाला करू शकते. ती सावित्रीबाईंएवढी कर्तृत्ववान नसली, तो जोतिबांच्या तोलामोलाचा नसला तरीही, एकमेकांची कदर करत, काळजी वाहत, आदर बाळगत जाणारं जोडपं त्यांच्या स्वत:च्या कुवतीएवढं मोठं होतं आणि साफल्याचा अनुभव घेत जीवन जगू शकतं! हे सारं या शब्दांत न बोलूनही, जोतिबा-सावित्रीबाई या जोडप्यानं करून दाखवलं. चुकतमाकत, शिकत वाढत जाणाऱ्या पत्नीला स्वीकारू न शकणाऱ्या नवऱ्यामुळेसुध्दा घरं फुटतात. म्हणून आपल्या सर्व शक्तीनिशी आणि सजगतेसह प्रत्येक जोडप्यानं जोतिबा-सावित्रीबाईंकडे बघत, आपलं आयुष्य जगण्याचा प्रयत्न केला, तरी समाजात केवढातरी बदल दिसू लागेल, असा मला विश्वास वाटतो. (हिमालयाच्या अत्युच्च शिखराची आठवण काढत, आपल्या घराच्या पन्नास पायऱ्या न दमता चढण्याची आकांक्षा ही आपली सुरुवात का ठरू नये?)

हे सारं म्हणणं मला आज अशासाठी महत्त्वाचं वाटतं की, आजही सावित्रीबाईंची थोरवी वर्णन करून, स्त्रियांपुढे बोलताना मी एक अनुभव पुन्हापुन्हा घेतला आहे.

'सावित्रीबाईंनी कष्टांनी जे पेरलं, ते आज आपण आरामात खातो आहोत. त्यांच्याच खांद्यावर आपलं जीवन उभं आहे. आता आपण आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी कोणत्या अक्रोडाची झाडं लावणार?' असा प्रश्न विचारल्यावर काहीशा प्रामाणिकपणे, पण काहीशा नकारात्मक दृष्टिकोनातून त्या स्त्रिया मला प्रश्न विचारतात, 'सावित्रीबाईंच्या पाठीशी जोतिबा होते आणि ते त्यांना बरोबरीनं घेऊन

जाऊ इच्छित होते! आमचं काय?' त्यांचा प्रश्न आजच्या सहजीवनाविषयीचं कटू वास्तव सांगणारा आहे.

या जोडप्याचं सहजीवन समतेचं, स्वातंत्र्याचं मूल्य जपणारं तर दिसतंच, पण यांचं पालकत्वही थोर होतं. आजही वाढत्या लोकसंख्येचा आणि अनाथ मुलांचा प्रश्न डोळ्यांपुढे दिसत असतानाही, मूल दत्तक घेण्याचा विचार सहजपणे समाजाच्या पचनी पडलेला दिसत नाही. विशेषत: आजही कित्येक घरात, मूल दत्तक घेण्याला पुरुषाचा विरोध दिसतो. जैविक पितृत्व हे पुरुषार्थाचं एक महत्त्वाचं लक्षण मानण्याची प्रथा आजही पुरुषांच्या मनावर हुकुमत चालवताना दिसते. म्हणूनच, गरोदर विधवांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह इ.स. १८६३ साली, स्वत:च सुरू करणे आणि त्यानंतर त्यातलेच एक मूल दत्तक घेणे हे फुले दांपत्याच्या जबाबदार पालकत्वाचं नमुनेदार चित्र जाणवतं. पण या जोडप्यानं जैविक पालकत्वाचा विचार जितक्या सहजी ओलांडला, तितक्याच सहजपणे त्यांनी एकप्रकारे स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूलभूत मूल्यांवर चालणाऱ्या समाजनिर्मितीसाठी, त्याचेही पालकत्व स्वीकारलं.

या पालकत्वाचाच एक अतूट भाग आहे मातृत्वाचा. याचाही मी सुरुवातीलाच उल्लेख केला आहे. केवळ विवाहांतर्गत, जैविक मातृत्वाचेच अवडंबर आपल्या संस्कृतीत आहे. विधवांचं मातृत्व आणि त्यांचे अपत्य याविषयीची बालहत्या प्रतिबंधकगृहानं दाखवलेली माणुसकीची जाण आजही दुर्मिळ असताना, मातृत्वाचे हे सीमित गौरव कशासाठी? शिवाजी महाराजांची घडण करणाऱ्या जिजाऊचा मलाही अभिमान जरूर आहे. पण सगळ्याच माता आणि सगळीच मुलं जिजाऊ-शिवबा होऊ शकत नाहीत. अशावेळी मातृत्वाला नैतिकतेच्या सांस्कृतिक मखरात बसवण्याऐवजी, त्याहून विशाल मातृत्वाच्या ज्या दोन वाटा, सावित्रीबाईंच्या जीवनानेच आपल्यापुढे इतक्यापूर्वीच ठेवल्या आहेत, त्यांचा खरा गौरव आपण का करत नाही? स्वत:च्या नवऱ्यापासून मूल जन्माला घालायची इच्छा असणाऱ्या स्त्रीला हे स्वातंत्र्य आहेच. त्यापलीकडे तिला काही कारणासाठी, काही कामासाठी या प्रकारचं मातृत्व नको असेल तर, तिला ते नाकारण्याचं स्वातंत्र्यही स्वीकारणारी नवी संस्कृती जन्माला यायला हवी. किंबहुना त्याहीपलीकडे जाऊन स्वत:चे मूल असून, नसून किंवा नाकारूनही, एखाद्या स्त्रीनं आपल्या कुटुंबापलीकडच्या 'मोठ्या समाजकुटुंबाचं' मातृत्व स्वीकारायचं ठरवलं तर त्याची बूज आपण कशी राखणार आहोत?

मला आवर्जून असं सांगावंसं वाटतं, की जोतिबा-सावित्रीबाईंच्या जीवनातले घटनाप्रसंग तर महत्त्वाचे आहेतच आणि त्यांच्या तपशिलांविषयी

लिहिणंबोलणं तर अगत्याचं आहेच; पण याच्याही पलीकडे जाऊन या अलौकिक जोडप्याकडे बघत-बघतच, त्यांच्यानंतरच्या शंभर-दीडशे वर्षांत आपण किती आणि काय-काय ओलांडत, मागे टाकत जात आहोत, हेही बघायला हवं. त्यांच्या जीवनात एक बाप, एक आई, एक पती, एक पत्नी आणि एकत्रितपणे पालक अशा ज्या-ज्या भूमिका त्यांनी घेतल्या आणि सहजपणे निभावल्या, त्यांचा विचार करत, त्या अंगीकारण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. अन्यथा ज्ञानेश्वरीची पारायणं, गुरूचरित्राचे सप्ताह आणि कुणाकुणाची दोनशेवी आणि सातशेवी जयंती/पुण्यतिथी यांच्यासारखाच जोतिबा-सावित्रीबाईंच्या नावांचा उच्चार हा एक पोकळ, अर्थशून्य उपचार ठरेल. स्त्रीमुक्ती किंवा मानवमुक्ती यातला आज महत्त्वाचा ठरलेला कोणताही शब्द हाताशी न धरता, सर्वस्वानं समाजात सर्वांगीण बदल घडवण्यासाठी आटापिटा करणाऱ्या जोतिबा-सावित्रीबाईंना म्हणूनच मला एकत्रितपणेच अभिवादन करावंसं वाटतं!

✱

# एकोणिसाव्या शतकातील स्त्री-जीवन

नीला उपाध्ये

आजच्या आघाडीच्या कथाकार आशा बगे यांची, निराधार विधवेची फरफट सांगणारी 'निवडुंग' नावाची एक सुरेख कथा आहे. ती कथानायिका विधवेची व्यथा सांगताना म्हणते, 'आम्हा विधवांचं जिणं म्हणजे कसं अगदी निवडुंगासारखं असावं, अशी साऱ्यांची अपेक्षा असते. निवडुंग कसा कुठेही टाका-तिकडे तगतो! तसं आम्ही जगावं, असं साऱ्यांना वाटतं. अहो, घरातल्या एखाद्या खोलीतलं एखादं कपाट जरी नेहमीच्या जागेवरून हलवलं, तरी ती खोली रिकामी-रिकामी वाटू लागते, पण आमच्यासारख्या, साऱ्यांनाच नकोनकोशा झालेल्या विधवांची पाठवणी एका घरातून दुसऱ्या घरी केली, तर कुणालाही चुकल्या-चुकल्यासारखं देखील वाटत नाही बघा!'

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर, संपूर्ण हिंदुस्थानात, स्त्री-शिक्षण व समाजसुधारणा चळवळीच्या आद्यप्रवर्तक महिला ठरणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतिबा फुले यांच्या काळ-कर्तृत्वाची पार्श्वभूमी असलेल्या, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या स्त्री-जीवनाचा वेध घेऊ लागले तेव्हा, वरील वाक्य सहजच आठवले. कारण, सक्तीचे बालविवाह, त्यातून ओढवणारे अकाली वैधव्य, केशवपनाची विद्रूपता, तारुण्यसुलभ भावना-वासनांच्या कोंडीतून घरच्यांकडूनच लादला जाणारा व्यभिचार, शापित मातृत्वाची बदनामी टाळण्यासाठी गतभर्तृकांकडून विहीर जवळ केली जाणे - हेच एकोणिसाव्या शतकातील बहुतांश स्त्रियांचे भागधेय होते! एका परीने कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी त्यांच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीत घडवलेले जीवनदर्शन म्हणजे तत्कालिन स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक चित्रणच मानायला हवे. किंबहुना मराठीतील पहिली कादंबरी-बाबा पद्मनजी लिखित 'यमुनापर्यटन' ही कादंबरी - विधवांचे दु:ख चितारणारीच आहे.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे राहून, एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवनाकडे आपण मागे वळून पाहतो तेव्हा लक्षात येतं की, अनेक महत्त्वाच्या राजकीय-सामाजिक स्थित्यंतराचा तो कालखंड एकूणच 'स्त्री' या मनुष्यप्राण्याचे निश्चित अस्तित्व-महत्त्व उमजले जाण्याच्या दृष्टीने फार क्रांतिकारी ठरला. एकोणिसावे शतक हे आपण भारताच्या इतिहासात प्रबोधनाचे युग मानतो.

इ.स. १८१८ साली महाराष्ट्रातील पुण्याच्या शनिवारवाड्यावरील मराठेशाहीचा भगवा झेंडा खाली उतरून त्यावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकला आणि सबंध हिंदुस्थानभरच्या ब्रिटीश सत्तेवर शिक्कामोर्तब झाले. हे केवळ राजकीय सत्तांतर नव्हते. त्या नव्या राजवटीबरोबर नव्या संस्था, धर्म-समाजव्यवस्थेची नवी मूल्ये, जागतिक संदर्भ असलेली नवी अर्थव्यवस्था आली आणि एकूणच समाजमंथन सुरू झाले.

पाठोपाठ १८३५ साली लॉर्ड मेकॉलेने हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणपध्दती आणली आणि राजकीय सत्तांतराबरोबर आनुषंगिकपणे येणारे सामाजिक परिवर्तनाचे रंग अधिकच गहिरे झाले! त्यातही पुणे शहर प्रदीर्घ काळ पेशवाईच्या प्रभावाखाली राहिले. पण मुंबई शहरात जागतिक व्यापार करणाऱ्या बंदराची अशी एक सर्वसमावेशक, मोकळीढाकळी संस्कृती बनत गेली. स्त्रीपुरुष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य अशा; तोवर भारतीय समाजाला अपरिचित असलेल्या जीवनमूल्यांचा उद्घोष ही नवी शिक्षण प्रणाली करीत होती. त्या शिक्षणाचा लाभ होऊन नव्या आकांक्षा जागृत झालेल्या येथील नवशिक्षित समाजातील फुले दांपत्य, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, पंडिता रमाबाई यांसारख्या पुरोगाम्यांना, समकालीन स्त्रियांच्या सनातन व्यथावेदनांचे सामाजिक भान प्रथमच व्यापक पातळीवरून प्रखरपणे आले आणि प्रतिगामी सनातन्यांच्या दबावाला बळी न पडता स्त्रीसुधारणेचा विचार ते जाहीरपणे मांडू लागले. आपल्या कुटुंबियांच्या विरोधाला न जुमानता आपल्या 'कुटुंबाच्या' म्हणजे पत्नीच्या हाती पाटी-पेन्सिल देऊ लागले. इतर चारचौघा नवऱ्यांहून वेगळा असलेला आपला पती आपल्यासारख्या मातीच्या गोळ्यातून एक स्वतंत्र विचारशक्ती, व्यक्तिमत्व असलेला नवा माणूस घडवू पाहत आहे. याविषयीच्या कृतज्ञतेच्या भावनेने भारावलेल्या तत्कालिन सुशिक्षित स्त्रिया इतक्या पतिअनुगामिनी असत की, घरातल्या ज्येष्ठ माणसांच्या विरोधाला न जुमानता पतीची आज्ञा त्या शिरसावंद्य मानत.

पण हे पतिअनुगामित्व कधी-कधी इतके टोकाचे असे की, यातील मुळात स्वत:ही अत्यंत कर्तबगार असलेल्या खूपशा स्त्रियांचे कर्तृत्व पतिनिधनानंतरच खऱ्या अर्थाने बहरत असे. 'टिळकांच्या अस्थि पेटीत गेल्या आणि मग मला माझ्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव झाली' हे 'स्मृतिचित्रे'कार लक्ष्मीबाई टिळकांचे वाक्य सर्वश्रुतच आहे!

'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आत्मचरित्र लिहिताना आपले पती न्या. महादेव गोविंद रानडे यांचे थेट नाव न घेता, सतत त्यांचा निर्देश

शालीनपणे 'स्वत:' असा करणाऱ्या रमाबाई रानडे यांचेही कर्तृत्व महादेव तथा माधवरावांच्या निधनानंतरच बहराला आल्याचे आढळते. तशा त्या १८७७ पासून मुंबईतील प्रार्थना समाजात डॉ. सखाराम अर्जुन राऊत, डॉ. आत्माराम दादा तर्खडकर, भास्कर हरी भागवत, सदाशिव पांडुरंग केळकर प्रभृती प्रार्थनासमाजी, स्त्रियांच्या ज्या सभा भरवीत असत, त्यांना उपस्थित राहत. त्या ५०-६० भगिनीसमोर सौ. गंगूताई भांडारे, सौ. काशीबाई गोविंदराव कानिटकर प्रभृतींनी वाचलेले स्त्रीजीवनविषयक निबंध ऐकता-ऐकता १८८१ साली स्वत: रमाबाईनीही त्या सभेपुढे 'स्त्रियांना अवश्य विद्या कोणती?' आणि 'स्त्रियांचे संसारातील कर्तव्य' हे दोन निबंध वाचल्याची नोंदही सापडते. पण पुण्यात आपल्या वाड्यात 'हिंदू लेडीज सोशल क्लब'ची १९०२ साली रमाबाईनी केलेली स्थापना काय, किंवा १९०८ साली मुंबईत आणि पुढील वर्षी पुण्यात त्यांनी मलबारी शेठ, दयाराम गिडुमल, सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर या पुरोगामी पुढाऱ्यांच्या सहकार्याने केलेली सेवासदनची स्थापना काय; १९०१ साली माधवरावांचे निधन झाल्यानंतरच झाली, हे लक्षात घ्यायला हवे.

नवऱ्याचे ऐकून इंग्रजी शिक्षण घेऊ लागलेल्या रमाबाई रानडे यांचा तसेच काशीताई कानिटकरांचा घरच्यांकडून जबर छळ होण्याच्या त्या काळात, स्वत:च्या पतीकडून चक्क थेट अमेरिकेला वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी पाठवली गेलेली, हिंदुस्थानातील पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई गोपाळ जोशी अमेरिकेहून स्वदेशी परतल्यावर अवघ्या अडीच महिन्यांनी २६ फेब्रुवारी १८८७ रोजी, पतीच्याच हट्टामुळे मृत्युमुखी पडली. आपली प्रकृती ढासळत आहे, हे वैद्यकीय ज्ञानामुळे उमजत असतानाही, कॅम्पातल्या डॉक्टरला बोलावून न घेता, आपला विक्षिप्त पती ब्राह्मणांकडून दररोज शिंपडत असलेल्या तीर्थांचा अंगाऱ्याधुपाऱ्यांचा, ग्रहशांतीयज्ञांचा तमाशा ती बुध्दीमती तरुणी अगतिकपणे बघत राहिली आणि वयाच्या अवघ्या बावीसाव्या वर्षी क्रूर काळाची शिकार झाली. भगीरथ प्रयत्नांनी घेतलेले वैद्यकीय शिक्षण पती हट्टामुळे तिच्या उपयोगी ठरू शकले नाही. तरी ती स्नेहशील तरूणी आपल्या अमेरिकन मैत्रिणीना लिहित राहिली, 'मला ठाऊक आहे - अमेरिकेत आपल्या स्त्रियांशी चांगले वागणारे पुष्कळ नवरे आहेत. ते आपल्या बायकांना खूप सुखही देत असतात. तथापि, या सर्वांच्या तुलनेतही माझा पती अधिक चांगला, अधिक श्रेष्ठ आहे, असं मला वाटतं!'

या सर्व महिलांपेक्षा सावित्रीबाई फुले वेगळ्या ठरतात कारण, त्या अशा पतिअनुगामिनी नव्हत्या; त्या पतिसहगामिनी होत्या! तात्या भिडे यांनी मुलींची

शाळा काढण्यासाठी जोतिबांना पुण्यातील आपली जागा मोफत दिली व सोबत १०१ रुपयांची देणगी दिली. तिथे १८४८ साली जोतिबांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. बायामाणसांनी अक्षरे वाचली तरी, त्या अक्षरांच्या आळ्या बनून घरच्या पुरुषांच्या ताटात जातात, अशा वेडगळ कल्पना रुढ असल्याच्या त्या काळात अन्नपूर्णा जोशी (वय पाच वर्षे), सुमती मोकाशी (४ वर्षे), दुर्गा देशमुख (६ वर्षे), माधवी थत्ते (६ वर्षे), सोनू पवार (४ वर्षे), जनी कर्डिले (५ वर्षे) या सहा ब्राह्मणा-धनगर-मराठा मुलींनी या शाळेत प्रवेश घेतला. जातीपातीचा विचार न करता, या सर्व मुलींना आईच्या ममतेने शिकवायला जाताना सावित्रीबाईंनी सनातन्यांकडून दगड-शेणगोटे फुलासारखे झेलले. 'हे श्रीहरीचे काम आहे' असे सांगत, स्वत: अभ्यासक्रम पूर्ण करीत सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाचे कार्य इतक्या चिकाटीने केले की, मेजर कँडी यांना शाळेतील विद्यार्थिनींच्या प्रगतीबद्दल समाधानाचे उद्‌गार काढावे लागले! सत्यशोधक समाजाचे नेतृत्व, केशवपनास विरोध, बालविवाहास विरोध, विधवाविवाह, स्त्री-शूद्रातिशूद्रांना शिक्षणदान, सती चालीस विरोध, निराधार बालके-स्त्रिया यांच्यासाठी आधार-अन्नछत्र चालवणे, बालहत्या प्रतिबंधक गृह चालवणे (१८५३) अशा अनेक बाबतींत सावित्रीबाईंनी जोतिबांच्या बरोबरीने इतके समाजकार्य केले की, जोतिबांना जाहीरपणे मान्य करावेसे वाटले- 'माझ्या हातून जे काही घडले, त्यास माझी पत्नी कारणीभूत आहे.' अन् थोर चरित्रकार धनंजय कीर यांना 'म. जोतीराव फुले' या चरित्रग्रंथात हे नमूद करावेसे वाटले. पांडित्य आणि प्रतिभा असलेली एकोणिसाव्या शतकातील स्त्री, म्हणून पंडिता रमाबाईचा उल्लेख केला जातो. परंतु (१८५८ साली जन्मलेल्या) रमाबाईपेक्षा दोन दशकांहून अधिक वर्षे आधी (३ जानेवारी १८३१ रोजी) जन्मलेल्या सावित्रीबाई या दोन्ही गुणांत कमी नव्हत्या. त्या प्रतिभाशाली कवयत्री, उत्तम अभ्यासिका, नि:स्वार्थी समाजसेविका आणि म. फुल्यांच्या मृत्युनंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करणाऱ्या महान नेत्या होत्या.'

एका परीने सनातन काळापासून १९व्या शतकापर्यंत अज्ञान, बालविवाह, वैधव्य, संपूर्ण परावलंबन यामुळे विध्वंस, ऱ्हास, विनाशाच्या दिशेने शतकानुशतके चाललेली भारतीय स्त्रीजीवनाची लाट थोपवण्याचा पहिला प्रयत्न सावित्रीबाईंनी केला. हजारो वर्षांच्या स्तब्धतेचा भंग त्यांनी आपल्या कार्याने केला, असे म्हणावे लागते, कारण प्रार्थनासमाजी कुटुंबांतील स्त्रियांचे त्या काळातील पुरोगामित्व हा एक सुखद अपवाद होता! डॉ. सरोजिनी वैद्य यांनी त्यांच्या 'संक्रमण' या ग्रंथातील 'उपासनेला दृढ चालवावे' या प्रार्थना समाजावरील लेखात, वैयाकरणी दादोबा पांडुरंग (तर्खडकर) यांचे धाकटे बंधू, प्रार्थना समाजाचे

संस्थापक डॉ. आत्माराम पांडुरंग (१८२३ ते १८९८) यांच्या प्रगतशील कन्यांच्या अत्यंत हृद्य आठवणी पुढीलप्रमाणे सांगितलेल्या आहेत :-

'विल्सन कॉलेजजवळील डॉ. आत्मारामाच्यांच घरात प्रार्थना समाजाची पहिली बैठक झाली होती. त्यांनी आपल्या पत्नीला आणि दुर्गा, अन्नपूर्णा व माणक या तिन्ही मुलींना उत्तम इंग्रजी शिक्षण दिले होते... आत्मारामांची आणि रविंद्रनाथ टागोरांचे मोठे बंधू सत्येंद्रनाथ टागोर यांची खूप मैत्री होती. सतरा वर्षांच्या रविंद्रनाथांना प्रथम इंग्लंडला पाठवण्यापूर्वी, इंग्रजी भाषेची व प्राश्चात्य रीतिरिवाजांची नीट माहिती व्हावी म्हणून सत्येंद्रनाथांनी त्यांना आत्मारामांच्या घरात १८७८ साली आणून ठेवले होते. इथेच रविंद्रनाथांना अविस्मरणीय अशी अँना (अन्नपूर्णा) ही अवखळ, धीट, कलासंपन्न मैत्रीण भेटली होती. रविंद्रनाथांनी तिला 'नलिनी' असे नवे नाव देऊन 'शुन नलिनी खोलो गो आखि' अशी एक सुंदर कविताही लिहिली होती. ती कविता अँनाला इतकी आवडली की, ती इंग्रजीतून कविवर्यांना म्हणाली होती, 'कविवर्य, मला वाटतं - उद्या जर कधी मी मृत्यूशय्येवर पडले तर तुमच्या कविता मला नवजीवन देतील!' एकोणिसाव्या शतकात या देखण्या अन्नपूर्णेचा विवाह हॅरॉल्ड लिट्लहेड या आयरिश माणसाशी झाला होता तर वडिलांप्रमाणेच डॉक्टर झालेल्या धाकट्या माणकने आपल्या पारशी वर्गमित्रांचा वकीलभाऊ बॅरिस्टर डी. एम. बहादुरजी याच्याशी, पारशी समाजाच्या विरोधाला न जुमानता प्रेमविवाह केला होता... १८६६ साली मेरी कार्पेंटर स्त्री-शिक्षणाच्या कार्यासाठी इंग्लंडमधून जेव्हा भारतात आली, त्यावेळी अगदी दुसऱ्याच दिवशी डॉ. आत्माराम आपल्या तिन्ही मुलींसह मेरीला भेटायला गेले होते. साध्या पण नीटनेटक्या पोषाखातील त्या शाळकरी हिंदू मुली सहजतेने इंग्रजी बोलत होत्या, साता समुद्रापलीकडच्या इंग्लंडबद्दल मेरीला कुतुहलाने प्रश्न विचारत होत्या. त्यांच्या या भेटीनंतर मेरीला वाटायला लागले, 'हिंदुस्थानातील स्त्रियांच्या मागासलेपणाबद्दलची आपली समजूत चुकीची तर नाही?' पण नंतर पुढील सहा महिन्यांच्या हिंदुस्थान-भ्रमणाच्या काळात तिच्या लक्षात आले की, हा केवळ सुखद अपवादच होता!'...

पण तर्खडकर-भगिनी, डॉ. काशीबाई नवरंगे यांसारख्या, प्रार्थना समाजाच्या मोकळ्या वातावरणात तयार झालेल्या सुशिक्षित, व्यक्तित्वसंपन्न स्त्रिया हाताच्या बोटावर मोजण्या इतपतच! प्रार्थना समाजाच्या निमंत्रणावरून ३१ मे १८८२ रोजी मद्रासमार्गे पुणे शहरात येऊन प्रथम 'आर्य महिला समाजा'ची व नंतर 'शारदा सदन'ची स्थापना केलेल्या, आयुष्याच्या उत्तरार्धात ख्रिस्ती धर्मस्वीकारामुळे वादग्रस्त झालेल्या पंडिता रमाबाई सरस्वती मेधावी (डोंगरे) ही;

महाराष्ट्राबाहेर मंगरूळजवळ जन्मलेली व हिंदुस्थानभरचे पाणी प्यायलेली अनंतशास्त्री डोंगरे यांची कन्या देखील अपवादात्मकच होती. संमतीवयाच्या विधेयकासाठी झगडणाऱ्या मलबारीशेठच्या सुधारणाविषयक निवेदनांपासून स्फूर्ती घेऊन, बालविवाहाने आपल्यावर पती म्हणून लादले गेलेल्या दादाजी भिकाजीपासून सुटका मिळावी म्हणून १८८४ ते १८८७ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात लढून एक नवा सामाजिक इतिहास घडवलेल्या डॉ. रखमाबाई ही पाचकळशी ज्ञातीतील स्त्रीही अपवादात्मकच होती. 'हिंदू लेडी' या टोपण नावाने १८८५ साली 'टाइम्स ऑफ इंडिया'त रखमाबाईंनी 'बालविवाह' व 'सक्तीचे वैधव्य' या विषयांवर इंग्रजीतून लिहिलेल्या पत्रांनी तेव्हा एकच खळबळ माजवली होती!

एरव्ही मराठी समाजातील, त्यातही तथाकथित उच्चवर्णियांतील बहुतांश स्त्रियांची दुर्दशा बालविवाहाच्या रुढीमुळे कीव करण्याजोगीच होती. तथाकथित खालच्या जातीतील विधवांचा 'पाट लागत असे' म्हणजे पुनर्विवाह करून दिला जात असे. पण ब्राह्मणादि कथित उच्चवर्णियांतील विधवेचा पुनर्विवाह शास्त्रसंमत मानला जात नव्हता. मात्र 'अष्टवर्षात् भवेत् कन्या' अशासारख्या वचनांनी बालविवाहाला शास्त्राने पर्यायाने संमती दिलेली होती. वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत मुलगी ऋतुमती होईस्तोवर तिला घरात अविवाहित ठेवणे म्हणजे मुलीच्या आईबापांना घोर वाटायचा. नवऱ्या मुलाचे वय, आरोग्य काहीही न बघता आपल्या घरातली ब्याद त्याच्या गळ्यात अडकवून आपण एकदाचे मोकळे व्हायचे, एवढाच ध्यास आई-बापांना लागलेला असायचा. प्लेग, हिवतापासारख्या जीवघेण्या रोगांच्या साथी-अपुऱ्या वैद्यकीय सोयी, यामुळे पुरुषाचे सरासरी आयुर्मान ४०-४५ वर्षेच असण्याच्या त्या काळात जरठबाला विवाह संमत असल्याने आठ-दहा वर्षांच्या कितीतरी नाजुक जुईच्या कळ्यांसारख्या मुली निवडुंगासारख्या निबर पतीच्या बलात्कारसह शारीरिक जबरीमुळे एक तर कुस्करल्या तरी जात, सततच्या बाळंतपणाच्या चक्रात अडकून चिपाड होऊन जात किंवा कळते व्हायच्या आधीच वैधव्याची शिकार बनत.

इ.स. १८८१ च्या शिरगणतीनुसार हिंदुस्थानात एकोणीस वर्षांच्या आतील बालविधवा ६ लाख, ६९ हजारांहून अधिक होत्या. पण विधवांच्या पुनर्विवाहाची इष्टता मात्र सनातनी मान्य करायला तयार नव्हते. विष्णुशास्त्री पंडितानी लोकहितवादींच्या सहाय्याने १८६५ साली 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळा'ची स्थापना केली होती व पुढे एप्रिल १८७४ मध्ये ४७व्या वर्षी कुसाबाई या २५ वर्षांच्या विधवेशी पुनर्विवाह करून, त्यांनी स्वत:च्या आचरणाने धडाही घालून दिला

होता! त्याआधी १८६९ मध्ये विधवाविवाहेच्छू पांडुरंग करमरकरांचा विवाह ब्राह्मण समाजातीलच वेणूताई परांजपे या विधवेशी वृत्तपत्रीय जाहिरातीच्या माध्यमातून जुळवून विष्णूशास्त्रींनी खूप खळबळ माजवली होतीच. १८७० साली पाचकळशी समाजातील विधुर डॉ. सखाराम अर्जुन यांनी (डॉ.) रखमाबाईची विधवा आई जयंतीबाई यांच्याशी पुनर्विवाह केला होता. (या विवाहाचे वैशिष्ट्य म्हणजे, सुशिक्षित जयंतीबाईंनी स्वतः आत्मविश्वासाने डॉ. सखाराम अर्जुन यांना पत्र लिहून त्यांच्याशी पुनर्विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली होती!) त्याही अगोदर १८६० मध्ये गौड सारस्वत जातीत रघुनाथ जनार्दन व चिमाबाई यांचा पुनर्विवाह झाल्याची नोंद आढळते.

परंतु २५ जुलै १८५६ रोजी संमत झालेल्या कायद्यान्वये, हिंदूधर्मीय विधवा स्त्रियांच्या विवाहाला कायदेशीर मान्यता दिली गेली असली तरी, जनमानसावरील रुढीच्या पगड्यामुळे पुनर्विवाहितांची वैवाहिक वाटचाल कष्टप्रदच राही. मोरोबा कान्होबा विजयकर यांनी जून १८७० मध्ये जाहिरात देऊन पुनर्विवाह केला होता. पण सामाजिक छळाला कंटाळून वर्षाच्या आतच त्या दुर्दैवी दांपत्याला गोवालिया टँकची विहीर जवळ कराविशी वाटली होती. त्यांची ती आत्महत्त्या होती की खून;-हा त्या काळचा चर्चाविषय होता! १८६९ ते १८८९ या वीस वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात २२ तर गुजरातमध्ये २५ पुनर्विवाह झाल्याची उपलब्ध आकडेवारी, पुनर्विवाह सर्वमान्य होत चालला नव्हता हेच दर्शवते! फार कशाला? सुधारकांचे अग्रणी नेते न्या. रानडे यांना देखिल पितृभक्तीपोटी विधवा-विवाह करण्याचा आपला मूळ विचार सोडून, रमाबाईंशी विवाहबध्द व्हावे लागले होते!

उपरोल्लेखित अपवादात्मक स्त्रिया वगळल्या तर सर्वसामान्य हिंदू स्त्री शूद्रातिशूद्रांइतकीच शोषित होती. तिला पायात जोडा घालायला परवानगी नव्हती. ओसरीवर बाहेर येण्याची मुभा तिला नव्हती; पुरुषांशी दाराआडूनच हळू आवाजात तिला बोलावे लागे. घरच्या कर्त्या पुरुषाने वर्षातून दोनदा सणावारी आणलेली लुगडीच तिला पुरवून पुरवून नेसावी लागत. स्वयंपाकघर, माजघर, कोठीची खोली एवढ्याच भागात तिचा वावर घरात असे आणि चूल व मूल यातच ती अहोरात्र व्यग्र असे. पुरुषांपेक्षा कनिष्ठ असल्याचे संस्कार बालपणापासूनच तिच्यावर बिंबवले जात. लहान मुलींना पंगतीत जेवायला बसताना कधीही पाट दिला जात नसे, मुलें मात्र पाटाशिवाय कधी पंगतीत बसत नसत! मुलीचा तिटकारा सर्वांनाच फार असे. कोणासही मुलगी झाली की, काहीतरी अशुभ झाल्यासारखे दुःख होई. मुलगी म्हणजे बापाच्या गळ्यातली धोंड - या सार्वत्रिक

भावनेतून लवकरात लवकर तिचे हात पिवळे करून आपण मोकळे व्हायचे, एवढी एकच भावना वधुपित्याची असे आणि त्या ओढीतून घरचे आप्तस्वकीयच दुर्दैवी बालविधवांशी अत्यंत निष्ठुरपणे वागत असत.

स्त्री ही पुरुषाची अर्धांगी मानली गेली असल्यामुळे, पती मरण पावताच तिचेही जीवन त्याच्याबरोबरच संपले पाहिजे, असे अपेक्षिले जाई. सती जाण्याची चाल होती तोपर्यंत हे सहज शक्य होते. पण १८३९ साली लॉर्ड बेंटिंग्जने सतीबंदी कायदा जारी केला. त्यामुळे पतीबरोबर मरणे शक्य नसले तर, उरलेले आयुष्य मरणप्राय-कष्टप्रद अवस्थेत पत्नीने काढावे, असे अपेक्षिले जाई. पतीच्या मागे स्त्रीने एकभुक्त राहून जाडेभरडे वस्त्र नेसल्याने, झोपायला कंथा (गोणपाट) घेतल्याने पतीला मोक्ष मिळतो आणि पत्नीलादेखील लवकरात लवकर पतीसह स्वर्गात स्थान मिळते, अशी स्त्रीची समजूत धर्मशास्त्रांनी करून दिली होती.

१९व्या शतकात वैधव्य दुःखातला सर्वांत अमानुष भाग असे तो म्हणजे, विधवेचे सक्तीने केले जाणारे केशवपन! (कविवर्य विंदा करंदीकर त्यांच्या 'धोंड्या न्हावी' या श्रोतृप्रिय कवितेचे वाचन करताना, तिच्यातील गोठ्यात होणाऱ्या केशवपनाच्या खुडबुडीचा संदर्भ आजच्या पिढीला कळत नाही, याबद्दल म्हणून तर नेहमी आनंद व्यक्त करतात!) त्या राक्षसी रुढीला 'नारीणां कबरीबंध पतिबंधाय जायते' या शास्त्रवचनाचा अप्रत्यक्ष पाठिंबा दर्शवला जाई. मृत पतीला मोक्ष मिळण्यासाठी विधवेचा कबरीबंध म्हणजे केशसंभार उतरवणे आवश्यक आहे, असा त्या वचनाच्या कुटिल अर्थ सनातन्यांनी लावला होता. त्यामुळे रुढीप्रिय समाज पतिनिधनानंतरही सकेशा राहिलेल्या विधवांची स्वैरिणी, पापिणी म्हणून संभावना करीत असे. तिचा स्पर्श झालेले पाणी, अन्न, फुले विटाळलेली, अशुभ असे मानून फेकून दिली जात. न्या. रानडे यांच्या निधनानंतर रमाबाईंनी केशवपन करण्यास नकार दिला तर, त्यांच्या घरच्या परंपराप्रिय बायका पूजाअर्चा-अन्नपान इत्यादि व्यवहारांत रमाबाईंना वाळीत टाकल्याप्रमाणेच कसे वागवीत, वर्षभर त्यांचे जेवणाचे ताट वर माडीवरच कसे पाठवले जाई, वर्षभरानंतर त्या खाली माजघरातच जेवायला येऊ लागल्या तेव्हा त्यांचे पान सर्वांच्या पंगतीत न मांडता, थोडे दूर निराळे कसे मांडले जाई, हे रमाबाई रानडे यांनी आपल्या आठवणीत लिहून ठेवले आहेच.

'त्या काळी उच्च मानल्या जाणाऱ्या ब्राह्मण, सारस्वत, प्रभू वगैरे जातीच्या स्त्रियांना पतिनिधनानंतर केशवपनाच्या या गर्हणीय रुढीस बळी पडावे लागे. पतिनिधनसमयी पत्नीचे वय दहा वर्षांपेक्षा कमी असले तरी तिला केशवपन करून घ्यावे लागायचे आणि दर महिन्याला त्याच क्रियेसाठी नापितासमोर मान

वाकवावी लागे. कौमार्यावस्थेत आणि सौभाग्यकाळात ज्या केशकलापाचे नाजुक हातांनी तेल व सुगंधी द्रव्ये लावून संवाहन केले, सुवासिक फुले अलंकार घालून ज्याची शोभा वाढवली, त्या केशकलापाला मुकावे लागणे, स्त्रीला किती दुःखकारक होत असेल? त्यातही विधवेचा केशसंभार नष्ट करण्याची जी रीत होती, ती अतिशय ओंगळ व हृदयद्रावक होती. तिचा सासरा-वडील दीर-पिता किंवा वडीलभाऊ यांनी एखाद्या अंधाऱ्या खोलीत नापिताला आणून बसवलेले असे. गतभर्तृकेच्या आप्तस्त्रिया तिला त्या नापितासमोर ढकलून देऊन खोलीचे दार ढकलून घेत असत. ती बिचारी हुंदके देऊन रडत असतानाच, नापित आपल्या वस्तऱ्याचा प्रयोग तिच्या डोक्याच्या कोमल त्वचेवर करून तिच्या केसांचे उच्छेदन करी. या क्रियेत होणाऱ्या वेदना आणि अनुषंगाने त्या स्त्रीच्या डोक्याला, मानेला, खांद्याला होणारा नापिताच्या हाताच्या स्पर्श यामुळे ती स्त्री अक्षरशः थरथर कापत असे. प्रख्यात कादंबरीकर ह. ना. आपटे यांनी १८९६ साली लिहिलेल्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीत घडवलेले सक्तीच्या केशवपनाचे हृदयद्रावक दर्शन त्या काळातील उच्चवर्गीयांच्या घरोघरीच्या घटनांचे प्रातिनिधिक चित्रच आहे.

'सदाचाराची अनेक बंधने स्त्रियांवर असतानाही, या केशवपन क्रियेत निरनिराळ्या तऱ्हेने होत असलेली गतभर्तृकेची विटंबना, हिंदुधर्माला व रुढीला मान्य होती. विकेशा स्त्रीला अंग झाकण्यासाठी चोळी घालायलाही रुढीचा प्रतिबंध असे. सुवासिनी वापरतात त्यांपैकी कोणत्याही रंगाचे लुगडे तिला निषिध्द असे. जाडेभरडे तांबड्या रंगाचे आलवण नेसून, त्याचाच पदर भुंड्या डोक्यावरून घेऊन, तोच अंगाभोवती लपेटून त्या सोवळ्या झालेल्या स्त्रीला आपले लज्जारक्षण करावे लागे. तिला कोणताही दागिना घालायला बंदी असे.

घरात एखादी विधवा स्त्री सकेशा अवस्थेत असली तर, त्या घरात पुण्यकृत्ये किंवा शुभकार्ये होत नसत. ही अडचण तिला विकेशा केल्यावर मग दूर होई. विकेशावस्था व तांबडा वेश प्राप्त झाल्यावर मग त्या स्त्रीला घरातील सोवळ्यात प्रवेश मिळे. तिचे स्वयंपाकपाणी 'पुण्यवान लोकांना' चालू लागे. तशा त्या विद्रूप अवस्थेत तिला मात्र स्वयंपाकघराबाहेर येणेसुध्दा नकोसे होई. एकदा तिच्यामागे लागलेले पोळपाट-लाटणे मरेस्तोवर तिची पाठ सोडत नसे. पण घरातील शुभकार्यांच्या वेळी मात्र तिला 'बोडकी', 'करंटी', 'पांढऱ्या पायांची अवदसा' अशी दूषणे देऊन हौसमौजेपासून दूर ठेवले जाई.' अशा नेमक्या शब्दांत 'श्रीमती रमाबाई रानडे' या चरित्रग्रंथात डॉ. सरोजिनी वैद्य यांनी १९व्या शतकांतील विधवांच्या व्यथा बोलक्या केल्या आहेत.

आर्थिक परावलंबनातून विधवांच्या होणाऱ्या या दुर्दशेची जाहीर चर्चा प्रथम बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या 'दर्पण' पत्रातून सुरू केली. मागोमाग भाऊ महाजनानीही आपल्या 'प्रभाकर' पत्रातून, लोकहितवादींची, पुनर्विवाहाचे समर्थन करणारी पत्रे प्रसिद्ध केली. स्त्रियांचे परावलंबित्व सरावे, यासाठी त्यांना चरितार्थ संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता गोपाळ गणेश आगरकर आपल्या 'सुधारका'तून प्रतिपादित राहिले. संमती वयाचे विधेयक मंजूर व्हावे यासाठी चळवळ करणारे पारशी पत्रकार-कवी बैरामजी मलबारी, बालविवाह व लादलेले वैधव्य या एकाच प्रश्नाच्या दोन बाजू कशा आहेत, याबद्दलची टिपणे प्रसिध्द करून ब्रिटीश सत्तेवर दबाव आणत राहिले. त्याकाळी 'अवघे पाऊणशे वयमान' असलेला वृद्ध पुरुष नऊ-दहा वर्षाच्या कोवळ्या मुलीच्या गळ्यात विवाहमाला घालण्यासाठी बेलाशक बोहोल्यावर चढत असे. या जठरबाला-विवाहांमुळे मुली लहान वयात विधवा होत. तारुण्यसुलभ वासनांच्या आहारी जाऊन, कुटुंबातल्याच कोणा पुरुषाने केलेल्या जबरी शरीरसंगाला बळी पडून ती विधवा गर्भवती झाली तर जननिंदेच्या भयाने तिला नदी-विहीर, जीव देण्यासाठी जवळ करावे लागायचे.

सावित्रीबाई फुले यांचे द्रष्टेपण म्हणजे अशा कोणा निराधार काशीला जीव देण्यापासून परावृत्त करून, तिचे मूल स्वत:चे म्हणून वाढवून, अनाथ अर्भकालय चालवून त्यांनी आपली समाजहितैषी दृष्टी स्पष्ट केली. विधवांचे केशवपन बंद पडावे, यासाठी नापितानाच त्या कुकर्मावर बहिष्कार घालायला त्यांनी प्रेरित केले. मुलगा म्हणून पाळलेल्या यशवंताला जोतिबांच्या शवाला अग्नि देण्यास आप्तांनी प्रतिबंध केला, तर ही माऊली स्वत: हातात मडके घेऊन स्मशानात केली. स्त्रीशिक्षणाचा पाया घालण्याचे सावित्रीबाईंचे कार्य तर अलौकिकच म्हणावे लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील स्त्रीजीवनाचे वैचारिक पुनरुत्थान झाले. कारण पुनर्विवाहाच्या प्रश्नावर किंवा संमतीवयाच्या विधेयकावर वादळ उठण्याआधीच, महाराष्ट्रातील द्रष्ट्या सुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केल्या होत्या. त्याचे फलित १९व्या शतकाच्या अखेरच्या १५-२० वर्षात डॉ. आनंदीबाई गोपाळराव जोशी, डॉ. रखमाबाई, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, काशीताई कानिटकर, बाया कर्वे प्रभृती कर्तृत्ववान, सुशिक्षित स्त्रियांच्या रुपाने दिसू लागले होते. पण या साऱ्यांतील अग्रणी स्त्री होती ब्राह्मणेतर समाजात जन्मलेल्या सावित्रीबाई फुले! त्या माऊलीने शंभर वर्षांपूर्वी दगड-शेणगोटे खाल्ले म्हणून आम्ही आजच्या स्त्रिया फुले झेलतो आहोत. सावित्रीबाईंच्या पुण्यस्मृतीला माझे शतशः अभिवादन!

## संदर्भऋण

| | | |
|---|---|---|
| ☆ अर्वाचीन भारत | : | आचार्य जावडेकर |
| ☆ शतपत्रे | : | लोकहितवादी |
| ☆ आगरकर वाङ्मय (तीन खंड) | : | गोपाळ गणेश आगरकर |
| ☆ विसाव्या शतकातील महाराष्ट्र (खंड एक) | : | डॉ. य. दि. फडके |
| ☆ आगरकर | : | डॉ. य. दि. फडके |
| ☆ संक्रमण | : | डॉ. सरोजिनी वैद्य |
| ☆ श्रीमती रमाबाई रानडे व्यक्ती आणि कार्य | : | प्रा. माधव विद्वांस व डॉ. सरोजिनी वैद्य |
| ☆ श्रीमती काशीबाई कानिटकर | : | आत्मचरित्र आणि चरित्र - डॉ. सरोजिनी वैद्य |
| ☆ डॉ. रखमाबाई | : | एक आर्त - मोहिनी वर्दे |
| ☆ म. जोतिबा फुले | : | डॉ. धनंजय कीर |

*

# स्त्री-जीवनाला नवी दिशा देणारी कार्यकर्ती

**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

महाराष्ट्राच्या स्त्री जीवनाला आकार देणारी एक रचनात्मक शक्ती म्हणून सावित्रीबाई फुले यांचा उल्लेख अभिमानाने करता येतो. सावित्रीबाईंनी स्त्रीला प्रतिष्ठा दिली. स्त्रीच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे उदात्त, क्रांतिकारक दर्शन त्यांच्यामुळेच घडले असे म्हणायला प्रत्यवाय नाही. नवविचारांच्या या ज्योतीचे तेज आजच्या आणि उद्याच्या महाराष्ट्राला प्रेरणा देणारे आहे. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकातले एक वाक्य आठवते- 'पुरुष ही परमेश्वराची कीर्ती आहे, तर स्त्री ही परमेश्वराची मूर्ती आहे.' अनुप्रासाच्या मोहाने हे वाक्य लिहिले गेले नाही; त्यातले सत्य लेखकाने जाणून घेतले आहे. स्त्रीला परमेश्वर म्हणण्यात एक प्रकारचा भाबडेपणा आहे अशी कोणी टीका करील; पण तिच्या ठायी असलेल्या अपार वात्सल्याचा, निर्मितिशीलतेचा आणि सेवेतून संस्कार करण्याचा, त्यागाचा गुणधर्म लक्षात घेतला तर स्त्रीच्या सामर्थ्याची यथोचित जाणीव होऊ शकते. स्त्रीमध्ये असलेल्या देवत्वाचेही दर्शन घडू शकते. पण प्राचीन काळापासून स्त्री हा केवळ आपल्याच देशात नव्हे तर, जगात सर्वत्र उपेक्षेचा विषय बनलेला आहे. पुरुषाच्या तुलनेत स्त्री सदैव दुय्यम आहे असेच मानले गेले. तिच्या गौरवाचे कित्येक उल्लेख साहित्यात आढळत असले तरी तिला स्वतंत्र व्यक्तित्व आहे, स्वतंत्र मन आहे, याची डोळस जाणीव पूर्वीही नव्हती, आजही ती सर्वार्थाने आलेली दिसत नाही. अशा पारंपरिक वाटेने चालताना ज्या स्त्रियांनी नव्या वाटांचा शोध घेतला आणि स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला बळ देऊन समाजमन घडवले, त्यात सावित्रीबाई फुले हे एक विशेषनाम आहे. पुराणकाळातली सावित्री पतीचे प्राण परत मिळवण्यासाठी मृत्यूबरोबर झगडली. पण आधुनिक काळातली ही सावित्री मृतवत् झालेल्या समाजात आणि स्त्रीच्या जीवनात नवा प्राण ओतण्यासाठी एकोणिसाव्या शतकात अखंड संघर्ष करीत राहिली. तिच्या लढ्याची स्फूर्तिदायक गाथा समजून घेण्यासाठी त्या कालखंडातील सामाजिक स्थितीगतीचे चित्र पाहणे जरुरीचे आहे.

एकोणिसाव्या शतकातले स्त्रीजीवन हे अनेक प्रकारच्या रुढीत जखडलेले होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे म्हणून मनूने स्त्रीच्या पारतंत्र्यावर कायमचे शिक्कामोर्तब करून ठेवले होते. घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रीला

ज्ञानापासून, अधिकारापासून आणि स्वातंत्र्यापासून अनेक शतके वंचित ठेवलेले होते. जिचे नखही कधी समाजाच्या दृष्टीला पडत नाही; किंवा सूर्यही जिला पाहू शकत नाही ती स्त्री श्रेष्ठ मानली जाणे म्हणजे अज्ञानाची परमावधी होती. 'मी' या हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीतील नायिका म्हणते, 'बाबारे! आम्ही गोठ्यात बांधलेली मुकी जनावरें.' या उद्गारात स्त्री जीवनातली सारी दयनीयता आणि दु:ख व्यक्त झाले आहे. स्त्रीच्या या पारतंत्र्याला धर्म आणि रुढी यांचा आधार दिल्यामुळे तिची परवशता अधिकच दृढ झालेली होती. स्त्रीविषयक सुधारणांना वेगाने चालना देण्याचा प्रयत्न लोकहितवादी, जोतिबा फुले, विष्णुशास्त्री पंडित आणि आगरकर यांनी प्रामुख्याने केला. सामाजिक सुधारणा आणि स्त्रीविषयक प्रश्न यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे हे या सुधारणावादी विचारवंतांनी ओळखले होते. स्त्रीचा मनोविकास शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकतो म्हणून ती प्रथम शिक्षित झाली पाहिजे, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. लोकहितवादी, फुले आणि आगरकर यांच्या दृष्टीसमोर सुशिक्षित, स्वतंत्र आणि व्यक्तित्वसंपन्न स्त्रीचे चित्र उभे होते. लोकहितवादींनी 'शतपत्रां'तून स्त्रीसुधारणेचा विचार भावोत्कट भाषेतून मांडला. स्त्री आणि पुरुष यांचे अधिकार समान असले पाहिजेत ही भूमिका त्यांनी आग्रहपूर्वक मांडून म्हटले आहे--

'जसे पुरुष, तशा स्त्रिया आहेत असे आंधळ्या हिंदू लोकांस समजा.' स्त्रियांस आणि पुरुषांस सारखे अधिकार आहेत असे ठरवा. जो अधिकार संसारासंबंधी व सुखासंबंधी पुरुषांस आहे तोच स्त्रियांस असावा. स्त्रीच्या संबंधात सामाजिक न्यायाचा आणि माणुसकीचा हा विचार मराठी साहित्यातून प्रथमच उत्कटतेने प्रकट झालेला दिसतो. लोकहितवादींची 'शतपत्रे' इ.स. १८४८ ते १८५० या कालखंडात लिहिली गेली. त्यापूर्वीच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा विचार कोणा विचारवंताच्या मनात उद्भवल्याचा आधार आढळत नाही. स्त्री हा केवळ करुणेचा विषय नव्हे. भूतदयेच्या मलमपट्ट्या लावून तिच्यासंबंधीची सामाजिक दुखणी दूर होण्यासारखी नव्हती. पुरुषरचित शास्त्रांतून, आचारसंहितातून जो अन्यायी, एकतर्फी दृष्टीकोन दिसतो, तोच प्रथम पुसून टाकला पाहिजे आणि करुणेपेक्षा सामाजिक न्यायाचे तत्त्व गृहीत धरून स्त्रीपुरुषांचा विचार केला पाहिजे; अशी दृष्टी लोकहितवादींच्या साहित्यात आढळते. फुले-आगरकरांनी स्त्री-स्वातंत्र्यवादी विचारांचा ध्वज अभिनिवेशाने उचलून धरला, याचे कारण त्याच्या मुळाशी सामाजिक न्याय होता. महात्मा फुल्यांनी तर एक नवी, पुरोगामी विचारांची सुशिक्षित, स्वावलंबी, बंडखोर स्त्री उभी करण्यासाठी आपली सारी सामर्थ्ये वेचली. सावित्रीबाई फुल्यांनी या कार्याला आपले जीवन

समर्पित केले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातले स्त्रीचित्र हळुहळु बदलत गेले. कोणताही सामाजिक बदल जाणीवपूर्वक घडवून आणावा लागतो. परिवर्तनाची आच जेव्हा मनाला लागून राहाते, तेव्हा विचारवंत कृतीच्या पातळीवर उतरतात. फुले दंपतीचे स्त्री-दास्य-विमोचनाचे कार्य हा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे, यात शंका नाही.

प्राचीन काळापासून स्त्रीला अनेक अर्थांनी कनिष्ठ मानण्यात येत होते. स्त्री ही केवळ शृंगाराची पुतळी आणि 'नरकमार्गस्यदीपिका' आहे असे मानले गेले. केशवपनाची आणि सतीची चालदेखील तिच्यावर लादली गेली. तिने केवळ पतीची सावली होऊन रहावे आणि पतिव्रत्य हाच आपला परमधर्म समजावा, पतिव्रता हीच पुण्यशील असते, अशा अर्थाची अनेक भ्रांतिमूलक वचने निर्माण करण्यात आली. स्त्रीला देवता समजण्यातही तिचे मनुष्यत्व नाकारण्यासारखे आहे. मध्ययुगातल्या संतसाहित्यातही स्त्रीचे चित्र पारंपरिक दृष्टीनेच चितारलेले आढळते. विठ्ठलाला माऊली समजून भक्ती करणाऱ्या संतांनी स्त्रीमधल्या माऊलीची मात्र उपेक्षा केली. स्त्रीसंबंधीचा सनातन, सांकेतिक आणि पक्षपाती विचार लोकमनात रुजून बसलेला असल्यामुळे एकोणिसाव्या शतकातले स्त्रीचे जीवन पूर्वीसारखेच परावलंबी राहिले. महाराष्ट्रात लोकहितवादींनी केशवपनाचा आणि सती जाण्याचा प्रश्न धसाला लावला. यापूर्वी बंगालमध्ये राजा राममोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या प्रश्नांवर रान उठवले होते. पतीच्या जळत्या चितेत आपल्या जिवंत देहाची राखरांगोळी करणाऱ्या स्त्रीला देवता मानून तिची पूजाअर्चा आजही क्वचित् कोठेतरी केली जाते. अज्ञानी रुढींची बंधने किती चिवट असतात, हेच त्यातून स्पष्ट होते. इ. स. १८१७ ते १८२७ या दहा वर्षांच्या काळात दरवर्षी सरासरीने सहाशे स्त्रिया बंगालमध्ये सती गेल्या, ही माहिती अधिकृत म्हणून दिली आहे. (अर्वाचीन महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना - लेखक डॉ. रा. शं. वाळिंबे, पृ. १२५) 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकाचे लेखक ना. वि. जोशी यांनी एक चित्तथरारक अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात,

'एक स्त्री सती जात असता तिचेही अंग पोळून ती बाहेर निघाली; आणि सर्व अंगाची आग झाली म्हणून नदीत उडी टाकण्यास पळू लागली. पण ब्राह्मण लोकांनी तिला पकडून जुलुमाने सरणात फेकली व वर मोठे मोठे ओंडके टाकून तिचा प्राण घेतला. ही गोष्ट इंग्रज सरकारास कळताच त्यास दया येऊन त्यांनी लोकांस अशी ताकीद केली की, ज्या बाईला सती जाणे असेल तिने अथवा तिच्या घरच्या लोकांनी सरकारात कळवावे. सरकार हुकूम देईल तर जावे.

या विलक्षण राक्षसी रुढीच्या भोवती धर्माज्ञेचे वलय निर्माण केलेले होते.

वर दिलेली दोन उदाहरणे एकोणिसाव्या शतकातील आहेत. गायीसंबंधी सहानुभूती आणि भक्ती ठेवणाऱ्या तथाकथित धार्मिक ब्रह्मवृंदाला कोवळ्या-कोवळ्या निष्पाप मुली आगीत जळत असताना मात्र शांतपणाने पहावेसे वाटत होते. या अज्ञानाला आणि क्रूरतेला कोणत्याही भाषेत एखादे सार्थ विशेषण सापडेल असे वाटत नाही. धर्म हा माणसाला सर्व बाजूंनी करकचून बांधून ठेवणारा असेल तर त्याच्या पाशातून मुक्त होऊन मानवधर्माची कास धरली पाहिजे, असा आशय म. फुल्यांच्या क्रांतिकार्यातून आणि त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतो. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ या दृष्टीने मननीय आहे. लोकहितवादींनी लिहिले आहे,

'हिंदू हो धन्य तुमची!' तुम्हीच आपल्या मुलीचे खाटीक स्वस्थपणाने होता. तुमच्यासारखे राष्ट्र आणि तुमच्यातील विद्वानांसारखे विद्वान यास तुलना पृथ्वीवर कोठेही मिळणार नाही. लोकहितवादी हे ब्राह्मण होते, पण ब्राह्मणी धर्मात शिरलेल्या विसंगतीचे, अन्यायी रुढींचे आणि अज्ञानी प्रवृत्तीचे ते कठोर टीकाकार होते. टीका करताना त्यांची भाषा आक्रमक होते. आपल्या भाषेच्या शस्त्राने ते दांभिक रुढींवर घाव घालतात. लोकहितवादी आणि फुले या दोन्ही समाज सुधारकांनी रुढीवादावर निर्दय प्रहार करून विधायक विचार जनतेला दिले आहेत. दोघांच्याही भाषेत काहीशी ग्राम्यता व शिवराळपणा आहे अशी हास्यास्पद टीका सनातनी वृत्तीच्या लोकांनी केली. पण ती निरर्थक आहे. खरे स्त्रीजीवन शतकानुशतके उद्ध्वस्त करीत राहिलेल्या तर्कशून्य धर्मरुढींवर प्रहार करताना ते सोवळ्या आणि सौम्य शब्दांतून करावे, ही अपेक्षाच वेडेपणाची आहे.

म. फुले हे तर श्रेष्ठ कृतिवंत होते, दृढनिश्चयी होते. सामाजिक परिवर्तनाची पहिली प्रभावी ललकारी त्यांच्या उक्तीतून आणि कृतीतून प्रकट झाली. सावित्रीबाई फुले हे महाराष्ट्रातल्या पहिल्या जागरूक आणि व्यक्तित्वसंपन्न स्त्रीचे उदात्त प्रतिक आहे, यात शंका नाही. नवनिर्मिती करताना जे जुनाट झाले आहे, जे व्यक्तीला आणि समाजाला बांधून ठेवते, प्रगतीच्या वाटा अरुंद करते ते न्यायनिष्ठुरतेने बाजूला सारावे लागते. अन्यायावर तुटून पडावे लागते. लोकहितवादींच्या 'शतपत्रांत' आणि म. फुल्यांच्या साहित्यात हीच भूमिका आहे. फुल्यांच्या विचारांना अधिक व्यापक असे सामाजिक अधिष्ठान आहे. नवरचना करणाऱ्या सुधारकांना, 'जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळुनी किंवा पुरुनी टाका' हा अटीतटीचा मार्ग स्वीकारावाच लागतो. आगरकरांच्या विचारातही आक्रमक अभिनिवेश आहे. जीर्ण आचारविचारांवर त्यांनी आपल्या धगधगीत शब्दांतून घणाघाती टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे,

'आमची गृहपध्दती, आमची राज्यपध्दती, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीती - सारांश, इंग्रज येईपर्यंत आमचे सारे व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व घशात घालून ओतलेल्या पोलादासारखे किंवा शृंखलाबध्द बंदिवानासारखे, अथवा उदकाच्या नित्य आघाताने दगडाप्रमाणे कठीण झालेल्या लाकडासारखे किंवा हाडकासारखे शेकडो वर्षे होऊन राहिले, असे म्हणण्यास हरकत नाही.'

आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करून स्त्री-शिक्षणाचा विचार ठामपणे मांडला. स्त्रीला माणुसकीशून्य पध्दती साखळदंडात ठेवणाऱ्या धर्माचा उल्लेख त्यांनी, 'हे भीषण, बीभत्स, अमंगळ हिंदुधर्मा' अशा संबोधनाने केला आहे. सारांश, एकोणिसाव्या शतकात स्त्रीकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाहाण्याची प्रवृत्ती उदयाला येऊ लागली. स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराला या शतकात चालना आणि चेतना मिळू लागली. म. फुले यांनी तर- 'स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे' असे मत मांडले आहे. स्त्रीच्या ठायी संगोपन करण्यासाठी जे वात्सल्य निसर्गाने ठेवले आहे, त्यामुळे स्त्री ही पुरुषांपेक्षा काकणभर सरस आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेची चळवळ मूळ धरू लागली. सर्वच समाजसुधारकांनी स्त्रीसुधारणा आणि शिक्षण यांना या चळवळीत अग्रस्थान दिलेले दिसते. बालविवाह, जरठबाला विवाह, केशवपन, सतीची भयानक रुढी आणि शिक्षणाचा अभाव या साऱ्या गोष्टींच्या विरुद्ध चळवळ उभी करण्यात आली. याचे श्रेय पुष्कळ अंशी पाश्चात्य विद्येच्या प्रसाराला दिले पाहिजे. भौतिक शास्त्रांच्या अभ्यासातून आणि उदारमतवादी पाश्चात्य शिक्षणातून लोकहितवादी, फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे प्रभृती समाजसुधारक बाहेर पडले आणि पाश्चात्य विद्या व दृष्टीकोन यांचे त्यांनी स्पष्ट समर्थन केले. सनातन जीवनमूल्ये आणि आधुनिक विचारधारा यांचा संघर्ष सुरू झाला. बुद्धिवाद, व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रभाव भारतीय जीवनावर वाढत गेला. महाराष्ट्रात त्याचे विशेष प्रत्यंतर येऊ लागले. स्त्रियांच्या शिक्षणावर सुधारकांनी सर्वाधिक भर दिला याचे कारण स्त्री हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक जर अज्ञानात राहिला, तर साऱ्या सामाजिक जीवनावर त्याची अनिष्ट छाया पडेल हे त्यांनी ओळखले होते.

व्यक्ती हे स्वयंसिध्द मूल्य आहे; मग ती स्त्री असो की पुरुष असो! तिला मूलभूत अधिकार आहेत ही जाणीव समाजात रुजणे आवश्यक आहे, असे सुधारकांना वाटत होते. सतीबंदीचा कायदा या चळवळीतूनच निर्माण झाला.

१८५५ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी हिंदुविधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे एक पुस्तक लिहिले. महाराष्ट्रात पुनर्विवाहासाठी चळवळ करणाऱ्या व्यक्तीमध्ये म. फुले, डॉ. भांडारकर, सर नारायण चंदावरकर, आगरकर, न्या. रानडे, महर्षि कर्वे प्रभृती प्राधान्याने होते. महाराष्ट्रात मुलींसाठी पहिली शाळा १८२४ साली अमेरिकन मिशन या संस्थेने काढली. १८२९-३० या वर्षात* मुलींसाठी आणखी सहा शाळा स्कॉटिश मिशनरी सोसायटीने सुरू केल्या. पण या शाळांतून आपल्या मुलींना पाठवणे नागरिकांना फारसे पसंत नव्हते. परकीय संस्कृतीच्या व परधर्माच्या लोकांनी काढलेल्या या शाळांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. स्त्रीशिक्षणाची ही चळवळ अत्यंत मंद होती. महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात १८५१ साली मुलींची जी शाळा सर्व प्रकारच्या विरोधाला तोंड देऊन स्थापन केली; त्यामुळे स्त्री शिक्षणाच्या आंदोलनाला भरती येऊ लागली. म. फुल्यांनी सामाजिक सुधारणेच्या चक्राला आपल्या पुरोगामी विचारांनी जी गती दिली, तिच्यातून परिवर्तनाचा इतिहास घडत गेला, हे निर्विवाद आहे.

फुल्यांनी स्थापन केलेल्या या शाळेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ मागासलेल्या वर्गातील मुलींसाठी नव्हती. ब्राह्मण आणि बहुजन समाजातीलही काही मुलींनी या शाळेत प्रवेश घेतला होता. समाजाचा प्रचंड प्रक्षोभ फुल्यांना सहन करावा. सनातनी कर्मठांनी या शाळेला आणि स्त्री शिक्षणाला संस्कृतीच्या नावाखाली कडवा विरोध केला. स्त्रीने शिक्षण घेणे, तिने पुरुषांप्रमाणे लिहिणे आणि वाचणे हे त्यांच्या दृष्टीने संस्कृतिविध्वंसक कृत्य होते. फुल्यांच्या वडिलांनीही शक्य तितका विरोध केला. पण ज्योतिबा आणि सावित्रीबाई दोघांनीही घरादाराची बंधने तोडून टाकली आणि स्त्री शिक्षणाला वाहून घेतले. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेचा इतिहास हा फुले दांपत्यांच्या कर्तृत्वाचा आणि व्यापक विचारांचा इतिहास आहे, यात शंका नाही! स्त्री ब्राह्मण असो की कोणत्याही वर्णातील असो, तिने चूल आणि मूल या आपल्या परंपरागत कार्यक्षेच्या पलीकडे जाऊ नये, हे लोकमत असताना त्याच्या विरूद्ध दिशेने पोचण्याचा विक्रम फुले पतीपत्नींनी केला. सावित्रीबाईंनी शिक्षण घेतले आणि पुढे दीर्घकाळ स्त्री-शिक्षणाचे कार्य त्या करीत राहिल्या. हे करताना त्यांना कोणत्या खडतर वाटेने पावले टाकावी लागली, याचा इतिहास सर्वांना माहीत आहे. क्रांतीची वाट कधीच सरळ नसते. अनेक खाचखळग्यांनी आणि काट्याकुट्यांनी भरलेल्या या वेड्यावाकड्या वळणाच्या वाटेवरून चालणे हे एक दिव्य आहे. पण फुले पती-पत्नी निर्धाराने, शांतपणे वाटचाल करीत राहिले. त्यामुळेच महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची चळवळ सामर्थ्यवान बनली. खरे तर केवळ स्त्रीच नव्हे तर ब्राह्मण सोडल्यास इतर सर्व

जाती-जमातींतल्या पुरुषांतही शिक्षणाचा अभाव होता. अध्ययन, अध्यापन, लेखन आणि वाचन ही एकाच वर्गाची शतकानुशतके मिरासदारी होती. मूठभर शिकलेसवरलेले लोक शेतकऱ्यांचे आणि कष्टकऱ्यांचे शोषण करू शकत होते. आपले शोषण होत आहे याचेही भान बहुजनसमाजाला आणि खालच्या स्तरातील लोकांना आलेले नव्हते. अज्ञान, अंधःश्रद्धा आणि पाचवीला पुजलेले दारिद्र्य याचा परिणाम इतकाच झाला की, बहुसंख्य समाज कर्तृत्वहीन व प्रारब्धवादी बनला. आपल्या दुःखाचे मूळ आपल्या प्रारब्धातच आहे आणि हे प्रारब्ध मनुष्य बदलू शकत नाही, या निराशावादी विचारांच्या विळख्यात बहुसंख्य लोक सापडलेले होते. स्त्री तर मानसिक दृष्ट्या बालपणापासूनच खचलेली असायची. आपण उपेक्षित आहोत, स्त्री असल्यामुळे आपण दुर्दैवी आहोत, हा न्यूनगंड सर्वच स्त्रियांच्या मनात खोलवर गेलेला असायचा. पुरुष हा कर्ता आहे, आपण त्याची सेवाचाकरी करीत राहाणे हाच आपला धर्म आहे, ही भावना तिच्या मनात आणि जीवनात खिळलेली असायची. अशा परिस्थितीत तिला शिक्षण देऊन आत्मसन्मानाची जाणीव तिच्याठायी निर्माण झाल्याशिवाय ती आपल्या गुलामगिरीच्या साखळ्या तोडायला सिद्ध होणार नाही; हा बहुमोलाचा विचार समाजसुधारकांनी एकोणिसाव्या शतकात उचलून धरला. पाश्चात्य विद्येचे हे ऋण मान्य केलेच पाहिजे. या विद्येचा प्रभाव पडला नसता, तर भारतातल्या आणि महाराष्ट्रातल्या सामाजिक जरठ वातावरणातून समाजाला मुक्त होता आले नसते.

महात्मा फुल्यांनी स्त्री-शूद्रांच्या दुःख दैन्याचे कारण सांगताना म्हटले आहे, 'विद्येविना मती गेली. मतिविना नीती गेली' आणि याच क्रमाने पुढे ते म्हणतात, 'इतके अनर्थ एका अविद्येने केले.' सर्वसामान्य माणसाला, घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रीला, ज्ञान आणि स्वातंत्र्य यांचा प्रकाश जोतिबांनी दाखवला. लोकहितवादी, आगरकर प्रभृतीनी क्रांतीप्रद विचार रसरशीतपणे सांगितले. विचारवंत म्हणून त्यांची कामगिरी लक्षणीय आहे. पण प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर उतरून बहुजन समाजात शैक्षणिक चळवळ पेटवण्यासाठी आपल्या आत्मिक शक्तीची ठिणगी प्रथम फुल्यांनी टाकली आणि आपल्या व्यक्तित्वाची ज्योत त्या ठिणगीच्या साहाय्याने पेटवण्याचे महनीय कार्य सावित्रीबाईंनी केले. सावित्रीबाई फुले आपल्या संस्कृतीला भूषणभूत आहेत असे म्हणण्यापेक्षा त्या संस्कृतीचा एक आधारस्तंभ आहेत असे म्हणणेच संयुक्तिक ठरेल. आज विसाव्या शतकाच्या अखेरीला स्त्रीच्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने अनेक कार्यक्षेत्रे उजळून टाकलेली दिसतात. राष्ट्राच्या प्रशासनाची सूत्रेही आजची स्त्री हाती घेऊन राष्ट्र चालवू शकते हे आता ऐतिहासिक सत्य बनले आहे. पण या कर्तृत्वाचा जन्म

एका सावित्रीच्या व्यक्तित्वातून झाला हे मान्य करावे लागेल.

*सावित्रीबाई आपल्या एका कवितेत म्हणतात-*

*'शूद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग हा*
*शिक्षणाने मनुष्यत्व । पशुत्व हाटते पहा ।।*
*इंग्रजी शिकुनी जातिभेद मोडा*
*भटजी भारूडा । फेकुनिया ।।'*

या काव्यातल्या विचारांवरून सावित्रीबाई फुले या एकोणिसाव्या शतकातल्या क्रांतिकारकांच्या मालिकेत सहज सामावल्या जातात. त्यांचे विचार आणि कृती सामाजिक परिवर्तनाला कशा कारणीभूत झाल्या, याची जाणीव होते.

फुले दांपत्याने काढलेल्या शाळेबद्दल १८५२ च्या अहवालात सावित्रीबाईंच्या उदात्त शैक्षणिक कार्याबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले आहेत. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांच्यामुळे स्त्रीशिक्षणाला उत्तेजन मिळू लागले आणि ही चळवळ समर्थ बनू लागली, असे शासकीय अहवालात नमूद केले आहे. श्री. ना. वि. जोशी यांनी 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात म्हटले आहे. तो उतारा पुढे यासाठी देत आहे की, एकोणिसाव्या शतकातील या कार्यावर आणखी प्रकाश पडेल.

''या साली मुलींची शाळा ऐतद्देशीय गृहस्थांनी प्रथमच स्थापन केली... या स्त्री शिक्षणाचे पुढारी रा. जोति गोविंद फुले हे होते. त्यांनी या कामाचे प्रथम दु:ख व श्रम सोसले. काही दिवस पंतोजी मिळत नव्हते. तेव्हा त्यांनी निर्लेप बुद्धीने स्वत: पंतोजीचे काम केले. त्या शाळेत मदतनिसाची गरज भासली तेव्हा ती मिळेना, म्हणून त्यांनी आपल्या बायकोस मदतीस आणली. त्यास दोनप्रहरी भाकरी खाण्यास देखील फुरसत नसे. एक एक दिवस संध्याकाळपर्यंत उपाशी राहावे लागे. तरी त्यांनी या परोपकारी कृत्याचा पिच्छा सोडलाच नाही. पुढे काही दिवसांनी लोकांच्या मनातील शंका निघून मुली शाळेत बिनदिक्कत येऊ लागल्या व शाळा बरीच चालली. राजेश्री जोतिबाचा सरकारने सन्मान करून एक शालजोडी बक्षिस दिली...''

शिक्षणाचा प्रवाह समाजाच्या खालच्या स्तरातूनही अनिरुद्धपणे वाहत राहावा हे स्वप्न फुल्यांनी का पाहिले असावे? शिक्षणातून विचार करण्याची आणि विचारातून अन्यायांशी संघर्ष करण्याची शक्ती निर्माण होते म्हणून फुल्यांना ही विलक्षण अनुभूती आलेली होती. ज्ञानाची स्वाभाविक प्रवृत्ती, पारतंत्र्याचे पाश तोडून स्वतंत्र होण्याची असते. ज्ञानातूनच स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचा उदय होतो.

एकोणिसाव्या शतकात बहुजन समाजातल्या स्त्री-पुरुषांत ही जाणीव उत्पन्न व्हावी यासाठी त्यांनी जन्मभर परिश्रम केले. सावित्रीबाई देखील आपल्या स्वतंत्र व प्रभावी व्यक्तिमत्वाने प्रबोधनाच्या चळवळीत उभ्या राहिल्या. महात्मा फुल्यांची पत्नी म्हणूनच केवळ नव्हे तर, आपल्या स्वयंकर्तृत्वाने त्यांच्याभोवती प्रकाशवलय उत्पन्न झाले आहे. मात्र विद्येचा उपयोग स्त्रीने अलंकरणासाठी करू नये. आत्म्याला जागृतीची साद घालणारी विद्या नवनिर्मितीसाठी असते. सामाजिक प्रबोधनासाठी स्त्री-शक्तीने कार्य करावे ही देखील सावित्रीबाईंची इच्छा होती. नवसंस्कृतीच्या रचनेत नव्या जगाच्या मांडणीत, स्त्रीचा वाटा महत्त्वाचा असावा. जुन्या काळात ती केवळ शोभेची बाहुली किंवा पायाची दासी होती. पण नव्या काळात सुविद्य स्त्रीच्या हातात नवयुगाचा म्हणजेच समतेचा, स्वातंत्र्याचा आणि प्रतिष्ठेचा ध्वज असावा. हे स्वप्न सावित्रीबाईंनी पाहिले होते. आजची जागृत स्त्री हे स्वप्न साकार करू शकली, तर सावित्रीबाईंची तपश्चर्या फळाला आली असे म्हणता येईल.

ग्रामीण भागातील स्त्रीच्या समस्या आजही जटिल आहेत. खेड्यापाड्यात शाळा आल्या, वीज आली, यंत्र, तंत्र आले. पण दोन चार इयत्ता झाल्या की मुलींच्या शिक्षणाला खंड पडतो. कारण अजूनही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणात फरक केला जातो. सनातनी वातावरण निवळले असले तरी मुलीला अधिक शिकवून काय करायचे, फार तर तिला लिहिता वाचता येते एवढे प्रस्थापित झाले म्हणजे तिच्या लग्नाचा मार्ग सुकर होईल ही विचारसरणी खेड्यापाड्यांत बऱ्याच ठिकाणी आढळते. बाह्य सुधारणा झाल्या पण शिक्षणातून जे मानसिक परिवर्तन अपेक्षित आहे; ते होण्याच्या दृष्टीने आजच्या समाजसुधारकांना कार्य करावे लागेल. प्रबोधनाची लाट केवळ नागरी भागात उंचबळून चालणार नाही. ती ग्रामीण भागात आणि आदिवासी भागात पोहोचविण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. फुल्यांची चळवळ ग्रामीण जनतेच्या जीवनाशी अधिकांशाने निगडित होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची, शूद्रातिशूद्रांची मुले व मुली सर्वार्थीनी ज्ञानविज्ञानात पुढे येत आहेत हे चित्र आज दिसावे.

*

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व

**प्राचार्य डॉ. मा. गो. माळी**

म. जोतीराव फुले यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या पतीच्या खांद्यास खांदा लावून केलेले क्रांतिकार्य बारकाईने विचारात घेतल्यास एक चमत्कार वाटण्यासारखे आहे. एकोणिसाव्या शतकात, पुण्यासारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात प्रचंड विरोधाला न जुमानता, सावित्रीबाईसारख्या एका स्त्रीने भल्याभल्या जाणकारांना आणि मान्यवरांना दिपवून टाकण्यासारखे काम करावे, हे एक नवलच वाटणे स्वाभाविक होते. नाईलाजाने का असेना; जोतीराव फुले यांच्या क्रांतिकार्यापुढे काही तथाकथित साहित्यिकांना मान तुकविण्याशिवाय इलाज नव्हता. तथापी सावित्रीबाईंचे कार्य अद्याप काही जणांना खरे वाटत नाही. त्यांनी केलेल्या क्रांतिकार्याचे श्रेय त्यांना देणे त्यांच्या जीवावर येते. नायगांवसारख्या एका खेड्यात जन्मलेली, शेतकऱ्याची एक निरक्षर मुलगी, लग्नानंतर शिक्षण घेते; शिक्षिका बनते; मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषा अवगत करते, व्यासंग वाढवून लोकशिक्षणासाठी गद्यपद्य रचना करते, समाजसेविका बनते, आणि फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे समर्थ नेतृत्व करते; हे ऐतिहासिक सत्य असूनसुध्दा कोत्या मनोवृत्तीच्या महाभागांना हे सर्व खोटे वाटते. एका पतिपरायण स्त्रीपेक्षा सावित्रीबाई मोठ्या असू शकत नाहीत, अशी काही जणांची कोल्हेकुई ऐकावयास मिळते. एकोणिसाव्या शतकात या देशात स्त्रियांना जनावरांइतकीही किंमत नव्हती, देवाधर्माच्या नावाखाली भयाण-भीषण गुलामगिरीत भरडल्या जाणाऱ्या कालखंडात एक ज्योत आपले पती जोतीराव फुले याच्या दैदिप्यमान ज्योतीने प्रज्वलित होते; आणि जगातील सर्व स्त्री समाजाला आपल्या प्रज्वलित झालेल्या ज्योतीने प्रकाश दाखवते; असे हे अपवादात्मक आणि अलौकिक उदाहरण आहे. जोतीराव फुले यांनाही एक थोर समाजक्रांतिकारक म्हणून त्यांच्या हयातीतच नव्हे तर, त्यांच्या मृत्यूनंतरसुध्दा पूर्ण न्याय मिळू शकत नाही, अशी अवस्था आहे. ही जर जोतीरावांची अवस्था, तर सावित्रीबाईंना न्याय मिळणे किती कठीण आहे याची कल्पना येऊ शकेल.

गेल्या काही वर्षांत सावित्रीबाईंचे क्रांतिकार्य हळुहळू प्रकाशात येऊ लागले. याही अगोदर थोर चरित्रकार कै. धनंजय कीर, समकालीन कै. मामा

परमानंद, शिक्षणखात्याचे उपलब्ध असलेले त्यावेळचे अहवाल आणि समकालीन व्यक्तींनी लिहून ठेवलेल्या आठवणी विचारात घेतल्यास, सावित्रीबाईंच्या थोर कार्याची यथार्थ कल्पना येते. तथापि डोळ्यावर कातडे ओढून झोपेचे सोंग घेणाऱ्या काही चिंतातूर जंतूंना हे मंजूर नाही. त्यांना हे कपोलकल्पित वाटते. त्यासाठी काही प्रश्नोत्तरे द्यावीशी वाटतात. म. फुल्यांच्या पत्नी, सावित्रीबाई होत्या काय? होय! त्या शिक्षिका होत्या काय? होय! अस्पृश्यांसाठी उभयतांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला केला होता काय? होय! आपल्या घरीच सुरू केलेल्या अनाथ बालकाश्रमाची जबाबदारी त्यांच्यावर होती काय? होय! सर्व जातीजमातीतील स्त्रियांसाठी एकत्र हळदीकुंकू समारंभ त्यांनी आयोजित केला होता काय? होय! लोकशिक्षणासाठी त्यांनी गद्यपद्यरचना केली होती काय? होय! सत्यशोधक समाजाच्या त्या सभासद व नेत्या होत्या काय? होय! सनातन्यांनी सातत्याने शेणगोळे मारून त्यांचा छळ केला काय? होय!

वरील काही मोजकी प्रश्नोत्तरे एखाद्या निरक्षर अडाणी माणसाला जरी ऐकवली तरी तो सुध्दा सावित्रीबाईंचे मोठेपण आनंदाने मान्य करील. परंतु झोपेचे सोंग घेणाऱ्या व द्वेषमत्सरांनी पछाडलेली तथाकथित विद्वान मंडळींना हे कसे लक्षात येणार?

अंधारयुगातील सावित्रीबाईंसारखी एक दिव्यज्योत जगातील सर्व स्त्री समाजाला आपल्या प्रखर ज्योतीने दिव्य प्रकाश दाखवते, हे जरी आश्चर्य वाटण्यासारखे असले तरी, वास्तव सत्य असल्याने हे ऋण जगातील सर्व स्त्रीपुरुषांनी मानून या क्रांतिकार्यापुढे नतमस्तक होणे आणि कृतज्ञता व्यक्त करणे क्रमप्राप्त ठरते.

जोतीरावांनी आपल्या दैदीप्यमान कार्याच्या ज्योतीने आपल्या सहधर्मचारिणी सावित्रीची ज्योत प्रज्वलित केली आणि हिंदुस्थानमध्ये स्त्रीसुध्दा अलौकिक व युगप्रवर्तक कार्य करू शकते, हे जगाला सिध्द करून दाखवले. सावित्रीबाई जोतीरावांच्या पत्नी म्हणून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्रांतिकार्यात सहभागी होणे स्वाभाविक होते. त्यात विशेष असे काय आहे; अशी शंका एखाद्याच्या मनात निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु एकोणिसाव्या शतकातील रावबाजी, पेशव्यांच्या काळातील स्त्री आणि शूद्र यांची पशुपेक्षाही हीनदीन असलेली परिस्थिती, भटभिक्षुकांनी देवाधर्माच्या नावाखाली स्वार्थासाठी घातलेला नंगानाच; यामुळे स्त्री आणि शूद्र ही माणसेच नाहीत अशी 'भूदेवां'ची ठाम समजूत होती. स्त्री म्हणजे नरकद्वार, स्त्री म्हणजे पापाचे माहेरघर, स्त्री म्हणजे पुरुषांच्या कामवासना त्याच्या इच्छेप्रमाणे भागविणारे एक साधन, एक दैनंदिन

उपयोगी पडणारी वस्तू असे मानली जाई. स्त्रीला भावना आहेत, तिला काही आशा-आकांक्षा असू शकतात, तिलाही एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असू शकते, हे मान्य करण्यात पुढील सर्व पुराणकारांनी, भटभिक्षुकांनी साफ नकारच दिला आहे. यामुळे हिंदू धर्मात स्त्री आणि शूद्रांचा जेवढा छळ झाला आहे, त्याच्यावर जेवढा अनन्वित अत्याचार झाला आहे, तेवढा जगातील कोणत्याही धर्मात झाला नसेल. स्त्रियांनी शिक्षण घेणे हे महापाप मानले जाई. शिक्षण हीसुद्धा धार्मिक बाब समजली जाई. या धर्माप्रमाणे फक्त ब्राह्मणांनाच म्हणजे पुरुष ब्राह्मणांनाच विद्येचा अधिकार आहे. स्त्रियांना, शूद्रांना विद्येचा अधिकार धर्मानेच नाकारला. धर्म हा परमेश्वरनिर्मित असून त्याविरूद्ध वर्तन करणारे नरकात जातात अशी भोंदू व किळसवाणी शिकवण दिली जाई. ज्या स्त्रिया शिक्षण घेतात, त्यांचे नवरे लवकर मरतात, शिक्षणाने स्त्रिया स्वैर व चवचाल बनतात, अशी भीती घालून या देशात हजारो वर्षांपासून ते एकोणिसाव्या शतकातील अव्वल इंग्रजी काळापर्यंत स्त्रियांना आणि शूद्रांना विद्येपासून वंचित ठेवण्यात आले. त्यांचे सत्वच हिरावून व छिनावून घेण्यात आले. पेशवाईच्या या काळ्याकुट्ट कालखंडापर्यंत स्त्री-शूद्रांची ही अवस्था होती.

या पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंच्या कार्याचे मूल्यमापन केल्यास त्यांचे कार्य म्हणजे भारतीय स्त्रियांच्या जीवनातील युगप्रवर्तक कार्य मानावे लागेल. जोतीरावांच्या सत्य, समता आणि मानवतावाद या तत्वांचा त्यांनी सर्व हयातभर पाठपुरावा करून स्त्री-मानवजातीसाठी आपले जीवनसर्वस्व अर्पण केले. भारतातील पहिली शिक्षिका, पहिली मुख्याध्यापिका व पहिली समाजसेविका सावित्रीबाईच होय. स्त्री-शूद्रांच्या सेवेतच खरी ईश्वरसेवा आहे, ही जोतीरावांकडून प्रेरणा घेऊन विरोधाला अगर छळाला न घाबरता आपले इच्छित कार्य त्यांनी यशस्वी करून दाखविले. स्त्री-शूद्रांचे व दीनदलितांचे दुःख पाहून त्या रडत बसल्या नाहीत. रडण्यापेक्षा ज्या संग्रामाची गरज होती, तो स्त्री-शूद्रांचा दुःखमुक्तीचा संग्राम जोतीरावांसारख्या क्रांतिवीराबरोबर मोठ्या जिद्दीने, धैर्याने, चिकाटीने, कौशल्याने त्यांनी यशस्वी केला. त्यांचा स्वभाव दयाळू, तितकाच स्वाभिमानी होता. त्या जशा रूपसंपन्न होत्या, तशाच गुणसंपन्न होत्या. स्त्री-शूद्रांबद्दल त्यांच्या मनात जेवढी अनुकंपा होती, तितकीच बालविवाह, बालविधवा, केशवपन, भ्रूणहत्या, सतीची चाल, तिरस्कृत विधवाजीवन या सर्व चालींबद्दल त्यांना मनापासून चीड होती. धर्माच्या नावाखाली भट-भिक्षुकांनी चालवलेली मानवतेची ही लूट त्यांना पाहवत नव्हती. देशामध्ये निम्मी संख्या स्त्रियांची असताना, त्या अज्ञानांधकारात व गुलामगिरीच्या नरकात हजारो वर्षे

बुडून जाव्यात, आणि याबद्दल एकाही देवाला अगर धर्माला लाज वाटू नये, याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. जो धर्म स्त्रियांना व शूद्रांना विद्या नाकारतो, जो धर्म त्यांना गुलाम मानतो; तो धर्म कोणी निर्माण केला, असा त्यांच्यापुढे प्रश्न होता. परमेश्वर हा एकच असून जगातील सर्वच माणसे ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, असे असताना ब्राम्हणांनी स्वत:चा देव वेगळा मानण्याचे कारण काय? त्या देवाला संस्कृतशिवाय कोणतीच भाषा येऊ नये, हे कसे शक्य आहे? मग तो देवच कसा असेल?- असे एक ना अनेक प्रश्न ज्या जोतीरावांपुढे होते, तेच प्रश्न सावित्रीबाईंपुढेही होते.

परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते, असे मानले जाते. परंतु सोने होण्याचा गुण लोखंडात मुळात असावा लागतो हे लक्षात ठेवले पाहिजे. जोतीरावांच्या दैदीप्यमान ज्योतीने सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाची ज्योत प्रज्वलित केली, हे जरी खरे असले तरी, सावित्रीबाई ही सुद्धा प्रज्वलित होण्याच्या पात्रतेची ज्योत होती, ही वस्तु:स्थिती महत्त्वाची आहे. जोतीरावांच्या वेळी कार्यविद्याविभूषित मंडळी होती. ती जरी समाजक्रांतिकारक नव्हती तरी, समाजसुधारक होती. यामध्ये लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख, न्यायमूर्ती रानडे, बाळशास्त्री जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर आदींचा समावेश होतो. या व्यक्ती त्यावेळी मोठ्या अधिकारपदावर असल्यामुळे त्यांना रावबहादूर, रावसाहेब अशा मोठ्या मानाच्या पदव्याही मिळाल्या. त्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती आणि त्यामुळे जनमानसात त्यांना खूप मोठी प्रतिष्ठाही लाभली होती. परंतु यांच्यापैकी एकाचीही पत्नी सावित्रीबाई होऊ शकली नाही. एकाही रावबहादुराच्या पत्नीने आपल्या घरचा सुखासमाधानाचा संसार सोडून 'दारचा' संसार करण्याचा वेडेपणा स्वीकारला नाही. वैयक्तिक सुखाला लाथ मारून स्त्री-शूद्रांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न एकाही माऊलीने केला नाही. तसे जर झाले असते, तर ते स्त्रीसमाजाचे भाग्य मानले गेले असते. परंतु देवधर्म, पूजाअर्चा, हळदीकुंकू समारंभ यापलीकडे त्यांची मजल गेलीच नाही. अशावेळी निरक्षर सावित्रीबाईंनी नव्याने शिकावे, प्रशिक्षित व्हावे, इंग्रजीचे ज्ञान अवगत करावे आणि शिक्षिका म्हणून सार्वजनिक कार्यास; न घाबरता, पुण्यासारख्या भटभिक्षुकांच्या बालेकिल्ल्यात प्रखर विरोधाला न जुमानता यशस्वीपणे काम करावे, यामध्ये सावित्रीबाईंचा वेगळेपणा आहे, मोठेपणा आहे. म्हणूनच त्या स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या ठरतात. सावित्रीबाईंपासूनच भारतीय स्त्री सार्वजनिक कार्यात अवतरली. त्यांनीच स्त्रियांना ज्ञानाची कवाडे प्रथम खुली केली. स्त्री आणि पुरुष सर्व दृष्टीने समान आहेत, हे त्यांनीच प्रथम सिद्ध करून दाखवले. यावरून सावित्रीबाई या भारतीय समाजातील

स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या आद्य जनक ठरतात. सत्य, समता आणि मानवता ही जोतीरावांची तत्वे समाजात रुजविण्याचा महान प्रयत्न त्यांनी केला. जोतीरावांनी तत्कालीन उच्चनीचतेवर व जातिव्यवस्थेवर जे हल्ले केले, त्यास सावित्रीबाईंनी जोरदार साथ दिली. जोतीरावांप्रमाणे स्त्री-शूद्रांच्या जागृतीसाठी गद्य-पद्य स्वरुपात साहित्य निर्माण केले. त्यामध्ये वृत्त-अलंकार यांच्या तंत्रबध्दतेपेक्षा हीनदीन समाजाच्या दु:खांनाच जास्त महत्त्व देण्यात आले. वाचकाच्या काळजाला भिडेल अशा भावना त्यामध्ये त्यांनी ओतल्या. तत्कालीन परिस्थितीचे विदारक चित्रण आणि दीनदलितांच्या आर्त किंकाळ्या त्यामधून व्यक्त झाल्या. अलंकारांची रचना आणि शुद्धलेखन तपासणी करण्यास त्यांना वेळही नव्हता आणि त्याची जरुरीही नव्हती. भाषेपेक्षा स्त्री-शूद्रांच्या जीवनाचे 'शुध्द लेखन' त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. पंख्याखाली बसून न जाणारा वेळ घालवणाऱ्या व करमणूक करून घेणाऱ्या पांढरपेशा व उच्चभ्रू लोकांसाठी जोतीरावांनी किंवा सावित्रीबाईंनी लिहिले नव्हते. ज्या दीनदुबळया लोकांसाठी ते साहित्य होते, ती लोकभाषाच त्यांनी वापरली. प्रगल्भ भाषा त्यांना अवगत नव्हती, असे नव्हे. परंतु ती भाषा निरुपयोगी वाटल्याने, त्यांनी लोकभाषेचा वापर केला. अभंग व श्लोक हेच त्यांच्या दृष्टीने सोयीचे वाटले, कारण साधुसंतांचे अभंग आणि श्लोक हेच बहुजन समाजाला आवडतात, ही पार्श्वभूमी त्यांना ठाऊक होती. म्हणूनच धनंजय कीर यांनी म्हटले आहे, पांडित्य आणि प्रतिभा असलेली एकोणिसाव्या शतकातील स्त्री म्हणून पंडिता रमाबाईचा उल्लेख केला जातो. परंतु रमाबाईपेक्षा; दोन दशकांपेक्षा अधिक वर्षे आधी जन्मलेल्या सावित्रीबाई या दोन्ही गुणांत कमी नव्हत्या. त्या प्रतिभाशाली कवयित्री, उत्तम अध्यापिका, नि:स्वार्थी समाजसेविका आणि फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करणाऱ्या महान नेत्या होत्या. यावरून सावित्रीबाईंची योग्यता यथार्थपणे कळून येते.

सन १८५२ मध्ये विश्रामबागवाड्यांत जोतीरावांच्या स्त्री-शिक्षण-कार्याबद्दल ब्रिटिश सरकारकडून शाल व श्रीफळ देऊन त्यांचा जो गौरव करण्यात आला त्यावेळी सावित्रीबाईंनाही अत्यानंद होणे स्वाभाविक होते. यावेळी सावित्रीबाईंचाही गौरव झाला. त्यावेळी जोतीराव सावित्रीबाईस म्हणाले, 'हा गौरव तुझाच गौरव आहे. मी शाळा स्थापण्यास कारणमात्र आहे, पण त्या शाळा तू अनेक संकटांशी तोंड देऊन यशस्वीरीत्या चालविल्यास, त्याचा मला अभिमान वाटतो.'

जोतीरावांच्या मृत्यूच्या दिवशी घडलेला हा प्रसंग! या महात्म्याला मृत्यूची चाहूल लागताच त्यांनी बडोदा, मद्रास, मुंबई, नागपूर, धुळे, जळगाव, नगर,

कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या सत्यशोधक समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना बोलावून घेतले. सावित्रीबाई व यशवंत यांना जवळ घेऊन उपदेश केला. नंतर सर्वांना जवळ बोलावून ते म्हणाले, बंधूंनो, आपण खूप कार्य केले. दोन हजार वर्षांत आपणाला जे मिळाले नाही, ते येत्या ५० वर्षात खात्रीने मिळेल पण... तुम्ही पेशवाईत जसे गुरासारखे वागत होता, तसे न वागता वाघासारखे वागा. गायीप्रमाणे कसायापुढे मान देऊ नका. आंग्लाई आज आहे, उद्या नाही. पण ती जोपर्यंत आहे, तोपर्यंत साऱ्या शूद्रादि शूद्रांस विद्या देऊन शहाणे करा. विद्या ही माणसास मनुष्यत्व प्राप्त करून देते. सावित्रीने माझ्या चरित्राबरोबर ५० वर्षे प्रवास केला. तिच्यामुळेच मी लोकांचे भले करू शकलो. खुद्द महात्मा फुल्यांनी आपल्याच शब्दांत शेवटच्या क्षणी सावित्रीबाईचा कृतार्थ दृष्टीने जो गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, तो सावित्रीबाईच्या अलौकिक क्रांतिकार्याची चोख पावती होय.

'महात्मा फुले यांचे अमर जीवन' हे पुस्तक महात्मा फुले यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त क्षत्रिय मराठे शास्त्री नारो बाबाजी महाघट-पाटील, सत्यशोधक समाजाचे चालक, रा. ओतूर, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, यांनी सत्यशोधक समाजाचे एक प्रकाशन म्हणून लिहिले आहे. महाघट-पाटील हे जोतीरावांचे निकटवर्ती असून ते नेहमी जोतीरावांबरोबर असत. त्यांनी जोतीरावांचे व सावित्रीबाईचे जीवन जवळून पाहिले होते. ते स्वत: सत्यशोधक समाजाचे प्रमुख कार्यकर्ते, लेखक व विचारवंत म्हणून मान्यता पावले होते. समकालीन असल्यामुळे त्यांनी लिहिलेल्या चरित्रातील जोतीरावांची आणि सावित्रीबाईची माहिती अधिकृत अशी आहे. सावित्रीबाईंना महात्मा जोतीराव फुल्यांची पत्नी म्हणून नव्हे, तर सत्यशोधक समाजाच्या एक प्रमुख कार्यकर्त्या व नेत्या म्हणूनही मान्यता प्राप्त झाली होती. महाघट-पाटील म्हणतात, "आज महात्मा जोतीबा आपल्यात नाहीत. तरी त्यांच्या सर्व कार्याची धुरा ते जिवंत असतानाच सावित्रीबाई आपल्या खांद्यावर होऊन पुढे रेटीत असत. आज तर सत्यशोधक समाजाची सर्व जबाबदारी त्यांनी आपल्या अंगावर घेतली आहे. त्याकरिता सर्व सत्यशोधकांनी त्यांना मदत केली पाहिजे. महात्मा जोतीबांच्या मृत्यूनंतर त्यांचे कार्य नेटाने पुढे चालावे व देवीला निदान जेवणा-खाण्याची अडचण येऊ नये, या हेतूने बडोद्याचे महाराज समशेरबहादूर श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी साध्वी सावित्रीबाईंना दरमहा ५० रुपये मदत गेल्या एप्रिल महिन्यापासून चालू केली आहे. याबद्दल महाराज अभिनंदनास पात्र असून या सभेच्यावतीने आम्ही महाराजांना दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना करतो."

वरील अवतरणावरून सावित्रीबाईच्या कार्याची थोरवी अधिकच स्पष्ट

होते. १८९० मध्ये जोतीरावांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाच्या कार्यासह जोतीरावांच्या सर्व क्रांतिकार्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सावित्रीबाईंवर येऊन पडली आणि ती त्यांनी यशस्वीरीत्या शेवटपर्यंत पार पाडली. महात्म्याचा शेवटचा संदेश डोळ्यांसमोर ठेवून आपल्या स्वत:च्या पोटापाण्याचासुध्दा विचार न करता, स्त्री-शूद्रांच्या क्रांतिकार्यासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. देशातील सत्यशोधक समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांना प्रभावी मार्गदर्शन केले. क्रांतिकार्यात कुठेही पोकळी निर्माण होऊ दिली नाही. महात्मा जोतीराव फुल्यांच्या अपूर्व, अद्वितीय क्रांतिकार्याची अतिशय कठीण पण तितकीच महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणे हे सोपे काम नव्हते. प्रखर विरोध, आर्थिक चणचण आणि अनेक संकटे यांना टक्कर देऊन सावित्रीबाईंनी मरेपर्यंत समाजक्रांतिकार्याची ज्योत अखंड तेवत ठेवली. संपूर्ण भारतात समाजक्रांतीच्या नेत्या म्हणून सावित्रीबाई या पहिल्या युगस्त्री ठरतात.

सुप्रसिध्द लेखिका इंदुमती केळकर आपल्या एका लेखात म्हणतात, 'अज्ञात आईबापाचे निराधार मूल आपल्या पदरात घेऊन त्याला स्वत:च्या मुलाप्रमाणे लहानाचा मोठा करणारी उदारहृदयी स्त्री पहावयास मिळते, पण एखाद्या विधवेला अनैतिक संबंधापासून झालेले मूल आपलेच समजून त्याचे संगोपन करणारी दुर्मिळच! सावित्रीबाईंच्या बालगृहात बाळंतपणास आलेल्या, काशीबाई नावाच्या ब्राह्मण तरुण विधवेला झालेले अनौरस मूल सावित्रीबाईंनी दत्तक मुलगा म्हणून आपल्या ओटीत घेतले. केवळ भावुक मानवतेच्या कल्पनेच्या आहारी जाऊन त्यांनी हे साहस केले, असे कोणी म्हणू शकेल. पण माणसातील माणुसकी अन्य भयाच्या कल्पनेने मरण पावते, हे आपण नेहमीच अनुभवतो. जाती, वंश, धर्म व परंपरा यांच्या कक्षा ओलांडून गेलेली, विचारनिष्ठा असलेली स्त्रीच ही बंडखोरी करू शकते.

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाचा सखोल अभ्यास केलेल्या ख्यातनाम लेखिका आणि एक विचारवंत सौ. फुलवंताबाई झोडगे या आपल्या एका लेखात म्हणतात, 'एतद्देशीय महिलांत सावित्रीबाई ही शिकलेली पहिली स्त्री, पहिली शिक्षिका, भारतातील सर्व जातीतील स्त्रियांची पहिली पुढारी, आणि अस्पृश्यतेला जबरदस्त विरोध करणारी पहिली थोर कार्यकर्ती. महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्यावर तिची अढळ निष्ठा होती नि स्पष्टवक्तेपणा, शूद्र-अतिशूद्र समाजात क्रांती घडवून आणण्याची दूरदृष्टी, सदाचरण, विद्येचा व्यासंग, विलक्षण चिकाटी व कडक तत्त्वनिष्ठा इत्यादि गुणांमुळे त्यांचे चरित्र अभ्यासनीय ठरते. त्यांनी आपले सारे जीवन दलित,

शेतकरी, गोरगरीब, मजूर आदि समाजाच्या सेवेसाठी वाहून घेतले. नवीन आचाराची थोर परंपरा त्यांनी सुरू केली.

तत्कालीन एक थोर राजकीय ऋषी मामा परमानंद यांनी जोतीराव व सावित्रीबाई यांच्या त्यागबुद्धीने केलेल्या कार्याचे जवळून निरीक्षण केले होते. फुले दंपतीच्या कार्याचे ते एक चाहते होते. जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी जीवनसर्वस्व स्त्री-शूद्रांच्या कल्याणासाठी खर्च केल्याने वृध्दापकाळी त्यांची उपासमार होऊ नये म्हणून मामा परमानंदांनी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचेकडे त्यांचे चिटणीस श्री. धामणकर यांच्यामार्फत विनंती अर्ज करून वेतनाची मागणी केली होती. त्यांनी म्हटले आहे, जोतीबा आणि त्यांची पत्नी ह्यांना मासिक तीस रुपयांचे वेतन आता सुरू करावे, ते त्यांच्या उभयतांच्या अंतापर्यंत चालू ठेवावे. यापैकी एकाच्या मृत्यूनंतर कमी करावे. मागे राहिलेल्याच्या मृत्यूनंतर आणि मुलाचे शिक्षण संपल्यावर बंद करावे. आता ही गोष्ट दीर्घ कालापर्यंत लांबणीवर टाकता येणार नाही. ह्यासाठी खर्चसुध्दा फार मोठा होणार नाही, एवढीच माझी अपेक्षा आहे. त्यांची ही मागणी लवकर मंजूर न झाल्यामुळे, त्यांची परत पत्र लिहिले, त्यामध्ये ते म्हणतात, अर्धांगवायूमुळे जोतीबा अंथरुणास खिळले आहेत. त्यांना जर सहाय्याला उशीर झाला तर मनातला दयाभाव विफल ठरेल. बडोदे संस्थान आजवर सर्व प्रकारच्या ब्राह्मणांसाठी मग ते बरे असोत, वाईट असोत, अगर उदासीन असोत; रयतेच्या घामाचा पैसा उधळीत आलेच आहे. त्यांनी एका लायक अशा ब्राह्मणेतरासाठी आणि जो शेतकरीवर्गापैकी आहे त्यासाठी त्या करापैकी थोडा पैसा खर्च केला तर अनाठायी होणार नाही. यावरून जोतीराव व सावित्रीबाई यांच्या कार्याची त्यांनी जाणलेली थोरवी व यांच्याबद्दलचा आपलेपणा दिसून येतो. मामा परमानंद हे त्यावेळी मान-मान्यता पावलेले महर्षी असल्यामुळे राजालासुद्धा खडसावण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झालेला होता, हे स्पष्ट होते. अशा महर्षींनी जोतीरावांप्रमाणेच सावित्रीबाईंच्या क्रांतिकार्याची थोरवी सिध्द करुन 'सावित्रीबाई ह्या युगस्त्री होत्या' यास पुष्टीच दिली आहे.

सावित्रीबाईंच्या कार्याची थोरवी ही त्यांच्या कार्यावरूनच सिध्द होते. विशेष म्हणजे महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर नारो बाबाजी महाघट-पाटील यांनी 'महात्मा जोतीराव फुले यांचे अमर जीवन' हे १८९१ मध्ये लिहिलेले पुस्तक सावित्रीबाईंना अर्पण केले आहे. ती अर्पणपत्रिका पुढीलप्रमाणे :

पूजनीय सत्यस्वरुप<br>
साध्वी सावित्रीदेवी जोतीबा फुले<br>
(म. जोतीबांच्या पत्नी)

त्यांची पतीवरील प्रीती, भक्ती आणि निष्ठा त्याचप्रमाणे त्यांच्या अंगी असलेले सहनशीलता, सत्यपरायणला आणि सत्यशोधक समाजप्रियता वगैरे सद्‌गुणांच्या गौरवार्थ हे पुस्तक ग्रंथकर्त्यांनि आदरभावाने व भक्तिपूर्वक नजर केले असे.

ता. १५-११-१८९

ग्रंथकर्ता

ही अर्पण-पत्रिका म्हणजे सावित्रीबाईंच्या अलौकिक कार्याचे यथायोग्य असे मूल्यमापन होय.

सावित्रीबाईंनी मुलींच्या शाळेत स्त्री-शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनास आरंभ झाला. स्त्री व शूद्र-अतिशूद्रांसह अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी आपली सर्व शक्ती वेचली. स्त्री ही माणूस असून पुरुषाप्रमाणेच तिला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हे केवळ उक्तीनेच नव्हे, तर कृतीने सांगणारी ही पहिली भारतीय स्त्री होय. स्त्री-पुरुष समानतेचा पहिला जाहीरनामा सावित्रीबाईंचा आहे. सावित्रीबाई म्हणजे स्त्रीसमाजातील भारतीय संस्कृतीचा आदर्श होय. पददलितांच्या उध्दारासाठी पेटून उठलेले हे पहिले स्त्रीरत्न होय. वयाच्या सतराव्या वर्षी ऐन तारुण्यात पुण्यासारख्या सनातन्यांच्या माहेरघरात अनेक संकटांना टक्कर देऊन सत्य, समता आणि मानवता यासाठी जोतीरावांच्या क्रांतिकार्यात सहभागी होऊन त्या केवळ स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या आद्यजनक ठरल्या, असे नसून विश्वमानवाच्या कल्याणासाठी श्वास घेऊन त्यासाठी सर्वस्व वाहून घेणाऱ्या युगस्त्रीही ठरल्या. जोतीरावांच्या आणि सावित्रीबाईंच्या कार्याने हिंदुस्थानात मन्वंतर घडून आले. नव्या युगाचा आरंभ झाला. म्हणूनच महात्मा जोतीराव फुले हे युगपुरुष आणि सावित्रीबाई फुले ही युगस्त्री ठरते.

दि. १० मार्च १८९७ रोजी या युगस्त्रीचे महानिर्वाण झाले. जोतीने प्रज्वलित केलेली ज्योत अनंतात विलीन झाली. आज या घटनेस एक शतक पूर्ण होत आहे. या प्रदीर्घ कालखंडात भारतात अनेक राजकीय आणि सामाजिक उलथापालथी झाल्या. परंतु सावित्रीबाई या दिव्य ज्योतीने स्त्री आणि शूद्र या समाजाच्या मुक्तीचे जे आंदोलन चालू केले त्याचे काय; हा प्रश्नच आहे. स्वातंत्र्य मिळून ३० वर्षांचा कालखंड झाला आहे. इंग्रजांचे राज्य गेले आणि देश गुलामगिरीतून मुक्त झाला. महात्मा फुल्यांनी शंभर वर्षापूर्वी म्हटल्याप्रमाणे इंग्रज आज ना उद्या जाणार होते. परंतु या दोन ज्योतींनी ज्या सत्य, समता आणि मानवतावादासाठी आपले आयुष्य वेचले आणि ज्या प्रकारचा भारत त्यांना अपेक्षित

होता; तसा तो झाला काय, हा खरा प्रश्न आहे. भट-भिक्षुकांनी निर्माण केलेल्या देवदेवींची दलाली संपली काय? स्त्री व शूद्र हे खऱ्या अर्थाने मुक्त झाले काय? त्यांच्यावरील अन्याय थांबले काय? सर्व मानवजात ही एक आहे, असे मानले जाते काय? या प्रश्नांची उत्तरे नकारात्मकच द्यावी लागतील. त्याचे प्रमुख कारण म्हणजे या ज्योतींच्या प्रेरणा पुढे चालू राहिल्या नाहीत. किंबहुना त्यांचे कार्य जाणूनबुजून झाकण्याचाच प्रयत्न झाला. गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, उच्च-नीच हे भेदाभेद कमी होण्याऐवजी ते वाढतच आहेत, असे म्हणावे लागते.

स्त्रीसमाजाचेच आपण उदाहरण घेऊ. आज मूठभर स्त्रिया शिकून निरनिराळ्या क्षेत्रांत नोकरी करताना दिसतात, परंतु हे प्रमाण फारच अल्प असे आहे. यामध्ये ग्रामीण भागातील व शूद्र-अतिशूद्र समाजातील स्त्रियांची संख्या नगण्यच आहे. म्हणून मूठभर स्त्रियांच्या शिक्षणावरून किंवा त्यांच्या कार्यावरून भारतातील स्त्रीसमाज जागृत झाला किंवा मुक्त झाला असे मानता येणार नाही. खरे सांगावयाचे म्हणजे, स्त्रीमुक्तीबद्दल पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही म्हणावी तशी आस्था नाही. आपल्यापुरतेच मर्यादित वर्तुळ आखून सर्वसामान्य सुशिक्षित स्त्री आज जीवन जगत आहे. दीन आणि शूद्र-अतिशूद्र स्त्रियांवर आजसुध्दा दिवसाढवळ्या होणारे अत्याचार आजच्या सुशिक्षित स्त्रीला जरी दिसले तरी, त्याकडे डोळेझाक केल्याचा अनुभव येतो. अन्यायाविरूद्ध पेटून उठल्याची उदाहरणे क्वचित्‌च आढळतात. म्हणून सावित्रीबाईंच्या युगप्रवर्तक कार्यामधून प्रेरणा घेऊन देशातील शूद्र-अतिशूद्र, खेड्यापाड्यांतील दीन-दुबळ्या स्त्रियांचे ज्यावेळी पुरेसे शिक्षण होईल, ज्यावेळी त्या जागृत होतील, ज्यावेळी त्यांच्यामध्ये अस्मिता निर्माण होईल, ज्यावेळी त्या स्वावलंबी बनतील आणि आपण पुरूषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही इतका आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण होईल; त्याचवेळी सावित्रीबाईंचे कार्य पूर्ण होईल.

साहित्याच्या बाबतीतही अशीच तफावत आढळते. बहुतेक सर्व लेखक, कवी, उच्च ब्राह्मणवर्गातील असून त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचे विषयही त्यांच्याच पांढरपेशा जीवनावर आधारित असे असतात. यामध्ये काही अपवादही आहेत. परंतु सध्या एकूण साहित्य विचारात घेतल्यास शूद्र, अतिशूद्र व तळातील स्त्रीसमाज यांना या साहित्यात अद्याप पुरेसे स्थान नाही. विशिष्ट समाजातील व शहरातील सुखवस्तू लेखक व कवींना हे भानच दिसत नाही. 'कलेसाठी कला' या नावाखाली अशा मंडळीचे साहित्य आणि तळागाळातील समाजजीवन यांचा कुठे मेळच बसत नाही. स्त्रीशूद्रांच्या परिस्थितीचे, भावनांचे आणि आशा-आकांक्षांचे व्याकरण अद्याप या लेखक कवींना जमलेले नाही. अलीकडे

शूद्र-अतिशूद्र समाजातील काही नवोदित लेखक-कवी उदयास येत आहेत. पोटतिडकीने आणि त्वेषाने त्यांच्या भावना त्यांच्या साहित्यात उफाळत आहेत. परंतु ही संख्यासुद्धा अत्यल्पच आहे. माझ्या मते उद्याच्या साहित्यात तळागाळातल्या बहुसंख्या समाजाचे चित्र रेखाटले गेले नाही आणि त्यांच्या जीवनाशी ते एकरूप झाले नाही तर त्याला साहित्यसुद्धा म्हणता येणार नाही. यासाठी महात्मा जोतीराव फुल्यांचा सर्वसमावेशक असा मानवतावादी दृष्टिकोण साहित्यात आणून, लोकभाषेत साहित्य निर्माण होण्याची खरी गरज आहे. म्हणूनच भाषेच्या शुद्धलेखनापेक्षा, तिच्या सौंदर्य अलंकारांपेक्षा, स्त्री-शूद्रांचे जीवन हा केंद्रबिंदू मानून, जोतीराव आणि सावित्रीबाईंनी साहित्य जसे निर्माण केले, तीच प्रेरणा अनुसरण्याची गरज आहे.

सन १८९७ साली महाराष्ट्रात प्लेगची मोठी साथ पसरलेली होती. प्लेगच्या रोग्यांना दवाखान्यात आणून उपचार करण्यासाठी सावित्रीबाई अहोरात्र प्रयत्न करत होत्या. त्यांचा मुलगा डॉ. यशवंतराव हाही प्लेगच्या रोग्यांवर सेवाभावाने उपचार करत होता. एका प्लेग झालेल्या हरिजन मुलाला सावित्रीबाई आपल्या खांद्यावरून आपला मुलगा डॉक्टर यशवंत यांच्या दवाखान्यात आणताना त्यांनाही प्लेगचा प्रार्दुभाव झाला आणि त्यातच दि. १० मार्च १८९७ रोजी ही दिव्य ज्योत मालवली. एका सक्रीय जीवनाची अखेरही सक्रीयतेतच झाली...

*

# 'समाजक्रांतीच्या अग्रणी'

**नीळकंठ गोपाळ मेंढे**

युगप्रवर्तक स्वरुपाची सांस्कृतिक क्रांती करणाऱ्या महात्म्यांचे जीवन हे साधेसरळ कधीच नसते! तत्कालीन प्रतिगामी शक्ती त्यांना सतत विरोध करून त्यांचे जगणे कठीण करून ठेवत असतात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतीराव फुले हे या देशाच्या सामाजिक इतिहासातील एक असेच आगळेवेगळे जोडपे होय.

महात्म्यांचे जीवन हे आदर्शरूप, सत्य, आव्हानरूप व तत्कालीन देशकाल-परिस्थितीत सभोवतीचे मानवी जीवन परिवर्तित करण्याची क्षमता असलेले असते. एकंदरीत समाजजीवनाच्या व स्थलकालांच्या विरूद्ध दिशेने प्रवाह पोहत जाणे सोपे नसते. त्यासाठी प्रचंड आत्मविश्वास, समर्पणभाव, भवितव्यतेची सुस्पष्ट दृष्टी, परिवर्तनाची आकांक्षा व मानवी कल्याणाची भावना मनात सतत तेवत राहावी लागते. अशा व्यक्तिमत्त्वाचा आदर्शरूप व स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून विचार होणे गरजेचे आहे.

मुकुंदराजापासून पेशवाई अखेरपर्यंत महाराष्ट्रात विपुल ग्रंथ निर्माण झाले; पण ते सर्व अध्यात्माचे ग्रंथ होते. भौतिक विद्येसंबंधी, ऐहिक उत्कर्षापकर्षाविषयी एकही ग्रंथ झाला नाही. त्याआधी राजकारण, लोकशाही, कारखानदारी, स्त्रीपुरुष-समता, व्यापार, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व, अस्पृश्यता, जातिभेद, धर्मातील वचनप्रामाण्य, जगातील थोर पुरुषांची चरित्रे, इतिहास, पुराण संशोधन इत्यादी विषयांना कुण्या संत-पंडिताने सुध्दा स्पर्श केला नव्हता.

पाश्चात्य विद्येमुळे भारताला बुध्दिप्रामाण्याची देणगी मिळाली. त्यापूर्वी येथे ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य व रुढिप्रामाण्याचे युग होते. 'जुन्या शास्त्रग्रंथांमध्ये घातक गोष्ट अशी होती की, त्यात केवळ आज्ञा असत. त्यांच्या मागे तर्काचे, कार्यकारणाचे, संयुक्तिकतेचे कसलेही विवेचन केलेले नसे. मानवाला त्यामुळे त्यांनी सर्वस्वी गुलाम करून टाकले होते.' (संदर्भ- महाराष्ट्र संस्कृती : पु. ग. सहस्त्रबुध्दे पृ. ६५२)

इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली व हळुहळू संबंध हिंदुस्थानावर इंग्रजांचा एकछत्री अंमल सुरू झाला. हा काळ स्त्रिया व शूद्र यांच्या दृष्टीने अन्याय व अत्याचारांच्या परिसीमेचा होता. स्त्री व शूद्रांना शिक्षणास बंदी होती.

बालविवाह व सती जाण्यासारख्या अनिष्ट प्रथा धर्मांध शक्तींनी जाणीवपूर्वक रुढ केल्या होत्या.

सावित्रीबाईंचा जन्म दि. ३ जानेवारी १८३१ मध्ये झाल्याचे मानतात. बाल सावित्री आईप्रमाणे गोरीपान, सुंदर व वडिलांप्रमाणे प्रकृतीने धडधाकट, निरोगी होती. तिला लहानपणापासूनच खोटे बोलणे, कुणाची चेष्टा करणे आवडत नसे. लहानपणीच शेती काम करणे, गुरे सांभाळणे, धारा काढणे इत्यादि कामे ती करी. बुध्दी तीक्ष्ण, स्वभाव काहीसा रागीट व खट्याळ होता. वृत्ती तरतरीत व जिज्ञासू असल्यामुळे, नवीन गोष्टी शिकण्यात ती नेहमीच तत्पर असे. पुढे उमलते वय, निसर्गत: प्राप्त झालेले सुदृढ व्यक्तिमत्व व म. जोतीराव फुले यांच्यासारख्या महाप्रवाहाशी वयाच्या नवव्या वर्षी झालेले मीलन, या सर्वच बाबी त्यांच्या संदर्भात युगपरिवर्तनासाठी श्रेयस्कर व क्रांतिपूरक ठरल्या.

स्त्री-शूद्रांवरील वाढलेले अन्याय-अत्याचार व भट-ब्राह्मणांची भोंदूगिरी व लुबाडणूक जर थांबवायची असेल तर बहुजनसमाज शिकला पाहिजे, हे जोतीरावांना प्रकर्षाने जाणवले. त्यासाठी त्यांनी १८४८ मध्ये सावित्रीबाईला घरी शिकवून तयार केले. आणि सावित्रीबाई पहिल्या भारतीय शिक्षिका बनल्या. सावित्रीबाईंनी त्यावेळी घराबाहेर टाकलेले पाऊल म्हणजे नवीन युगाचा आरंभ होता. त्यांनी मिचेलबाईच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षण घेतले. त्यामुळे सावित्रीबाई याच पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका व मुख्याध्यापिका ठरल्याचे तत्कालीन शासकीय अहवाल व बातम्यावरून दिसून येते. स्त्री-शूद्रातिशूद्रांची पहिली शैक्षणिक चळवळ सुरू केल्याबद्दल एका अनामिक समकालीनाने दि. २५ मार्च १८५३ रोजीच्या 'दि पूना ऑब्झर्व्हर अँड डेक्कन विकली' मध्ये काढलेले उद्‌गार आज द्रष्टेपणाचे ठरले आहेत. त्याने म्हटले होते, 'हे काम म्हणजे हिन्दु संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा आरंभ होय.'

ज्या काळात स्त्री-शूद्रांनी शिक्षण घेणे हे धर्मबाह्य व निषिध्द मानले जाते, तेथे एका बहुजन समाजातील माळ्याच्या बायकोने शिक्षिका होणे, हे पुण्यासारख्या धर्ममार्तंडांच्या-भूदेवांच्या व सनातन्यांच्या नगरीत आव्हानच होते. मुलींना शाळेत पाठविणे हे धर्मबाह्य आहे, मुलींना कुमार्गाला लावण्याचाच तो उद्योग आहे, अशी आवई धर्ममार्तंडांनी उठवली. बायामाणसांनी जर अक्षरे वाचली तर त्या अक्षरांच्या अळ्या बनून त्या जेवणाच्या ताटात येतात, असे गैरसमज पसरवून दिले. सावित्रीबाईंचा, त्या शाळेत जाऊ नये म्हणून झालेला छळ सर्वश्रुतच आहे. परंतु त्रास देणाऱ्या गुंडांना त्यांनी दिलेले उत्तर म्हणजे मानवी कल्याणासाठी त्यांच्या मनातून ओसंडणारी परम करुणाच होय. त्या म्हणतात, 'मी माझ्या

भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करीत असतांना तुम्ही माझ्यावर शेण अगर खडे फेकीत आहात, ती मला फुलेच वाटतात. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो.'

जोतीराव-सावित्रीबाई, पूर्व पुण्याच्या गंजपेठ, वेताळपेठेच्या भागात म्हणजे दलित-मुस्लिम व कष्टकऱ्यांच्या वस्तीत राहत. तेथूनच त्यांनी आपले कार्य सुरू केले. त्यांच्या या शैक्षणिक कार्यामुळे त्यांना त्यांच्या वडिलांनी घराबाहेर काढले. शाळेसाठी कुणी जागा देईना, शाळेच्या बांधकामासाठी जवळ पैसा नव्हता, लोक आपली मुले शाळेत पाठवायला तयार होत नसत. अशावेळी लऊजी बिन राघ, राऊत मांग, राणबा महार यांनी आपल्या जातवाल्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यात मदत करणाऱ्या भिडे, गोवंडे, परांजपे, भवाळकर, वाळवेकर प्रभृती ब्राह्मण सहकाऱ्याबरोबरच मुनशी गफार बेग आणि लिजिट यांचीही त्यांना मदत झाली. तशीच सावित्रीबाईंची एक सहकारी फातिमा शेख ही मुस्लीम शिक्षिका होती.

शिक्षणाचे कार्य चालते राहावे व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही मुले शाळेत येत राहावी, म्हणून सावित्रीबाई स्वत: पालकांच्या भेटी घेत. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. मुलांना विरंगुळा मिळावा म्हणून त्यांना मध्येच खाऊ वाटत, खेळावयास सोडत. मुलांना त्यांच्या हुशारीबद्दल पारितोषिके देण्यात येत. शाळेचे वातावरण आरोग्यदायी असून विद्यार्जन व चारित्र्य-निर्माण या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले जाई. तत्कालीन परिस्थितीत सावित्रीबाईंचे अध्यापन कार्य व तळमळ लक्षात घेता आजच्या पोटभरू, राजकारणी, स्वार्थी व वरिष्ठांची हांजीहांजी करणाऱ्या शिक्षकांची कीव येते!

शाळेत उपस्थितीचे प्रमाण वाढवून गळतीचे प्रमाण कमी करणे हा प्रश्न त्यावेळी किती कठीण असेल! पण मुलांना शाळेत येण्यासाठी उपस्थिती-भत्ता देऊन हा प्रश्न त्यांनी सोडविल्याचे दिसते. महाराष्ट्र शासनानेही आदिवासी व ग्रामीण विभागात सध्या असा भत्ता देऊ केला आहे. पण यापूर्वीच हा प्रश्न जर सोडवला असता, तर साक्षरतेचे प्रमाण आज अल्प राहिले नसते. त्याच सुमारास, म्हणजे १८५३ मध्ये, 'ज्या सामाजिक परिस्थितीतून मुले शाळेत येतात, त्याचा बरावाईट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत असतो' हा स्वानुभवावर आधारित सिद्धांत, सावित्रीबाईंनी सांगितला!

त्याकाळी (बंगालमध्ये इ.स. १८२० मध्ये शाळा काढणाऱ्या) मिस कुक यांना पुण्यात मात्र पुरेसा सहयोग न मिळाल्यामुळे आपली शाळा बंद करावी लागली. याच दरम्यान ख्रिस्ती झालेल्या मोडक नावाच्या व्यक्तीने महारवाड्यात काढलेली मुलींची शाळा ही तर रुढीप्रिय शूद्र-अतिशूद्रांनीच बंद करण्यास भाग

पाडली. १८४४ मध्ये चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनने मंगळवार पेठेत काढलेली व पुरेशी शैक्षणिक साधनसामुग्री असलेली शाळा देखील १८४७ साली बंद पडली. एकंदरीत, एकोणिसाव्या शतकात स्त्री-शूद्रांसाठी चालविल्या गेलेल्या सर्वच शाळा बंद पडल्याचे दिसते. म्हणूनच फुले दंपतीच्या या महान कार्याची प्रशंसा करताना मामा परमानंद म्हणतात, 'त्यांच्या (ब्राह्मणांच्या) बालेकिल्ल्यात राहून महार-मांगांसाठी शाळा उघडून आणि त्यांना समाजाचे घटक म्हणून घडविणे म्हणजे सिंहाची आयाळ त्याच्या गुंफेतच जाऊन उपटण्यासारखे आहे.''

'पुरुषांपेक्षा स्त्रियांना शिक्षणात अग्रक्रम दिला पाहिजे'- हे सांगणारे म. फुले हे पहिले भारतीय द्रष्टे व तत्त्वचिंतक होत. शिक्षणाचे व्यवहारात उपयोजन झाले पाहिजे यावर त्यांचा भर होता. ते केवळ शाळा काढूनच थांबले नाही तर त्यांनी योग्य अभ्यासक्रमही तयार केला. सावित्रीबाईंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बहुजन समाजातील एक स्त्री म्हणून घराबाहेर पडून जे शैक्षणिक कार्य जिद्दीने, कौशल्याने व तळमळीने अगदी पहिल्यांदा पार पाडले, त्याला ऐतिहासिक दृष्टीने अधिक महत्त्व आहे.

आज नोकरी व व्यवसायात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी सुशिक्षित स्त्री म्हणजे शंभर-दीडशे वर्षांपूर्वी फुले दंपतीने केलेल्या शैक्षणिक कार्याचे फलित होय. प्रतिगाम्यांचा प्रखर विरोध होतानाही त्यांच्याबद्दल फुले दंपतीने कधी द्वेषभावना दाखविली नाही. म्हणून या परिवर्तनाचा फायदा उच्चवर्णीयांच्याच मुलांनी-विशेषत: मुलींनी अधिक घेतला, हे इतिहासावरून दिसून येते.

सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांची सुधारणा करण्यासाठी 'महिला सेवा मंडळा'ची स्थापन केली. या संस्थेच्या अध्यक्षपदी पुण्याच्या कलेक्टरच्या पत्नी इ. सी. जोन्स या बाई होत्या. या संस्थेमार्फत जानेवारी १८५२ मध्ये भव्य प्रमाणावर जो तिळगूळाचा कार्यक्रम घेतला, त्या कार्यक्रमाची छापील पत्रिका अशी होती: ''१३-१-१८५२ रोजी पुणे कलेक्टर साहेबांच्या पत्नी मिसेस जोन्स यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक तिळगूळ समारंभ होणार आहे. तरी सर्व स्त्रियांनी आपल्या लेकी-सुना घेऊन यावे. समारंभ सायंकाळी ५ वाजता आहे. कोणत्याही जातीच्या अथवा धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातीभेद व पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरून हळदीकुंकू लावण्यात आणि तिळगूळ वाटण्यात येईल.

सौ. सावित्रीबाई भ्रतार जोतीराव फुले

सेक्रेटरीज, महिला सेवा मंडळ.'' ( संदर्भ सावित्रीबाई फुले :

सौ. फुलवंताबाई झोडगे, पृ. २२) या समारंभासाठी झालेला प्रचंड खर्च व समारंभात राबणाऱ्यांची तथा उपस्थितांची संख्या लक्षात घेता, सावित्रीबाईंच्या संग्राहक वृत्तीची, उत्सवप्रियतेची, सेवावृत्तीची, जातिभेद निर्मूलनाची व पुरोगामित्वाची कल्पना येते.

दि. २५ डिसेंबर १८७३ रोजी पहिला सत्यशोधक विवाह, सावित्रीबाईंच्या पुढाकाराने, व खर्चाने त्यांची मैत्रिण बजूबाई ग्यानोबा निंबाळकर यांची मुलगी राधा हिचा सीताराम बजाजी आल्हाट यांचेशी झाला. यामुळे देशभर जे वादळ उठले, त्याचा सावित्रीबाईंना खूप त्रासही झाला. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या सहकार्याने ब्राह्मण विधवांच्या केशवपनाच्या विरूद्ध नाभिकांचा जो ऐतिहासिक संप घडवून आणला, त्यामागची प्रेरणा देखील सावित्रीबाईच होत्या.

'जोतीरावांचे अनेक चरित्रकार त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कामाचे श्रेय त्यांना देतांना सावित्रीबाईंनी वा लोखंडे, भालेकर यांसारख्या सत्यशोधक सहकाऱ्यांनी केलेल्या बऱ्याचशा कामांचे श्रेयही जोतीरावांच्या नावावर जमा करतात. सत्यशोधक चळवळीतल्या अनेक कामांमध्ये सावित्रीबाईंचा वा इतरांचा पुढाकार असल्याचे आता नव्या प्रकाशात स्पष्ट होऊ लागले आहे.'' (संदर्भ - **'तुम्ही आम्ही आपण सगळेच** (मराठी पाक्षिक) संपा. अविनाश धर्माधिकारी, पुणे, २१ एप्रिल १९९७, लेख- 'क्रांतीज्योती बाई सावित्रीबाई फुले : ज्ञानसत्ता प्रसारदूत' - ले. हरि नरके, पृ. २५)

१८७६-७७ साली महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यावेळी जोतीरावांनी सरकारचे त्याकडे लक्ष वेधले. स्वत:च्या घरचे खंडोगणती धान्य गोरगरीबांना वाटून दिले. दुष्काळपीडित गरीब मुलांसाठी 'व्हिक्टोरिया बालाश्रम'ची स्थापना केली होती. त्याठिकाणी सावित्रीबाई आपल्या मैत्रिणींसह स्वत: स्वयंपाक करीत. या दुष्काळात फुले दंपतीने किती माणसे मरणाऱ्या दाढेतून अक्षरश: ओढून काढली असतील, त्याची गणती नाही.

विधवा स्त्रियांकडून बालहत्या होऊ नये या हेतूने जोतीबांनी पुरोगामी विचारवंत कार्यकर्त्यांच्या मदतीने बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. तरूण विधवांना हे गृह म्हणजे फार मोठा आधार होता. स्वत:च्याच घरात स्थापन केलेल्या (१८६३) अनाथ बालकाश्रमात सावित्रीबाईंनी '३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे केली. त्याची सेवा करताना सावित्रीबाईंना कधीच कमीपणा वाटला नाही. काशीबाई या ब्राह्मण विधवेच्या, अनैतिक संबंधातून झालेल्या मुलाचे जन्माचे वेळी स्वत: सावित्रीबाईंनी जाऊन, तिने बाळाला जन्म दिल्याबद्दल तिचे अभिनंदन केले. क्रूर व संकुचित सामाजिकतेच्या पलिकडे जाऊन नैसर्गिक अशा

सृजनाचा करण्यात आलेला हा केवढा मोठा सन्मान होय! पुढे या काशीबाईच्या यशवंत नावाच्या मुलाला फुले दंपतीने दत्तक घेऊन त्याला आपल्या मुलाचा दर्जा दिला, हे कार्य केवळ महामानवांचेच असू शकते. 'जोतीरावांनी जुलै १८८७ मध्ये केलेल्या मृत्यूपत्रात सावित्रीबाईंनी पोटच्या मुलीसारखी ही बाळंतपणे केल्याचे नमूद केले आहे.' अत्यंत प्रतिकूल आर्थिक स्थितीत ही आव्हाने उभयतांनी पेलली होती, हे महत्त्वाचे आहे.

क्रांती म्हणजे आमूलाग्र व्यवस्था परिवर्तन - मग ते धार्मिक, राजकीय अथवा सामाजिक इ. कोणत्याही क्षेत्रातले असो! सर्व जगाच्या इतिहासात १८४८ हे वर्ष महान क्रांतिकारक वर्ष ठरले. कार्ल मार्क्स याने याच वर्षी 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' हा आपला ऐतिहासिक महत्त्वाचा प्रबंध प्रसिध्द केला. अमेरिकेत स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ याच वर्षी न्यूयॉर्क येथील वेल्सियन चर्च येथे सुरु झाली. फ्रान्समध्ये मानवी हक्कासाठी क्रांती, इंग्लंडमध्ये स्त्री-स्वातंत्र्याची मागणी व भारतात जोतीराव व सावित्रीबाई यांचे शिक्षणाचे युगप्रवर्तक कार्य, या युगप्रवर्तक महत्त्वाच्या घटना होत. जोतीरावांनी दिलेला स्त्रीपुरुष समानतेचा (म्हणजे वर्णव्यवस्थेचा छेद करणारा) मंत्र हा धर्मसत्ताक व पुरुषसत्ताक मानसिकतेला अंतर्मुख करणारा मूल्यविचार होता. भारत व जगातील सर्वच राष्ट्रांसाठी ती एक नवीन दिशा होती. मार्क्सवादापेक्षाही ती अधिक मूलभूत होती. स्त्रीमुक्ती व एकंदरीत मानवमुक्तीची हीच खरी सुरुवात होती. त्याचवेळी भारतात राजकीय स्थित्यंतरे झपाट्याने होत होती.

स्त्रीमुक्ती म्हणजे नेमके काय? हे आत्ताच्या हळदीकुंकू व मंगळागौरीच्या कार्यक्रमात धन्यता मानणाऱ्या, समाजात केवळ 'मिरविता' यावे यासाठीच 'सोशल वर्क' करणाऱ्या, श्रीमंतीचा बडेजाव मिरवणाऱ्या व स्त्रीसुलभ नैसर्गिक अस्तित्वावर अतिक्रमण करणाऱ्या 'सुधारणावादी'(!) स्त्रियांना जर समजून घ्यायचे असेल तर त्यांनी सावित्रीबाईंचे चरित्र एकदा तरी डोळ्याखालून घालावे.

तत्कालीन समाज व्रतेवैकल्ये, कुळाचार, सतीची चाल, विषमविवाह, बालविवाह, केशवपन इत्यादि अनिष्ट चालीरीतींनी व अज्ञानाने ग्रस्त होता. त्यासाठी म. फुले त्यांनी सभासंमेलने घेऊन जनजागृती केली. 'विधवा पुनर्विवाह' सभा स्थापन करून स्त्रियांच्या प्रश्नांना वाट करून दिली. या सर्वच कार्यात सावित्रीबाईंचा महत्त्वाचा सहभाग असे. यासाठी सावित्रीबाईंशी चर्चा करून पुढील कृतीची दिशा निश्चित करीत. म. फुल्यांच्या जीवनात सावित्रीबाईंचे स्थान, एक पत्नी यापेक्षा एक सहकारी मित्र व एक प्रेरणाशक्ती म्हणून अधिक होते. म्हणूनच विषम संघर्षाची ही अभूतपूर्व सांस्कृतिक लढाई जोतीरावांना जिंकता आली.

दि. २८ नोव्हेंबर १८९० मध्ये वयाच्या ७३व्या वर्षी म. जोतीबांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यावेळी सावित्रीबाई ६० वर्षांच्या होत्या. जोतीरावांच्या अखेरच्या आजारात औषधपाण्यासाठीही पैसे नव्हते. सावित्रीबाईंनी सगळी सेवाशुश्रूषा केली. जोतीराव गेल्यावर त्यांचे भाऊबंद अंत्ययात्रेस आडवे झाले. अशावेळी सावित्रीबाईंनी धीराने पुढे येऊन त्यांनी स्वत:च्या हाती टिटवे धरले व स्वत:च जोतीरावांना अग्नी दिला. भारताच्या इतिहासात प्रथमच घडलेली ही क्रांतिकारक घटना होय.

पुढे महाराष्ट्रात १८९६ मध्ये पडलेला दुष्काळ व १८९७ साली पुण्यात आलेली प्लेगची साथ यात शूद्रातिशूद्र पददलित समाज होरपळून निघाला. अशावेळी त्या घरोघरी फिरून लोकांच्या अडचणी ऐकत, त्यांचे सांत्वन करीत व त्यांच्या तक्रारी सरकार दरबारी पोचवीत. आयुष्याच्या सतत संघर्षाने थकलेले शरीर व प्लेगच्या रोग्यांची प्रत्यक्ष केलेली सेवा यात त्यांनाही प्लेगची लागण होऊन दि. १० मार्च १८९७ रोजी या कर्मयोगिनी मातेचे महापरिनिर्वाण झाले.

सावित्रीबाईच्या जीवन कर्तृत्वाचा विचार करताना, त्यांच्या समकालीन पुरोगामी विचारवंतांचे व कार्यकर्त्यांचेही त्यांना खूप सहकार्य मिळाले, हे नाकारता येत नाही. त्यापैकी विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी ख्रिश्चन धर्मप्रसाराला तोडीस तोड असे उत्तर दिले. जन्मनिष्ठ जातीभेद व वर्णभेद त्यांना मान्य नव्हते. श्रमविभाजन व वितरणाचा विचार त्यांनी मार्क्सचा कसलाही अभ्यास न करता आपल्या 'सुखदायक राज्यप्रकरणी' या पुस्तकात मांडला, पण विष्णुबुवाच्या कोणत्याच विचाराचा समाजात प्रसार झाला नाही.

बाळशास्त्री जांभेकर हे राजाराममोहन रॉय यांचे अनुयायी व पाश्चात्य विद्येचे पुरस्कर्ते होते. १८३२ मध्ये त्यांनी 'दर्पण' साप्ताहिक काढून त्याद्वारे लोकस्थिती, धर्मरीती आणि राज्यरीती यात चांगले व उपयोगी फेरफार घडवून आणले.

बुद्धीवादाचा पहिला पुरस्कर्ता म्हणजे लोकहितवादी होय, ते पाश्चात्य विद्येचे पुरस्कर्ते होते. 'अज्ञान ही हिंदु लोकांची आणि ब्राह्मणांची महाव्याधी आहे' असे त्यांचे मत होते. पुनर्विवाहाचा पुरस्कार व परदेशगमनाविषयीची परखड मते नोंदवून त्यांनी पारंपरिक शब्दप्रामाण्याला जबरदस्त धक्के दिले. स्त्रियांच्या सुधारणेविषयी आपली मती त्यांनी अनेक पत्रांत व्यक्त केली. पण, 'लोकहितवादींनी जरी हा इतरांना उपदेश केला असला, तरी तो त्यांच्या स्वत:च्या कृतीत व आचरणात उतरलेला कधीच आढळत नाही! (सं. महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक, ले. धनंजय कीर, पृ. ११२)

धर्मसुधारणेचा प्रयत्न करणारे व व्याकरणाचे पंडित असलेले हे नंतरचे सुधारक होत. १८४४ मध्ये त्यांनी 'मानवधर्म सभा' स्थापन केली. विवेकास धरून नित्यनैमित्तिक कर्मे विवेकास अनुसरून करावी, सर्वांस ज्ञानशिक्षण असावे, विचारस्वातंत्र्य असावे ही सभेची मुख्य तत्त्वे होती, मूर्तिपूजा त्यांना वेडगळ वाटे. ख्रिश्चन लोकांप्रमाणे ते प्रार्थना करीत. पुढे काढलेल्या 'परमहंस सभे'ची तत्त्वेही अशीच होती. जातिभेद मोडण्याचे कामही ते गुप्तपणे करीत. हा विचार व कृती त्या काळाच्या मानाने अत्यंत क्रांतीकारक असली, तरी हे काम अत्यंत गुप्तपणे चालत असल्यामुळे समाज सुधारकांच्या अंगी जी निर्भिडता व धैर्य पाहिजे, ते त्यांच्याजवळ नव्हते.

न्या. रानडे, भांडारकर इ. पंडित धर्मसुधारणेसाठी पुराण वचनांचा आधार घेत. समाजसुधारणेसाठीची निर्भिडता त्यांचे जवळ नव्हती. न्या. रानडे यांनी तर जरठविवाह अधिक्षेप व विधवाविवाहाचा पुरस्कार करुनसुद्धा अल्पवयीन मुलीसोबत पुनर्विवाह केल्याचा इतिहास आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेतून इंग्रजांवर कडक टीका केली, तर त्यांच्या राज्यातील व्यक्तिस्वातंत्र्याचा मुक्तकंठाने गौरवही केला. परंतु जोतीरावांनी आरंभलेल्या क्रांतीकार्याचा गौरव न करता, त्यांच्या साहित्यातील व्याकरणाच्या चुका काढण्यात भाषेच्या या शिवाजीनी धन्यता मानली. लेखक म्हणून चिपळूणकरांचे कर्तृत्व आणि शक्ती अजोड होती; पण 'विष्णुशास्त्रांच्या विचारसरणीत उजेडापेक्षा उष्णता अधिक होती. विचारापेक्षा विकारच अधिक होता.' (सं. महात्मा जोतीराव फुले - धनंजय कीर, पृ. १६६)

बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, रानडे, भांडारकर प्रभृतींना भारताच्या प्राचीन वैभवाचा अभिमान होता. यांपैकी बरेचसे लोक सरकारी नोकरीत होते व इंग्रजांचे राज्य एक वरदान आहे' असे ते मानीत. त्यांच्या प्रार्थनापद्धती ख्रिस्ती वळणावर जात. ख्रिश्चन लोक हिंदुधर्मातील व्यंगांवर बोट ठेवून त्यांची निंदानालस्ती करीत. त्याला वरील लोकांनी कधीच उत्तरे दिली नाहीत. या कारणामुळे हे सर्व लोक हिंदु समाजाला परके वाटत. 'त्यामुळे संपूर्ण भारतात नवचैतन्याची लाट निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले नाही. ते काम विवेकानंदानी केले'. (सं. महाराष्ट्र संस्कृती - ले. पु. ग. सहस्त्रबुध्दे, पृ. ६६५)

जेथे सुधारणावाद्यांची ही स्थिती होती, तेथे त्यांच्या बायकांची 'सुधारणा' हळदीकुंकवाचे कार्यक्रम करण्यापुरतीच मर्यादित राहावी यात नवल ते काय? तरी पण तत्कालीनांमध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष' संबंधाची बौद्धिक चिकित्सा केली, हे त्यांचे फार मोठे धैर्य म्हणावे लागेल. परंतु ताराबाईंनी आपले

सगळे लेखन स्त्री-शोषणावरच केंद्रीत केले. १८८२ मध्ये पंडिता रमाबाई यांनी न्यायमूर्ती रानडे यांचे सहकार्य घेऊन, 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. खास हिंदु विधवांसाठी आश्रम काढण्याचाही त्यांनी प्रयत्न केली. परंतु त्यात त्यांना यश न आल्याने त्या इंग्लंडला निघून गेल्या व पुढे त्यांनी ख्रिश्चन धर्मही स्वीकारला. आनंदीबाई जोशी यांचेवर त्यांच्या पतीच्या महत्त्वाकांक्षेची पकड अधिक होती. म्हणून त्यांनाही फारसे काही विधायक कार्य करता आले नाही. म्हणूनच समकालीन पुरोगामी महिलांमध्ये सावित्रीबाईंच्या कार्याला तोड नाही.

समकालीनामध्येच श्री. कृष्णराव भालेकर हे सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रभावी वक्ते, लेखक व 'दीनबंधू' पत्राचे संपादक होते. शेतकरी आणि कामगार यांच्याविषयी त्यांना अत्यंत कळवळा होता. व्यवहारातील सहज व समर्पक दृष्टांतांद्वारा त्यांनी ज्ञान व परिवर्तनाचे महत्त्व पटवून दिले. नारायणराव लोखंडे हे सुध्दा महात्मा फुल्यांचे अनुयायी व सत्यशोधक समाजाचे तरुण नेते होते. त्यांची कार्यशक्ती दांडगी होती. त्यांनी स्थापन केलेली 'मिल हॅण्ड असोसिएशन सोसायटी' ही भारतीय कामगारांची पहिली संस्था होय.

उत्तरकालीनांपैकी समाजसुधारणेच्या क्षेत्रात गोपाळ गणेश आगरकरांचे स्थापन अनन्यसाधारण आहे. ते बुद्धिवादाचे निःसीम पुरस्कर्ते होते. 'मनुष्यतेचे ऐहिक सुखसंर्वधन' हाच भावी काळात सार्वत्रिक धर्म व्हावा अशी त्यांची इच्छा होती. एकंदर सुधारणांविषयी आगरकरांनी जे लिहिले ते अत्यंत आवेशाने, त्वेषाने, तर्कसंगत व तीव्र भाषेत, परंतु त्या काळी कित्येक वर्षे पुढचा असा तो विचार तत्कालीन समाजाच्या पचनी पडला नाही.

म. फुले यांच्यानंतर स्त्रीशिक्षणाविषयी टाहो फोडणारे पुरुष म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे. त्यासाठी त्यांनी स्त्रीशिक्षणाविषयी केंद्र पुण्यासारखे एखादे शहर न ठेवता हिंगणे, वाई, सातारा यासारख्या खेड्यापाड्यापर्यंत स्त्रीशिक्षणाचे लोण पसरविले. यात त्यांच्या द्रष्टेपणा सामावला आहे. विधवांचे होत असलेले हाल व दुःखे सहन न झाल्याने त्यांनी पुण्याला 'अनाथबालिकाश्रम'ची स्थापना केली; पण पुनर्विवाहासंबंधी मात्र या संस्थेने अगदी तटस्थ भूमिका स्वीकारली. महर्षी शिंदे यांनी देखील ब्राह्मणेतर चळवळीला राष्ट्रनिष्ठ वळण लावण्याचा मोठा प्रयत्न केला होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी देखील शिक्षणप्रसाराच्या क्षेत्रात मोठी कामगिरी केली. लोकमान्य टिळकांची देशभक्ती जाज्वल्य असली तरी ते धर्मपरिवर्तन व वर्णाश्रम व्यवस्था परिवर्तनाच्या विरूद्ध असल्याचे दिसून येते.

सावित्रीबाईंचे जे साहित्य उजेडात आले आहे यावरून त्यांच्या

काव्यनिर्मितीचे प्रयोजन कलात्मक साहित्य निर्माण करणे, हे मुख्यत्वे नसून 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क माणसांना मिळवून देणे हा आहे. त्यामुळे सावित्रीबाईंची काव्यरचना कातीव-कोरीव नसली तरी, त्यांच्या काव्यनिर्मितीच्या मागील आंतरिक तळमळीमुळे त्या रचना मौल्यवान उतरल्याचे दिसून येते. सावित्रीबाईंच्या रचनांचा विचार करता; श्रेष्ठ मानवीमूल्यांच्या स्थापनेसाठी जनसामान्यांना केलेले आवाहन व आत्मनिष्ठेतून कवटाळलेली जननिष्ठा प्रतीत होते. एवढेच नव्हे, तर जोतीरावांच्या जीवनचिंतनाशी सावित्रीबाईंच्या चिंतनाचा किती एकात्म मेळ बसला होता हेही, आविष्कृत होणाऱ्या आशय-विषयावरून, जाणवल्याशिवाय राहात नाही. सावित्रीबाईंच्या कवितेतून अभिव्यक्त होणारी संपूर्ण भारतीयता, श्रेष्ठ व व्यापक जीवनमूल्ये, आत्मप्रतीती, कालसापेक्षता व विषयाची विविधता या संदर्भाने विचार करता, त्यांची कविताच खरी आधुनिक ठरते. म्हणून 'आधुनिक कविता निर्मिताचा मान' केशवसुतांपूर्वी सुमारे ३०-३५ वर्षे काव्य लेखन करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्याकडे जायला हवा.

'तारतम्य' या पुस्तकातील/एका पूर्वप्रसिद्ध लेखावरून (ले. डॉ. स. गं. मालशे) सावित्रीबाई यांच्या चरित्रावर व साहित्यावर त्यांनी घेतलेले आक्षेप प्रथमदर्शनी योग्य वाटू लागतात हे खरे; तथापि तत्कालीन परिस्थितीच्या परिघात फुले दंपतीने मानवमुक्तीसाठी केलेले लोकोत्तर कार्य व त्यांच्या चरित्रातून, व्यक्तिमत्त्वातून व साहित्यातून व्यक्त होणाऱ्या आशय व कळवळा या बाबी लक्षात घेता, त्यांचे साहित्य व चरित्र मुळीच विसंगत वाटत नाही. 'सावित्रीबाई या शिक्षिका होत्या व जनकल्याणासाठी त्या आयुष्यभर झटल्या' ही बाब इतिहासाने मान्यच केली आहे.

उपरोक्त संशोधकाने जे उपहासात्मक व तर्ककठोर कृपाण सावित्रीबाईंवर चालविले, त्यावरून 'जे ब्राह्मण स्त्रियांना शक्य आहे ते बहुजन समाजातील माळी जातीतल्या सावित्रीबाईंना कसे होईल?' हा प्रश्नच त्यांच्यासमोर अधिक निर्णायकपणे उभा असावा असे वाटते. तसेच डॉ. मा. गो. माळी यांनी सावित्रीबाईंच्या लोकोत्तर कार्याची प्रशंसा करताना व त्यांना अग्रतेचा मान देताना जी विशेषणे व गौरवपर भाषा वापरली तीही त्यांना खटकल्याचे जाणवते. तरी पण संबंधित संशोधकास स्वत:सच मान्य असल्याप्रमाणे, ''सौ. सावित्रीबाई जरी फार शिकली नव्हती, तरी पतीच्या सहवासाने तिची समजूत वाढून तिचे नेहमी त्यांच्या इच्छेप्रमाणे वर्तन, पतिसेवा व आनंदी वृत्ती ही अप्रतिम होती,'' असे मान्य केले तरी, आणि तत्कालीन धर्मांधता, प्रतिकूल समाज-परिस्थिती, न. फुल्यांचे लोकोत्तर कार्य व स्त्री म्हणून तत्कालीन समाजात असलेले सावित्रीबाईंचे

स्थान या दृष्टीने जरी विचार केला तरी सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्व आकलनात फारसा फरक पडत नाही. 'तारतम्य' हे नाव धारण करणाऱ्या संबंधित तारतम्यविहीन तर्कटाला डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत इतिहास-संशोधन तत्कालीन परिस्थिती व 'तारतम्य' या दृष्टीने संयमित शैलीत जी उत्तरे दिली आहेत. तीच अंतिमत: योग्य वाटतात.

सावित्रीबाईंचे एकंदरीत चरित्र, व्यक्तिमत्व, तत्कालीन अंधार युगातील संघर्षाचे स्वरूप, स्त्री-शूद्रांच्या कल्याणासाठी आयुष्यभर सोसलेला छळ व कष्ट यांतून सावित्रीबाई 'समाज क्रांतीच्या अग्रणी' ठरतात. मानवमुक्तीची-जनकल्याणाची आच त्यांच्या मनात म. फुल्यांइतकीच तीव्रतेने होती, हे त्यांच्या कवितेच्या अंतरंगाचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर तर अधिकच स्पष्ट होते. भारतीय स्त्री-शूद्रांना अज्ञानाच्या अंधार कोठडीतून बाहेर काढणारी सावित्रीबाई म्हणजे 'आधुनिक सरस्वती'च होय.

*'माऊली स्वत: थोर । जरी जोतीबा परिस*
*जैसी गंगा यमुनेस । मेळ सुरेख भूलोकी ।*
*पुराणात सरस्वती । कल्पनेची अनुकृती ।*
*परी प्रत्यक्ष कृतिमती । युगमाता सावित्री ।'*

या शब्दांची सुमनांजली त्यांच्या चरणी अर्पून समाज क्रांतीच्या या मातृमूर्तीपुढे नतमस्तक होणे- यातच आपल्यासारख्या पामरांची कृतार्थता आहे.

# सत्यशोधक समाजाच्या नेत्या सावित्रीबाई फुले

**फुलवंताबाई झोडगे**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ज्या काळात होऊन गेल्या, तो काळ अज्ञानाच्या अंध:कारात गडप होता. पेशवाई मावळली गेली होती. आंग्लाईचा उदय झाला होता. त्याचबरोबर नव्या नव्या गोष्टीचे वारे वाहू लागले. आगगाडी काय, तारायंत्र काय, टपालपेटी काय, नव्या नवलाईच्या घटना घडू लागल्या. त्याकडे सारे आबालवृद्ध आश्चर्यचकित होऊन पाहू लागले. शिकलेसवरलेले लोकही आंग्लाईची बहादुरी मान्य करू लागले. नव्या विचारांचा, नव्या आचारांचा लोक अंगीकार करू लागले. तरी प्राचीन परंपरा आणि सामाजिक रुढी, पुराबरोबर लव्हाळी जशी वाहून जात नाही, त्याप्रमाणे टिकून राहिल्या. नव्या विचारांच्या तुफानी वादळात काही झाडे जशी उन्मळून पडत नाहीत, त्याप्रमाणे स्त्रीजनात, शूद्रादि अतिशूद्र जनांत आणि सर्वसामान्य अशा स्त्रीपुरुषांत, बहुजनात अज्ञान, दारिद्र्य वाढलेले होते. त्यांना अंधश्रद्धेने पछाडलेले होते. विचारशून्य आचार आणि निरर्थक रुढी इत्यादींनी सारा मानवसमाज भारावून गेला होता. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी, सती प्रथा, केशवपन, स्त्री व शूद्रादिक जनास शिक्षणाची बंदी! तो काळ विचारात घेतला तर मनाचा थरकाप उडतो. भयानक काळ होता. काळाकुट्ट अंधार!

काळच विचित्र होता. बाजीरावी थाटाचा. श्रेष्ठीलोक धर्माच्या व रुढींच्या नावाने गोरगरिबांना लुटून गबर झाले होते. सारा गोरगरीब बहुजन समाज, सामाजिक गुलामगिरीत खितपत पडलेला होता. अतिशूद्रांची तशीच स्त्रियांची स्थिती अति हीनदीन झाली होती. शूद्राचा विटाळ नको म्हणून शूद्राला आपल्या गळ्यात मडके बांधावे लागे. चालताना जमिनीवर उठत असलेली पावले पुसून जाण्यासाठी पानांची फांदी कमरेस बांधून ती वाटेवर सोडावी लागे. ही अमानुष प्रथा अस्तित्वात होती. स्त्रियांना गाई, शेळ्या या जनावरांप्रमाणे विकले जाई. तिला जनावरांप्रमाणे वागविण्यात येत असे. बालविवाह, सतीची चाल, अकाली वैधव्य इ. चालीरीतींने स्त्री जीवन बरबाद झाले होते. अशाप्रकारे बहुजन समाजाची स्थिती भयावह बनली होती. त्यावेळी जोतिबा गोविंदराव फुले नावाचा मुलगा मिशनरी शाळेत शिकत होता. शिकता-शिकता तो समाजाचे निरीक्षण करून अभ्यास करीत होता, जोतिबा १३ वर्षांचा असताना १८४० साली त्याचे लग्न

नायगाव, तालुका खंडाळा, जि. सातारा येथील नेवसे पाटलाच्या नऊ वर्षे वयाच्या मुलीबरोबर झाले. तिचे नाव सावित्रीबाई हे होते. लग्न झाल्यावर जोतिबाने सावित्रीबाईस शिकविण्यास प्रारंभ केला. त्यांचे हे कार्य म्हणजे स्त्री-शिक्षण बंदीवर केलेला पहिला हल्ला होय.

महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले हे जगावेगळे दांपत्य होते. त्यांनी शूद्रांवर होत असलेले अन्याय पाहिले, अनुभवले. स्त्री जातीवर होत असलेल्या अत्याचारांनी हे दांपत्य व्यथित झाले. स्त्री आणि शूद्र या समाजावर जे अन्याय व अत्याचार होतात, त्याचा कार्यकारणभाव शोधल्यास प्रचलित असलेली समाजव्यवस्था हीच कारण आहे; तिची रचना पुरुष प्रभुत्वाची असून स्त्री-हीनत्व वाढविणारी आहे. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने स्त्रियांचे व शूद्रांचे पद्धतशीर शोषण करता येते व त्यांना मनुष्यत्वहीन करता येते. अशी ही अघोरी पुरुषसत्ताक समाजरचना आहे. तिच्यात बदल झाला पाहिजे. म्हणून त्यांनी समाज क्रांतीसाठी स्वत:चे एक स्वतंत्र तत्वज्ञान निर्माण केले. सामाजिक परिवर्तनाला समता, स्वतंत्रता आणि एकता या स्वभावसिद्ध तत्त्वांना अधिष्ठान दिले. या दांपत्याने प्रचलित असलेल्या समाजव्यवस्थेविरूध्द बंड उभारून पुरुषसत्ताक समाजव्यवस्था नाकारली. पितृसत्ताक समाज-रचनेवर घणाघाती आघात सुरू केले. मातृसत्ताक समाजरचनेचा त्यांनी पुरस्कार केला. स्त्री आणि पुरुष हा संघर्ष मानव जन्मापासूनचा आहे आणि तो मानवप्राणी पृथ्वीवर असेपर्यंत चालणार आहे. ही गोष्ट स्त्रियांनी लक्षात ठेवावी आणि स्त्रीमुक्तीचा संघर्ष चालू ठेवावा. त्यात खंड पडू देऊ नये.

फुले दांपत्याने स्त्री-शूद्र हे अज्ञानाच्या पांघरुणात झोपले असता त्यांना जागे केले. ज्ञानाचे डोस दिले. त्यांना चालू असलेल्या समाजरुढीविरूध्द बंड उभारण्यास शिकविले. स्त्री-मुक्ती आणि अस्पृश्योद्धार या चळवळी त्यांनी जीवाच्या अंतापर्यंत चालू ठेवल्या होत्या. शिवाय सामाजिक परिवर्तनाचा कार्यक्रमही समाजापुढे ठेवला. चळवळी, सभा, सम्मेलने, निषेध, संप, आंदोलने, पिकेटिंग हे चळवळीचे मार्गही दाखविले. समता आणि स्वतंत्रता या दिव्य तत्त्वांचा पाठपुरावा केला. म. जोतिबांचे महान कार्य राजर्षि छत्रपती शाहूराजांनी वेगाने पुढे नेले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म. जोतिबांना पूजनीय गुरू मानून त्यांचे कार्य उजळून टाकले आणि ते भारताच्या घटनेत नोंदवून टाकले. फुले दांपत्याने समता आणि स्वतंत्रता यासाठी चळवळीत ज्या-ज्या साधनांचा उपयोग केला, ती-ती सर्व साधने महात्मा गांधींनी स्वराज्याच्या चळवळीत वापरली होती, असे आढळून येते. म. गांधी म्हणतात,- 'खरा महात्मा जोतीबा फुले हे

होते.'

जोतिबाचे कुटंब म्हणजे जोतिबा, जोतिबाचे वडील गोविंदराव फुले, आणि लहानपणापासून जोतिबास सांभाळत आलेली सगुणाबाई. गोविंदराव फुलांचा धंदा करीत. त्यात त्यांना पैसा बराच मिळत असे लहानपणापासून शेती जोतिबा पाहात असे. रानातल्या पडळीत जोतिबा आणि सगुणाबाई राहात होत्या. येथून जोतिबा गावातल्या मिशनरी शाळेत जात असे. त्याने शाळा कधीच चुकवली नाही. त्याचे सारे जीवन नियमबद्ध होते. ही सवय सगुणाबाईंनी जोतिबास लावली. सगुणाबाई या प्रेमळ, मायाळू, शिस्तप्रिय होत्या. त्यांचा सहवास जोतिबांच्या जीवन विकासाच्या कामी सहजगत्या उपयुक्त होत होता. सावित्रीबाई माहेराहून नुकत्याच आल्या होत्या. त्या घरात आनंदाने वावरत होत्या. जोतिबा शाळेतून आला तेव्हा सगुणाबाईने विचारले-

'जोतिबा शाळेत आज काय शिकलास तू?'

'आज मॅडमनी येशूखिस्ताची माहिती सांगितली.'

'त्यापासून तू काय शिकलास?' ' परोपकारी कृत्ये करावी. यातच खरा पुरुषार्थ आहे.' 'वाहवा! छान आहे. पण तुला एक गोष्ट सांगू?'

'सांग ना!' जोतिबा म्हणाला.

'तू जे काही शिकतोस, तेच तू सावित्रीला शिकव. तुझ्या पुढील संसाराला सावित्रीचा हातभार लागेल बघ. तुझा आनंदाने चाललेला संसार मला बघायचा आहे म्हणून तू सावित्रीला शिकव.

जोतिबा म्हणाला, 'ठीक आहे, तुझी आज्ञा शिरसावंद्य.'

सावित्रीने मध्येच तोंड घातले. 'आऊला आणि मला आधी श्रीगणेशा शिकवा. शिकवाल ना?'

'होय. होय हो.' आणि दुसऱ्या दिवसापासून जोतिबाची पहिली बायांची शाळा सुरू झाली. शाळा-आंब्याच्या झाडाची सावली. लिहायला पाटी-मऊ मऊ माती. लिहायला लेखण्या-आंब्याच्या झाडाच्या वाळलेल्या काड्या. जोतिबामास्तर दोन विद्यार्थिनींना धडे देऊ लागले. ते धडे बाया गिरवू लागल्या. दिवसामागून दिवस भुर्रकन उडून गेले. दोन्ही विद्यार्थिनी मराठीचा अभ्यासक्रम पूर्ण करून मिशनरी ट्रेनिंग क्लासचे शिक्षण घेऊ लागल्या. दोघीही ट्रेनिंग क्लासच्या शेवटच्या वर्षात प्रथम वर्ग मिळवून उत्तीर्ण झाल्या.

जोतिबाने वानवडीच्या महारवाड्यात एक शाळा स्थापन केली. इ.स. १८४७च्या जूनपासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत ही शाळा कशीबशी चालून आपोआप बंद पडली. या शाळेच्या शिक्षिका आऊ होत्या.

जोतिबाने व सावित्रीबाईने आऊस विचारले, 'ही शाळा बंद कशी पडली? आऊची शाळा कशी बंद पडली; याचा अभ्यास आपणास करावयास हवा. तरच पुढच्या कार्यास पुढचे पाऊल टाकता येईल.' आऊ म्हणाल्या- 'मी महारवाड्यातले घर उघडले. पहिल्या दिवशी पुष्कळ मुले व मुली आल्या. पण पुढे लवकरच त्यांची संख्या कमी झाली. मी महारवाड्यातील पुढाऱ्यांना शाळेत बोलावून घेत असे. त्यांच्याशी चर्चा करीत असे. ते मलाच धमकावणी देत असत की, तुमची शाळा बंद करा. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शाळा काढून कित्येक महारवाडे व मांगवाडे ख्रिस्तीवाडे बनवून टाकले आहेत. तसा आमचा महारवाडा तुम्ही ख्रिस्तीवाडा बनविणार की काय? उद्यापासून तुम्ही आमच्या वाड्यात येऊ नका. तुम्हाला आमचा वाडा उद्यापासून बंद.' जोतिबा व सावित्रीबाई ही दोघे सगुणाबाईकडे गंभीर नजरेने पाहात राहिले. सगुणाबाई त्यांचेकडे पाहात म्हणाली.

'अरे, तुम्ही असे गंभीर का झालात? चांगल्या कामाला अनेक अडचणी येतात. त्याला घाबरून जाण्याचे कारण नाही.'

जोतीबा म्हणाला, 'छे हो! छे आऊ! मी घाबरलो नाही उलट वानवडीच्या महारमांगांसाठी व बहुजन लोकांसाठी पुन्हा शाळा काढण्याचे सामर्थ्य आले आहे. बघाच तुम्ही गंमत.'

महाराष्ट्रावर ब्रिटीशांची सत्ता स्थापित झाल्यावर कारभाराच्या सोयीसाठी ब्रिटिशांनी समाजाचे तीन वर्ग पाडले: (१) पुढारलेले, (२) मध्यम परिस्थितीचे, (३) पूर्ण दरिद्री व पूर्ण अडाणी. लोकसंख्येच्या मानाने (१) पुढारलेल्यांचा वर्ग-शेकडा ३ टक्के, (२) मध्यम वर्ग-शेकडा १७ टक्के आणि पूर्ण मागासलेले शेकडा ८० टक्के प्रमाण होते. हे ८० टक्के लोक मागासलेल्या जातीजमातींचे आहेत. अडाणी असल्यामुळे त्यांना नोकऱ्या नाहीत. ब्रिटिश सरकारने इ.स. १८२७ साली काही कायदे केले म्हणून लोकात 'आंग्लाई म्हणजे कायद्याचे राज्य' ही म्हण प्रचारात आली. महात्मा जोतिबा फुले हे इ.स. १८२७ साली जन्मले. याच सालात ब्रिटीश सत्ता महाराष्ट्रात स्थिरावली, हा योगायोग असेल. विद्यार्थीदशेतच जोतिबाचा मित्र गोतावळा बराच वाढला होता. गोवंड, जोशी इत्यादी मित्रांबरोबर तो आपल्या पुढील कार्यासंबंधी बोलत असे व त्यांचा सल्ला घेत असे. वस्ताद लहूजी मांग, खंडू, रामोशी हे तर जोतिबाला देवमाणूस समजत असत. असे असले तरी, जोतिबा फुले त्यांना शारीरिक खेळाचे गुरू मानीत.

महारवाड्यातील शाळेच्या बाबतीत जो अनुभव आला, त्यामुळे जोतिबा फार बेचैन झाले. ते घराबाहेर पडले. गल्लीबोळातून ते मुख्य रस्त्याला लागले. ते गणेश पेठेत शिरले. त्यांनी डुल्या मारुतीकडे जाणारा रस्ता पकडला. तोच

समोर घोरपडी गावाच्या महारवाड्यातील धोंडी महार येत असल्याचे दिसले. जोतिबाचा चेहरा आनंदाने फुलला. धोंडीबा जवळ येईपर्यंत जोतिबा रस्त्यावरच उभा राहिला. जोतिबा जवळ येताच धोंडीबाने जोतिबाकडे पाहत 'जोहार, मायबाप जोहार!' म्हणून नमस्कार केला आणि जोतिबापासून थोड्या अंतरावर जाऊन तो उभा राहिला. जोतिबालाच त्याच्याजवळ यावे लागले. जोतिबा त्यास म्हणाला, 'धोंडिबा तुमच्याकडेच मी निघालो होतो. रस्त्यात गाठ पडली, बरे झाले!'

धोंडिबा म्हणाला. 'माझ्याकडे काय काम काढले, जोतिबा देवा?'

'तुझ्याजवळ घोडे आहेत'.

'होय देवा. पण काय काम देवा?'

जोतिबा म्हणाले, 'एक दवंडी द्यावयाची आहे.'

'दवंडी देण्याची परवानगी गोऱ्या साहेबाकडून काढावयास हवी ना?'

'ती काढली आहे.'

'दवंडी काय द्यावयाची? केव्हा द्यावयाची? सांगा देवा'

'उगाच देवा म्हणू नकोस. नीट ऐक! तारीख २५ डिसेंबर १८४७ रोजी फुले वाड्याकडच्या समोरच्या असलेल्या मैदानात फार मोठी सभा भरणार आहे. या सभेला सर्वांनी यावे हो. ढुमढुम ढुम. ऐकलंस धोंडिबा?'

'पाठसुद्धा झाली दवंडी!' म्हणत धोंडिबाने ती जोतिबास म्हणून दाखवली. जोतिबा आश्चर्याने त्याच्याकडे पहातच राहिले. आणि पुटपुटले, 'आपल्या समाजात अशा गुणी माणसांचा संग्रह असताना त्यांना धर्माने अस्पृश्य म्हणून दूर ठेवावे व समाजाने त्यांना गावाबाहेर हाकलावे हा निव्वळ मूर्खपणा आहे.'

दि. २५ डिसेंबर १८४७ ला झालेली जंगी सभा पुण्यातच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात दुमदुमून राहिली. सभेचे अध्यक्षस्थान लहुजी मांग यांनी भूषविले होते. प्रमुख वक्ते जोतिराव फुले हे होते. त्यांच्या भाषणाचा थोडक्यात आशय असा- 'स्त्रियांच्या सर्व दु:खांची मुळे कोणती असतील तर पितृसत्ताक पध्दती हे आहे; कुटुंबाची सत्ता व समाजातील सत्ता यांच्या संबंधात आहे. महिला हीन दर्जाच्या आहेत हे केव्हाच ठरवून टाकलेले असते. हा पुरुषसत्ताक व्यवस्थेत पक्का झालेला सिद्धांत आहे. ब्रिटीशांच्या आगमनानंतर तर हीन विचारात थोडेसे परिवर्तन झाले असले तरी मूलगामी लोकशाही मूलतत्वे अजून या समाजात रुजली नाहीत. अबला, स्त्रिया व दुर्बल शूद्रातिशूद्र या बहुजनसमाजावर मूठभर लोक प्रभुत्व गाजवितात. त्यांच्यावर नाना प्रकारचे अन्याय करतात. 'स्त्री' हा शब्द उच्चारला की, आपल्या डोळ्यासमोर केवळ चूल व मूल यातच रममाण झालेली, अज्ञानाच्या व दारिद्र्याच्या गर्तेत अनंत काळापासून सापडलेली,

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेखाली भरडून निघत आलेली स्त्री येते. स्त्री-जातीने आजतागायत अनेक अत्याचार सोसले आहेत. तिच्यावर होत असलेल्या अन्याय, अत्याचाराला तिच्याकडून विरोध झाला असल्याचा इतिहास नाही.अन्याय सहन करणे. अन्यायाचा प्रतिकार करण्यास ती असमर्थ असते. जो **'माणूस'** असतो, तो त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाचा कडाडून प्रतिकार करतो. मानव प्राण्याचा स्वतंत्रता, समता आणि बंधुता हा स्वाभाविक धर्म आहे. या धर्माच्या पालनासाठी मानव या संज्ञेस पात्र असणारा माणूस, जीवापाड प्रयत्न करणारच. स्त्री ही माणूसच राहिली नाही. तिला पुरुषप्रभुत्व असलेल्या समाजव्यवस्थेने माणसातून उठविले आहे.'

जोतिबांचे भाषण झाल्यावर सभा संपली. तुफान गर्दी होती. रेटारेटी करून लोक मोठ्या रस्त्याला लागले. वाडा मोकळा झाला. वाड्यातील मोठ्या खोलीत एक भली मोठी सतरंजी टाकून ठेवली होती. खोलीच्या बाहेर एक ओसरी होती. तेथेही भला मोठा तळवट अंथरलेला होता. त्यावर काही जोतिबांचे कार्यकर्ते येऊन बसले होते. जोतिबाच्या अभ्यास खोलीमध्ये सगुणाबाई, सावित्रीबाई आणि अण्णा भिडे ही मंडळी बसली होती. जोतिबा ओसरीवर बसलेल्या कार्यकर्त्यांपाशी उभा होता. वाड्यातील चारी कोपऱ्यांवर प्रकाशमान कंदील बांधले होते. सारा वाडा, वाड्यांचे अंगण, ओसरी, वाड्यातील छोट्या मोठ्या खोल्या प्रकाशमय होत्या. सारा भाग लग्नास आलेल्या वऱ्हाडांनी जसा फुलून जावा, तसा भरून गेला होता. साऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता. या ठिकाणी जोतिबाच्या खोलीत बसलेले भिडे, गोवंडे, जोशी, वाळवेकर वगैरे मित्रमंडळी तसेच सावित्रीबाई, सगुणाबाई, भागाबाई, दगडूबाई ही सारी मंडळी ओसरीवर आली. मागे-पुढे सरकून ओसरीवर बसणाऱ्यांनी त्यांना बसण्यास जागा दिली.

जोतिबा उभाच होता. वाळवेकर जोतिबाची पाठ थोपटीत म्हणाले, 'नवरा-बायकोचे भाषण फार छान झाले.' भिडे म्हणाले, 'ही माझ्या वाड्याची किल्ली. तू शाळा काढणार आहेस ना? काढ तेथे शाळा. या शाळेला मी दरमहा पाच रुपये देईन.' बसलेली मंडळी भिडे यांचा जयजयकार करीत उभी राहिली.

जोतिबांनी आपल्या मित्राच्या सहाय्याने दि. १४ जानेवारी १८४८ रोजी भिडे यांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. मुलींसाठी काढण्यात आलेली ही शाळा सबंध हिंदुस्थानातील पहिलीच शाळा होय. या शाळेच्या हेडमिस्ट्रेस म्हणून सावित्रीबाई काम करीत होत्या. एतद्देशीय महिलांमधील सावित्रीबाई या पहिल्या शिक्षिका, पहिल्या शिक्षणतज्ज्ञ होत्या असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.

ही शाळा जोतिबांनी स्थापन केली. त्यावेळी संस्थापकास जितके कष्ट पडले, त्यापेक्षा अधिक त्रास शाळा चालविताना सावित्रीबाईस झाला. त्यांच्यावर अनेक संकटे आली. कुभांड रचण्यात आले. नाना प्रकारच्या कटकटींना तोंड द्यावे लागले. शाळा चालविण्यास प्रतिकूल परिस्थिती होती. लोक सावित्रीबाईंची टिंगल करीत. प्रसंगी कुटाळ लोक त्यांच्यावर, शेण, दगड, धोंडे हेही फेकत. पण त्या, या सर्व त्रासाला पुरून उरल्या. या शाळेची एक वर्षात फार मोठी प्रगती झाली. मुलींच्या संख्येत वाढ झाली. आसपासच्या खेड्यात तिचा बोलबाला झाला. जोतिबाला चेव आला. त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी शाळा उघडण्याचा सपाटा सुरू केला.

पुण्यात व आसपासच्या खेड्यात मुलींच्या, मुलांच्या तशाच महारवाड्यात काढलेल्या प्रौढांच्या शाळा ही फार मोठी कामगिरी त्या काळात होती. तत्कालीन वर्तमानपत्रांनी तिची नोंद केली आहे. जोतिबाच्या कामगिरीचा 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ने देखील फार मोठा गौरव केला.

'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ने आयोजित केलेला डौलदार सत्कारसमारंभ आटोपल्यावर सावित्रीबाईंनी जोतिबाचे मोठ्या कौतुकाने अभिनंदन केले. जोतिबाने आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, 'खरे पाहू गेल्यास तुमचे अभिनंदन करावयास पाहिजे. कारण मी फक्त शाळा स्थापण्यास कारण मात्र आहे. पण त्या शाळा तुम्ही अनेक संकटांशी झुंजून व अनेक प्रकारची दुःखे सोसून नावारूपास आणल्या, याचा मला अभिमान वाटतो.' समारंभात जोतिबांच्या गळ्यात पडलेला हार जोतिबानी आपल्या गळ्यातून काढून सावित्रीबाईंच्या गळ्यात घातला आणि ते म्हणाले, 'समारंभात शिक्षणकार्याविषयी माझे जे कौतुक झाले, ते माझे नव्हे, तुमचे आहे. त्याचे श्रेय तुम्हांलाच मिळायला हवे. जोतिबांच्या या उद्गारावरून सावित्रीबाईंच्या श्रेष्ठत्वाची चांगलीचा कल्पना येते. सावित्रीबाई या हिम्मतबाज होत्या. बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि नीतिमत्ता या बाबतीत त्या फार कडव्या होत्या. त्यांचा आपल्या कार्यावर जबरदस्त विश्वास असे. सारासार विचार करणारी व निर्णय देणारी त्यांची चिकाटी उच्च दर्जाची होती. अंगीकृत कार्याची व ते यशस्वी करण्याची त्यांना फार तळमळ होती. त्या गुणग्राही होत्या; गुणवान लोकांना प्रोत्साहन देत होत्या. 'वाळवेकर यांनी लिहिलेल्या कोल्हापूरच्या महाराणी छत्रपती ताराराणी यांचे चरित्र सावित्रीबाई यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध झाले होते. त्यांना वर्तमानपत्राचा नाद होता. त्यांचे लेख 'गृहिणी' मासिकात येत असत. 'गृहिणी' मासिक वाळवेकर चालवीत होते. या मासिकाचे जोतिबा वर्गणीदार होते. वाळवेकर हे जोतिबांचे स्नेही होते.' (गावगाडा, सप्टेंबर १९७३).

सावित्रीबाई फुले या विचारशील आणि क्रियाशील कार्यकर्त्या होत्या. स्त्री-मुक्ती चळवळ हेही एक प्रकारचे बंडच होते. 'स्त्री-शूद्रादि-अस्पृश्य ही सारी माणसे आहेत; त्यांना माणसे म्हणून जगायचे आहे.' हा विचार धर्म-आचारात किंवा रुढी-पालनात आढळत नाही. मग धर्म व रुढी यांचे पालन करण्याची आवश्यकता काय आहे? हे धर्ममार्तंड सनातन्यांना आव्हान होते.

धर्माज्ञा आहे की, स्त्री-शूद्रांनी शिकू नये. रुढी सांगते की, विधवांनी पुनर्विवाह करू नये. सावित्रीबाईंनी शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. विधवांचे पुनर्विवाह करण्याची प्रथा सुरु केली. अशाप्रकारे जीर्ण विचार आणि रुढी उलट्या करून नव्या विचारांस गती देण्याचा फार चिवटपणे प्रयत्न केला. जीर्ण विचारांस व जुन्या रुढीस मारक ठरतील, असे कार्यक्रम सुरू केले. (१) मुलींची शाळा, (२) अस्पृश्य मुलांची शाळा, (३) बालसंगोपन केंद्र, (४) बालहत्त्या प्रतिबंधक केंद्र, (५) हळदीकुंकू समारंभ मंडळ, (६) विधवा-विवाह महिला संघ, (७) सत्यशोधक समाज, (८) शेतकरी संघटना, (९) दुष्काळ निवारण सभा, (१०) प्लेग निवारण महिला कमिटी. अशा प्रकारचे अनेक उपक्रम समाजक्रांतीसाठी म. जोतिबा फुले यांनी सुरु केले. ते क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी यशस्वीरीत्या पार पाडले.

म. जोतिबा दिवंगत झाल्यावर सावित्रीबाई सात-आठ वर्षे जगल्या. या काळात जोतिबांचा वसा त्यांनी नेटाने व निष्ठेने पुढे चालविला. समाजाची उन्नती होण्यासाठी म. जोतिबांनी सत्यशोधक समाजाची दि. २४ सप्टेंबर १८७३ साली स्थापना केली होती. या समाजाने शिक्षणाचा फार मोठा प्रचार केला. समाज जागृतीचे हे कार्य ऐतिहासिक स्वरुपाचे होते. या चळवळीचे एक वैशिष्ट्य म्हणजे, ही संघटना नोंदणीकृत नव्हती. समाजधुरिणांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी बहुजन रयतेसाठी व तिच्याच उत्कर्षासाठी चालविलेली 'स्वयंसेवी चळवळ' असे या संघटनेचे स्वरूप होते. जोतिबांमागे सावित्रीबाईंनी या समाजाचे कार्य मोठ्या निष्ठेने केले. १८९३ साली सासवड येथील २० व्या परिषदेस त्या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी ठिकठिकाणी सभा घेऊन सत्यशोधक समाजाचे कार्य मोठ्या ईर्ष्येने केले. भाऊ कोंडाजी डुंबरे-पाटील हे पुढारी होते. त्यांना व इतर सत्यशोधक पुढाऱ्यांना बरोबर घेऊन साऱ्या महाराष्ट्रभर सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचा प्रचार केला. कोणत्याही कामात त्यांची माघार नसे, मग तो दुष्काळ असो की, प्लेगची साथ असो! सावित्रीबाई एकाकी लढल्या. न मोडता, न वाकता त्यांनी झुंज दिली. मानवी इतिहासात एवढे मोठे कार्य करणाऱ्या व्यक्ती दुर्मिळच. म्हणून सावित्रीबाईंचे महत्त्व अधिकच प्रभावीपणे आपल्या मनावर ठसते.

(संदर्भ : प्राचार्य गजमल माळी)

सन १८९६ मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता. तसाच त्यापूर्वी १८७७ साली पडला. त्यांची हकिकत ऐकली की, अंगावर शहारे उमटतात. या दुष्काळात सावित्रीबाईंनी फार मोठे कार्य केले. १८९७ साली जानेवारीत पुणे येथे प्लेगची साथ सुरू झाली. या साथीने पछाडलेल्या रोग्यांची सेवा करता करता सावित्रीबाईही प्लेगने पछाडल्या गेल्या. दि. १० मार्च १८९७ रोजी हा इहलोक त्या सोडून गेल्या.

युगप्रवर्तक सावित्रीबाईंचे चरित्र सर्वांनाच आदर्शभूत आहे. सावित्रीबाई या क्रांतीच्या आद्य देवता होत. आपणास मानवी जीवनाच्या कर्तव्याचा विसर पडला तर त्यांची स्मृती व्हावी व आपले सर्वांचे जीवन सावित्रीबाईंसारखे सार्थकी लागावे, हाच हेतू त्यांची आठवण करण्यात असावी.

*

# शिक्षणशास्त्रज्ञ सावित्रीबाई

**अनिल प्रांजळे**

सावित्रीबाई फुलेंसारख्या महान तपस्विनीवर लिहीताना, त्यांच्या जीवनकार्याचा, त्यामागील प्रेरणांचा व संस्कारांचा विचार करताना प्रामुख्याने एकच गोष्ट पुढे येते; ती म्हणजे सावित्रीबाईंवर स्वतंत्रपणे कुठे फारसे लिहिले गेले नाही. महात्मा जोतिराव फुल्यांच्याबाबत जेव्हा जेव्हा लिहिले गेले; तेव्हा तेव्हा आनुषंगिकपणे सावित्रीबाईवर लिहिले गेले, एवढेच काय ते. त्यांच्याही व्यक्तिमत्त्वाचे काही वेगळे पैलू असू शकतात, त्यांच्या कार्यामध्ये त्यांच्या स्वत:च्या ऊर्मी, संस्कार असू शकतात, याचा विचार फारसा झालेला दिसत नाही. विशेषत: त्यांच्या समोर अनाहूतपणे आलेला धटिंगण - त्याने अब्रूची भिती दाखविणे, स्त्रीची अब्रू, शील, मर्यादा, औचित्य याबाबतीत अत्यंत कर्मठ असलेला समाज; तिच्या मदतीला धावून येण्याऐवजी गंमत पाहण्यासाठी भोवताली जमा होणे आणि सावित्रीबाईंनी धैर्य न सोडता त्याच्या मुस्कटात मारणे, त्याचे तसेच त्या गंमत पाहणाऱ्या आंबटशौकीनांचे पळून जाणे - हा प्रसंग आणि सावित्रीबाई नायगावला माहेरी असताना गणेश आणि सारजास गावकऱ्यांच्या रोषापासून वाचविणे - ह्या दोन्ही प्रसंगांना जरी काळाच्या चौकटीत पाहिले तरी सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण मान्य करावे लागते. ह्या दोन्ही प्रसंगांतील त्यांचे धैर्य व वागणे पाहिले की लक्षात येते, त्या केवळ जोतिरावांच्या सावली नव्हत्या तर त्यांच्यातील धैर्य, त्यांचं वागणं हे त्यांच्या विचारप्रणालीचं प्रतिक होतं. त्यांच्या ह्याच स्वयंपूर्ण व स्वयंभू विचारप्रणालीचं दर्शन त्यांच्या शिक्षणविषयक कार्यात व विचारांतही दिसते. त्यांनी शिक्षणाचा, तत्कालिन समाजाचा व शिक्षण - समाज संबंधांचा अत्यंत गांभीर्याने विचार केलेला होता, यात शंका नाही! केवळ या विषयातील त्यांच्या कार्याचा विचार करावयाचा म्हटले तरी आपल्याला खालील मुद्यांचा परामर्श घ्यावा लागेल

१) एकोणिसाव्या शतकातील सामाजिक/शैक्षणिक परिस्थिती -

२) सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक/सामाजिक कार्य

३) काही शिक्षणशास्त्रज्ञांची भूमिका व सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व.

**१) एकोणविसाव्या शतकातील सामाजिक/शैक्षणिक परिस्थिती :-**

खरे म्हणजे या विषयाची माहिती विस्तृतपणे या ग्रंथामध्ये इतरत्र आहेच,

तरीही थोडक्यात त्या काळातील सामाजिक व शैक्षणिक अवस्थेविषयी पाहू. सावित्रीबाईंचा जन्म सन १८३१ सालचा; तर कार्यकालखंड सन १८४८ ते १८९७ पर्यंतचा. ह्या काळात जरी इंग्रजांचे शासन असले तरी भारतीय जनता मात्र पूर्णपणे मनुस्मृतीच्या प्रभावाखाली होती. कर्मकांडाचे अवास्तव महत्त्व, चातुर्वर्ण्याच्या नावाखाली मानवतेची होळी, शूद्र तसेच स्त्रीयांची अमानुष विटंबना, जन्माधिष्ठीत श्रेष्ठकनिष्ठता; धर्माचे, उच्चवर्णीयांच्या सोयीचे विकृत स्वरुप, धर्माच्या नावावर गरीब जनतेची नागवणूक- हे सगळं पाहिलं की त्या काळातील एकूण समाजव्यवस्थेची कल्पना येते. शिक्षणाच्या बाबतीत तर फार अघोरी व हास्यास्पद समज सामान्य जनतेच्या मनात खोलवर रुजले होते. शिक्षण केवळ ब्राह्मणांचीच मक्तेदारी होती. इतरांनी शिक्षण घेतले तर त्यांच्या सात पिढ्या नरकात जातील, पुत्रप्राप्ती होणार नाही, स्त्रिया शिक्षणाने विधवा होतील इत्यादी बरेच गैरसमज परंपरेने लोकांच्या मनात खोलवर रुजविण्यास ब्राह्मणवर्ग यशस्वी झाला होता. खुद्द जोतीरावांचे वडीलही त्यातून सुटू शकले नाहीत. दैवदुर्विलासाने फुले दाम्पत्याला मूलबाळ झाले नाही हे खरे; पण जोतीरावांच्या वडिलांचे कान ब्राह्मणांनी फुंकल्यावर त्यांनीही डोक्यात राख घालून घ्यावी आणि इतक्या मेहनतीने, कौतुकाने, इच्छा-आकांक्षांनी वाढविलेल्या मुलाला व सुनेला 'समाजकार्य तरी सोड नाही तर घर तरी सोड'' असा निर्वाणीचा इशारा द्यावा, आणि त्या महान तपस्वी दाम्पत्याने अंगावरच्या कापड्यांनिशी घर सोडावे- ही घटना पहा. एकत्र कुटुंबपध्दतीच्या त्या काळातील चौकटीत 'घर सोडणे' ही घटना दशरथाने आपल्या लाडक्या रामाला वनवासात पाठविणे याच पातळीची आहे. हे लक्षात घेतले म्हणजे अंधश्रद्धांचा पगडा आणि ब्राह्मण्याचे जनतेच्या मन:पटलावरचे वर्चस्व लक्षात येईल. आणि हे सर्व अकांडतांडव कशासाठी?- तर केवळ शिक्षणाची दारे शूद्र व स्त्रियांना खुली करून दिली म्हणून! शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्याचे पुण्यकार्य करीत होते म्हणून! ही कार्यकारणमीमांसा आज जर एखाद्या शाळकरी मुलास सांगितली तर तोही आपले हसणे आवरू शकणार नाही. थोडक्यात काय, तर 'शिक्षण' ह्या 'उद्योगावर' आपला पिढीजात हक्क गाजवून त्याला आपल्यापुरतेच संकुचित केल्याशिवाय आपल्या वाढत्या कुटुंबाचे व पुढील पिढ्यांचे विनासायास मेहनतीशिवाय व घरबसल्या पालनपोषण होणार नाही हे उमगल्यामुळे, तसेच मधल्या काळात मनुस्मृतीला राजाश्रय मिळाल्यापासून अधिकार गाजविण्याची, राज्यकर्ते कुणीही असले तरी सत्ता आपल्याच हाती असावी ह्या राक्षसी महत्वाकांक्षेमुळे ब्राह्मण व ब्राह्मण्यवादाने संपूर्ण समाजाला येनकेप्रकारेण आपला गुलाम करून ठेवले होते. सामाजिक असुरक्षिततेची भावना

इतकी प्रबल होती की, आपण चूक करतोय हे कळत असूनही (काही) ब्राह्मण सामान्य जनतेला शिक्षण देण्याच्याबाबतीत वळत नव्हते हेच खरे. बरे, इंग्रज सरकारमध्ये ह्या गोष्टी मान्य नसलेले अधिकारी होते. परंतु ब्राह्मणांनी 'शिक्षण' ही सामाजिक बाब नसून धार्मिक बाब आहे'-हा कांगावा चालविल्यामुळे राज्यकर्त्यांच्या एकंदरीत स्वभावधर्माप्रमाणे इंग्रज सरकारनेही ह्या बाबतीत हस्तक्षेप करण्यास टाळाटाळच केली. भारतावर राज्य करणे सोयीचे जावे व इथला अल्प संख्येने असला तरी एकमात्र असा शिक्षित समाज आपल्या विरोधात जाऊ नये ही त्यांची अपेक्षा रास्त असेलही कदाचित; त्यातही काही मिशनरी लोकांनी प्रयत्न केले नाही असे नाही. उदाहरणादाखलच घ्यायचे झाले तर वुईल्यम कैरे व जॉन थॉमस यांनी सन १८१६ मध्ये बिहार, संयुक्तप्रांत येथे; तर सन १८२० साली कुक यांनी बंगालमध्ये काही शाळा काढल्या. त्यानंतर मिस कुक यांनीच मुंबईत येऊन सन १८३० च्या दरम्यान मुंबई भागात सहा शाळा काढल्या. याच दरम्यान पुण्यातही शनिवारवाड्यात शाळा काढली. ४ ते ६ वर्षांपर्यंतच्या फक्त आठ मुली ह्या शाळेत होत्या व त्यांच्या शिक्षणाचे कार्यही फार गुप्तपणे चाले. यावरूनच मुलींचे शिक्षण हे समाजसंमत नव्हते हे लक्षात येते. ही शाळाही सन १८३२ मध्ये बंद पडली याच दरम्यान महारवाड्यातही मुलींची शाळा काढण्याचा क्रांतिकारी प्रयत्न एका परिवर्तित ख्रिस्ती-मोडक नावाच्या गृहस्थाने केला. परंतु अंधश्रद्धा व रूढीप्रियता पिढ्यानपिढ्या रक्तात झिरपलेल्या शूद्रातिशूद्र लोकांनीच ही शाळा बंद पडली. यानंतर चर्च ऑफ स्कॉटलँड मिशनने मंगळवार पेठेत सन १८४४ साली काढलेली मुलींची शाळा ही सर्व साधनसामग्री, शिक्षिकांनीयुक्त असूनही १८४७ साली बंद पडली. या सर्व उदाहरणांवरून त्याकाळातील सामाजिक मानसिकताच आपल्यापुढे स्पष्ट होते. अशा मानसिकतेला बदलणे म्हणजे एक अत्यंत कठीण व दिव्य कार्य होते, यात शंका नाही.

### २) सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य

महात्मा जोतिराव फुले यांचेसमवेत सावित्रीबाईंनी जे काही शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू केले व राबविले, त्याचे बरेचसे श्रेय सावित्रीबाईंनाही जाते. हे उपक्रम खालीलप्रमाणे:-

१) १८४८ साली पुण्यात भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली व त्यात सावित्रीबाईने शिक्षिका म्हणून शिकविणे सुरू केले.

२) १५ मे १८४८ रोजी महारवाड्यात मुलामुलीसाठी शाळा सुरू केली.

३) १८५१ मध्ये पुण्याच्या महारवाड्यात हरिजन मुलांसाठी शाळा सुरू केली व त्यातही शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंनी ती काम केले.
४) १८४८ ते १८५२ या कालखंडात फुले दांपत्याने पुणे व पुणे परिसरात २० शाळा काढल्या व त्या उत्तमरीत्या चालविल्या.
५) २८ जानेवारी १८५३ रोजी पुण्यात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना. या गृहाची सर्व व्यवस्था सावित्रीबाईच पाहत.
६) आपल्या मुलाचा- 'यशंवत'चा मिश्रविवाह घडवून आणला (दि. ४ फेब्रुवारी १८८९)
७) केशवपनाच्या चालीविरूद्ध न्हाव्यांचा संप घडवून आणला.
८) 'विधवा पुनर्विवाह' घडवून आणणारी सभा स्थापन केली.
९) शाळांसाठी योग्य अभ्यासक्रम तयार केला.
१०) 'प्रौढ शिक्षण व 'रात्रीची शाळा' या विचारांच्या व प्रयोगाच्या जनक
११) सतीची चाल बंद करण्यास प्रयत्न.
१२) अस्पृश्यांसाठी घरचा हौद खुला केला.
१३) सत्यशोधक समाजाचे जोतिबांसमवेत व त्यांच्या निधनानंतरही कार्य व नेतृत्व सांभाळले, इत्यादी.

**काही शिक्षणशास्त्रज्ञांची भूमिका व सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व**

बालकांच्या शिक्षणाचा गंभीरपणे विचार; खरे तर युरेपियन देशात १६व्या शतकापासूनच होऊ लागल्याचे दिसते. १६व्या शतकाच्या शेवटी जॉन कोमेनियस या शिक्षणतज्ञाने स्पष्ट सांगितले की, देशीभाषेतूनही शिक्षण दिले जाऊ शकते. यापुढेही जाऊन तो गर्भावस्थेतील शिक्षणावर भर देऊन मातेचा आहार, व्यायाम, मनोवृत्ती, चित्तवृत्ती, पर्यावरण याला शिक्षणात महत्त्व देतो. त्यानंतर रूसोने (१७१२-१७७८) आपल्या 'सामाजिक करार' मध्ये अनियंत्रित राजसत्तेविरूद्ध व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. (महात्मा जोतिरावांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये नेमकी हीच भूमिका प्रखरपणे दिसते!) शिक्षणाला मानसशास्त्राचे अधिष्ठान मिळवून देण्याचा प्रयत्न पेस्टलॉजीने (१७४६-१८२७) केला. फ्रेडिरक फ्रोबेल (१७८२-१८५२) तर बालोद्यानचा निर्माता होता. त्याच्या मते जीवनविकासात व्यक्तिविकास व समाजविकास या दोहोचाही विचार अंतर्भूत होतो. प्रत्येक व्यक्तीची प्रगती झाल्याशिवाय कोणताही समाज पुढे जाऊ शकणार नाही नि संपूर्ण समाज पुढे गेल्याशिवाय एकट्यादुकट्या व्यक्तीच्या विकासाला अर्थ उरणार नाही. मारिया मॉंटिसोरी (१८७०-१९५२) यांचा कटाक्ष मुलांच्या भोवतालच्या परिसरात बदल घडवून आणण्यावर होता. तसेच बालकमंदिरातील

शिक्षिका प्रायोगिक मानसशास्त्रातील प्रशिक्षित स्त्री असावी; ह्यावरही त्यांचा भर होता. टॉलस्टॉय (१८२८-१९१०) म्हणतो की, 'शिक्षकांची आपल्या व्यवसायावर निष्ठा असली तरच तो उत्कृष्ट शिक्षक होईल.' जॉन ड्यूईने (१८५९) तर आपल्या अष्टसूत्रीत शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष जीवन व अखंड विकास आहे हे सांगितले आहे. यानंतर विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर व विसाव्या शतकात महात्मा गांधी त्यांच्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी यांनी शिक्षणाचा मूलभूत विचार केलला दिसतो.

शिक्षणाच्या प्रगतीचा हा सर्व एकूण आलेख आपण थोडक्यात पाहिला. यावरून असे लक्षात येते की, शिक्षणाचे महत्त्व १६ व्या शतकातच जगाला समजले होते. मात्र भारतीय जनता त्यापासून शेकडो मैल दूर होती. भारतातही त्या काळच्या लोकांनी प्रयत्न केले; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. सावित्रीबाईंच्या विचारात शिक्षणाची कळकळ दिसून येते. गरिबी-शूद्रत्व-दैन्य यांचा नाश करण्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे हे त्यांनी ओळखले होते, म्हणूनच त्या ईशस्तवन मध्ये म्हणतात-

*'आम्ही लेकरे तुला प्रार्थितो*
*विद्या होई, ज्ञान इच्छितो*
*दैन्यासुर संहारा। श्रीधरा।।*

आणि हेच त्यांनी 'शूद्रांचे दुखणे' मध्ये शूद्रांना सांगण्याचा प्रयत्न केला-

*शूद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा।*
*शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हटते पहा।।*

'शिक्षणासाठी जागे व्हा' मध्ये त्या म्हणतात-

*उठा बंधुनो, अतिशूद्रांनो, जागे होऊनी उठा*
*परंपरेची गुलामगिरी ही तोडणेसाठी उठा*
*बंधुनो शिकणेसाठी उठा ।।धृ।।*
*गेले-मेले, मनू-पेशवे, आंग्लाई आली*
*बंदी-मनुची विद्या घेण्या, होती ती उठली।।*

तसेच-

*नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन*
*शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटुन काढीन*

किंवा

*असे गर्जुनी विद्या शिकण्या जागे होऊन उठा*
*परंपरेच्या बेड्या तोडुनि शिकण्यासाठी उठा।।*

या आणि इतर बऱ्याच कवितांमधून सावित्रीबाईंचा तत्कालीन समाजव्यवस्थेचा खोल विचार दिसतो. लोकांची अवस्था सुधारण्यासाठी, अंधश्रद्धांचा नाश करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही-हेही त्यांनी जाणले होते. त्या नेहमी म्हणायच्या-

*जे करिती शेती। विद्या संपादती*
*तया ज्ञानवंती। सुखी करी*

किंवा

*विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून*
*तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन*

अंधश्रद्धेवर हल्ला करताना त्या म्हणतात-

*गोट्याला शेंदूर। फासून तेलात।*
*बसवी देवात। दगड तो।।*
*धोंडे मुले देती। नवसा पावती।*
*लग्न का करती । नारी-नर।।*

सावित्रीबाई ह्या जोतिबांच्या सहधर्मचारिणी होत्याच; पण त्यांचा इतिहास, समाजशास्त्र यांचा अभ्यास दांडगा होता. कोणत्याही शिक्षणशास्त्रज्ञाला ह्या गोष्टींचे ज्ञान आवश्यक असते. त्यातूनच त्या त्या काळानुरूप शिक्षणपद्धती जन्मास येत असते. ज्या काळात शिक्षण घेणे पाप समजले जाई, त्या काळात सावित्रीबाई म्हणतात- 'आपल्या पुत्रास शिकविणे हे मातापित्याचे कर्तव्य आहे. जे मातापिता आपल्या पुत्रास किंवा कन्येस शिकवीत नाहीत; ते आपल्या पुत्राचे किंवा कन्येचे शत्रू असतात असे समजावे. म्हणूनच आईबापांनी आपल्या मुलामुलींस विद्या शिकवावी. विद्येच्या योगे सदाचरणाचे व्रत पार पाडण्यास ते समर्थ होतात'.

सावित्रीबाईंचे हे असले क्रांतिकारी विचार ब्राह्मणांच्या अढळ पदाला छेद न देतील तरच नवल! त्यांनी पांडित्याच्या जोरावर सावित्रीबाईंना घोर पाप, कलीयुग, देवाच्या आज्ञेत, धुडगूस असे संबोधून विरोधच नव्हे, तर धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सावित्रीबाईंनी संस्कृतचा अभ्यास करून संस्कृतातलाच दाखला त्यांना दिला. त्या 'सदाचरण' मध्ये म्हणतात-

*'विद्यावित्तविहीनेन किंकुलीनेन दोहिनाम*
*अकुलीनोपि यो विद्वान् दैवतैरपि पूज्यते'*

अर्थात 'विद्या-धन-रहित जो मनुष्य तो मोठ्या कुळातला असला, तथापि त्यास कोणी पुसत नाही; तुच्छ समजतात. हीन कुलीन असूनही तो विद्यावंत असेल तर त्याची पूजा देवही करतात. तो लोकांत मान्यता पावतो.'



वाय ४८-५

जॉन कोमेनिअसने जे विचार १६ व्या शतकाच्या सुरूवातीलाच मांडले ते भारतीय जनतेपर्यंत मात्र १९ व्या शतकातही पोहोचले नव्हते. सावित्रीबाईंनी मात्र ओळखले की, शिक्षणाचे मूळ संस्कारात आहे; व संस्कार गर्भाधारणेपासूनच सुरु होतात. मातेचा आहार, विचार, संस्कार व पर्यावरण या सर्वांचा पुढील पिढीवर परिणाम होत असतो. त्यामुळे त्यानी सर्वप्रथम स्त्रियांच्या दुर्दशेबाबत व सामाजिक गुलामगिरीबाबतच आवाज काढला. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून एक जिवंत माणूस म्हणून मान्यता व तद्नंतर प्रतिष्ठा मिळवून दिल्याशिवाय समाजाचे अध:पतन थांबणार नाही, हा विचार त्यांनी दिला. त्या अंतर्गतच केशवपनाला विरोध, न्हाव्यांचा संप, विधवा-विवाह ह्या सर्व गोष्टी येतात. त्यातली सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना होय. ह्यामुळे मानवतेला काळिमा फासणाऱ्या प्रवृत्तीना रोखण्यात त्या यशस्वी झाल्या. नाईलाज म्हणून समाजभयास्तव स्वत:च्या पोटच्या गोळ्याला ठार मारण्याची वृत्ती उच्च लोकांमध्ये अधिक प्रमाणात होती. बालहत्या प्रतिबंधक गृहामध्ये त्या मातांना दिलासा मिळाला. भावनांचा निचरा व चुकांचे परिमार्जन करण्याचे आंशिक का होईना; स्वातंत्र्य मिळाले. केवळ एवढ्या एका गोष्टीनेही नीति-अनीतीच्या कल्पनांना जराही धक्का न लागता; स्त्रियांच्या चुकांमागून चुका करण्याची वृत्ती व त्यायोगे आसुरी, अमानवीय व क्रूर प्रवृत्ती आणि रीतिरिवाजांना आपोआपच आळा बसला. समाजाचे नैतिक स्वास्थ्य त्यामुळे सुधारू लागले. कोणत्याही समाजातील नवीन पिढी शरीराने, मनाने व संस्कारांनी निरोगी व्हावयाची असेल, तर त्या समाजाचे नैतिक स्वास्थ निरोगी, स्वच्छ व सुसंस्कृत असावे लागते. त्याअर्थी सावित्रीबाई खऱ्या अर्थाने महान समाजतज्ञ व शिक्षणतज्ञ होत्या, हे सिद्ध होते. याचेच आणखी एक उदाहरण म्हणजे सावित्रीबाईंनी केलेले शिक्षणाचे प्रयोग! पहिला प्रयोग म्हणजे शूद्रातिशूद्र मुलींच्या शाळेत स्वत: व फातिमा शेख यांनी शिकवून ब्राह्मण मुलींच्या शाळेवर ब्राह्मण शिक्षक ठेवले. शेवटी चाचणी घेतली तेव्हा शूद्र मुलीपेक्षा ब्राह्मण मुली सरस ठरल्या. त्यावरून सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या प्रगतीस परंपरा व परिस्थितीही कारणीभूत असते असा मूलभूत विचार मांडला. आज शैक्षणिक मानसशास्त्र व शैक्षणिक समाजशास्त्राचा गंभीरपणे विचार होत असताना हाच विचार आधारभूत मानण्यात येतो; यावरून त्याचे महत्त्व पटेल.

दुसरा प्रयोग म्हणजे 'आनंददायी शिक्षणाचा!' सावित्रीबाई अलौकिक प्रतिभेच्या धनी होत्या, यात शंकाच नाही. शाळेत शिकविताना उपयोगी पडतील अशा अनेक कविता त्यांच्या संग्रहात आहेत. ह्या कविता त्यांनी एकतर उत्स्फूर्तपणे अथवा संपूर्ण विचारांती विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या सहज-शिक्षणासाठीच लिहिलेल्या

असाव्यात. उदा. 'स्वागतपर पद्य', 'राणी छत्रपती ताराबाई', ' श्रेष्ठ धन', 'बाळास उपदेश', 'नवस', 'इंग्रजी शिका, 'शिकणेसाठी जागे व्हा', 'बोलकी बाहुली', 'सामुदायिक संवाद-पद्य', 'अज्ञान' इत्यादी. यातील काही कविता तर आजही लहान मुलांच्या वर्गात गाऊन दाखविण्यासारख्या आहेत. यावरून सावित्रीबाई त्या काळातसुद्धा आनंददायी शिक्षणसदृश प्रकल्प राबवीत असाव्यात असे वाटते. एवढ्यात प्राथमिक शिक्षणावर खूप गांभीर्याने विचार होऊ लागलेला दिसतो. 'आनंददायी' प्रकल्प नव्याने प्रस्तावित केला, हसत खेळत शिक्षणाची संकल्पना मांडली म्हणून महाराष्ट्र शासनाने श्री. नंदकुमार यांचा विशेष सत्कार अलिकडेच केला. सावित्रीबाईंची मुलींना शिकविण्याची निष्ठा, त्यांचे वय, त्यांची प्रतिभा, त्या सांस्कृतिक दडपशाहीच्या चौकटीत स्त्रीच्या प्रतिभेचा व एकूण मनाचा होणारा कोंडमारा; या सर्वांचा एकत्रित विचार केला तर सावित्रीबाई मुलींना शिकविण्यात खरोखर आनंदून जात असाव्यात असे दिसते. मी तर असेही म्हणेन की, त्यात त्यांना मानसिक तृप्ती जाणवत असावी. त्या हसत खेळत स्वरचित कविता गाऊन, नाट्यमय पद्धतीने शिकवीत असाव्यात. हा तर्क सहजच पटतो. त्याहून महत्त्वाचे म्हणजे अध्यापन पद्धतीतील नवनवीन प्रयोग सावित्रीबाई करीत असल्याचेहि यातून लक्षात येते. शिक्षणाविषयीचे मुलींचे व शूद्रांचे अथवा एकूणच ब्राह्मणेतर समाजाचे नैराश्य घालविण्यासाठी हे आवश्यकच होते. तसे पाहिले तर आज दीड शतकानंतरही स्त्रीशूद्रांच्या शिक्षणाविषयीच्या उदासीनतेत काही फार बदल जाणवत नाही. त्यामुळेच कदाचित 'आनंददायी शिक्षणसारखे प्रकल्प एकविसाव्या शतकात प्रवेश करतानाही राबविण्याची गरज पडते आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंचे कार्य, त्यांनी अध्यापन पद्धतीचे, शैलीचे केलेले प्रयोग, केवळ अलौकिक म्हटले पाहिजेत.

सावित्रीबाईंचा शिक्षणातील तिसरा व चौथा प्रयोग म्हणजे अनुक्रमे 'प्रौढ शिक्षण' व 'रात्रीची शाळा' चालविणे हा होय. भारत सरकारचे या दोन्हीविषयीचे प्रयत्न, त्याचा प्रचार-प्रसार, त्यासाठी खाली होणारी सरकारी तिजोरी, आजच्या तथाकथित सुशिक्षित वर्गात सरकारच्या या प्रयोगाविषयी असलेली उपहासगर्भ, हेटाळणीयुक्त व हास्यास्पदतेची भावना आणि त्याद्वारे स्पष्ट होणारी आजच्या समाजाची मानसिकता; ह्यांचा वास्तवदर्शी अभ्यास ह्याठिकाणी आवश्यक ठरतो. वरील बाबी आजच्या काळाच्या चौकटीतही जर इतक्या विद्रूप दिसत असतील तर त्या १८५०-६० च्या चौकटीत पाहाण्याची केवळ कल्पनाच केलेली बरी! यावरून लक्षात येते की, जोतिबा व सावित्रीबाईंच्या विचारांना काळाची, तत्कालीन समाजमान्यतांची व प्रासंगिक विरोधाची बंधने मान्यच नव्हती. त्यांची मानसिकता

व प्रगल्भता कदाचित एकविसाव्या शतकाच्याही पुढची असावी. भौतिक मर्यादा व परंपरेचे कुंपण यांतून ते आपल्याला जेवढे दिसले, केवळ तेवढीच त्यांची क्षमता निश्चितच नव्हती.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर प्रौढशिक्षण व त्यासाठी रात्रीच्या शाळांची गरज यांचे महत्त्व सरकार व बुद्धिवाद्यांना कितीही पटले असले, तरी परंपरेच्या पगड्यामुळे प्रौढशिक्षणांची आज प्रौढांकडून वाट लावली जाते. ह्या पार्श्वभूमीवर १९ व्या शतकात प्रौढशिक्षणाची केवळ कल्पनाच न सुचविता तन-मन-धनाने ती राबविणे, रात्रीची शाळा काढून तीमध्ये येण्यास घराघरात जाऊन (नाटके इ. द्वारे) लोकांना प्रवृत्त करणे हे कार्य सामान्यांचे निश्चितच नव्हते. त्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रामाणिक व चिवट जिद्द, निस्वार्थी, निष्काम कर्मयोग्याचेच व्यक्तीमत्व असावे लागते. सावित्रीबाई व जोतिबांच्या व्यक्तीमत्वाचे मोठेपण यासाठीच मान्य करावे लागते.

पाचवा प्रयोग म्हणजे फुले दांपत्याने; शाळेत येणाऱ्या मुलांचे पर्यावरण, त्यांची क्षमता, कुटुंबाचा शैक्षणिक इतिहास यांचा अभ्यास करून त्यांच्यासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. याद्वारे तर त्यांनी शिक्षणाच्या यशस्वितेसाठी, त्याच्या योग्य प्रसारासाठी, त्याच्या उपयुक्ततेसाठी एक नवा मार्ग, नवा विचार शिक्षणतज्ञांना दिला; ज्याचा गंभीरपणे विचार होण्याची आज गरज आहे. कारण वर्ण-वर्ग व्यवस्थेच्या संकुचितपणामुळे अजूनतरी शाळेत येणारी मुले एकजिनसी पर्यावरणातली वा क्षमतेची नसतात हे कटू सत्य मान्य करावेच लागते. कदाचित आज विशिष्ट समाजातील विद्यार्थ्यांच्या, विशेषत: मुलींच्या गळतीचे प्रमाण जास्त असण्याचे एक कारण, विसंगत अभ्यासक्रम हेही असू शकेल.

आपल्या शाळांमध्ये शिकविणारे शिक्षक, शिक्षिका हे प्रशिक्षितच असले पाहिजेत, यावर जोतिबा व सावित्रीबाई दोघांचाही कटाक्ष होता, त्यामुळे प्रथम सावित्रीबाईंनी प्रशिक्षण घेतले व नंतर सर्वांना प्रशिक्षण देता यावे म्हणून स्वत:च एक अध्यापक विद्यालय (नॉर्मल स्कूल) सुरू केले.

टॉलस्टॉय, जॉन ड्युई, विवेकानंद, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विनोबा, राष्ट्रसंत तुकडोजी ह्या काही पाश्चात्य व काही भारतीय तसेच सावित्रीबाईंच्या समकालीन व नंतरच्या अशा शिक्षणतज्ञांनी एक गोष्ट प्रामुख्याने सांगितली; ती म्हणजे व्यवसाय शिक्षण व स्वयंपूर्णता! सावित्रीबाई व जोतिबांनी मात्र हे आधीचे हेरले होते की, व्यसन, अंधश्रद्धा व अविद्या ह्या तीन बाबी स्त्रीशूद्रांच्या गुलामगिरीस कारणीभूत आहेत. त्यामुळे आपल्या भाषणांतून, कवितामधून त्यांनी ह्या तीन बाबतीत लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केलेला

दिसतो. यालाच त्यांनी 'स्वयंपूर्णता' व 'व्यवसाय शिक्षणही जोडलेले दिसते. 'मनू म्हणे', 'ब्रह्मवंती शेती', 'श्रेष्ठ धन', 'शूद्रांचे परावलंबन', 'तयास मानव म्हणावे का?', 'अज्ञान'- ह्या सर्व कविता आणि त्यांची भाषणे विशेषत 'उद्योग', 'विद्यादान-', 'सदाचरण', 'व्यसने', इ. मधून त्यांच्या ह्या विचारांचा सहज अभ्यास करता येतो.

वरील सर्व बाबींचा गांभीयनि विचार केला असता हेच लक्षात येते की, सावित्रीबाई प्रारंभी अशिक्षित जरूर होत्या; पण जेव्हा जोतिबांनी त्यांना शिकविले व शिक्षिका केले; त्यावेळी त्यांचे वय जेमतेम १७-१८ वर्षांचे होते. मानसशास्त्र सांगते की, हे ध्येयवेडे वय असते. ह्या वयात जर एखाद्या ध्येयाला वाहून घेण्याची प्रेरणा झाली, तर त्या ध्येयाप्रति आयुष्यभर प्रामाणिक राहून त्याच्या वाटेत येणारी सगळी संकटे झेलण्याची व्यक्तिची मानसिक तयारी आपोआपच होत जाते. कदाचित सावित्रीबाईंचे हेच झाले असावे. जोतिबासारखा खंबीर महामेरू त्यांना हिम्मत देण्यासाठी; त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करून प्रोत्साहित करण्यासाठी सतत त्यांच्या पाठीशी होता, ही बाब निर्विवाद सत्य! मात्र सावित्रीबाईंनी शिक्षण, अंधश्रद्धा-निर्मूलन व स्त्रीशूद्रांच्या मानसिक गुलामगिरीचे उच्चाटन हे जणू आपले ध्येयच ठरवून टाकले होते. मानसशास्त्रीय नियमाप्रमाणे त्यातल्या अडचणींनी त्यांना त्यासाठी अधिक खंबीर केले. एकूण सामाजिक स्थिती तशी लपलेली नव्हतीच; पण तिच्याकडे पाहण्याची मानवतेची दृष्टी आल्याबरोबर आणि आपल्या ध्येयाप्रति झपाटल्यागत पूर्णपणे समरस झाल्याबरोबर सावित्रीबाईंची विचारशक्ती व प्रतिभा अधिकाधिक प्रगल्भ होत गेली. एक स्वयंपूर्ण व्यक्तिमत्व म्हणून त्या पुढे आल्या. कदाचित त्यामुळेच सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व जोतिबांनंतरही त्या अत्यंत समर्थपणे करू शकल्या. त्यांचे शिक्षणाप्रति विचार, निष्ठा, त्यातून त्यांच्या लक्षात आलेले निरनिराळे प्रश्न, त्यावरचे उपाय म्हणून त्यांनी जोतिबांसमवेत चालविलेले/राबविलेले उपक्रम व त्या काळची प्रतिकूल परिस्थिती; हा संपूर्ण क्रम सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची मौलिकता व श्रेष्ठत्व निर्विवाद सिद्ध करतो. त्यांना एक अत्यंत संवेदनशील, प्रगल्भ व समाजोन्नतीची कळकळ असलेली समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ- तसेच 'शिक्षणशास्त्रज्ञ' म्हणूनही मान्य करावयास भाग पाडतो.

**—अनिल प्रांजळे**, प्राचार्य,
दीपशिखा गुरूकुल सैनिक शाळा
चिखलदरा, जि. अमरावती.

✱

# स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

डॉ. लीला पाटील

महात्मा जोतिबा फुले यांच्या पत्नीचे नाव सावित्रीबाई फुले. त्यांचा विवाह इ.स. १८४० साली झाला. विवाहाच्या वेळी सावित्रीबाई निरक्षर होत्या. जोतिबांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी आपल्या पत्नीला शिकवायचे ठरविले. शेतीतील मातीची पाटी केली. त्या पाटीवर झाडाच्या फांदीच्या काटकीने अक्षरे गिरविण्यास आरंभ केला. हळू हळू अक्षरे काढता येऊ लागली. सावित्रीबाईंना शिकण्याची जिद्द होती. त्यासाठी कष्ट करण्याची तयारी होती. त्यांना शिक्षणाची गोडी लागली. शेतीतील पिकांची नावे लिहून झाली. फुलझाडांची नावे लिहिता आली. रोजच्या परिचयातील वस्तूंची नावे सावित्रीबाई लिहू लागल्या. त्यांची हुषारी पाहून जोतिबांना शिकविण्याचा हुरूप आला. स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी सावित्रीबाईंना शिकविले. त्याकाळी बायकांनी शिकणे महापाप आहे असे मानले जाई. समाजाचा स्त्री शिक्षणाला कडाडून विरोध होता तरीही सावित्रीबाई शिकल्या. कारण त्या जिद्दी व करारी होत्या.

सावित्रीबाई शिक्षिका झाल्या. १८४८ मध्ये पुणे येथील बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यात फुल्यांनी मुलींची पहिली शाळा काढली. पहिली भारतीय शिक्षिका म्हणून सावित्रीबाई तेथे काम करू लागल्या. त्यावेळच्या समाजातील दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी सावित्रीबाईंना खूप छळले. त्यांची निंदा केली. शिव्या दिल्या. शाळेत जाता-येता त्यांच्यावर शेणमारा केला. परंतु सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. गरीब व दलित समाजातील मुलींना शिकविणे म्हणजे देवकार्य होय, असा विचार करून सनातन्यांकडून होणाऱ्या छळाला त्यांनी जरासुद्धा भीक घातली नाही. शाळा बंद करावी म्हणून एका गुंडाने त्यांना धमकी दिली. त्यांच्याशी अंगचटीस येण्यास तो पुढे झाला. सावित्रीबाईंनी न भिता त्याला दोन थपडा दिल्या. तो धटिंगण मुकाट्याने तोंड लपवून बाजूला गेला. शिक्षणाने धाडसीपणा येतो. शिक्षण खोटेपणा व अन्यायाला प्रतिकार करण्याची शक्ती देते हे सर्वांनी यावरून जाणून घ्यावे. सावित्रीबाईंनी घरदार, संसार असे न म्हणता शिक्षण घेतले. तसेच खूप तळमळीने व संकटाला न डगमगता शिक्षिका म्हणून काम

केले. १५ मे १८४८ साली पुण्याच्या महारवाड्यात मुला-मुलीसाठी शाळा काढली. तेथेही सावित्रीबाई शिकविण्याचे काम करू लागल्या पगार न घेता त्यागबुद्धीने काम करणाऱ्या सावित्रीबाई या महान शिक्षिका होत. सावित्रीबाई म्हणत-

*शूद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग हा*
*शिक्षणाने मनुष्यत्व । पशुत्व हाटते पहा*

सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणासाठी खूप कष्ट घेतले।

सावित्रीबाई माणुसकी मानणाऱ्या होत्या. तहानेने जीव व्याकुळ झालेल्या लोकांना पाणी देणे हे आपले काम आहे हे त्यांनी ठरविले. त्याकाळी शूद्र-अतिशूद्र यांच्या सावलीचा विटाळ मानला जाई. अशा लोकांना पाणी मिळणे कठीण झाले. कारण या जातीच्या लोकांना उच्च जातीचे लोक आपल्या विहिरीवर व पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत. या खालच्या जाती-धर्माच्या लोकांना पाणी मिळेना. अशा वेळी जोतीबा व सावित्रीबाई यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद त्या लोकांना खुला केला. त्या काळातील जातीभेद न मानण्याचा हा निर्णय म्हणजे फार मोठी अघटित घटना होय. त्यांनी दीन-दलितांचे दु:ख जाणले. जग काय म्हणेल याची पर्वा न करता त्यांना पोटाशी धरले, आसरा दिला. खरोखर सावित्रीबाई युगस्त्री ठरल्या.

शेतमजुरांचे कष्ट सावित्रीबाईंना समजले. दीन-दुबळ्यांची मुले, स्त्रिया यांची दु:खे त्यांनी जाणून घेतली. दलितांचे केविलवाणे व बहिष्काराचे जिणे त्यांनी लक्षात घेतले. या सर्वांची दु:खे दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांची सेवा केली. हे करताना समाजातील दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी सावित्रीबाईंना त्रास दिला. पण त्या क्रांतीकारी स्त्रीने कशाचीही पर्वा केली नाही. दीन-दुबळ्यांना यांना आधार दिला. समाजसेवा करण्याचे व्रत सावित्रीबाईंनी घेतले होते. त्या उपेक्षित जीवन जगणाऱ्यांना, शिक्षणाचे महत्त्व लक्षात आणून दिले. विद्या हे समाजाला जागे करण्याचे साधन आहे. महिलांना तर त्याची फार गरज आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. म्हणून स्त्री शिक्षणाची कामगिरी हाती घेतली. त्याचबरोबर स्त्रियांचे जीवन गुलामगिरीचे आहे हे ओळखले. त्यांची हलाखी दूर करण्यासाठी सावित्रीबाई आयुष्यभर झटत राहिल्या.

त्या काळात बालविवाह होत असत. पाळण्याला बाशिंग बांधून बालवयात मुला-मुलींचे विवाह होत. अनेक मुली बालविधवा होत. तरुण वयातील विधवांना पुरुष फसवीत. काही वेळा त्यांचाही पाय घसरे, चुकून गरोदर रहात. अशा स्त्रियांना घरीदारी आश्रय नसे. मग त्यांना नदी-विहिरीत जीव द्यावा लागे. एखाद्या

स्त्रीला असे धाडस करता येत नसे. मग तिचा खूप छळ केला जाई. काशीताई अशीच विधवा स्त्री. ती आपला जीव देण्यासाठी गेली. तेव्हा जोतिबाने तिला आपल्या घरी आणले. सावित्रीबाईंनी तिला मायेने जवळ केले. तिची सर्व काळजी घेतली. तिला मुलगा झाला. त्याचा नामकरण समारंभ केला. त्याचे नाव यशवंत ठेवले. सावित्रीबाईंने त्याला आपला मुलगा मानले. त्याला शिक्षण दिले. पुढे तो डॉक्टर झाला. सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सुधारणावादी म्हणून त्यांचे हे काम मोलाचे आहे. विधवांना आसरा दिला. अशा सावित्रीबाई थोर सामाजिक कार्य करणाऱ्या व स्त्रियांच्या आधारस्तंभ होत्या. स्वत:ला मूल नसताना अनाथ मुलांची माउली होण्याचा मनाचा मोठेपणा सावित्रीबाईंकडे होता. परोपकारी, त्यागी स्त्री म्हणून त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे!

१८७६ व १८९६ असा दोन्ही साली महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडला. या दुष्काळाची माहिती सरकारकडे देण्याचे काम जोतिबा व सावित्रीबाईंनी पोटतिडिकेने केले. सावित्रीबाईंनी दुष्काळाचे वर्णन ओव्यात सादर केले. त्या म्हणतात-

*झाडेझुडपे वाळून जाती। उजाड झाला सर्व देश।*
*गुरे मरती रानावनात। माणसे मरून पडती घरात॥*
*त्यांची प्रेते कुजुनी जात । जिकडे तिकडे दुर्गंधी ।*
*दुष्काळाची ही गती। शूद्रादि अतिशूद्रादि भोगती॥*

सावित्रीबाईंनी दुष्काळात दीन-दलितांना मदत केली. इंग्रज सरकारला दुष्काळ निवारण्यासाठी उपाय सुचविले. त्या पती-पत्नींनी ठिकठिकाणी अन्नछत्रे उभारली. ती चालविण्याची जबाबदारी सावित्रीबाईंच्या पुढाकाराने पार पाडली. ठिकठिकाणी हे काम चालू केले.

सत्यशोधक समाजामार्फत दोन हजार ठिकाणी हे काम चालू केले. छात्रालये उघडली. मुला-मुलींची त्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था केली. या सर्व छात्रालयांचा कारभार सावित्रीबाईच पाहात होत्या. त्याकाळी केशवपन ही रुढी फार होती. ही धर्माची आज्ञा आहे असे भासविले जाई. या अघोरी प्रकारास कितीतरी सुंदर बालिका बळी पडत. इच्छेशिवाय बळजबरीने त्यांना केशवपनासाठी न्हाव्यापुढे बसावे लागे. त्यावेळी त्यांची स्थिती हृदय पिळवटून जाईल अशी असे. शिवाय मृत विधवेचेही केस कापण्यास भाग पाडत. हे पाहून जोतिबा व सावित्रीबाई या दोघांनी या प्रकाराला आळा घालण्याची प्रतिज्ञा केली. स्त्रीवर्गाची विटंबना, अवहेलना आणि अघोरी छळ थांबावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जिवंत व मृत भगिनींचे केस कापू नयेत अशी न्हाव्यांना विनंती करण्याचे

ठरले. त्यासाठी पुणे, मुंबई परिसरातील न्हाव्यांची एक परिषद बोलविली. न्हावी कोणते अघोरी काम करतात यावर चर्चा झाली. ताबडतोब न्हाव्यांनी संपाचा निर्णय घेतला. या देशातील न्हाव्यांचा, हा पहिला संप होय. अशा तऱ्हेने केशवपनाच्या संकटातून विधवांची सुटका करण्यात सावित्रीबाईंनी पुढाकार घेतला.

१८९७ साली महाराष्ट्रात प्लेग रोगाची मोठी साथ आली होती. या साथीत अनेकजण दगावले. लोक गाव सोडून रानावनात राहू लागले. इंग्रज सरकारने रोग निवारण केंद्रे उभारली. परंतु प्लेगच्या संशयानेच लोकांवर जबरदस्ती होऊ लागली. अशावेळी सावित्रीबाईंनी आपले दत्तक चिरंजीव यशंवत यांची मदत घेतली. दीन-दलितांना दवाखान्यात नेले व त्यांची सेवा सावित्रीबाईंनी केली. एक महाराचा मुलगा या रोगाने पछाडलेला होता. ते पाहून माऊलीने त्यास खांद्यावर घेतले. दवाखान्यांकडे त्या निघाल्या. पण खुद्द त्यांनाच त्याची लागण झाली. आपला संसार न करता पीडित व दीनदलितांसाठी सावित्रीबाई राबल्या; अगदी आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत.

जोतिबा फुले यांचे कार्य फार महान होते. ते कार्य करताना सावित्रीबाईंची साथ तितक्याच जिद्दीने त्यांना मिळाली. सनातनी लोकांनी सावित्रीबाईंचा छळ केला पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. त्याकाळी सतीची चाल होती. एखाद्या नवविवाहित बालिकेच्या पतीचे अचानक निधन होई. त्या बालिकेला नवऱ्याच्या चितेवर स्वत:ला जाळून घेऊन सती जावे लागे. सती जाणे ही भयानक प्रथा होती. इच्छा नसतानाही पतीच्या प्रेताबरोबर जाळून घेऊन सती जावे लागे. सती जाणे हा भयानक अघोरी धार्मिक विधी पाहून सावित्रीबाईंना फार चीड आली. याविरोधी आवाज उठविला गेला. त्यावेळच्या सरकारवर सतीची चाल बंद करण्याविषयीची कायदा करावा म्हणून सावित्रीबाई व जोतिबा यांनी दबाव आणला.

सावित्रीबाईंना स्वत:ला मूल नव्हते. त्याकाळात त्यांच्या पतीने दुसरा विवाह करावा म्हणून खूप विनवण्या झाल्या. सावित्रीबाई तशा हुषार, धाडसी व गरीबांच्या कैवारी होत्या. जोतिबांच्या विचारांशी त्या एकरूप झालेल्या होत्या. त्या थोर समाजसेविका होत्या. जोतिबांच्या विचाराची व आचाराची झेप फार मोठी होती. ती सर्वसामान्य माणसाला पचण्यासारखी नव्हती. सावित्रीबाई असामान्य होत्या. त्यांनी जोतिबांबरोबर ही झेप घेतली. स्वत:चे मूल नसले तरी एका विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले. सावित्रीबाई थोर मनाच्या होत्या. त्यांनी आपल्या दत्तकपुत्राला डॉक्टर केले. केवढे हे थोर विचार व आचार! सावित्रीबाईंचे मन उदार होते. त्यांची मते सुधारक होती. कारण त्यांनी आपल्या

मुलाचे लग्न ग्यानबा ससाणे यांच्या राधाबाई या मुलीशी केले. हा विवाह ४ फेब्रुवारी १८८९ मध्ये झाला. तो मिश्र विवाह होता. तो होऊ नये म्हणून त्यांच्या नातेवाईकांनी खूप विरोध केला. धमक्याही दिल्या. परंतु सावित्रीबाईंनी जोतिबांच्या मदतीने न डगमगता तो सोहळा उत्तमरीतीने साजरा केला.

सावित्रीबाईंच्या काळात स्त्री ही पापाचे माहेर, नरकद्वार समजले जाई. स्त्री म्हणजे मोहाचे मूळ! गुलामगिरीत त्यांनी रहावे असा धर्माचा दंडक होता. स्त्री ही पायाची दासी आहे. पुरुषाच्या सुखासाठी ती आहे. अशाप्रकारे स्त्रीचे जीवन जनावरासारखे होते. सावित्रीबाईंनी या अन्यायाला वाचा फोडली. स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व त्यांना जाणवून दिले. स्त्रियांच्या हक्कासाठी त्या लढल्या. स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्या अविरत झटल्या.

सावित्रीबाईंना वाटे की, नवरा वारला तर विधवेचा काय दोष? त्यांनी विधवांनी पुन्हा विवाह करावा असे मत मांडले. ज्या विधवेची इच्छा असेल तिने दुसरा विवाह करावा हे त्यांनी सांगितले. विधवा पुनर्विवाह घडवून आणणारी सभा स्थापन केली. ती सभा दर १५ दिवसांनी भरत असे. तीमध्ये हळदीकुंकू सभारंभ, रसपान सभारंभ व्हायचे. तसेच प्रौढ स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांचा होणारा छळ या विषयावर चर्चा होई. उपाय सुचविले जात. स्त्रियांची ही पहिली संघटना म्हणावी लागेल. सावित्रीबाईंमध्ये संघटना कौशल्य होते. त्या सोशीक होत्या. सर्वांना समजावून घ्यायच्या; म्हणूनच स्त्रियांची संघटना करण्यात त्यांना यश आले.

सावित्रीबाईंची थोरवी त्यांच्या कार्यावरून लक्षात येते. सावित्रीबाई या थोर तळमळीच्या शिक्षिका होत्या. विलक्षण चिकाटीने आणि कठोरपणे त्यांनी ज्ञान देण्याचे कार्य केले. स्त्रियांवरील अन्यायाविरोधात त्या आयुष्यभर लढल्या. सावित्रीबाईंचे हे महान कार्य त्यांच्या शिक्षणातून मिळालेली प्रेरणा होय! म्हणून 'भगिनींनो, साक्षर व्हा आणि निर्भय व्हा-' हा संदेश क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा! प्रस्थापितांविरोधी पाऊल उचलून, सनातनवाद्यांशी संघर्ष करून, स्त्रियांवरील अत्याचार, रुढी-परंपरेच्या दृढ शृंखला तोडण्याचे असीम धाडस दाखविणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या होत.

सावित्रीबाई फुले यांच्या ठिकाणी द्रष्टेपण तर होतेच; पण स्त्री चळवळ परिवर्तनासाठीचा संघटित लढा विशिष्ट वर्गाच्याच हातात राहून त्यांची मिरासदारी वाढू नये हा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला. आज ओ. बी. सी. वर्गासाठी आणि स्त्रियांसाठी ज्या राखीव जागा ठेवण्याची शासनाची भूमिका आहे. त्यास

सामाजिक मान्यता मिळावी यादृष्टीने विचारांचे बीज पेरण्याचे असामान्य कार्य त्यांनी केले. सावित्रीबाई फुले म्हणजे असामान्य त्याग, असीम निष्ठा, अपरिमित श्रद्धा, अखंड परिश्रम, अविचलपणे मूल्यांची जपणूक, अतुलनीय धाडस आणि अविरतपणे स्त्री, शूद्र, अतिशूद्रासाठी पुरोगामीपणाने झटणारे वंदनीय व्यक्तिमत्व होय.

*

# सावित्रीबाई व जोतिबा – दोन स्वतंत्र व्यक्तिमत्वे

द. स. झोडगे संपादक- गावगाडा, पुणे

महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले. या क्रांतिकारक जोडप्याची नावे मानव समाज क्रांतीच्या जागतिक इतिहासात ललामभूत अशी राहणार आहेत. या उभयतांनी दाशरथी रामापासून घडत आलेल्या महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाला नवीन वळण लावून चैतन्यशील केले. क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी इ. स. १८४८ साली मुलींची शाळा चालू केली. शिक्षणबंदी, विधवा-विवाह बंदी इत्यादी साऱ्या बंदी मोडून टाकण्याची घोषणा करून स्त्री-मुक्तीचा झेंडा फडकविला. त्यावेळी जगातल्या बहुतेक देशांतील स्त्रिया महाराष्ट्रातील स्त्रियांप्रमाणेच कष्ट करीत होत्या. हाल भोगीत होत्या, त्रास सोशीत होत्या. जातीभेद, उच्चनीचता, स्पृश्य-अस्पृश्य, शिवाशिव, सोवळे ओवळे इत्यादींनी सारा समाज जखडून बांधला गेला होता. याला कारण पुरुषप्रधान समाजरचना होय, असे त्यांचे मत होते.

म. जोतिबांनी दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. समाजातर्फे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची त्यांनी मागणी केली. सर्व शिक्षण विनामूल्य मिळावे असा त्यांचा आग्रह होता. दीनदुबळे, दलित यांचे शिक्षण, स्त्रीदास्य विमोचन, अस्पृश्यता- निर्मूलन, शेतकऱ्यांचे विकसित जीवन इत्यादी कितीतरी उपक्रम म. फुले यांनी केले. त्यात सावित्रीबाईंचा फार मोठा भाग होता. या दांपत्याने आपल्या कार्यातून अंगी असलेल्या कर्तृत्व, काव्य लेखन व संघटन, चातुर्य या गुणांचा चांगल्या प्रकारे उपयोग केला. त्यांनी महाराष्ट्राची धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक भूमी नांगरून साफ केली आणि समतेचे बीजारोपण केले. म. जोतिबांचे व्यक्तिमत्व फार मोठे कणखर व लढाऊ होते. कोणत्याही गोष्टीत त्यांना अपयश आले, तरी ती गोष्ट यशस्वी करण्यासाठी ते पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत. ते हट्टी स्वभावाचे होते.

म. फुले समग्र वाङ्मय (आवृत्ती ४ थी इ.स. १९६१) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, व भारताचे संरक्षणमंत्री शरद पवार हे म्हणतात, 'स्त्री-शूद्रातिशूद्र म्हणजे सर्व उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता

आहे. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे. या ठोस भूमिकेतून त्यांनी शेतकऱ्यांचा 'आसूड' लिहिला. शंभर वर्षापूर्वी सहकाराचा पुरस्कार केला, अत्याधुनिकीकरणाचा त्यांनी आग्रह केला. त्यांनी अनेक आंदोलने उभारली. गिरणी कामगारांच्या संघटना उभारण्यास प्रोत्साहन दिले. देवदासी, परित्यक्ता, भटके, दलित यांच्या मुक्तीसाठी चळवळी केल्या. म. फुल्यांना समृद्ध आणि निकोप माणूस घडवायचा होता. यावरून म. फुल्यांच्या कार्याची थोरवी स्पष्ट होते.'

औरंगाबाद येथील साहित्यिक प्राचार्य गजमल माळी, म. फुले यांच्याविषयी म्हणतात, 'विश्वकुटुंब वादाची संकल्पना म. फुले यांनी प्रथम आपल्या देशाला दिली. त्यांचे व्यक्तिमत्त्व असामान्य होते. त्यांच्याप्रमाणेच त्यांची पत्नी सावित्रीबाई यांचे कर्तृत्व अलौकिक होते. इ. स. १८९० साली महात्मा फुले वारले आणि त्यांच्या कार्याचे व्रत घेऊन सावित्रीबाई पुढे सरसावल्या. म. फुले यांच्या कार्याची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. महात्मा जोतिराव यांच्या कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेली ही स्त्री होती. आपल्या पतीच्या घरातील जबाबदारी आणि सार्वजनिक जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन यशस्वीरित्या पार पाडणारी स्त्री विरळाच! सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजास आपले नेतृत्व दिले होते. (''महात्मा फुले यांचे सहकारी'' पृ. १०)

नागपूर येथील कुमुदिनी यावलकर यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची थोरवी चांगल्या प्रकारे सांगितली आहे. इ. स. १८३१ ते १८९७ हा बाईंचा जीवनकाळ. या काळात सामाजिक परिस्थिती फार बिकट होती. आपल्या युगप्रवर्तक पतीच्या प्रत्येक कार्यात भाग घेऊन ती यशस्वी करण्यासाठी त्या फार झटत त्यासाठी त्यांना हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. सावित्रीबाईंनी स्त्रियांसाठी आणि दीनदुबळ्यांसाठी जी कामगिरी केली तिला इतिहासात तोड नाही. जोतिबांनी काढलेल्या मुलींच्या व अस्पृश्यांच्या शाळा बंद पाडण्यासाठी लोकांनी केवढी उठाठेव केली, धाकदडपशाही केली, वाळीत टाकण्याचा दम दिला. शेवटी हे दांपत्य एका मुसलमान मित्राच्या घरात राहू लागले. अजून मुसलमानांकडे पाणी प्यायला लोक कचरतात. भल्या भल्या समाजसुधारकांची मजल फक्त आंतरजातीय विवाहपुरती! तेही मुलामुलींनी स्वत:हून ठरवले तरच! एरव्ही एका जातीचा दुसऱ्या जातीशी विवाहसंबंध नाही.

पुनर्विवाहाचा प्रश्न तळागाळातील जातींचा नव्हता. वरच्या जातीतील समाजाचा होता. या समाजातील विधवा स्त्रियांचे फार हाल होते. या विधवांना जीव नकोसा होऊन जाई. सावित्रीबाई असामान्य स्त्री होत्या. त्यांनी पाय घसरलेल्या-नव्हे जुलमाने घसरवलेल्या- विधवा बायकांची बाळंतपणे केली.

एवढेच नव्हे तर, अशाच एका ब्राह्मण विधेवेचे गोरेगोमटे मूल दत्तक म्हणून घेतले. केवढे हे धाडस? ते सावित्रीबाईंनी भावविवशतेने किंवा भूतदयेने किंवा पतीच्या सांगण्याने केले असेल का? हे संभवनीय नाही. हे केवळ अशक्य आहे. जातपात, वंशधर्म आणि परंपरा यांच्या मर्यादा उल्लंघून स्वत:च्या विचारांशी प्रामाणिक असलेली स्त्रीच जगावेगळे धाडस करू शकते. म. फुले यांचे विचार, धैर्य, कर्तृत्व ही त्यांची महानता केवळ सावित्रीबाईंमुळेच झळाळून उठते. या दांपत्याचे आपण सर्वांनीच भावपूर्ण स्मरण करावयास हवे.

सावित्रीबाईंच्या काळात स्त्रियांची व शूद्रातिशूद्रांची स्थिती फार भीषण होती. अतिशूद्रांना रस्त्यावरून चालायचे झाल्यास गळ्यात थुंकीसाठी मडके बांधावे लागे व चालताना उमटलेली पावले पुसण्यासाठी कमरेला झाडांची डहाळी बांधावी लागे ही गोष्ट काल्पनिक किंवा अतिरंजित नाही. त्या काळाची वस्तु:स्थिती आहे. त्यांचे आजचे वंशज आपल्या पूर्वजांच्या हालअपेष्टांच्या विचारात गुरफटले गेले तर त्यांना रडू कोसळल्याशिवाय राहणार नाही. स्त्रियांची अवस्था तर लांडग्याने कान धरून चालविलेल्या शेळीसारखी बनली होती. स्त्रियांना उठल्यापासून झोपेपर्यंत काम करावे लागे, तेही तिनेच केलेल्या भाकरीतील चतकोर तुकड्यासाठी! तेवढ्यावर ती जगत असे. विधवांची स्थिती तर मोठी केविलवाणी होती. बालविवाह रूढ होते. पाळण्यात हातपाय हालवीत व मुठी चोखीत पडलेल्या बालकांचाही विवाह करण्यात येत असे.

बालविवाहाची रूढी पाळण्यासाठी सहा-सात वर्षांच्या मुलींचे २५-३० वर्षांच्या मुलांबरोबर लग्न करून टाकीत, लग्न झाले की बालिका सासरघरी नांदावयास जात असे. तरी ती वयात आलेली नसे. सासरघरी काही दिवस रुळते न रुळते तोच तिचा नवरा मरे. बिचारीला वैधव्य प्राप्त होई. रूढी म्हणून तिचे केशवपन होत असे. विधवा म्हणून तिच्या कपड्यात बोलीचालीत फरक पडत असे. खाणं-पिणं-बोलणं- चालणं-वागणं-वावरणं यांच्या बाबतीत तिला बंधने पाळावी लागत. त्या सर्वांचा फायदा घेऊन पुरुषांकडून ती फसली जाई. गरोदर राहिली की नव्या संकटाने ती बेजार होई, बदनाम होई, तिच्यावर अत्याचारही होऊ लागत. अशा प्रकारचा स्त्री, शूद्रादिकांना माणसांतून उठविण्याचा काळा काळ होता. फुले दांपत्याने स्त्री शूद्रांसाठी समता आणि सेवाभावी शिक्षणाचे मंदिर उभे केले. ही त्यांची अपूर्व कामगिरी होती. यात तिळमात्र शंका नाही.

प्रसिद्ध विचारवंत, साहित्यिका विद्या बाळ म्हणतात, 'शहरी व ग्रामीण स्त्रियांना त्या काळातील जिणं एवढं तपशिलांत माहित नसतं म्हणूनच ते सांगितल्यावर मी त्यांना विचारू इच्छिते, सावित्रीबाईंनी व जोतिरावांनी जे पेरले,

ते आज आपण खात आहोत. आज आपणही काही पेरलं नाही, तर आपल्या नातवंडा-पतवंडांनी काय करावयाचं? याच वेळी मला हेही सांगणे गरजेचे वाटते की, फुले दांपत्यांने जे विचाराचं बी पेरलं ते मूलभूत समतेचे आणि समाजपरिवर्तनाचे बी होते. हे बियाणं जातिवंत आहे, पण ते फार उशिराने वर येणार आणि फळ देणार. बियाणं आहे म्हणूनच ते दर पिढीने लावायला हवं, तरच त्यात नंतरच्या पिढ्यांसाठी काहीतरी उगवत, हाती येत राहील. जुन्या काळात नव्या विचारांची मांडणी करत, त्यानुसार कृती करत, जगण्याचा पराक्रम त्यांनी केला. त्यांच्या जयंती मयंतीतून त्यांनी अंगिकारलेल्या समतेची प्रेरणा घ्यायला हवी.'

सावित्रीबाई फुले यांनी जोतिबांना बरीच पत्रे पाठविली आहेत. ती सावित्रीबाईंच्या मनाची, बुद्धीची व विचारांची साक्ष देतात. १८५६ सालच्या एका पत्रात भावाचे मतपरिवर्तन कसे केले याची माहिती दिली आहे. इ. स. १८६८च्या पत्रात सावित्रीबाईंनी एका नवीनच घटनेची माहिती दिली आहे. गणेश नावाच्या ब्राह्मण तरुणाचे सारजा नामक तरुणीवर प्रेम जडले होते. या दोघांवर सारे गाव चिडले. त्यांची धिंड काढली. त्यांनी त्यांना जाळण्याचे ठरविले होते. त्यात सावित्रीबाई मध्ये पडल्या. इंग्रजांचे भय दाखविल्यावर गणेश आणि सारजा यांची सुटका झाली. या दोघांनी सावित्रीबाईंचे पाय धरले. कोणत्याही गोष्टीचा त्या विचार करीत व मगच ती गोष्ट कृतीत आणीत. यामुळे त्यांच्या कार्यात (अपयशाचे) भय फारसे राहत नव्हते.

सावित्रीबाईंनी समाजक्रांतीसाठी तत्कालीन रूढी व विचार यावर मात करून स्वतंत्रता, समानता व बंधुता या मूल्यवान जीवन तत्त्वांची, मानवी हक्कांची जाणीव समाजात रुजवली. सावित्रीबाईंनी नाना प्रकारे समाजसेवा केली. जातिभेद निर्मूलन, स्त्री दास्यविमोचन, अस्पृश्योद्धार, शिक्षणाकरिता शाळा, शेतमजूर व शेतकरी संघटना, देवदासी, मुरळ्या, यल्लम्मा इ. स्त्रीवर्गात शिक्षणाचा प्रसार, दुष्काळ निवारण, प्लेगच्या रोग्यांची सेवा, सर्वसामान्यांचे जीवन स्थिर करण्याची त्यांची धडपड होती आणि तीही अविश्रांत! त्यांनी अनेक गोष्टीत बदल घडवून आणला. सावित्रीबाईंच्या काळातील परिस्थिती बदलली. आजच्या वर्तमान-काळातही सावित्रीबाईंच्या कार्याची गरज संपलेली नाही. पृथ्वीवर मानवप्राणी जिवंत आहे, तोपर्यंत सावित्रीबाईंच्या समता आणि सेवा कार्याची गरज पडणार आहे, इतके ते चिरंतन आहे.

सावित्रीबाईंच्या काळात ज्या स्त्री -शूद्रातिशूद्र लोकांना सावित्रीबाईंच्या कार्याचा लाभ झाला, त्या भाग्यवान लोकांचे वंशज आज मानाने जगून संसार

करीत आहेत. त्यांचीही मुले-बाळे, नातवंडे-पतवंडे शिक्षण घेत, सावित्रीबाईंची शिकवण आचरण्याचा प्रयत्न करीत आहेत. सावित्रीबाईंच्या काळात मानवप्राण्यांची माणुसकीच हरवली गेली होती. दुबळ्या स्त्री शूद्रादिकांवर बलिष्ठ-श्रेष्ठी लोक प्रभुत्व गाजवीत होते. त्यांना जनावरासारखे वागवीत होते. सावित्रीबाईंना माणूस हा प्राणी माणुसकीने माखलेला असा पाहावयाचा होता. त्यांना सारे जग सुंदर दिसत होते. त्या काव्यात सांगतात-

*'सुंदर सृष्टी। सुंदर मानव*
*सुंदर जीवन सारे*
*सद्‌भावाच्या पर्जन्याने*
*बहरूनी टाकू सारे।। ध्रु ।।*
*मानव जीवन हे। विकसुया।*
*अपयश भय हे। सोडुनिया।। आपण जगू*
*इतरास जगवू। बहरूनी टाकू सारे।।*

सावित्रीबाईंचे जीवन चिकित्सक दृष्टीने पाहिले तर अनेक प्रश्न मनामध्ये उभे राहतात.

सावित्रीबाईंनी जोतिबांच्या कार्याला पती म्हणून हातभार लावला की, त्यात स्वतंत्र प्रेरणा होती? महात्मा जोतिबांच्या प्रत्येक भागात सावित्रीबाईंचा भाग होता की, त्यात काही स्वयंप्रेरणा होती? सावित्रीबाईंचं सारं जीवन जोतिबाच्या कार्यानेच गुंडाळून गेल्याचे दिसते. कार्य म. जोतिबाने उभे करावे आणि ते क्रांती कार्य सावित्रीबाईंनी डोक्यावर घ्यावे आणि त्यात यशाचे श्रेय जोतिबांना द्यावे? याचा उलगडा डोके न चालविता सावित्रीबाईंच्या काव्यात सापडतो.

*'जयाचे मुळे मी कविता रचिते।*
*जयाचे कृपे ब्रम्ह आनंदे चित्ते*
*जयाने दिली बुद्धी ही सावित्रीला।*
*प्रणामा करी मी यती जोतिबाला।।*

या काव्यात सावित्रीबाईंच्या अंगी असलेल्या श्रद्धा आणि कृतज्ञता या गुणांचे वाचकास दर्शन होते. सावित्रीबाई स्त्रीमुक्तीच्या चळवळीच्या आद्य संस्थापिका समजल्या जातात. पण या चळवळीस जोतिबांनी जन्म दिला; हे विसरता येत नाही.

सावित्रीबाई या म. जोतिबांच्या साथी होत्या आणि म. फुले सावित्रीबाईंचे साथी होते. दोघेही मरेपर्यंत एकमेकांचे साथीदार राहिले होते. त्यांच्यात एकदाही भांडण झाल्याचे कोणाच्या ऐकिवात नव्हते.

या उभयतांना मूलबाळ नव्हते. धर्माच्या व रूढीच्या दृष्टीने घराण्याला दिवा लावण्यास मुलगा असावा लागतो. पण सावित्रीबाईस मूलच होत नव्हते. त्यामुळे सावित्रीबाईंकडे तर स्त्रिया वांझोटी म्हणून पाहत व स्वभावानुरूप कुजबुजत. लोक जोतीबांना दुसरे लग्न करण्यास आग्रह करू लागले. एकदा तर खुद्द सावित्रीबाईंनी जोतिबास म्हटले, 'स्वामी, तुम्ही वंशाचा दिवा लावण्यासाठी दुसरे लग्न करा.' या वाक्यावरून उभयतांचे कडाक्याचे भांडण झाले. या भांडणाच्या अनेक भावपूर्ण दंतकथाही ऐकावयास मिळतात.

एकदा सावित्रीबाई फुले आपल्या घराकडे जात असता रस्त्यावरील एका घरात भांडणे चालली होती. नवरा आपल्या बायकोला लाटण्याने मारीत होता. त्याची बायको ओरडत होती, रडत होती, 'मला मारू नका,' ओरडून सांगत होती. घरापुढे स्त्री-पुरुषांची गर्दी जमली होती. नवरा बायकोच्या भांडणात कोणी पडावे? या विचाराने सर्वांनीच बघ्याची भूमिका घेतली होती. त्यांची गर्दी हटवून सावित्रीबाई आत शिरल्या. त्यांना पाहताच नवरोबा गजरला, 'बाईसाहेब, तुम्ही नवरा-बायकोच्या भांडणात पडू नका.' 'अरे चल' असे रागात ओरडून त्याच्या हातातले लाटणे हिसकावून सावित्रीबाईंनी त्याला जोरात दाराकडे ढकलले. दारात सोल्जर युरोपियन शिपाई होता. त्याने नवरोबास पोलिस गेटावर नेले. दोन दिवस त्यास गेटात राहावे लागले. त्याच्या बायकोने सावित्रीबाईस विनंती करून नवऱ्यास सोडवून आणले. असा सावित्रीबाईंचा दबदबा होता.

नवरा-बायकोच्या संसारात मुलगा असणे, हे भाग्याचे लक्षण समजले जाते. मुलगा असेल तर तो घरातील धार्मिक विधिकर्म करतो, श्राद्ध वगैरे पूजा-अर्चेत भाग घेण्याचा त्याचा हक्क असतो. सावित्रीबाईंनी त्यांच्याकडे बाळंतपणासाठी आलेल्या काशी नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक म्हणून ओटीत घेतला. स्वत:च्या पोटचा मुलगा समजून त्याचे पोषण, बालपण, शिक्षण केले. जोतिबाने आपली वडीलोपार्जित सारी इस्टेट या दत्तक मुलाच्या नावाने केली. या मुलाचे नाव 'यशवंत जोतिबा फुले' असे होते. आणि तेही सावित्रीबाईंनीच ठेवले होते. यशवंतवर त्यांची फार माया होती. सावित्रीबाईंनी जोतिबांच्या कौटुंबिक व सार्वजनिक प्रपंचास दाद देत प्रतिसाद दिला होता. व आपल्या मनाचा, बुद्धीचा आणि गुणांचा सदुपयोग त्या करीत होत्या.

सन १८८३ साली पंडिता रमाबाई पुण्यात आल्या होत्या. त्यांच्या आगमनाने साऱ्या पुण्यात खळबळ उडून राहिली होती. त्याच काळात ताराबाई शिंदे यांची 'स्त्री-पुरुष तुलना' ही छोटीशी पुस्तिका प्रसिद्ध झाली. ताराबाईंनी आपल्या पुस्तिकेत पुरूष ज्ञातीचे वाभाडे काढले आहेत. पंडिता रमाबाई आणि

ताराबाई यांचे फुले दांपत्याने छान स्वागत केले. स्त्रीविकासासाठी पुरुषांनी काही केले नाही, असे म्हणता येत नाही. स्त्री-पुरूष समतेचा विचार, स्त्रीमुक्तीचा आराखडा, म. फुले यांनी तयार केला हे नाकारता येत नाही. म. फुले हे लोकोत्तर पुरूष होते. त्यांची साथ आयुष्यभर मिळाल्याने सावित्रीबाईंच्या जीवनाची जडणघडण झाली; हे सत्य आहे. तरीदेखील म. जोतिबांची सारी सामाजिक कार्ये सावित्रीबाईंनी यशस्वी केली असे म्हणावे लागेल.

म. फुले आजारी होते. दि. २६ नोव्हेंबर १८९० ला त्यांना देवाज्ञा झाली. गुरूवारची रात्र काळरात्र ठरली. रडारडीने व्यापून गेली. ही दुःखद बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. सत्यशोधक समाजाचे अनुयायी आले. त्यांनी अत्यंविधीची तयारी केली. अंगणात जोतिबांचा देह लोकांच्या दर्शनास ठेवला होता. त्यांच्या कपाळावर हात ठेवून सावित्रीबाई धाय मोकलून रडत होत्या. जवळ दत्तकपुत्र यशवंत बसला होता. या दत्तकपुत्राने मृतापुढे मडके धरावयाचे नाही याचा घोळ माळी लोकांनी सुरू केला. हा पुत्र माळीचा नाही, असा वादविवाद सुरू केला. वादविवाद संपत नाही हे पाहून सावित्रीबाईंनी आपले रडे थांबविले, डोळे पुसले. मयतीपुढे धरावयाचे मडके हातात घेतले व दत्तक पुत्रास म्हटले, 'तू जोतिबा माळ्याचा पुत्र आहेस. चल माझ्या बरोबर' हा दुःखद प्रसंग सावित्रीबाईंच्या असामान्य सामर्थ्याचा साक्षात्कार घडविणारा असा आहे. अशा प्रकारचे अनेक प्रसंग सावित्रीबाईंच्या चरित्रात आढळून येतात.

स्त्री-पुरूष समतेविषयी सध्या खूप बोलले जाते. चर्चिले जाते, तरी त्याचा शेवट होत नाही! हजारो वर्षापूर्वी प्रस्थापित झालेल्या पुरूषप्रधान समाजरचनेचे प्रभुत्व कमी झालेले नाही. स्त्रियांना समाजात दुय्यमच मानले जाते. स्त्रियांच्या हक्काला विशेष प्राधान्य देऊन समानतेच्या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. स्त्रियांचे हक्क पुरुषांसारखेच असतात. मानवी हक्कांबाबत बरेच काही बोलले जाते. पण पुरुष हक्काचा भाग अधिक असतो. बहुसंख्य स्त्रिया पुरूषी छळवादामुळे आपले हक्क बजावू शकत नाहीत. बहुसंख्य स्त्रिया आपल्या हक्कांपासून वंचित आहेत. पण त्याची नोंद मानवी हक्कांत चर्चिली गेली नाही. अशा प्रकारची दुःखे स्त्रियांना भोगावी लागतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला प्रतिनिधींसाठी पुणे महापालिकेतर्फे महिला समता परिषद भरविण्यात आली होती. ही भव्य दिव्य परिषद दोन दिवस चालली होती. या दोन दिवसांच्या अधिवेशनात थोरांची व विचारवंतांची भाषणे झाली. अनेक ठराव पास झाले आणि काही मागण्याही करण्यात आल्या. 'सावित्रीबाई फुले स्मृतिशताब्दी' हे वर्ष शासनाने ''महिला धोरण अंमलबजावणी

वर्ष'' म्हणून जाहीर करावे. त्या निमित्त निरनिराळे कार्यक्रम घ्यावेत. सावित्रीबाईंचे नावे टपाल तिकीट काढावे, इत्यादी. महिला समता परिषदेमध्ये प्रारंभी विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व म. जोतिबा फुले यांच्या छायाचित्रांना पुष्पहार घातले. परिषेदस आलेल्या उपस्थितांचे मन हेलावले. त्यांनी मनातल्या मनात फुले दांपत्यास आदराची प्रेमांजली वाहिली.

क्रांतिज्योती सावित्रीबाईंयांच्या ठायी सत्यप्रीती, सत्यनिष्ठा आणि कडवी समता होती. म्हणून त्या सर्वांना वंद्य वाटत होत्या. मृत्यूपूर्वीच त्या लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांचे चरित्र मानवतेने भरलेले होते. त्यांची काम करण्याची पद्धती, चिकाटी आणि तडफ यामुळे त्यांचे चरित्र आबालवृद्धांना आदर्शभूत आहे. त्या मितव्ययी, मितभाषी, मिताहारी होत्या. त्यांनी स्त्रियांसाठी शूद्रादिकांसाठी खूप काही केले. दीडशे वर्षापूर्वीच्या अंधाऱ्या काळात सावित्रीबाईंनी समाजक्रांती घडवून आणली. ती कशी? मिशनरी स्त्रियांच्या प्रचाराची पद्धत, गाणे, डफ या आवाजात त्या स्त्रियांच्या जमावात आपले नवविचार मांडीत. अशा प्रकारची स्त्री मुक्ती चळवळीचा पाया घालणारी ती असामान्य स्त्री होती.

सावित्रीबाई फुले यांचे चरित्र अनेक चरित्र लेखकांनी लिहून प्रसिद्ध केले आहे. काहींना आपल्या पुस्तकांची दुसरी आवृत्ती काढावी लागली. हा सावित्रीबाईंच्या नामाचा महिमा होय! गारगोटी, जि. कोल्हापूर येथील साहित्य संशोधक डॉ. मा. गो. माळी यांची २० पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यापैकी सहा ग्रंथांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले' या ग्रंथास खास पुरस्कार मिळालेला आहे. शिवाय त्यांनी सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मयाचे संपादन केले आहे.

डॉ. मा. गो. माळी यांना आम्ही आमचे मित्र कै. गोपीनाथ पालकर यांच्या संग्रही 'सत्यशोधक' समाजाच्या इतिहासास उपयुक्त होणारी काही साधनसामुग्री होती, तिचे झेरॉक्स फोटो काढून दिले. दुष्काळाचे काही फोटो बिघडलेले होते. पालकर यांचेकडे सात-आठ फुटक्या व पिचक्या फोटोच्या काचेच्या निगेटिव्ह होत्या. त्यांचे फोटो घेतले. ते बिनचूक आहेत. हे फोटो आम्ही डॉ. माळी यांना संशोधनासाठी दिले व त्यांचा उपयोग करण्याची विनंती केली. डॉ. माळी यांनी सावित्रीबाई फुले यांचे सुंदर चरित्र लिहून प्रसिद्ध केले. मत्सरी साहित्यिकांनी या पुस्तकावर भयंकर टीका केली. त्या टीकेला ना बूड ना खोड. सारे मनकल्पी आधार. सावित्रीबाईंना दोष देणे हेच टीकेचा सार.

काही वर्षापूर्वी आमच्याकडे 'सत्यशोधक' समाजाचा अभ्यास करणाऱ्या

डॉ. गेल आम्व्हेट येत असत. त्यांनी दोन-तीन पुस्तके लिहिली आहेत. 'जोतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार' या पुस्तकात त्या म्हणतात; अनेक पुरुषांनी स्त्री विषयक प्रश्नावर मोठी मोहिम काढली असे सांगितली जाते. याही पुढे जाऊन, 'करू पहिलं नमन जोतिबाला! त्यानं जन्म दिला स्त्रीमुक्तीला' असं गाणं आज स्त्री मुक्ती चळवळीमध्ये म्हटलं जातं.' जोतिबा आणि सावित्रीबाई यांनी पुरूषसत्ताक समाज रचनेवर घणाघाती हल्ले केले आणि मातृसत्ताक समाजव्यवस्थेवर पुरस्कार केला. पितृसत्ताक व्यवस्थेपासून व्यक्तीचे, कुटुंबाचे समाजाचे आणि देशाचे काय तोटे होतात हे नमूद केले. एकूण स्त्रियांच्या 'गुलामगिरी'स पितृसत्ताक समाजव्यवस्था हीच जबाबदार आहे. ती उखडत काढण्याचा कार्यक्रम त्यांनी आखला. त्यात सावित्रीबाईंचा महत्त्वाचा भाग होता.

एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणा चळवळीमध्ये स्त्रियांची भागीदारी किती होती? १८८० पर्यंत स्त्रियांची भागीदारी फारशी झाली नव्हती. सुशिक्षित स्त्रिया बोटावर मोजण्याइतपत होत्या. त्याही घरात बसून गप्पा मारणाऱ्या होत्या. १८४८ पासून सावित्रीबाईंचे शिक्षणाचे कार्य चालूच होते. केशवचंद्रसेन यांच्या समाजातील स्त्रियांनी, स्त्रियांच्या उन्नतीसाठी १८६५ साली 'ब्राह्मो समाज' ही स्त्रियांची संघटना उभी केली. १८७८ मध्ये 'आर्य नारी समाज' नावाची एक स्त्री संघटना स्थापन केली. १८८२ मध्ये बंगाली स्त्रियांनी स्वत: पुढाकार घेऊन स्त्री चळवळ सुरू केली. महामानव रविंद्रनाथ टागोरांची मुलगी स्वर्णकुमारीदेवी यांनी १८८२ साली 'लेडीज थिऑसॉफिकल सोसायटी' सुरू केली. १८८६ मध्ये 'सखी समाज' नावाची एक संघटना स्थापन झाली. १८८२ मध्ये पंडिता रमाबाईंचे महिलासेवेचे कार्य सुरू झाले. महिला चळवळींचा असा स्थूल इतिहास सांगता येतो. पुढील शतकात स्त्रीमुक्तीच्या कार्यकर्त्या २० व्या शतकाकडे मागे वळून पाहतील तेव्हा त्या दचकतील आणि पुटपुटतील; स्त्रियांचे दुय्यम स्थान जेथचे तेथेच आहे. लिंगभेदावर आधारलेली असमता तशीच टिकून आहे. स्त्रियांची परिस्थिती पुरुषापेक्षाही भयंकर हलाखीची आहे. सध्याची सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक व्यवस्था अयोग्य आहे. या गोष्टीचे योग्य निदान करून कार्यकारणभावाचा शोध घेतला पाहिजे.

पुरुषांचे प्रश्न एक नदी असेल, तर स्त्रियांचे प्रश्न एक सागर आहे. ते सोडविणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे अशक्य काम आहे, याची जाणीव सावित्रीबाईंना होती. सावित्रीबाईंच्या काळात नवऱ्याच्या व कुटुंबियांच्या गरजा एखाद्या बायकोने पुरविल्या नाही, तर तिला मारपीट होत असे. रूढींमुळे त्यावर इलाजही करता येत नसे. उलट त्या बायकोस ठार करण्यात येत असे.

स्त्रियांवर अत्याचार होणे, त्यांना ठार मारणे याचे मूळ पितृसत्ताक समाज व्यवस्थेतील कुटुंबात आहे. हे कुटुंब स्त्रीला हीन समजते. इंग्रजांच्या आगमनानंतरच धर्म, अर्थ, रूढी यांच्या उतरंडी ढासळू लागल्या हे नाकारण्यात अर्थ नाही. कुटुंबात एकमेकांशी असलेल्या परस्पर संबंधाबाबत जी ऐतिहासिक व्याख्या आहे. त्यामुळे महिलांना स्वावलंबी होऊन आपला विकास करून घेण्यास खूपच अडचणी आहेत. यासाठी जगातील महिलांची मातृसत्ताक राजवटीची अपेक्षा आहे.

सावित्रीबाई फुले उपदेश करतात, 'खेडोपाडी राहिलेले पुरूष आणि स्त्रिया पूर्ण अडाणी आहेत. स्त्रिया बोटावर मोजण्याइतक्या शिकलेल्या आहेत. स्त्रीशूद्रही जनता आपण अडाणी आहोत. परंपरेने होणाऱ्या अन्याय व अत्याचार यांचा प्रतिकार करण्यास असमर्थ आहोत; या न्यूनगंडाने पछाडले गेले होते. हा न्यूनगंड काढून टाका.' असे आवाहन केले. 'आपण पुरूषांपेक्षा कमी शक्तीच्या आहोत', ही न्यूनत्वाची भावना काढून टाकली पाहिजे. स्त्रियांनी स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनले पाहिजे. सांप्रत समाजाची मांडणी पुरुष- प्रभुत्वाखाली झाली. या पुरूषप्रधान समाज व्यवस्थेमुळे स्त्रियांवर घोर अन्याय होत आले आहेत. आजही होत आहेत. पुढील काळातही होतील. म्हणून जागृत झालेल्या आजच्या स्त्रियांनी गप्प न बसता प्राणपणाला लावून मातृसत्ताकतेची स्थापना केली पाहिजे. पण आधी शिका व स्वावलंबी व्हा' हा अष्टाक्षरी मंत्र सावित्रीबाईंनी काव्यातून दिला आहे.

विदर्भ भागातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या नेत्या डॉ. सीमा साखरे म्हणतात- म. जोतिबा व सावित्रीबाई हे अलौकिक दांपत्य होते. मिळेल त्या मार्गांनी समतेसाठी व माणुसकीच्या रक्षणासाठी जीवाच्या आकांताने ते लढले. सामाजिक परिवर्तनासाठी समतेचे अधिष्ठान टेऊन त्यांनी वैचारिक संघर्ष सुरू केला. त्यांचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी पुढे नेलें. तथापी हे कार्य ज्यांच्यासाठी आहे त्यांनी स्वत: हाती घेऊन परिवर्तन चक्राला वेग दिला तरच त्याचे परिणाम दिसू लागतील. ज्याची लढाई त्यांनीच लढायची असते. म्हणून स्त्रियांच्या चळवळीची गरज असते. या देशातील स्त्री जीवनाचा इतिहास हा गुलामीचा इतिहास आहे. पण स्त्रियांना 'देवता' म्हणून संबोधले जाते, पण त्या माणूस म्हणून जगू शकल्या नाहीत. हे सत्य आहे, खोटे काही नाही ('समता' अंक १९९२)

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काळात आपला देश ब्रिटीश साम्राज्यात मोडत होता. हे साम्राज्य जगभर पसरले होते. त्यावर सूर्य मावळत नव्हता अशी म्हण प्रचारात होती. मोगलाई, पेशवाई खलास झाल्या होत्या.

कायदेबाज राज्य सुरू झाले होते. तरी परंपरेने चालत आलेल्या पुरूषसत्ताक समाज व्यवस्थेतील रूढीत व विचारांत बदल झालेला नव्हता. स्त्री, शूद्रादी बहुजन समाज शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीत रूढीने पक्का डांबून ठेवला होता. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी फुले दांपत्यानी समाजक्रांतीचे बंड उभारले. त्याला १५० वर्षे होत आली आहेत. या कालावधीत जगातील ठिकठिकाणच्या स्त्री समाजात सावित्रीबाईंच्या बंडाचे लोण पोहोचले. त्यांनीहि आपल्या विकासासाठी स्त्रीमुक्ती चळवळीच्या संस्था स्थापन केल्या. जगभर स्त्रियांची जागृती होऊ लागली. स्त्रियांच्या जागतिक परिषदाही भरू लागल्या.

जागतिक परिषदांचे शांतता, समानता व विकास हे सूत्र आहे. १९७५ साली पहिली परिषद मेक्सिकोस, दुसरी परिषद कोंपनहेगनला झाली. तिसरी परिषद नैरोबीला झाली. सन १९७५ ते १९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले. व्हिएन्ना, रिओचि, कैरो, कोंपनहेगन येथेही महिलांच्या जागतिक परिषदा झाल्या. बिजींग येथे चौथी आंतरराष्ट्रीय परिषद १९९५ साली झाली. अशा प्रकारे अगदी थोडक्यात सावित्रीबाईंपासून आजपर्यंत महिलांच्या स्त्रीमुक्ती चळवळीचा इतिहास सांगता येतो. बिजिंगच्या परिषदेत स्त्रियांच्या अनेक प्रश्नांची चर्चा झाली. वाढत्या हिंसेचे व सामूहिक बलात्काराचे मूळ पितृसत्ताक पद्धतीत असलेल्या कुटुंब रचनेत आहे. पुरूषसत्ताक पद्धती दप्तरी बांधून मातृसत्ताक पद्धती मानवसमाजात रूढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी संघर्ष करण्याची गरज आहे. हेच बिजींग परिषदेस गेलेल्या नव-लोकशाही विचारवंत महिलांचे विचार आहेत.

म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या जोडप्याने लोकांसाठी फार खस्ता खाल्ल्या. स्त्री-मुक्तीसाठी व अस्पृश्योद्धारासाठी निरनिराळे कार्यक्रम आखून ते यशस्वी करून दाखविले. स्त्रीदास्य विमोचन, शूद्रातिशूद्रांची गुलामगिरी निर्मूलन या कार्याचे ध्येय अंगिकारलेल्या कार्यकर्त्यांना हे दांपत्य एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील.

*

# सावित्रीबाईंची साहित्यनिर्मिती

डॉ. सुभाष सावरकर, अमरावती

भारतीय प्रबोधनयुगातील पहिल्या एतद्देशीय शिक्षिका, स्त्रीमुक्तीच्या पहिल्या कृतिशील उद्‌गात्या, प्रौढ तथा महिला शिक्षणाच्या पहिल्या सक्रिय पुरस्कर्त्या आणि पददलितांच्या पहिल्या क्रियाशील कैवारी- अशा विविध गौरवास्पद भूमिकांमधून क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी जनसामान्यांच्या मनांमध्ये मातृमूर्तीचे अढळ ध्रुवपद प्राप्त केले आहे. शूद्रातिशूद्र पददलितांना सुशिक्षित व सुसंस्कारित करण्याचा वसा घेतलेल्या सावित्रीबाईंच्या धीरोदात्त व्यक्तिमत्वाचे आकलन एक स्वतंत्र प्रेरणेची स्वत्वसंपन्न व्यक्ती या स्वरूपात नव्याने होणे आवश्यक आहे. अन्यथा 'क्रांतिसूर्य जोतिबांची पतिपरायण पत्नी, केवळ एवढ्या संकुचित परिघातच अडकून, त्यांच्या स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्वावर अन्याय होण्याचा धोका आहे.[१]

सावित्रीबाई म्हणजे विलक्षण आत्मविश्वासाची आणि अखंड चैतन्याची जणू मूसच! जोतिबांना केवळ मन:पूर्वक साथ देण्याचेच नव्हे, तर प्रसंगविशेषी धीर देऊन त्यांची आशा तेवत ठेवण्याचेही सामर्थ्य सावित्रीबाईंच्या ठायी होते, ही बाब दि. १० ऑक्टोबर १८५६ रोजी नायगावहून त्यांनी जोतिबांना जे पत्र लिहिले [२] त्यावरून स्पष्ट होते. कोवळ्या वयात सासर-माहेरची सावली सोडून रणरणत्या वैशाख वणव्यात जोतिबांच्या सोबत बाहेर पडण्याचा त्यांचा निर्णय, वयाच्या विसाव्या वर्षी पुण्यासारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात टारगटांच्या टिंगलटवाळ्या आणि निंदानालस्ती सहन करून (आणि प्रसंगविशेषी अंगावर आलेल्या धटिंगणाच्या मुस्कटात हाणून सुद्धा!) प्रौढ मुलींना प्रशिक्षण देण्याचे त्यांनी केलेले दिव्य, जोतिबासारख्या प्रखर ध्येयवेड्या क्रांतिपुरुषासोबत सतत ५० वर्षे काट्याच्या अणीवर वैयक्तिक प्रपंच तोलून परिसरातल्या साऱ्या साधनवंचितांचा संसार यशस्वी करण्यात त्यांनी दाखविलेले कर्तृत्व, जोतिबांच्या अंत्ययात्रेतही आडमुठ्या नातलगांच्या नाकावर टिच्चून टिटवे धरण्यातून त्यांनी दाखविलेले लोकविलक्षण धैर्य- इतकेच नव्हे; तर पतिनिधनानंतरही खचून न जाता, पतीच्या सत्यधर्मप्रसारकार्यात स्वत:ला झोकून देण्याची त्यांची तयारी आणि साथीच्या रोगाने ग्रस्त झालेल्या रुग्णांच्या सेवेत त्यांनी अखेरीस ठेवलेला देह- या एकाहून एक लोकविलक्षण घटना विचारता घेता, सावित्रीबाईंच्या प्रगल्भ,

समृद्ध व भव्योदात्त अशा व्यक्तित्वापुढे कोणीही सहृदय भारतीय आदराने नतमस्तक होईल यात शंका नाही.

अशी ही स्वत्वसंपन्न मातृमूर्ती सृजनशील काव्यप्रतिभेचीही धनीण होती, ही वस्तुस्थिती अलिकडेच उजेडात आली आहे. वयाच्या तेविसाव्या वर्षीच (१८५४) 'काव्यफुले' नावाचा त्यांचा ४१ स्फुटरचनांचा संग्रह प्रकाशित झाला असून 'बावनकशी सुबोध रत्नाकर' ही ५२ कडव्यांची काव्यरचना त्यांनी जोतिबांच्या निधनानंतरच्या वर्षी (१८९१) लिहून १८९२ मध्ये प्रकाशित केलेली आहे. या व्यतिरिक्त शिवस्तुतिपर अशा संस्कृत 'शिवमहिम्न स्तोत्रा' चे ओवीबद्ध मराठीत त्यांनी केलेले सुबोध रूपांतरसुद्धा अगदी अलिकडेच प्राप्त झाले आहे.[१] अर्थात वरील रचनांच्या संग्राहकांनी पाठसिद्धी व पाठशुद्धीसंदर्भात केलेली हेळसांड, अनावश्यक शोधने, संस्करणे व प्रक्षेप यांमुळे त्या रचनांची मूळ स्वरूपात अनुपलब्धी हा एक मोठा अडसर या रचनांच्या अभ्यासमार्गात उपस्थित होतो. तरीही या रचनांमागची प्रेरणा व निर्मितीमागची तळमळ ध्यानात घेता, सावित्रीबाईंची काव्यकळा ही अनघड असूनही मौल्यवान आहे, हे मान्य करावेच लागते. शब्दांना नटवून सजवून कातीव-कोरीव शब्दबंध घडविणे आणि त्याला कलात्मक करण्यासाठी तंत्राचे आडाखे उपयोजिणे- अशा कुठल्याही खटाटोपात न पडता सावित्रीबाईंनी स्वत:च्या अस्सल, अर्थपूर्ण व मानवीय अनुभूतीचे प्रामाणिक आविष्करण केल्याचे या रचनांवरून दिसून येते. देव-दैव-धर्म शरण तसेच गतानुगतिक तंत्रशरण अशा त्या काळातील रूढ कवितेच्या तुलनेत, सावित्रीबाईंची साधीसुधी पद्यरचना ही, मंत्रवती-ओघवती-बोधवती-प्रयोजनवती असून ती वास्तवाभिमुख असल्यामुळे उजवी ठरते. जनसामान्यांबद्दलच्या त्यांच्या उपजत कळवळ्यामुळे तसेच जनतत्त्वावरील त्यांच्या प्रगाढ निष्ठेमुळे सावित्रीबाईंची साधीसुधी जनभाषेतील कविता ही समकालीन तंत्रसिद्ध रचनांना बाजूस सारून ठसठशीतपणे नजरेत भरते आणि थेट मनात उतरते.

त्यांच्या 'काव्यफुले' वरून १४३ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतर आज काव्याच्या मूल्यमापनाचे पारंपरिक निकषच मोडीत काढण्याची भाषा केली जात आहे. दलित, जनवादी, स्त्रीवादी, विमुक्त भटके, आदिवासी- असे विविध साहित्यप्रवाह अभिजन साहित्यपरंपरेपासून फुटून बाहेर पडत आहेत. तळागाळातली दबलेली मानवी आयुष्ये व जीवनसंघर्षाशी निगडित असलेली त्यांची मूल्ये हीच खरी प्रातिनिधिक मूल्ये असून, त्या मूल्यांच्या अनुरोधाने समाजात परिवर्तन घडवून आणण्याची व त्यासाठी एक प्रभावी साधन म्हणून साहित्याचा वापर करण्याची या साऱ्या प्रवाहांची जिद्द उमटून येत आहे. आधुनिक

मराठीपुरते बोलायचे झाले तर ही परंपरा ठळकपणे सुरू झाली ती जोतिबांपासून! अन् जोतिबांनी पुकारलेल्या सांस्कृतिक क्रांतीची ज्योत आपल्या तळहातावर घेऊन बिकट वाट चालणाऱ्या सावित्रीबाईंच्याही साहित्याची आतकुळी त्याच जीवनमूल्यांची उद्‌गाती आहे. फरक एवढाच की, जोतिबांच्या रचनांमध्ये सूर्याची दाहकता प्रतीत होते; तर सावित्रीबाईंच्या रचनांमध्ये चंद्राची शीतलता उमलून येते. दोन्ही प्रकाशाकांक्षीच असल्या तरी, व्यक्तित्वानुसार जोतिबांची प्रतिभा ही युयुत्सु, आव्हानक, विदारक वास्तवलक्ष्यी-अशी प्रखरदाहक परिवर्तनकला घेऊन अवतरते; तर सावित्रीबाईंची प्रतिभा ही आश्वासक, आवाहक, संयमित वास्तवलक्ष्यी- अशी शांत, संयतशील परिवर्तननिष्ठा घेऊन अवतरते; आणि शब्दा-शब्दाला आश्वासक सच्चेपणा बहाल करीत स्निग्ध आत्मीयतेसह उलगडत जाते. मातृमूर्तीचे ऋजु, करुणागर्भ व्यक्तित्वविशेष हे सावित्रीबाईंच्या या शैलीतून वाचकमनाला फुलवत, गोंजारत जातात.

वस्तुत: आक्रमक अशा प्रखर प्रतिभेचे दाहक विलसित असूनही महात्मा जोतिबांचे लेखन हे त्यांच्या स्मृतिशताब्दीनंतर आता कुठे 'साहित्य' म्हणून मान्यता पावू लागले आहे.[४] या पार्श्वभूमीवर पाहू जाता सावित्रीबाईंच्या लेखनाबाबत विद्वान पंडितांनी अगदी नमनालाच नकारघंटा वाजवून अपशकून करणे आरंभले[५] ही गोष्टही अपेक्षितच म्हटली पाहिजे. अशा परिस्थितीत सावित्रीबाईंच्या लेखनाचे 'साहित्यदृष्ट्या' मूल्यमापन करू पाहाणाऱ्या समीक्षकाला संकुचित अशा रूढ अभिजनवादी कसोट्या अन्यायकारकच वाटतील, ही बाब उघड आहे. सबब, जनसामान्यांविषयीच्या अस्सल जिव्हाळ्याने ओथंबलेल्या व त्यांच्या पुनरुत्थानासाठी आत्मीयतापूर्ण विधायक दृष्टिकोन धारण करणाऱ्या सावित्रीबाईंच्या भावकाव्यात्मक लेखनाचे मूल्यमापन व्यापक अशा जनसाहित्य मूल्यनिकषांच्या[६] आधारे सिद्ध करणे हेच न्यायसंगत ठरेल.

साहित्य हे जनांसाठी लिहिले जाते; जनतत्त्वाशी (म्हणजे धर्म, पंथ, पक्ष, वर्ण, वर्ग, जात, लिंग आदि उपाधींपलीकडल्या निखळ 'माणसा'शी) लेखकाचा चाललेला विधायक हृदयसंवाद म्हणजेच साहित्य असून जनसंस्कृतीचे संवर्धन हे त्याचे ध्येय असते,- अशी जनसाहित्य विचाराची मान्यता असून 'जनसाहित्य म्हणजे जननिष्ठ जाणिवेने जीवनाचा घेतलेला कलात्मक वेध' -होय. जनसाहित्य ही संज्ञा मूल्यात्मक आहे. जनसाहित्य समीक्षा-पद्धतीत कोणत्याही साहित्यकृतीचा विचार (१) निर्मिती (२) अस्तित्व आणि (३) आस्वाद या तिन्ही अंगांनी करावा लागतो. निर्मात्याच्या जननिष्ठेची प्रत, साहित्यकृतीच्या कलात्मकतेची प्रत व आस्वादकावरील संस्काराची प्रत- तपासून व जनसंस्कृतीच्या संवर्धनात त्याचे

महत्त्व जोखूनच 'जनसाहित्य'-म्हणून एखाद्या साहित्यकृतीचा दर्जा ठरविता येतो.

वरील मान्यतांच्या जनसाहित्य दृष्टीतून सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले'मधील स्फुट कवितांच्या, तसेच 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दीर्घ रचनेच्या मूल्यमापनाचा प्रयत्न यापुढील विवेचनात करण्याचे योजिले आहे.

**काव्यफुले**

सावित्रीबाईंच्या या काव्यसंग्रहात संकलित केलेल्या ४१ रचनांपैकी आठ-दहा रचना या समकालीन परंपरामान्य विषयांना धरूनच केलेल्या दिसतात. उदाहरणार्थ, 'प्रास्ताविका' व 'अर्पणिका' या रचना ग्रंथप्रकाशनाची औपचारिक रीत म्हणून; 'शिवप्रार्थना', 'शिवस्तोत्र', 'ईशस्तवन' या रचना कार्यारंभीचे नमन म्हणून; 'छत्रपती शिवाजी', 'राणी छत्रपती ताराबाई' या रचना इतिहासप्रसिद्ध विभूतींचे पुण्यस्मरण म्हणून; तर 'स्वागतपर पद्य', 'सामुदायिक संवादपद्य' या रचना अध्यापनाची अगर विशेष आयोजनाची समयोचित निकड म्हणून तशा परंपरामान्यच म्हणाव्या लागतील. अर्थात् यांच्यापैकीही 'अर्पणिका', 'ईशस्तवन', 'राणी छत्रपती ताराबाई' व 'सामुदायिक संवादपद्य' यांच्या विषयांमध्ये नवा चिंतनगर्भ आशय भरण्याची सावित्रीबाईंची प्रवृत्ती जाणवल्याशिवाय राहात नाही. सबब, समकालीन काव्यपरंपरेचा विकास साधण्याचे श्रेयही सावित्रीबाईंना देणे भाग पडते.

'अर्पणिका' ही वसंततिलका वृत्तातील चार ओळींची रचना सुजनांना आवाहन करीत असतानाच कृतज्ञतेने भारावलेली कवयित्रीची भाववृत्ती आविष्कृत करीत असून, या भाववृत्तीतून तिला स्वाभाविक व रमणीय असा बाज प्राप्त झाला आहे. कृतज्ञताभावाबरोबरच समर्पणभाव व कृतार्थभाव यांच्या संयमित संयोगाने ही भावकाव्यात्म रचना आत्माविष्कारी व हृदयस्पर्शी उतरली आहे. 'ईशस्तवन' मध्ये दैन्यासुराचा संहार करण्यासाठी शंकराची करुणा भाकताना ज्ञान व विद्येची मागणीही केली आहे. ह्यातील स्तवन-प्रार्थना-याचना हे घटक भावनिक - मानसिक अशा भक्तिसूत्राद्वारे एकजीव झाले असून त्यांचा परस्परमेळ आल्हाददायक आहे. जगातले दैन्य व अज्ञान निवारणाची आकांक्षा धरणारे हे चिंतन जनसंस्कृती-संदर्भात मौल्यवान आहे. 'राणी छत्रपती ताराबाई' या रचनेद्वारे स्त्रीसामर्थ्यपूजकाच्या भूमिकेतून सावित्रीबाईंनी ताराबाईंचा गुणगौरव केला आहे. स्त्रीची अस्मिता चेतवण्यामागची प्रखर जाणीव ही या रचनेतील नवी, अभूतपूर्व बाब म्हणता येईल. 'सामुदायिक संवादपद्य' ही नाट्यसंवाद शैलीतील कृतिपर रचना बालिकांच्या मनात ज्ञानार्जनाची महती व स्त्रीस्वातंत्र्याची दीप्ती उजळणारी असून यातील चिंतन हे जनसामान्यांच्या जीवनशैलीशी निगडीत आहे.

समाजपरिवर्तनासाठी एकमात्र उपाय शिक्षण हाच असून त्याद्वारे क्रांतीची चाहूल मनामनात जागी करणे हे या कृतिपर पद्याचे प्रयोजन होय. साहजिकच, बालमने घडवू पाहाणाऱ्या सावित्रीबाईंच्या सर्जनशील प्रज्ञेचा हा विलास असून तो जनसंस्कृतीच्या समृद्धीशी मुळातच जुळलेला आहे.

अशाप्रकारे, परंपरामान्य विषयांतही नवा जीवननिष्ठ आशय ओतण्याची सावित्रीबाईंची असोशी ही स्पृहणीय खरीच; परंतु सावित्रीबाईंच्या मुक्त (तरीही प्रतिबद्ध) प्रतिभेचे खरे दर्शन घडते, ते समकालीन एतद्देशीय काव्यपरंपरेपासून हटून, काव्यरचनेसाठी सर्वस्वी नवे विषय निवडण्यातून तथा आत्मनिष्ठेच्या प्रकाशात त्यांना आत्मविश्वासपूर्वक हाताळण्यातून! अशा अभिनव रचनांमधून सावित्रीबाईंची स्वंतत्र प्रेरणा, मौलिक प्रज्ञा व उत्स्फूर्त क्रांतिकारिता प्रतीत होत असून या रचनांचे त्यांच्या विषयानुरोधाने वर्गीकरण करून १) आत्मकथनपर २) निसर्गचिंतनपर ३) समाजचिंतनपर व ४) काव्यचिंतनपर अशा क्रमाने विचार करणे सोयीचे ठरेल.

सावित्रीबाईंच्या आत्मकथनपर रचनांमध्ये 'माझी जन्मभूमी', 'संसाराची वाट', 'आमची आऊ', 'जोतिबांना नमस्कार', 'जोतिबांचा बोध' व 'सावित्री-जोतिबा संवाद' या सहा रचना समाविष्ट असून, त्यांपैकी 'माझी जन्मभूमी' या वर्णनात्मक कवितेतून कवयित्रीच्या जन्मभूमीची स्मृती जागविली जाते. तिचे आवाहन बळीच्या वंशजांना असून एकीकडे राम, पांडव, शिवाजी या पुण्यश्लोकांबद्दल गौरवभाव तर दुसरीकडे मातृकुलाबद्दल गौरवभाव - यांमधून चिंतनाची पातळी आत्ममग्नतेत हरवून गेलेली दिसते. कविता वाचताना तिची दुपेडी बांधणी ही सहज ओघाने आकारास येत असल्याचे जाणवते. मानवतेचा गौरव वाढविणारी वीरवृत्ती व जनसंस्कृतीचा तोल सांभाळणारी भूमिनिष्ठा - या दोहोंचा स्पर्श या कवितेतून वाचकमनाला होतो. 'संसाराची वाट' या अभंगात्मक रचनेतून स्वतःची अस्मिता कसदार व प्रबुद्ध करण्याचे आवाहन स्त्रीजातीला करण्यात आलेले आहे. सहज गद्यप्राय संवादलेखनातून या कवितेची रचना होत गेली असून हिच्या द्वारे, प्रपंचाचा शीण झेलणाऱ्या स्त्रीला आत्मीयताभावाने उपदेश केलेला आहे.

*शांतता आपली । ठेवावी प्रपंची*
*हीच वाट साची । संसारात ।।* (७)

आत्ममग्नता सोडून परसंतोषाची कास धरणाऱ्या व्यापक भाववृत्तीतून, तसेच स्त्रीजातीने शतकानुशतके हाल सोसून प्राप्त केलेल्या समंजस शहाणपणातून यातील काव्यार्थाला व्यापकता व प्रगाढताही लाभली आहे. जीवनसहचराचा

प्रतिसाद नसला तरीही धीराने संसार सफल करावा असा सावित्रीबाईंचा गर्भित उपदेश हा जनसंस्कृतीच्या संदर्भात मूल्यवान ठरतो. 'आमची आऊ' ही आऊंची मानसपूजा बांधणारी कविता निवेदनपर असूनसुद्धा अंतरीच्या सहज कृतार्थताभावाने मूल्यस्पर्शी उतरली आहे. 'जोतिबांना नमस्कार' व 'जोतिबांचा बोध' यांच्यापैकी पहिली रचना म्हणजे अनुष्टुभ छंदातल्या चार ओळींचे नमन असून दुसरी मात्र बऱ्यापैकी निर्दोष अशी अभंगरचना आहे. ही रचना मानव सेवा व सत्यधर्म यांच्या आसाभोवती सतत गतिमान राहिली असून त्याव्यतिरिक्त समर्पणभाव व मानवनिष्ठा ही जनसंस्कृतीला पोषक अशी मूल्ये सुद्धा या रचनेत भिनलेली आहेत. तरीही सखोल वैचारिक प्रगल्भतेच्या अभावी या दोन कविता गुणवत्तेत फारशी उंची गाठू शकल्या नाहीत.

'सावित्री व जोतिबा संवाद' या अभंगात्मक रचनेचे आशयकेंद्र हे अंधार वितळून प्रकाश पसरल्याच्या 'पहाट' जाणिवेशी निगडीत आहे. या रचनेतील कवयित्रीची आत्मनिष्ठा ही व्यक्ती-कुटुंब -समाज या निष्ठांमधून क्रमाने उत्तीर्ण होत जाऊन व्यापक जननिष्ठेत परिणत झालेली दिसून येते. ही कविता संवाद व स्वगत यांच्या सरमिसळीतून व प्रतिमानांच्या जोड्यांमधून फुलत गेली असून, ज्ञानपहाटेच्या आशयबीजाचा तिच्यात सहज असा विकास झालेला दिसतो. विविध स्वरूपाच्या अर्थघटकांचा येथील मेळ व तोल मनोवेधक आहे. प्रेम व आत्मीयता यांनी ओतप्रोत असा भावनार्थ चिंतन-निवेदन-संवाद-स्वगत या विविध रूपांच्या एकात्म रचनेतून साकार झाल्यामुळे मूळ अनुभवाला जिवंतपणा, नाट्यमयता व भावसघनता आलेली आहे.

ज्ञानसंवर्धन व मानवतापोषण यांची सूक्ते गाणाऱ्या या कवितेच्या वाचनाने शिवपार्वतीच्या युग्मप्रतिमेचा स्पर्श वाचकमनाला घडल्याविना राहात नाही. त्यामुळे भारतीय जनसंस्कृतीच्या संवर्धनाचा आयाम या कवितेला सहजगत्या प्राप्त होतो.

*'काळरात्र गेली। अज्ञान पळाले॥*
*सर्वा जागे केले। सूर्याने या॥*

..................

*जाऊ चला गाठू । मानवता केंद्र।*
*मनुष्यत्व इंद्र- पदी जाऊ॥* (८)

हा या कवितेचा अंतिम चरण एका अदम्य आशावादाची नांदीच ठरणारा आहे.

सावित्रीबाईंच्या निसर्गचिंतनपर रचनांमध्ये 'जाईचे फूल', 'जाईची कळी', 'फुलपाखरू व फुलाची कळी,' 'मानव व सृष्टी', 'मातीची ओवी' व 'पिवळा

चाफा'- या सहा कवितांचा समावेश असून या रचनांमधून कवयित्रीची निसर्गजाणीव व निवेदन- चिंतनाची स्वच्छ खळाळती प्रवाहितता हे गुण सहज प्रत्ययास येतात.

'जाईचे फूल' मधून जगरीतीचे यथादर्शन घडविलेले असून त्यातील मानव व निसर्ग यांदरम्यानचा विसंवाद अधोरेखित होतो. अल्पाक्षर-रमणीय अशा या रचनेतून, कवयित्रीची आत्मनिष्ठा ही गंभीर नीतिदृष्टीने भारली गेल्याची प्रतीती येते. त्याचबरोबर निसर्गतत्त्वाशी चाललेली लडिवाळ सलगीदेखील वाचकमनाला आल्हादित करून जाते. आशयबीजाच्या स्वाभाविक विकासातून उमलून आलेली जगरहाटीबद्दलची आर्जवी तक्रार ही सूचकतेने सुंदर बनली असून, शालीनता व निरागसता यांचा आदर ठेवून अंतरीचा ओलावा जपण्याचे या कवितेतील आवाहन हे हृदयंगम आहे. हे आवाहन चिंतनातून सहज उमलून आलेल्या बोधाच्या पातळीवर होत असल्याने प्रभावी व जिवंत झाले आहे. 'जाईची कळी' मध्ये कळीच्या रूपकाद्वारे स्त्रीत्वाची नियतीच जणू उघड करण्यात आली असून, येथील तटस्थ सौदर्यदर्शन व स्त्रीत्वाच्या कडेकंगोऱ्यांनी सजलेले भावोष्ण चिंतन हे कवयित्रीच्या आत्मनिष्ठेचा स्त्रीजाणीवसंदर्भ जाणवून देणारे आहे. मालाकार गुंफणीचा हा रचनाबंध सृष्टीसौंदर्य व मानवी सौंदर्य यांदरम्यानच्या अदृश्य धाग्याची सूचकतेने प्रतीती आणून देणारा आहे. ही कविता 'आशयाचे शब्दरूप' या दृष्टीने कलात्मक उतरली असून, एखाद्या लोककथेतील विरहिणी राजकन्येप्रमाणे येथील मानवी कळी (स्त्री) ची जीवनसाफल्याची आर्त असोशी हृदयंगम उतरली आहे. 'मानव व सृष्टी' या कवितेत मानवी जग आणि सृष्टी यांच्या दरम्यानचे एकात्मतेचे सूत्र साध्या सुंदर पद्धतीने उघड होत असून, त्यातून एक अर्थपूर्ण रचना आकारास आलेली आहे. मानवासकट चराचरात व्यापलेले निसर्गचैतन्य- एवढा प्रदीर्घ आवाका कवयित्रीच्या आत्मनिष्ठेने या काव्यानुभवात धारण केल्याचे प्रतीत होते. एका पावसामुळे सृष्टीला जसा बहर येतो, तसाच शिवारालाही चैतन्याचा पूर येतो. तिकडे सृष्टीचा शृंगार भरास येतो, तर इकडे फळाफुलांच्या समृद्धीने मानवी जीवनाचे पोषण होते. याच तत्त्वानुरोधाने, सद्भावपर्जन्य बरसवीत 'जगा व जगवा' हा दिव्य संदेश एखाद्या साक्षात्कारासारखा झटकन पुढे येतो आणि कवयित्रीची जाणीव तर त्याहीपलीकडे जाऊन पुढील शब्दांत भारतीय तत्त्वदर्शन प्रकट करते-

*'मानव प्राणी निसर्गसृष्टी द्वय- शिक्क्याचे नाणे*
*एक असे ते म्हणुनि सृष्टिला शोभवु मानवलेणे॥'*

हा एक प्रकारचा जीवनसौदर्यवाद होय. याआधीची ओळ-

*'सुंदर सृष्टी, सुंदर मानव, सुंदर जीवन सारे'* [९]

—ही तर सृष्टी व मानव यांच्यामधील एकात्मतेच्या साक्षात्काराचीच निर्मिती आहे! अशा परिस्थितीत, जे विद्वान 'आधुनिक पटगीताच्या धर्तीवरची कृत्रिम रचना' ठरवून तिची कुचेष्टा करू पाहात असतील, त्यांच्या संवेदनाक्षमतेची तर कीवच करावी लागेल. [१०] अशी ही एकात्म अखंडता कवटाळणारी सृजनगर्भ भाववृत्ती व त्या भाववृत्तीतून जीवनाचे दर्शन देणारी विशाल जाणीव- ही जनसंस्कृतीच्या धारणपोषणाच्या संदर्भात मौल्यवान आहे. एका सुंदर, सूचक, मितव्ययी व कलापूर्ण गुंफणीतून अशी मौल्यवान जीवनदृष्टी उजागर करणारी 'सृष्टी व मानव' ही रचना त्यामुळेच एक महत्त्वाची जनकविता ठरते.

'मातीची ओवी' ही भूमिपुत्राला आवाहन करणारी कविता मात्र 'काळी' आणि 'पांढरी' चा महिमा सांगत-सांगत तार्किक विवरणांवर बेतली गेली आहे; व त्यामुळेच ती सामान्य भावनात्मक पातळीवर रेंगाळत राहिली आहे. 'फूलपाखरू आणि फुलाची कळी' ही, कथात्म घाटातून पुरुषी जगाची भ्रमरवृत्ती उघड करणारी व वाचकाला अंतर्मुख करून चिंतनास प्रवृत्त करणारी कविता तिच्या गद्यप्राय निवेदनशैलीमुळे कलात्मकतेत डावी ठरत असली तरी, तिच्या अंतरंगातील प्रखर नैतिक दृष्टी व त्या दृष्टीतून पुरुषी भ्रमरवृत्तीचा केलेला स्पष्ट निषेध- या बाबी जनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी मौल्यवान ठरतात.

सावित्रीबाईंच्या समाजचिंतनपर रचनांमध्ये 'शिकणेसाठी जागे व्हा', 'मनू म्हणे', 'ब्रह्मवंती शेती', 'शूद्रांचे दुखणे', 'इंग्रजी माऊली'(अभंग व पद्य), 'शूद्र शब्दाचा अर्थ', 'बळीचे स्तोत्र', 'शूद्रांचे परावलंबन' आणि 'तयांस मानव म्हणावे का?'- अशा दहा कवितांचा समावेश होत असून बोधपर कवितांमध्ये 'अज्ञान', 'तेच संत', 'श्रेष्ठ धन', 'बाळास उपदेश', 'नवस', 'बोलकी बाहुली', 'गुलाबाचे फूल'- या सात कवितांचा समावेश होतो.

'शिकणेसाठी जागे व्हा' मध्ये अतिशूद्र बंधुसमूहाला मुक्तीकरिता विद्या आत्मसात करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कवितेच्या तळाशी असलेली आत्मनिष्ठा ही आत्मविश्वासपूर्ण जननिष्ठाच होय. रचना सामान्यत्वे कलापूर्ण असून कवितेतील प्रधानभाव क्रांतीप्रवण मानवतेशी निगडीत आहे. 'मनु म्हणे' या कवितेचे आशयकेंद्र मनुस्मृतिप्रणित धूर्तनीतीशी संबंधित असून, यास्थळी कवयित्रीची आत्मनिष्ठा ही कृषिनिष्ठेत विसर्जित झाल्याचे दिसून येते. कवितेचे रचनासूत्र भावनिक-मानसिक स्वरूपाचे असून एकूण रचनाबंध कलात्मक उतरला आहे. चिंतनाची पातळी मानव्यनिष्ठ असून वर्तमान विषमतापूर्ण समाजव्यवस्थेकडून भविष्यातील न्यायपूर्ण समाजव्यवस्थेकडे होणारा येथील

जाणीवप्रवास हा जनसंस्कृती- संदर्भात महत्त्वाचा आहे. 'ब्रह्मवंती शेती' मध्ये कृषिकर्म व विद्याध्ययन यांच्या संयोगातून सुखसमृद्धीची प्राप्ती- हे आशयसूत्र असून कृषिनिष्ठा हीच येथे आत्मनिष्ठेची पातळी होय.

शूद्र हे शेतीब्रह्माची मशागत करून अन्नपरब्रह्म जन्माला घालतात; अहंब्रह्मास्मिवाले मात्र आयते खाऊन वर दारुड्यासारखे मतलबी नीती बरळतात: अशा विरोधलयाच्या मांडणीनंतर कवयित्री शेतीब्रह्माला विद्येची जोड देण्यास सुचविते आणि चमत्कार घडून यावा तसे 'ब्रह्मवन्ती' च्या सेवकाला 'ज्ञानवन्ती' ही सुखसमृद्धी प्रदान करते![११] असा हा चमत्कारच या कवितेच्या रचनाबंधाला जिवंतपणा आणतो. या कवितेतील अर्थगाभा हा (कृषिकर्म) + (विद्याग्रहण) = (सुखसमृद्धी) असा परिवर्तनाचा म्हणजे जीवनसमृद्धीचा मार्गच जनमनावर ठसवून जातो. एक कलात्मक व प्रयोजनवती कविता: एक जनकविता म्हणून या रचनेचा निर्देश करता येईल.

'इंग्रजी माऊली'(पद्य) चे आशयसूत्र 'भटधर्म' विरुद्ध 'इंग्रजी सत्ता' या विरोधाशी निगडीत असून तिचे आवाहन जनसामान्यांना आहे. या गीतातून एक प्रकाशाकांक्षी भाववृत्ती उत्तरोत्तर गडद होत गेली असून, भावगर्भ अर्थाच्या सहजगुंफणीमुळे या रचनेस कलात्मकता आली आहे. जनसंस्कृतीला पोषक अशा गुणविशेषांना या कवितेत उठाव मिळाला आहे. 'बळीचे स्तोत्र' ही कविता बलुत्यांची अस्मिता चेतवण्यासाठी अवतरली असून भावनिक-बौद्धिक चेतकांच्या सीमारेषेवर झालेली तिची बांधणी जिवंत अशी आहे.या कवितेतील भावगर्भ अर्थ हा जनमानसाला आकर्षित करणारा असून चिंतनाचा ओघ सुप्त मनातील प्रतिमा-प्रतीकांनी प्रगाढ होत गेलेला आहे. दास्यमुक्तीच्या प्रेरणास्रोताची आळवणी करून अस्मिताजागृती साधणे व अस्मिताजागृतीतून जनसंस्कृती-संवर्धनाची आकांक्षा पल्लवित करणे-यांमुळे ही कविता मूल्यगर्भ झालेली आहे. 'तयांस मानव म्हणावे का?' ही मानव्यकेंद्री कविताही आशयबीजाच्या स्वाभाविक विस्तारामुळे रचनादृष्ट्या जिवंत वाटते. प्रारंभी पशूंच्या तुलनेत मानवाचे श्रेष्ठत्व गृहीत धरणाऱ्या या कवितेत अखेरीस पशू व मानव यांमधील मूलभूत एकात्मतेचे भानदेखील अबाधित आहे. जाणिवेची कक्षाही व्यापक व सखोल असून चिंतनाची प्रत कडव्यागणिक उंचावत नेलेली आहे; आणि जनसामान्यांच्या संचित शहाणपणाच्या भक्कम आसाभोवती हे चिंतन सतत गतिमान राखले गेले आहे. सुबोध वाच्यार्थप्रधान मांडणीद्वारे मानवाला पशुत्वातून वर उंचावणे व अंती मानव-पशू एकात्मेचा सृष्टचैतन्य पातळीवर उद्घोष करणे: या सर्वांमागे कवयित्रीची व्यापक जाणीव कार्यरत असल्याचे दिसून येते. पशुहून उच्चतर

पातळी गाठण्याचा श्रेयमार्ग दाखविणारी ही कविता जनसंस्कृतीच्या विकासाची जीवनमूल्ये अधोरेखित करणारी मूल्यपूर्ण कविता होय.

सावित्रीबाईंच्या बोधपर रचनांपैकी 'तेच संत' ही कविता तर सखोल विधायक चिंतनाचा प्रगल्भ परिपाकच म्हणता येईल. मानवी श्रेयसाची परिभाषा शब्दबध्द करणारी ही कविता जनआवाहक असून या कवितेद्वारा पूजनीय, वंदनीय, थोर (विभूती) आणि अखेरीस संत-असे चढत्या श्रेणीतील चिंतन-नवनीतच सादर करण्यात आले आहे. यातील आशयबीजाचा विकास भावसूत्रान्वये होत गेला असून, त्यातून अवतरलेली साध्यासरळ एकसरी गुंफणीची ही मालारचना सहजसुघट झाली आहे. निरामय चिंतन, भावगर्भ अर्थाचे संश्लेषण व सहज तरंगत वर येणारे विचार-कण ('मानवाचे नाते ओळखणारे जे, तेचि संत') [१२] यामुळे जनसंस्कृतीला वळण देणारी ही कविता मूल्यवान ठरते.

'बोलकी बाहुली' ही चिंतनपर परंतु इशारावजा असलेली कविता म्हणजे दृष्टान्ताच्या अंगाने विस्तारत जाणारी विवेकशील निष्कर्षप्रधान अशी रचना आहे. या कवितेतील चिंतनाची प्रत व विश्लेषणाची रीत यांचेवर पारंपरिक शहाणपणाचा प्रभाव जाणवत असला तरी 'विवेकाचा आश्रय घेऊन दुरिते टाळा'- असा सहजसुंदर बोध देणारी ही कविता मूल्यदृष्ट्या महत्त्वाची आहे. 'गुलाबाचे फूल' या कवितेमधून विविध प्रतिमायुग्मांच्या माध्यमातून एक बोध वाचकमनावर ठसविण्याचा प्रयास जाणवतो. 'मानव हा त्याच्या अंगभूत गुणांमुळे पशुहून वेगळा आहे.'- ही त्या बोधाची बैठक असून त्याभोवताली गुंफल्या गेलेल्या विविध अर्थघटकांचा मेळ हा विलोभनीय झालेला आहे. मानवाचे हे आगळेपण ठसविताना कवितेतील भावनार्थ क्रमश: अधिकाधिक व्यापक होत गेला असून, चिंतनशैलीच्या मोकळेपणामुळे तो प्रभावशालीही झालेला आहे. त्यामुळे जनसंस्कृति-संदर्भात ही कविता महत्त्वाची ठरते.

काव्य, कवी व काव्यप्रक्रिया यांचेबाबत सावित्रीबाईंचा दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या तीन तरी कविता 'काव्यफुले' या संग्रहात आलेल्या आहेत: (१) 'द्रष्टा कवी' (२) 'पिवळा चाफा' आणि (३) 'खुळे काव्य व खुळा कवी'. यांचेपैकी पहिल्या दोन कवितांमधून हा दृष्टिकोन गंभीरपणे अभिव्यक्त होतो; तर तिसऱ्या कवितेतून त्याकाळी रूढ असलेल्या कल्पनारजंक काव्यकलेचा परिहास केलेला दिसतो.

'द्रष्टा कवी' या कवितेत काव्यप्रतिभा ही शंभू व चण्डी यांचे वरदान असल्याची मान्यता आलेली आहे; तर 'पिवळा चाफा' मध्ये चाफ्याच्या प्रतिमेतून आलेली काव्यचेतक, काव्यमूल्य आणि काव्यसार्थक्य यांची अभिव्यक्ती साधली

गेली आहे. 'खुळे काव्य व खुळा कवी' मध्ये मात्र, कवीविषयीच्या खुळचट अशा प्रस्थापित धारणेचा यथोचित उपहास केलेला दिसतो. निखळ भारतीय जाणिवेच्या या तिन्ही कवितांमधून कवयित्रीची आत्मनिष्ठा ही सहजपणे जननिष्ठेत किंवा निसर्गनिष्ठेत परिणत झाली असल्याचे दिसून येते. 'द्रष्टा कवी' या कवितेमधील भावनार्थांची विशालता ही अबोध मनातून तरंगत आलेल्या प्रतिमांनी तोलून धरली असून त्यातील चिंतनप्रवाहदेखील सखोल व जाणीवसंपन्न झाला आहे. 'आदर्श जिण्या' च्या शोधात कवयित्री एकीकडे द्रष्टेपणाला अद्भुताचा दर्जा देत असतानाच, दुसरीकडे प्रतिसृष्टी निर्मात्याचा आत्मविश्वास आणि त्याच्या तपश्चर्येतून आकारास येणारी दिव्यसृष्टी- यांचाही गौरव करते; इतकेच नव्हे तर ज्ञान, विद्या, रसवत्ता यांचाही गौरव दिव्यसृष्टीचे कारक या नात्याने करते.

*'कवी कल्पी मी 'विश्व' मित्र आहे*
*काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे.* (१३)

'पिवळा चाफा' मधील भावनार्थांची विशालता ही सृष्टसंवेदना ते उच्चतर मानवीमूल्ये- अशा विकासक्रमातून प्रतीत होत असून या विकासक्रमात अबोधमनातील प्रतिमांच्या उपस्थितीमुळे प्रगल्भता व प्रगाढता आलेली आहे. इतरांच्या संतोषाकरिता स्वत:चे संतर्पण करण्यातला पिवळ्या चाफ्याचा आदर्श हा जनसंस्कृति-संवर्धनातील महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल.

*जैसे रतीला मदन खेळवी*
*तैसे कविचे मन चेतवितो॥*
*गूढपणे तो मनात शिरूनी*
*काव्य कराया उन्मुख करतो॥*
*नेत्र नासिका, रसिक मनाला*
*तृप्त करूनी, मरून पडतो॥* (१४)

एकंदरीत, 'द्रष्टा कवी' व पिवळा चाफा' या दोन कविता जनसाहित्याच्या कसोटीवर उत्कृष्ट ठरतात; तशाच प्रबोधन मूल्यदृष्ट्याही सकस ठरतात. पहिलीची रचना क्रमवार व सुसंवादी असून सुरावली एकजिनसी आहे; तर दुसरीची रचना चक्राकार जिन्यासारखी असून ती खोल खोल जाणीवपातळ्या कवेत घेत अखेरीस समतोल साधणारी बांधीव अशी आहे.

'खुळे काव्य व खुळा कवी' ची रचना मात्र नाटकी स्वरूपाची असून स्थूल व भडक प्रतिमा व प्रसंगचित्रे यांच्यातून अधिकाधिक वक्रता प्रतीतीस आणणारी उतरली आहे.

*'कल्पित रचतो कवि काव्य*

*..........*

*क्षणात रडतो। रडत नाचतो। देव आळवितो*

*अघटित रचतो खुळे काव्य*

*...............*

*नजरेसमोर उभी परी*

*प्रेम कवीवर परी करी*

*स्मित हासुनी। गोड बोलुनी। त्यास विनवुनी*

*जवळ घेऊनी चुंबितसे*

*कवीच्या मनी चित्र दिसे'* (१५)

अशाप्रकारे कल्पित व स्वप्नरंजक काव्यप्रणालीचा उपहास करीत असतानाही कवयित्री व्यतिरेकाद्वारे का असेना; पण शेवटी जनप्रबोधनच साधते. वरील तिन्ही कविता विचारात घेता, काव्यनिर्मितीकडे पाहाण्याची सावित्रीबाईंची दृष्टी ही गंभीर, चिंतनशील, जननिष्ठ, वास्तवलक्ष्यी, ध्येयनिष्ठ व आशावादी असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे 'काव्यफुले' मधील सावित्रीबाईंची कविता ही (तिच्यातील संयतशील वृत्तीमुळे) प्रखरतेने तळपून जरी उठत नसली तरी अंतिमत: ती जनप्रवर्तनक्षमच आहे. जनसंस्कृतीचे संरक्षण-संवर्धन हेच तिचे प्रयोजन आहे. केशवसुतांच्या काव्य-निर्मितीस आरंभ होण्याच्या सुमारे तीस वर्षे आधी 'काव्यफुले' प्रसिद्ध झाली; ही एक वस्तुस्थितीच असली तरी अभ्यासकांसमोर ती अगदी अलीकडेच आली, ही देखील दुसरी वस्तुस्थिती आहे. काव्यनिर्मितीची प्रेरणा, काव्याचे लौकिक विषय, काव्यान्तर्गत भाववृत्तीची विशालता, अस्सल आत्मनिष्ठेची सलगता व जाणिवेची बहुविधता या बाबतींत सर्व समकालीन कवी-कवयित्रींहून वेगळी अशी इहवादी जीवननिष्ठ कविता गेल्या शतकाच्या ऐन मध्यात सावित्रीबाईंनी लिहिली असून संकुचित व्यक्तिवादी जाणिवेचे व्यापक मानवी जाणिवेत उन्नयन करणाऱ्या जननिष्ठेच्या परिसस्पर्शाने सावित्रीबाईंची ही कविता मूल्यगर्भ झालेली दिसते. रचनेच्या बाबतीत प्राय: परंपरेला अनुसरणारीच ती असली तरी अभिव्यक्ती मात्र ती साधते समाजक्रांतीच्या आशयाचीच. शिवाय सावित्रीबाईंची ही स्फुट कविता म्हणजे परकीय भाषांमधील 'सोनियाच्या खजिन्या'तील ठसठशीत डागांची अनुकृती नसून, अस्सल जनसंस्कृतीवर पोसलेल्या देशकालविशिष्ट, स्वानुभवाधिष्ठित, समाजक्रांतिपर जाणिवांची ती सहज प्रामाणिक अशी शंभर नंबरी अभिव्यक्ती आहे. परपुष्ट वा परभृत नसून

मौलिक व स्वतंत्र आहे. त्यामुळे खऱ्या आधुनिक मराठी कवितेच्या जनकत्वाचा मान वस्तुत: सावित्रीबाईंना द्यायला हवा. परंतु 'काव्यफुले'ला त्या काळी व्यापक प्रसिद्धी न मिळू शकल्याने या जीवननिष्ठ भावकवितेचा पुढील विकासच खुंटला व नंतरच्या काळात केशवसुती तुतारी संप्रदाय, रविकिरण मंडळ यांद्वारे व्यक्तिकेंद्रित संकुचित मध्यमवर्गीय वळणच मराठी कवितेला लाभत गेले. पुढे मर्ढेकरकाळी तिच्यात नवीनता आली; तर लघुअनियतकालिकांच्या उठावातून तिने गतानुगतिकतेची कात टाकली. खरे आश्चर्य तर हे की, सव्वाशे वर्षांतल्या या सगळ्या वळणावाकणांनंतर 'आजची कविता' ही पुन्हा एकदा उपेक्षित समाजघटकांच्या जीवनानुभवांकडे वळली असून दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके, स्त्रीवादी- अशा विविध अंगांनी फुलत ती व्यापक जीवनजाणिवेकडे ओढली जात असल्याचे दिसून येत आहे.

याचाच अर्थ असा होतो की, आजची कविता ही सावित्रीबाईंच्या जनजीवननिष्ठ प्रेरणेचा मागोवा घेत समूहाचा व समष्टीचाही विकास साधू पाहात आहे. दुसऱ्या शब्दांत, सावित्रीबाईंच्या भावकवितेचा विकास सव्वाशे वर्षांच्या दीर्घमूर्च्छेनंतर आता कुठे साधला जात आहे!

**बावन्नकशी सुबोध रत्नाकर-**

इ. स. १८९२ साली पुस्तकरूपात प्रसिद्ध झालेल्या या बावन्न कडव्यांच्या दीर्घरचनेची सहा ठळक भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे: (१) उपोद्घात (२) सिद्धता (३) पेशवाई (४) आंग्लाई (५) जोतिबा (६) उपसंहार.

जोतिबांपासून सावित्रीबाईंना लाभलेल्या प्रेरणेची शब्दरूप अभिव्यक्ती 'उपोद्घात' मध्ये आहे; तर भारताचा प्राचीन ते मध्ययुगीन अशा प्रदीर्घकाळाचा सामाजिक इतिहास 'सिद्धता'मध्ये सूत्ररूपाने आला आहे. 'पेशवाई' मध्ये मध्ययुगीन इतिहासक्रमाच्या अखेरीस आलेल्या पेशवाईतील सडलीकिडली समाजस्थिती नोंदविली गेली असून 'आंग्लाई' मध्ये इंग्रज - गौरवासोबतच जनसामान्यांची झालेली नीतिहीन अवस्था व या पार्श्वभूमीवर जोतिबांचा उदय हा भाग आला आहे. 'जोतिबा' या भागात स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या उत्थानाकरिता जोतिरावांनी दिलेला संघर्ष चित्रित झाला असून जोतिबा-सावित्री सहजीवनाचेही चित्रण आले आहे; तर अखेरच्या 'उपसंहार' या भागात जोतिगौरव शब्दबद्ध झाला आहे.

'उपोद्घात' मध्ये भुंजगप्रयात वृत्तातील चार कडवी समाविष्ट असून या भागाचे आशयकेंद्र म्हणजे एक असे चरित्रसंकीर्तन दिसते, ज्याचे आवाहन

गुलामीत खितपत पडलेल्या स्त्रीशूद्रांना आहे. कवयित्रीची आत्मनिष्ठा येथे जोतिरावांच्या माध्यमातून शूद्रसेवानिष्ठेत विलीन झाली आहे. रचनेमागील सूत्रदेखील समर्पणाची भाववृत्ती हेच आहे. जोतिबांना प्रणाम-अर्पण-वंदन करताना वाहिलेली शब्दसुमने ही शूद्रांना सदैव प्रेरणादायी ठरावीत अशी येथे अपेक्षा आहे, कारण अर्पण-वंदनाचा विषय त्यांच्या उद्धारकर्त्यांचे गुणसंकीर्तन हाच आहे. असे हे विविध अर्थघटक परस्परांशी औचित्यपूर्ण रीतीने जुळून आले असून त्यामुळे या रचनेतून एक प्रसन्न व प्रगल्भ असा कृतार्थभाव प्रतीत होतो.

या लेखनातील चिंतन हे कृतज्ञता, सश्रद्धता व भक्तिभावना यांनी भारलेले असून त्यामागची विधायक जाणीव ही जोतिबाची मानसपूजा बांधीत असतानाच शूद्रजनांना संबोधून इतिहासाचा ओघ बदलण्याची हाक देऊ इच्छिते. 'सदोदीत हे काव्य आन्हीक व्हावे'- अशी अपेक्षा व्यक्त करतानाच आपण 'गुलामी जनांचा इतिहास' लिहीत असल्याचे सावित्रीबाई स्पष्ट करतात. यातच अशा या जुलुमी इतिहासाचा ओघ बदलण्याची हाक गर्भित आहे.

एकंदरीत, उपोद्घाताचा स्थायीभाव कृतज्ञता आणि जाणीवसंक्रमण यांच्याशी निगडित असून उद्धारकर्त्याबद्दल कृतज्ञ गौरवबुद्धी व पूज्यभाव ही जनसंस्कृतीची अहेव लेणीच या रचनेतून आविष्कृत होत आहेत.

'सिद्धता' या दुसऱ्या भागात भुजंगप्रयातातील बारा कडवी समाविष्ट असून, रानटी, तार्तरांपासून आधुनिक शूद्रशोषकांपर्यंत क्रमाने पुढे आलेल्या घटकांची मांडणी 'जेते विरुद्ध शूद्र' या सूत्रान्वये या भागात झाली आहे.

*स्त्रिया शूद्र सारे गुलामी गुहेत*
*पशूसारखे राहती ते कुपात*
किंवा
*अतीशूद्र झाले स्वधर्मी कुपात्री*
*स्वधर्मी अती यातना शूद्र भोगी* (१६)

असे या भागाचे आवाहन 'जित' अशा शूद्र दासांना आहे व कवयित्रीची आत्मनिष्ठा ही शूद्रकल्याणाच्या आकांक्षेने भारावून 'जननिष्ठे'त विसर्जित झाली आहे.

'सिद्धता' या भागातील विविध घटनाप्रसंग हे इतिहासाच्या भावनिक आकलनाच्या अनुरोधाने अवतरले असून त्यांचा ओघ सुद्धा अत्यंत स्वाभाविक असाच आहे. यातील आशयघटक हे परस्परांशी भावसघनता, स्पष्टता व संतुलितता या अनुबंधांनी जोडले आहेत. भारतीय संस्कृती - संघर्षाबाबतचे कवयित्रीचे आकलनही जोतिरावांच्या चिंतनानुरोधानेच पुढे जात असून सामूहिक

अचेतनातील प्राचीन प्रतिमांनी या भागातील मांडणीला प्रत्ययकारिता आणून दिली आहे.

स्त्रीशूद्रदास्य नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचा परिवर्तनमार्गच यातून सूचित होत आहे. मानवाचे अमानवीकरण करणाऱ्या हिंदू उच्चवर्णीयांच्या अमानुष संस्कृतीविरुद्ध संघर्ष उभा करण्याची या रचनेमागील भूमिका ही जनसंस्कृतीच्या विकासासाठी महत्त्वाची असून त्यामुळे या लेखनाला उच्च जनसाहित्य-मूल्य प्राप्त होते.

'पेशवाई' या तिसऱ्या भागातून ठळकपणे पुढे येते ती समकालीन अभद्र वास्तवता:-

*'स्वपत्नीस धाडी निलाजी पती ग*
*छळे ब्राह्मणाला अशी श्रीणशाही*
*मुखा बोलली ही जळो पेशवाई ......*
*छळी स्त्रीस शूद्रा बहू पेशवाई'* (१७)

स्त्रीशूद्रांना आवाहन करताना कवयित्रीच्या आत्मनिष्ठेचे अवतरण सहजच स्त्री-शूद्र कल्याणनिष्ठेत झालेले दिसते. या संपूर्ण रचनेमध्ये चिंतनाचा ओघ व निवेदनाचा ओघ हे एकरूप झाले असून घटनांमागील सूत्र हे कालानुसारी झालेले आहे. जनसामान्यांच्या आशाआकांक्षा व कष्टमय जीवन यांच्या बाबतीत तटस्थ 'साक्षी' वृत्ती धारण करून त्यांच्या जीवनक्रमावर विदारक प्रकाश टाकणारे हे चिंतन क्रमाक्रमाने प्रभावी होते गेले असल्याचे जाणवते. याच्या मुळाशी अर्थात तीव्रप्रखर व अभिप्रायगर्भ प्रतिमांची योजना आहे. तसेच जनसामान्यांच्या सामूहिक शहाणपणाच्या प्रभावक्षेत्रात व नव्या न्यायमूल्यांच्या प्रकाशात कवयित्रीने या स्थळी नोंदविलेला गुलामी वृत्तीचा निषेध हा जनसंस्कृती संवर्धनास उठाव देणाराच आहे. एकंदरीत पाहाता, रचनादृष्ट्या फार आकर्षक नसला तरी, 'पेशवाई' हा भाग मूल्यदृष्ट्या सकस आहे.

'आंग्लाई' या चौथ्या भागात एकूण अकरा कडवी असून, पेशवाईच्या ऱ्हासानंतर सुस्थिर झालेल्या इंग्रजी राज्यातील ख्रिस्ती जीवनमूल्यांचा गौरव या भागात करण्यात आला आहे. तसेच जोतिबांच्या संभवाची पूर्वपीठिकासुद्धा (पुढील शब्दांत) देण्यात आली आहे-

*मनुष्ये शिकाया असे पात्र प्राणी*
*वदे आंग्लशाही अभिजात वाणी .....*
*अडाण्यास देती शिकाया सुसंधी*
*दरोडे, खुनी, चौर्य गुन्ह्यास बंदी ..........*
*लळा लावुनी शिकविती शूद्र बाळां॥* (१८)

या भागातील आवाहन स्त्रीशूद्रांसकट जनसामान्यांना असून, कवयित्रीची आत्मनिष्ठा ही इथे स्त्रीशूद्रगौरवभावात अवतरलेली दिसते. या भागाची रचना जुळ्या पानांमधून उगवत्या कोंबासारखी असून एकीकडे इंग्रजी सत्ता, तर दुसरीकडे ज्ञानवंचित प्रजा व यांच्या मध्यात जोतिबांचा उदय-अशी ही गुंफण तिन्ही अर्थघटकांमध्ये समतोल साधणारी आहे. आशयबीजाचा विकास स्वाभाविक रीत्याच होत आलेला असून विस्तार हा निवेदनाच्या ओढीने गतिमान झालेला जाणवतो. या भागातील विविध अर्थघटकांची परस्परगुंफण सहज भावसघन असून तिसाव्या कडव्यातील दृष्टान्ताद्वारे उमलून आलेली नाट्यात्मता ही त्यात भरच घालून जाते:

*म्हणे बांब शेती पहा या विहीरी*
*पहा पीक माझे कशी छान ज्वारी*
*मला गौरकान्ता तशी गोड पुत्री*
*असा दंभ ज्याला नसे तो सुपात्री* (१९)

स्त्रीशूद्रादि सामान्यजनांच्या आकांक्षांना उद्‌गार देणारी विशालता हा या भागातील निवेदनाचा महनीय विशेष असून, आंग्लकालीन जनतेच्या श्रेयशून्य पशुवृत्तीवरील यास्थळीचे चिंतन डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे उतरले आहे. या भागातील जनस्थितीचे आकलनही प्रतिमांच्या बांधणीतून अवतरले असून चिंतनाचा ओघ हा सत्त्वहीन माणसापासून सुरू होऊन स्वत्वसंपन्न महामानवाच्या ओढीने गतिमान झालेला आहे. मानवता मूल्याच्या ओढीतून शब्दबद्ध झालेले हे चिंतन जनसंस्कृती-संवर्धनाच्या संदर्भात विधायक तसेच आश्वासक असे उतरले आहे. त्यामुळेच हा भाग जनसाहित्यदृष्ट्या मौल्यवान ठरतो.

'जोतिबा' हा 'सुबोध रत्नाकरा'चा पाचवा भाग चौदा कडव्यांमध्ये सामावलेला असून, स्त्रीशूद्रदलितांच्या उत्थानाचे स्वप्न साकार करणाऱ्या जोतिबांचे कार्यरूप चरित्र यात समाविष्ट आहे. विपरित परिस्थितीला पुरून उरणारे जोतिबांचे नायकत्व हा यातील मनोवेधक विशेष म्हणावा लागेल. पुढील शब्दांमध्ये आलेला जोतिगौरव पाहावा-

*तुकाराम जैसा तसा संत जोती*
*सुधा ज्ञान देई जना रीतिभाती।*
*पुढारी क्रि.याशील द्रष्टा प्रसिद्धी*
*वदे जोति रूढी असे ती असिद्धी।।*

किंवा

*सती धन्य माता यती धन्य पिता*
*तया वंदिते आदरे जोतिकान्ता।।* (२०)

अशा सहजसाध्या, भावसंपन्न मांडणीमुळे (अन्यथा घटना- तपशीलांनी रूक्ष बनू पाहाणारा) हा भाग चित्ताकर्षक झालेला आहे.

या भागाचे आवाहन शूद्रजनांना असून कवयित्रीची आत्मनिष्ठा ही यात सत्यशोधक मानवनिष्ठा बनून राहिलेली आहे. कालौघाने चरित्र तपशीलाच्या खुणा जागवीत असतानाच आंतरिक स्निग्ध भावसामर्थ्यासह त्यातल्या मूल्यदर्शी भागावर दृष्टी खिळवून ठेवण्याचे कसब यात साधले आहे. इथला आशयबीजाचा विकास हा अत्यंत स्वाभाविकपणे परंतु मूल्यभावानुरोधाने होत गेला असून जोतिबाला तो 'संत जोती' या मूल्यपूर्ण प्रतिमेत भक्कमपणे प्रस्थापित करीत आहे. अर्थघटकांचा इथला परस्पर मेळ हा जिवंत चित्रदर्शी, व मनोहारी झालेला असून, एकंदरीत पाहाता हा भाग आशयात सकस व रचनेत कलात्मक उतरला आहे.

व्यापक जनसेवेचा व जोतिबाच्या उपक्रमांचा गौरव हा या भागात सर्वदूर पसरलेला असून येथील चिंतनप्रवाह हा त्या दिव्य चरितापुढे नतमस्तक होताना दिसतो व त्याच्या कर्तृत्वाचा एक-एक चिरा प्रक्षाळत पुढे जातो. त्यामुळे येथील चरित्रदर्शन हे एकीकडून पाहाता संकलनात्मक तर दुसरीकडून मूल्यदर्शनात्मक झालेले आहे. परिवर्तनाचा वस्तुपाठ शोभणारे हे जीवनचरित्र दलित-निराधार स्त्रिया, चुकलेल्या तरुणी व अबोध मुलेमुली यांना शिक्षणाचे संस्कार व समतेचा सशक्त उद्घोष- या दिशेने पुढे जाताना सामान्य वाचकाच्या मनात परिवर्तनाची उर्मी जागविणारे उतरले आहे. जनसंस्कृतीचा धीरोदात्त नायक अशा जोतिबाची अंत:स्थ ऊर्जाच जणू या भागात शब्दरूप घेऊन अवतरावी इतके हार्दिक सहसंवेदन लाभल्यामुळे हा भाग जनसाहित्य म्हणून अत्यंत सकस व समृद्ध उतरला आहे.

'उपसंहार' या अखेरच्या भागात केवळ पाच कडव्यांचा समावेश असून या स्थळी कवयित्रीच्या दृष्टीतून जोतिबाच्या जीवनकार्याचे मूल्यदर्शनच साकार झाले आहे. 'कृतिशूर तैसा खरा ज्ञानयोगी'- असा इथला मूल्यनिर्णय आहे. हा मूल्यनिर्णय देतानाच 'सुबोध रत्नाकर' हे संपूर्ण काव्य रचण्यामागची प्रेरणा देखील ग्रथित झालेली आहे:

*मनी कल्पना ज्ञान गोष्टी रचावे*
*जना ग्राह्य होईल ऐसेचि गावे।*
*मनी इच्छुनी काव्य केले स्वभावे*
*तुम्ही गाउनी त्यातले सत्य घ्यावे।।* (२१)

ही ती प्रेरणा होय. निराधार दलित-पीडित व शोषितांना आवाहन करणाऱ्या

सावित्रीबाईंची आत्मनिष्ठा ही थेट जननिष्ठेत रूपान्तरित झाली असल्याची प्रतीतीदेखील यास्थळी येते. या भागातील तीन-पंचमांश हिस्सा हा जोतिबांच्या कार्याच्या मूल्यमापनाचा आहे तर अखेरचा दोन-पंचमांश हिस्सा हा समारोपीय निवेदनाचा आहे. अखेरच्या या भागात लेखनाची प्रेरणा, काव्यरचनेचे प्रयोजन व रसिकाच्या प्रतिसादाची अपेक्षा स्पष्ट उमटली आहे. उपोद्घाताच्या चार कडव्यांतील प्रकटनाशीही यांचा सांधा नीट जुळणाराच आहे:

*जयाचे मुळे मी कविता रचिते*
*जयाचे कृपे ब्रह्म-आनंद चित्ते।*
*जयाने दिली बुद्धि ही सावित्रीला*
*प्रणामा करी मी यती जोतिबाला ॥* (२२)

'उपसंहारा' ची रचना साधी व स्वाभाविक असून त्याच्या अर्थघटकांमधील गतिशील परस्परसंबंध हे त्याला कलात्मक बनवून गेले आहेत. यातील आशयाचा आवाका मानवजातीएवढा विशाल असून, कवयित्रीच्या चिंतनात समर्पणाची आच असली तरी वास्तवाचे प्रकटन मात्र अत्यंत तटस्थपणे झाले असल्याचे स्पष्ट होते. विश्लेषकतेऐवजी दर्शनप्रधानता हे या लेखनाचे वैशिष्ट्य असून पुराणे-कथा-इतिहास आदिंशी निगडीत वेधक प्रतिमा दर्शनामुळे यांचेमधून त्याला सखोलता व प्रगल्भता प्राप्त झालेली आहे. जनसंस्कृतीच्या एका प्रखर व खंद्या पुरस्कर्त्याचे ज्ञानमय तथा क्रियाशील रूप या काव्याद्वारे आदर्शरूप घेत असून, अशा आदर्शांच्या बळावरच जनता स्वतःच्या जीवनउर्जेला क्रियारूप देत योग्य मार्गाने वाटचाल करू शकेल अशी श्रद्धा या रचनेच्या मुळाशी दिसते. अर्थात जनसाहित्य म्हणून हे लेखन मौल्यवान ठरते.

साकल्याने 'सुबोध रत्नाकराची' रचना डोळ्यापुढे ठेवता असे जाणवते की, उपोद्घात व उपसंहार यांच्या दरम्यानच्या सहजसंवादी बांधणीतून साकारलेली ही रचना एखाद्या चक्राकार उद्यानासारखी आहे. तिची सहा भागांची वेगवेगळी सहा आशयकेंद्रे असूनही हे सहा भाग आंतरिक बंधांनी परस्परांशी मोठ्या आत्मीयतेने जुळलेले आहेत. या सर्वांच्या केंद्रस्थानी (स्मृतिरूपात) विराजमान असलेल्या एका युगनायकाच्या चरित्रसंकीर्तनातून कारंजांप्रमाणे युगजाणिवांचे व युगमूल्यांचे स्रोत उसळून केंद्राकडून परिघाकडे वाहात आहेत. वर्ण्यविषयाशी असलेल्या अव्यभिचारी निष्ठेमुळे व कवयित्रीच्या सहज-स्वाभाविक आत्मीयतेमुळे यात ओघसंपन्न अशी कलात्मकता अवतरली आहे हे स्पष्ट आहे. 'सदोदीत हे काव्य आन्हीक व्हावे' (२३) अशी अपेक्षा जनसामान्यांकडून बाळगणाऱ्या कवयित्रीच्या अंतरंगातील स्त्री-शूद्र-पददलितांबद्दलचे व त्यांच्या उद्धार-

कर्त्याबद्दलचे सारे उत्कट-सुंदर कोमल भाव या रचनाबंधात आत्मीयतेने मिसळून जाऊन मानवी मूल्यभावात विसर्जित झाले आहेत. ही एकंदर रचना त्यामुळे सुबक, सुंदर व मूल्यपूर्ण उतरली आहे.

..'सुबोध रत्नाकर' मागील प्रेरणा ही बावन्नकशी युगउद्धाराची आहे यात मुळीच संशय नाही. पती जोतिबांच्या निधनानंतर गतायुष्याचे सिंहावलोकन करताना सावित्रीबाईंना जोतिबा-सावित्री युग्माच्या भावजीवनदर्शनाच्या अगर ममताग्रस्त व्यक्तिगौरवाच्या प्रेरणेने झपाटलेले नाही; तर त्यांना झपाटले ते युगजाणीव आविष्कृत करण्याच्या प्रेरणेने! आणि ही बाबच बोलकी आहे. जोतिबा हे युगनायक असल्यामुळे त्यांचे कार्यरूप चरित्र व एकंदर सामाजिक दृष्टिकोन यांनी या दीर्घरचनेचा महत्त्वाचा भाग व्यापला हे खरे असले तरी वस्तुत: बावन्नपैकी अठरा कडवीच जोतिबाचरिताशी निगडीत अशी आहेत. निवेदनाचा एकूण रोख व आवाकाच असा काही आहे की, युगायुगांपासून भारतभूमीवर चालत आलेल्या जेता-जित संघर्षाचे व त्यातून जन्मलेल्या अमानवी शूद्रत्वाचे प्रमेय; आणि त्या प्रमेयाच्या दाहक पार्श्वभूमीवर जोतिबांनी दिलेला मानवमुक्तीचा अभूतपूर्व लढा हेच ..'सुबोध रत्नाकर' मधून सावित्रीबाईंना अपेक्षित असलेले दर्शन असल्याची खात्री होते. पती जोतिबाच्या शिकवणुकीने, विचारसहभागाने, प्रत्यक्ष कार्याने व एकंदरच जीवनसंघर्षाने सावित्रीबाईंचे व्यक्तित्व अंतर्बाह्य वेढलेले असले तरी स्वत: सावित्रीबाई हेच युगजाणिवेच्या आचेने चैतन्यमय बनलेले एका निर्भ्रांत स्त्रीचे जनसमर्पित व्यक्तित्व होते; प्राप्तकाळाच्या ऐरणीवर विपरितांचे आघात झेलूने शंभर नंबरी जननिष्ठेने तळपून उठलेले ते समर्थ स्त्रीत्व होते; ही बाब ...'सुबोध रत्नाकर'च्या एकंदर आशय-आकृतीमधून स्पष्ट होते. जनसामान्यांना थेट आवाहन करणारी साध्यासरळ शब्दार्थांची ही मांडणीसुद्धा अंतरीच्या जननिष्ठेमुळे 'जनसाहित्य' ठरते.

सावित्रीबाईच्या साहित्यनिर्मितीचा-अर्थात 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दोहोंचा- एकत्रित विचार केल्यास त्यांच्या काव्यकळे संबंधात काही ठळक वैशिष्ट्ये हाती लागतात. जनकल्याणाच्या तीव्र भावनेने थरारणारे आशयबीज, भारतीय सामूहिक नेणिवेच्या अनुरोधाने होत गेलेले त्या बीजाचे सहज विकसन आणि या विकसनाला उठाव देणारी जनजीवनव्यापी आत्मनिष्ठा ही ती वैशिष्ट्ये होत. या वैशिष्ट्यांचे दर्शन जनसाहित्य-मूल्यनिकषांच्या (२४) अनुरोधाने घडविण्याचा नम्र प्रयत्न प्रस्तुत लेखाद्वारे करण्यात आला आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाईंची साहित्यनिर्मिती म्हणजे मराठी सारस्वताचे एक सहजसुंदर लेणेच होय, हे यावरून स्पष्ट व्हावे.

## संदर्भ सूची

१) 'साहित्यातील तोतयेगिरी' - डॉ. स. गं. मालशे, 'तारतम्य' आ. पहिली १९८७ परचुरे प्रका. पृ. ४७-६२.

२) 'सावित्रीबाईची जोतिबास पत्रे', सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, संपा. डॉ. मा. गो. माळी, म. रा. सा. सं. मंडळ प्रका. आ. पहिली, १९८८, पृ. ७४

३) 'शिवमहिम्न स्तोत्र' (भाषांतर- सावित्री जोतिबा फुले) 'अक्षरवैदर्भी' जुलै ९६, संपा. डॉ. सुभाष सावरकर, ज. सा. साधना अमरावती, पृ. ३.

४) 'महात्मा फुले गौरवग्रंथ', सं. डॉ. मा. गो. माळी व इतर, म. रा. सा. सं. मंडळ प्रका. जुलै ८२, पृ. ६०८-७०६

५) 'साहित्यातील तोतयेगिरी'- उ. नि. पृ. ४७-६२

६) 'जनसाहित्य:समीक्षाविचार'- डॉ. सुभाष सावरकर, आमची श्रीवाणी (भारतीय साहित्यशास्त्र आणि समीक्षा विशेषांक, फेब्रु९७ संपा. सदानंद मोरे, का. स. वाणी प्रगत मराठी अध्ययन संस्था धुळे, पृ.

७) 'संसाराची वाट'- 'काव्यफुले', सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय (उ. नि.) पृ. ८

८) 'सावित्री व जोतिबा संवाद'- 'काव्यफुले' उ.नि. पृ. ३४

९) 'मानव व सृष्टी'- 'काव्यफुले' सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय (उ. नि. पृ. १७)

१०) 'साहित्यातील तोतयेगिरी'- डॉ. स. गं. मालशे 'तारतम्य'(उ. नि. पृ.६१)

११) 'ब्रह्मवंती शेती'- 'काव्यफुले' उ. नि. पृ. २०

१२) 'तेच संत'- 'काव्यफुले' उ. नि. पृ. ८

१३) 'द्रष्टा कवी'- 'काव्यफुले' उ. नि. पृ. १८

१४) 'पिवळा चाफा'-'काव्यफुले' उ. नि. पृ. १२.

१५) 'खुळे काव्य व खुळा कवी'- 'काव्यफुले' उ. नि. पृ. १८,१९

१६) 'सिद्धता'- 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर', सावित्रीबाई फुले 'समग्र वाङमय' उ. नि. पृ. ८३

१७) 'पेशवाई'- उ. नि. पृ.८४

१८) 'आंग्लाई'- उ. नि. पृ. ८५'

१९) 'आंग्लाई'- उ. नि. पृ. ८६

२०) 'जोतिबा'- उ. नि. पृ. ८८

२१) 'उपसंहार'- उ. नि. पृ. ८९
२२) 'उपोद्घात'- उ. नि. पृ. ८१
२३) 'उपोद्घात'- उ. नि. पृ. ८१
२४) 'जनसाहित्य' डॉ. सुभाष सावरकर, 'अक्षरवैदर्भी' ऑनोडि ९६, संपा. डॉ. सुभाष सावरकर, जनसाहित्य साधना अम. पृ. ९

*

# अशी जगली सावित्रीबाई

नलिनी लढके, अमरावती

जन्माला आलेल्या सर्व व्यक्ती जगतात. जीवनात बालपण, यौवन, वृद्धत्व या नैसर्गिक प्रक्रियेत प्राप्त परिस्थितीत जगतात आणि एक दिवस संपतात. काही व्यक्ति मात्र अशा नियतीच्या रहाटगाड्यांत फिरतानाही आपले जीवन जाळून समाज जीवनात प्रकाश देतात. ठरविलेल्या उद्दिष्टानुसार अडचणींची तमा न बाळगता मार्ग चालतात व म्हणून त्या संस्मरणीय ठरतात. त्यांच्या जीवनकाळात त्यांचे विचार समाजाला दिशा दाखवितात. त्याबद्दल आपण त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करतो. त्यात कृतज्ञतेसोबतच व्यक्तिपूजेचा भावसुद्धा असू शकतो. व्यक्तिचे जीवन मात्र यापेक्षाही काही वेगळे असते. ते संस्मरणीय तर असतेच, तसेच ते अनुकरणीयही असते. कारण भूतकाळातील त्या जीवनाचे चिंतन वर्तमान काळातही उपयुक्त ठरते. वर्तमान सामाजिक परिपूर्ण आशय त्यात जाणवतो. तो सामाजिक आशय आजही बदललेल्या जीवननिष्ठांना सुद्धा कल्याणकारी व मार्गदर्शक ठरू शकतो. अशा संस्मरणीय, अनुकरणीय आणि मार्गदर्शक तत्त्वांचा, विचारांचा सावित्रीच्या जीवनातून शोध घेण्याचा, हा अल्पसा प्रयत्न.

क्रांतिज्योती सावित्री आई-वडिलांच्या कुटुंबात सर्व सामान्य व्यक्तीप्रमाणेच जन्मली. एखाद्याच्या आशीर्वादाचे फळ असल्यामुळे तिला असामान्य कार्याकरिता बळ मिळाले; असे समजण्याचे कारण नाही. त्यामुळे तिच्या जन्माच्या किंवा कार्याच्या मागे चमत्काराचे वलय लावण्याची गरज नाही. ग्रामीण भागातील चार दोन मुलींसारखे सावित्रीचे बालपण गेले. ओचे खोचून चिंचेच्या झाडाला दगड मारून चिंचा पाडून खाणे या सारखे बालसुलभ कृतींचे जीवनही तिने अनुभवले. त्यावेळेच्या समाजधारणेनुसार बालवयातच तिचे लग्न झाले. लग्नाच्या वेळी सावित्रीचे वय नऊ वर्षाचे असल्याचा उल्लेख आहे. सासरी आल्यावर घरात असलेल्या पूर्वापार चालीरीती, परंपरेनुसार कुळाचार वगैरेही तिला पार पाडावा लागला असेल, जोतिबाने सावित्रीच्या ठिकाणी ज्ञानज्योत पेटवेपर्यंत त्यांना अवतीभवतीच्या समाजात रूढ झालेले जीवनच स्वीकारणे अनिवार्य असणार. जोतिबांनी सावित्रीला शिकविले. सावित्रीच्या ठिकाणी ज्ञानज्योत पेटली आणि एके काळची ही सामान्य गृहिणी पुढे क्रांतीयुगाचा आरंभ

करून चिरंतन झाली.

व्यक्ती-विकासाकरिता बालवयात संस्कार होण्याची गरज आपण सर्वच मान्य करतो. सावित्रीने यापेक्षा एक वेगळा विचार सिद्ध करून दाखविला. एखाद्या व्यक्तीचे बालपण बाळबोध वळणाच्या कुटुंबात गेले तर त्या व्यक्तीला क्रांतिकारी विचारांचे बाळकडू मिळू शकत नाही. तरीही जीवनात योग्य मार्गदर्शन व प्रगतीची संधी मिळाली तर अशी व्यक्ती ही स्वत:चा विकास करू शकते. इतरांना माणूस म्हणून जगण्यासाठी मार्गदर्शन व बळ देते. मानवी कल्याणाकरिता स्वत: काटेकुटे तुडवून पायवाट तयार करू शकते. व्यक्तींच्या सुप्त शक्तीचा विकास करण्याकरिता संधी मिळावी. योग्य मार्गदर्शन मिळावे. व्यक्तीचा तो जन्मसिद्ध मानवी हक्क आहे. तो हक्क जन्म, लिंग, धर्म अथवा कोणत्याही कारणाने नाकारला जाऊ नये हाच विचार क्रांतिज्योती सावित्रीच्या उदाहरणाने सिद्ध होतो.

सावित्रीचा कार्यकाळ दीडशे वर्षापूर्वीचा. एका शतकापूर्वी तिची जीवनज्योत विझून गेली. त्याकाळात भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुषांच्या कार्यक्षेत्रांबद्दल भिन्नभिन्न कल्पना रूढ. दोघांचे धर्माचरणाचे नियमही भिन्न, अधिकार भिन्न एकूणच स्त्रीचे कोणत्याच क्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व मान्य नव्हते. अशा लोकमत प्रवाहाच्या विरोधात सावित्रीने कार्य केले. तिचे कार्य ज्यांच्या हिताला बाधक होते अशा समाजातील तथाकथित पंडितांचा तिला विरोध होता. ज्यांच्या हिताचे ती कार्य करीत होती, ते अज्ञानामुळे पारंपरिकतेत गुरफटले होते. म्हणून त्यांचाही आधार नव्हता. असा तो कार्याचा दृष्टीने अगदीच प्रतिकूल काळ होता. आज आमच्या सामाजिक धारणा बदलल्या. आम्ही लोकशाही जीवन पद्धतीला अनुरूप जीवन निष्ठा स्वीकारल्या. या परिवर्तन काळातही त्या काळातील सावित्रीच्या कार्यात आजचा सामाजिक आशय व कार्याची दिशा अद्यावत आहे.

**'शिका आणि शिकवा'**

हा संदेश आधुनिक काळातील अभिनव असा समजला जातो. सावित्रीने हा विचार आपल्या प्रत्यक्ष जीवनात आचरला. व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याकरिता शिक्षणाची गरज आहे. हा विचार आजही महत्वाचा वाटतो. जोतिबा समाजाला हा विचार टाहो फोडून सांगत होते. त्याला प्रतिसाद दिला प्रथम सावित्रीने! लग्नानंतर जोतिबांची शिदोरी शेतात नेणारी सावित्री, शिकली. जमिनीची पाटी आणि झाडाच्या डहाळी हाती धरून तिने अंक, अक्षर गिरविण्याचा शुभारंभ केला. जोतिबाचे मार्गदर्शन होते. गृहिणी म्हणून प्रापंचिक, घरकामाच्या जबाबदारीतून सुटका नव्हती. शेतकऱ्याच्या पत्नीचे जीवनही निभवावे लागत

होते. तरी तिने शिक्षणात प्रगती केली. भारतातील प्रौढशिक्षणातील पहिली शिष्या सावित्री ठरली.

सावित्री शिकली ती नोकरी मिळवून सुखी व्हावे म्हणून नव्हे, केवळ जोतिबाची इच्छा म्हणूनही नव्हे; तर शिक्षणाचे महत्त्व मनोमन जाणले म्हणून शिकली. त्याकरिता छळ, निंदा नालस्ती, गुंडांची दहशत, सर्वच तिने सोसले. एवढेच नाही तर सासऱ्यांच्या चार भिंतीचा आसरा सोडून जोतिबांबरोबर घराबाहेर पडून एक प्रकारचे वनवासी जीवनही स्वीकारले. स्वत: तर आदर्श प्रौढ शिष्या ठरलीच. त्याच बरोबर राहत्या घरात प्रौढ भगिनींचे रात्रीचे वर्ग चालवून शिक्षिकाही बनली. सावित्री प्रौढ शिक्षण कल्पनेची गंगोत्री आहे; हे नाकारणे म्हणजे कृतघ्नपणाच ठरेल.

समाजाच्या वाईट स्थितीचे कारण अज्ञान आहे. ते दूर करण्याकरिता शिक्षण हे साधन आहे, ते शिक्षण मुलींना देण्यासाठी, शिक्षकाची उणीव दूर करावी, म्हणून सावित्री शिक्षिका बनली. तो विचार समाजात रुजविण्याकरिता काव्याचे भाषणाचे माध्यमही तिने वापरले. **'विद्येविणा गेले वाया। झाले पशू।** असे सांगून **'स्वस्थ नका बसू। विद्या घेणे'** असे समाजाचे प्रबोधन केले. फक्त उपदेश करून थांबली नाही तर शिकविण्याकरिता विनामूल्य सेवा केली. सावित्री भारतातील पहिली शिक्षिका, पहिली प्रशिक्षित शिक्षिका, पहिली भारतीय मुख्याध्यापिका आणि पहिली प्रौढ शिक्षण मार्गदर्शिका ठरली. प्रौढांना शिक्षण घेण्याकरिता प्रवृत्त करण्यासाठी सावित्रीने रचलेली कवने आजही तितकीच परिणामकारक ठरतात. ती म्हणते, 'अभिमानाने जगण्यासाठी, शिकून घ्या, जा शाळेला।

*मनुष्याचा खरा दागिना, शिक्षण आहे घ्या चला।*
*जा शाळेला, जा शाळेला।*
*न कुरकुरता, न आळसता, शाळेत जाऊ शिकू चला।।*

आज शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकासही कल्पना आपण स्वीकारली. सर्वांगीण विकासात अक्षरज्ञान, अंकज्ञान याशिवाय भावनिक व सामाजिकतेचा विकासही अपेक्षित आहे. शिक्षण आणि नीतीशिक्षण हे एकात्म असावे, असेही आज बोलले जाते. सावित्रीने नेमका या आधुनिक वाटणाऱ्या उद्दिष्टांचा त्या काळात स्पष्ट उल्लेख केला आहे. शिक्षणाच्या अंतिम उद्दिष्टाबद्दल सावित्री म्हणते-

*'शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हटते पहा।'*

समाज प्रबोधन करताना पशुत्व म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या

असामाजिक, अमानवीय प्रवृत्ती, असे सावित्री सांगते. ही प्रवृत्ती घालविण्याकरिता आणि चांगला माणूस बनण्याकरिता शिक्षण पाहिजे, शिक्षणात नीतीशिक्षण असावे या संदर्भात सावित्री म्हणते- 'मुलाबाळांना आपण शिकवू, आपण सुद्धा शिकू।

*'विद्या घेऊन ज्ञान वाढवून, नीती, धर्म ही शिकू।।'*

सावित्री- जोतिबांची शिक्षणाबद्दलची कल्पना म्हणून विद्यानीती आणि मानवताधर्म शिकविण्याचे साक्षरता-माध्यम; इतकी स्पष्ट आहे. शिक्षितांमध्ये स्वावलंबन, परिश्रमाचा आदर, उद्योगीपणा यावा यासाठी सावित्रीने भाषणांतून सांगितले 'आळस, परावलबंन न वाढण्यास उपयुक्त धर्म आहे, विद्यादान! विद्या देणारे व घेणारे या धर्मामुळे माणसे बनतात. विद्या देणारा धैर्यशाली व निर्भय बनतो आणि 'घेणारा सामर्थ्यशाली व शहाणा बनतो' या भाषणात नीतीधर्माचे महत्त्व सांगतानाच गुरू कसा असावा आणि शिष्य कसा बनवा, इकडेही संकेत केलेला आहे. एकाने एकाला शिकवा. हा विचार किती आणि कोणत्या काळी सांगितला आणि राबविला; यावर चिंतन केल्यास सावित्री कशी जगली ते समजू शकते.

सावित्रीने समाज जीवनाचे निरीक्षण केले. त्या अभ्यासातून तिने काही निष्कर्ष काढले. शिक्षण क्षेत्रातील तिचा निष्कर्ष आज मान्य करावा लागतो. तसेच समाज जीवन सुखी, समृद्ध, नीतीमय होण्यातील अडथळे शोधले. आजही राष्ट्रजीवनात एकात्मता निर्माण होण्यात अडथळा आणणाऱ्या अनेक गोष्टी कायम आहेत. त्यात जन्माधिष्ठित जाती-अभिमान, जन्मावरून उच्च-कनिष्ठतेची भावना, धर्माधर्मातील दुरावा, श्रीमंती व गरिबीवर आधारित प्रतिष्ठेची कल्पना अशा अनेक कारणांनी मानवी जीवन सतत दु:खाच्या, अशांततेच्या छायेत वावरत आहे. हे दूर करण्याचे प्रयत्न तिने जाणले. सावित्रीच्या काळात या सर्व कल्पना धर्मसंमत, शिष्टसंमत व समाजमान्य होत्या; तरी लोकमत प्रवाहाच्या विरोधी प्रवाहात ते प्रयत्न सावित्रीने केले. समाजातून या कल्पना बदलल्याशिवाय व्यक्तिस्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकणार नाही. हा विचार आज मान्यता पावला. त्याकरिता प्रयत्न करावे हेही आज मान्य झाले आहे. असे प्रयत्न करणाऱ्याला प्रतिष्ठा प्राप्त होते. परंतु सावित्रीला मात्र या कार्याकरिता दूषणे स्वीकारावी लागली होती. राष्ट्र दुंभगणाऱ्या, मानवामानवात कलह निर्माण करणाऱ्या कल्पना सोडाव्यात हे तत्वत: वैचारिक पातळीवर मान्य केले जाते. परंतु लोकापवादाची भीती, जननिंदा, रूढीचा पगडा असलेली मानसिकता, स्वकियांचा रोष इत्यादि कारणांनी आपले विचार आचरणात आणण्याची कृती मात्र सर्वत्र केली जात नाही. ही वास्तविकता आहे. या सर्वांवर मात करून

विवेकाला पटेल व कल्याणकारी असेल ते भय-चिंता सोडून स्वीकारावे; हे समाज प्रबोधन म्हणजे अनौपचारिक शिक्षण होते. सावित्रीच्या जीवनातील प्रत्यक्ष कृती व घटना याला साक्ष देतात.

जोतिबांनी अस्पृश्यांना घरातला हौद पाणी भरण्याकरिता खुला केला. त्यात सावित्रीने पूर्ण सहकार्य दिले. समाज ज्या निरपराध संततीकडे अनौरस म्हणून तिरस्काराने पाहत असे, अशा मुलाला त्या काळात स्वतःचा पुत्र म्हणून सावित्रीने स्वीकारले. यशवंताच्या विधवा आईत मातृत्वाची लक्षणे दिसली; तेव्हा माहेर आणि सासरच्यांनी 'पापिणी' म्हणून मरणाचा मार्ग तिला दाखविला होता. त्या व्यक्तिला 'मुलगी' म्हणून सावित्रीने स्वीकारले. तिला सरंक्षण दिले. तिचेच जन्मलेले मूल स्वतःच स्वीकारले.

ज्या काळात शिवाशिवीचे प्रस्थ होते. त्या काळात महिलांचा हळदीकुंकवाचा सार्वत्रिक कार्यक्रम सावित्रीने घेतला. कार्यक्रमाच्या नोटिसीमध्ये 'एकाच जाजमावर बसवून सर्व जाती-धर्माच्या भगिनींना हळदीकुंकू दिले जाईल.' असे जाहीरपणे नमूद कले. व कार्यक्रम त्यानुसार घडवून आणला. त्यातून भेदभाव-विरहित, एकात्मतेने, समतेने जीवन जगण्याकरिता सावित्रीने दिलेला कृतिपर पाठ हे अनौपचारिक शिक्षणच होतो. शाब्दिक पांडित्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीने एखादा विचार जनमानसात परिवर्तन करण्यास अधिक प्रभावी ठरतो. 'आचारा' शिवाय विचार वांझोटे ठरतात, हे जर आम्हाला मान्य असेल तरच सावित्री आपल्या जीवनात विचार, उच्चार व आचार यात सुसंगती ठेवून जगली. याचे महत्त्व पटेल.

महिलांमध्ये जागृती करून त्यांचे संघटन बनविण्याची कल्पना प्रथम सावित्रीचीच. समाजात अनेक बंधनांनी महिला समाज बद्ध होता, अज्ञान-भ्रामक कल्पनांचे महिला जीवनात प्रस्थ होते. त्या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीच्यापूर्वी महिला संगठन कोणी केले असेल, हे भारतात तरी संभवत नाही. म्हणून सावित्री भारतातील पहिली संघटिका ठरली. आज मात्र महिलांच्या संघटनांचे महत्त्व समाजाला पटविले जाते. त्यांच्या शक्तीचा समाजजीवन उन्नत होण्यासाठी उपयोग व्हावा म्हणून त्यांच्या जागृतीचे प्रयत्न केला जातो. त्यांनी समाजोपयोगी कृती करून राष्ट्राच्या प्रगतीत सहभाग घ्यावा, ही आज सामाजिक गरज मानली जाते. समाज-दृढतेची ही प्रक्रिया सुद्धा सावित्रीने दीडशे वर्षापूर्वी सुरु केली हे लक्षात घ्यायला हवे. सावित्रीपूर्वी बुद्ध भिक्षुणींचे संघ असल्याचा इतिहास आहे. परंतु त्यांना वैयक्तिक जीवनाचा त्याग करून केवळ, धर्म प्रचारासाठी जीवन व्यतीत करावे लागत असे. सर्व साधारण कुटुंबातील भारतीय स्त्रीने केलेला हा संघटनात्मक

कार्याचा प्रयोग निश्चित अभिनव होता.

त्या संघटनाद्वारे सामाजिक कार्य करवून घेण्याचाही सावित्रीने प्रयत्न केला. त्यांचे बालहत्या प्रतिबंधकगृहाचे कार्य, दुष्काळात अनेक अन्नसत्रांची जबाबदारी पार पाडण्याचे कार्य यांत निश्चितच संघटनांचा उपयोग झाला असेल. त्या कार्यातील संघटनांच्या सहभागातून एक विशिष्ट विचारसरणी प्रगट होते. ती म्हणजे जे काम व्यक्ती एकट्याने करू शकत नाही. ते काम सेवाभावी वृत्तीने तयार झालेली संघटनशक्ती यशस्वीपणे करू शकते. मोलाने एखादे काम योग्य प्रकारे होईलच त्याची खात्री देता येत नाही. स्वयंसेवी संघटना मात्र त्या कार्याकरिता उपयोगी ठरू शकते. आजच्या काळात अशा अनेक कार्यांत सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा केली जाते. त्यादृष्टीने महिला शक्ती जागृत करून त्यांच्या ठिकाणी सेवाभाव जागविणे राष्ट्रहिताचे आहे. हे सावित्रीने प्रत्यक्ष प्रयोग करून सिद्ध केले.

ज्या काळात सावित्रीने मुलींना शिक्षण देण्याचे काम केले, त्याकाळात आमच्या समाजात स्त्री शिक्षण धर्ममान्य व समाजमान्य नव्हते. सवर्ण स्त्रियांनी शिकणे म्हणजेसुद्धा पापाचरण मानले जायचे. अस्पृश्यांचा तर स्पर्शही नको, मग त्यांना शिक्षण देणे म्हणजे तर प्रलय ओढवून घेण्याइतपत कठीण काम. असे समाजमन असलेल्या काळात कार्य करणाऱ्या व्यक्तीचा छळ किती आणि कसा झाला असेल, त्याची आपण आज कल्पना करू शकणार नाही. लोकमत प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने काम करणाऱ्याच्या झालेल्या छळाची साक्ष इतिहासात नमूद केलेली आहे. सावित्री तर भारतीय स्त्री. तिच्या छळाची तीव्रता किती असेल याची थोडीशी कल्पना राजस्थानातील सामाजिक कार्यकर्ती भगिनी भंवरीबाई हिच्या घटनेवरून येऊ शकेल.

सावित्रीबद्दल सहानुभूती असणाऱ्या तिच्या काही मैत्रिणींना तिचा होणारा छळ सोसवत नव्हता. तरी समाजाच्या विरोधात जाऊन उघडपणे तिला आधार देण्याची हिंमतही त्यांना होत नसावी. स्नेहापोटी तिला पुढील सल्ला देण्याचा प्रयत्न मात्र त्यांनी केला. ''जोतिबा पुरूष आहे. त्यांना ते काम करू दे. तू मात्र मुलींच्या व अस्पृश्यांच्या शाळेतील काम बंद करावे.'' या मैत्रिणींना सावित्रीने जे उत्तर दिले, ते समाजकार्य करणाऱ्या भगिनींनी मनोबल देणारे आहे. सावित्री म्हणाली- 'जे लोग माझ्या अंगावर दगड, शेणगोळे, उष्टेखरकटे पाणी टाकतात, ते अज्ञानी आहेत. त्यांना या कार्याचे महत्त्व कळत नाही. त्यांची या अज्ञानापासून मुक्ती व्हावी. त्यांना सत्य कळावे, म्हणून तर मी विद्यादानाचे काम करते. त्यांच्या या अज्ञानमूलक कृतीचा अर्थ मी वेगळा करते. त्यांचे दगड, शेणगोळे,



याय ४८-८

निंदानालस्तीचे शब्द यांचा वर्षाव माझ्यावरील फुलांचा वर्षाव मी मानते. माझ्या कामात ते मला उत्तेजनच देतात, असे मी मानते.'

आजही समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत काम करणाऱ्या स्त्री-कार्यकर्त्यांनी टिंगल, टवाळी, निंदा याचा अनुभव येतो. तेव्हा काही वेळा आपले काम सोडण्याचा विचार निराशेपोटी मनात येतो. अशा वेळी सावित्रीचे शब्द कार्यरत राहण्याचे सामर्थ्य देतात.

आज स्त्री जीवनात अनेक दु:खद व अन्यायकारक समस्या निर्माण होत आहेत. आजच्या जीवनप्रणालीशी त्या विसंगत आहेत म्हणून त्याची धग आता जाणवू लागली आहे. ती कमी करायची असेल, तर ज्या भ्रामक कल्पनांमुळे ही मानसिकता बनली, त्या कल्पनांना छेद द्यावा लागेल. त्या कल्पनांना असा नवा अर्थ देऊन समाजाची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला व समाजापुढे आदर्श उदाहरणे ठेवली सावित्रीने!

स्त्री-जीवनातील एक चिरंतन समस्या म्हणजे पुत्रप्राप्ती न होणे, स्वत:ला संतान व तोही मुलगा झाला नाही तर वंशाचा दिवा विझेल; पितृतर्पण करण्यास अधिकारी पाहिजे, त्याशिवाय स्वर्गात जागा मिळत नाही. या कल्पना निराधार असल्या तरी त्या समाजमनावर पक्के स्थान मिळवून बसल्या आहेत. पत्नीला मूल झाले नाही म्हणून पुरूष दुसरी पत्नी घरात आणतो. यातून पत्नीचा छळ, गृहकलह व परित्यक्ताचा प्रश्न निर्माण होतो. ही समस्या आता वैयक्तिक अथवा एका कुटुंबाची राहिली नाही, तर समाजापुढे आणि शासनापुढे आव्हान देऊन उभी राहिली आहे. खुद स्त्रियांपुढेसुद्धा पुत्रप्राप्तीच्या अभावी आपले भविष्य भेसूर स्वरूपात दिसू लागते आणि मग त्या देवाला नवस, बुवाची भक्ती, मंत्रतंत्राचे उपचार यात गुरफटल्या जातात. ही मानसिकता बदलण्याचे प्रयत्न सावित्रीने आपल्या काव्यातून, भाषणांतून आणि प्रत्यक्ष कृतीने केले.

सावित्री या कल्पनांचे खंडन करताना काव्यातून म्हणते-

*'नवस करिती बकरू मारीना। नवस फेडीन, बाळ जन्मी।*
*धोंडे मुले होती, नवसा पावती, लग्न का करिती नरनारी?।।'*

हे विचार मांडण्याची आजही गरज आहे. कारण या कल्पनेमुळे जनसंख्येचा विस्फोट होण्याची स्थिती आली आहे. सावित्रीने तर असे विचार समाजाला सन १८५४ मध्ये आणि १८९२ मध्ये 'अग्निफुले' आणि 'बावनकशी रत्नाकर' हे काव्य संग्रह प्रकाशित करून दिले. हा काव्य रचनेचा काळ केशवसुतांच्या ३० वर्षे आधीचा आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

सावित्रीने स्वत: संततीला जन्म दिला नाही, तरी वात्सल्य या स्वाभाविक

प्रवृत्तीने संवर्धन केले. निपुत्रिक ठेवणाऱ्या निसर्गाला तिने आव्हान देऊन मातृत्व स्वीकारले. भीरू माता आणि दुष्ट पिता, समाजाची राक्षसी मानसिकता यामुळे प्रेमाला मुकलेल्या अनेक बालकांना मातेचे प्रेम दिले, संगोपन करून संस्कारित केले. त्यापैकीच एक यशवंत जगवला, डॉक्टर बनवला; आणि सेवाभावीवृत्ती देऊन संस्कारित केला. या कृत्यामुळे समाजापुढे एक नवीन आदर्श उभा झाला. स्वतःला पुत्र नाही म्हणून देवदेवतांची याचना करण्याची गरज नाही. त्यापेक्षा तुमच्या मातृप्रेमाचा पान्हा, त्यासाठी तहानलेल्या अनाथ जिवांना पाजून त्यांना सुखी करण्यात मातृत्वाला गौरव आहे, हा विचार आपल्या कृतीतून सावित्रीने समाजाला दिला. आज आपण या विचाराचे स्वागत करतो. काही सेवाभावी संस्था यासाठी कार्यही करतात. त्यांना समाजाकडून प्रतिसाद मिळतो. अशा मानवतावादी कार्याबद्दल, गौरवही मिळतो. सावित्रीने 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' जबाबदारी खूप पूर्वीच सांभाळली. ती या कल्याणकारी मानवतावादी कल्पनेची उद्‌गाती होय; हे विसरता येणार नाही.

वंशाचा दिवा आणि कुळाचा वारस या संकल्पनेला तिने आपल्या जीवनात कल्याणकारी मानवतावादी आधुनिक आशय दिला. आपल्यापोटी जन्माला आलेले संतानच आपला उत्तराधिकारी ही पारंपरिक कल्पना सावित्रीने नाकारली. त्या जागी कृतीने नवीन आशय असलेली कल्पना समाजासमोर मांडली.

जोतिबांची जीवनयात्रा संपली. सावित्री व यशवंत यांच्या जीवनावर फार मोठा आघात झाला. अंतिम संस्काराच्या मुद्यावरूनच फुलेंच्या कुळातील लोकांनी वादळ निर्माण केले. 'जोतिबांचा अंत्यसंस्कार करण्याचा अधिकार आम्हालाच आहे. आम्ही त्यांच्या कुळातील आहोत. यशवंत, फुले कुळात जन्मला नाही म्हणून त्याला तो अधिकार नाही.' अशी भूमिका त्यांनी घेतली. सावित्री-जोतिबांनी मात्र आपला वारस यशवंत ठरविला होता. अशा दुःखद प्रसंगीसुद्धा सावित्रीने कणखर भूमिका घेतली. 'जोतिबांच्या विचारांच्या आणि आचारांच्या अगदीच विरोधी असणारे, केवळ जन्मावरून त्यांचे वारस ठरू शकत नाहीत. वैचारिक बांधिलकी आणि त्यांच्या आचरणाचे व्रत घेणाराच त्यांचा वारस ठरू शकेल. या आधारे मी व यशवंत हेच त्यांचे वारस आहोत. आम्हालाच तो हक्क आहे.' ह्या विचारावर दृढ राहून एका हाती अग्नी घातलेले टिटवे आणि दुसऱ्या हातात यशवंताचा हात धरून तिने अंत्यविधी पार पाडला. विवेकाशी आणि सत्यनिष्ठेशी कोणत्याही दबावाखाली येऊन प्रतारणा न करता मनोधैर्य दाखविले. कवनातील 'वाचे जे उच्चारी तैसी क्रिया करी। तीच नरनारी 'पूजनीय' या शब्दांनी तिने ते सार्थ करून दाखवले.

सावित्री शिक्षिका झाली. अज्ञानी बंधुभगिनींना ज्ञानदृष्टी देण्याकरिता! स्वत:च्या भरणपोषणासाठी यशवंताला पुत्र मानले नाही. समाजाच्या अमानुष रूढींमुळे ज्याचा जन्म अपवित्र मानला जावा; समाजाच्या भीतीमुळे जन्मदात्रीने त्याचा जन्मघेण्याचा हक्क नाकारावा, अशा जीवाला त्याचा जन्म घेण्याचा व मानवी हक्क देण्याचे उदाहरण समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न तिने केला. अस्पृश्यता घालविण्याचे प्रयत्न; त्याना शिक्षण देण्याचा उद्योग हे सर्व मानवतेचा दृष्टीकोन ठेवून केले. त्यापासून तिला कोणतीही अपेक्षा नव्हतीच. उलट त्या कार्याबद्दल समाजाकडून छळाचा दाहच त्यांना मिळाला. तिच्या जीवनात तिने जे-जे कार्य केले ते सामाजिक कर्तव्य म्हणूनच! अशा एका नि:स्वार्थ सेवेचा आदर्श ठरली सावित्री! तिचे जीवन सेवेचा उपदेश करण्यास अधिकारी ठरले. क्रांतिज्योती सावित्री म्हणते, **'सेवा परमार्थ, पाळी व्रत सार्थ, होई जे कृतार्थ, तेच वंद्य। 'मानवतेते ओळखती जे, सावित्री वदते, तेची संत।।'**

मानवतेच्या भावनेतूनच प्लेगची लागण झालेल्या रुग्णांची सेवा करीतच सावित्री संपली. अशी सेवाव्रताची समाप्ती तिने स्वत:ची आहुती देऊन केली.

सावित्रीच्या जीवनकार्यातून अनेक नवीन संकेत आजही आपल्याला मिळतात. पुराणातील सावित्रीचा आदर्श आमच्यापुढे आहे. सावित्रीने प्रत्यक्ष यमाला हरवले. त्यापासूनच वर प्राप्त केले. त्या वराने पती जिवंत केला. सासू-सासऱ्यांना दृष्टी यावी म्हणून वर मागितला हा परिमार्जनाचाच भाग आहे. संतती, तीही शंभराच्या संख्येने मागणे, आज तर आदर्श ठरू शकत नाही. यादृष्टीने सावित्रीचा आदर्श अद्ययावत आहे. समाज सुखी व्हावा म्हणून ज्ञानदृष्टी देण्याकरिता मरणप्राय संकटे सोसणे यात सावित्रीने निष्ठांचा क्रम समष्टी पासून व्यक्तीकडे लावलेला आहे. हा तिचा आदर्श आज समाजाने स्वीकारण्याची गरज वाटते.

आज समाजाचे निरीक्षण केले तर व्यक्तीच्या कल्याणाकरिता समष्टीच्या कल्याणाला मूठमाती दिली जाते. अशा परिस्थितीत प्रथम समष्टीच्या कल्याणाचा विचार त्या कल्याणाला बाधक ठरणार नाही, या मर्यादेत व्हावा. प्रथम समष्टीचे हित नंतर व्यक्ती हिताचा विचार व्हावा. एवढेच नव्हे तर समष्टीच्या हितातच व्यक्तीचे हित सामावलेले असते; हा विचार दृढ होणे हाच अनेक असामाजिक कृत्यावर उपाय ठरू शकतो. सावित्रीच्या जीवनातून हा आदर्श मिळतो. या विचाराच्या अगदी उलट विचार सावित्रीने शंभर वर्षापूर्वी सांगितला ती म्हणते,

*'सुंदर सृष्टी, सुंदर मानव, सुंदर जीवन सारे।*
*सद्भावाच्या पर्जन्याने बहरून टाकू वारे।*
*मानवजीवन हे विकसूया । भय 'चिंता सारी सोडूनिया ।*
*'इतरां जगवून स्वतः जगू या'*

या तिच्या संदेशात खूप गाढ अर्थ जाणवतो. अवती भवती वावरणाऱ्या विविध प्रकारांनी पीडित, उपेक्षित जीवांना जगविण्याचा प्रयत्न करा म्हणजे तुम्ही सुखाने जगू शकाल; तरच तुम्हाला जगण्याचा खरा हक्क आहे. हा मानवतावादाकडे नेणारा, खूप आधीच्या काळात निवेदिलेला विचार मोलाचा आहे.

*

# सावित्रीबाई फुले यांची काव्यरचना

डॉ. श्रीराम गुंदेकर

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा व लेखनाचा विचार करताना म. जोतिबा फुले यांच्या संदर्भातच केला जातो. काही बाबतीत तसा विचार करणे अपरिहार्य असले तरी सावित्रीबाई फुले या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्ववान कार्यकर्त्या आणि कृतिशील लेखिका/कवयित्री आहेत, हे ही लक्षात घ्यावे लागते. आधुनिक कवयित्रींच्या परंपरेचा प्रारंभकाळ त्यांच्यापासून मानावा लागतो. या पद्धतीने विचार केल्यामुळे या पती-पत्नीपैकी कोणाचा मोठेपणा काढून घेणे किंवा कोणाला तरी निष्कारण मोठेपणा बहाल करणे, असा प्रयत्न किंवा हेतू नाही. या उभयतांचा मोठेपणा स्वयंसिद्ध आहे. काळानेही त्याना मान्यता दिलेली आहे. कोंबडा झाकून ठेवला म्हणून सूर्योदय थांबत नाही. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनकाळ, तत्कालिन रूढीप्रिय समाज; गुलामगिरीत जगत असलेला संपूर्ण शूद्रातिशूद्र समाज आणि सर्व स्त्रिया- यांच्या स्वातंत्र्याचा, मानवमुक्तीचा विचार करून त्यांच्यासाठीच जीवनदानी पद्धतीने कार्य करणाऱ्या या वैशिष्ट्यपूर्ण स्त्री-व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रस्तुत लेखाचा हेतू आहे. हा प्रयत्न अल्पसा आहे, तो परिपूर्ण नाही, याची नम्र जाणीव प्रस्तुत लेखकाला आहे. सावित्रीबाई फुले यांच्या लेखनाविषयी झालेल्या चर्चेची माहिती प्रस्तुत लेखकाला आहे. परंतु त्या वादात सहभागी होण्याचीही भूमिका येथे नाही. उपलब्ध लेखन सावित्रीबाई फुले यांचे आहे, असे समजूनच हा लेख लिहिला आहे. अस्सलपणाविषयी वाद घालणाऱ्या तज्ञांनी ते जरूर घालावेत. त्यातून सत्यापर्यंत पोहोचावे. सत्यशोधकी परंपरेतील सावित्रीबाईंचे लेखन निष्कारण वादाच्या भोवऱ्यातच अडकून पडू नये. त्यांच्या काव्याचा बावन्नकशीपणा सिद्ध व्हावा. अर्थात जे निके आणि विशुद्ध आहे ते टिकून राहील. त्यातील ओखटे आणि अशुद्ध ते मागे पडेल.

इ. स. १८४० मध्ये विवाह झाल्यानंतर लगेच इ. स. १८४१ मध्ये सावित्रीबाई घरीच म. फुले यांच्याकडून शिक्षण घेण्यास प्रारंभ करतात. स्त्रियांनी शिकणे ही गोष्ट त्या काळात सहज, सरळ, साधी, सोपी नव्हती. तेव्हा पुणे सनातन्यांचे आणि पुराणमताभिमान्यांचे आगर होते. स्त्रीने परक्यांसमोर पतीजवळ जाणे, संभाषण करणे ही गोष्ट निंद्य मानली होती. त्यांनी एकांतात भेटावे, बोलावे अशी रूढी होती. सावित्रीबाई पतीजवळ बसतात, बोलतात एवढेच नव्हे तर

शिक्षण घेतात, हा त्यांचा पहिला गुन्हा होता. शूद्र जातीच्या स्त्रीने शिकणे हा दुसरा गुन्हा होता. शिकून शिक्षिका व्हायचे ठरविले होते, हा तिसरा गुन्हा होता. शिवाय शाळा काढणे, वर्णजातीस्त्रीदास्य व्यवस्थेला विरोध करणे; हा तर महाअपराध होता. एकाच घटनेतून सामाजिक-धार्मिक गुन्ह्यांची मालिका निर्माण होत होती. धर्मशास्त्राप्रमाणे या गुन्ह्यांना प्रायश्चित्तही महाभयंकर होते. पण स्वतःच्या बुद्धीला पटेल तेच करावयाचे, त्यासाठी स्वकियांकडून आणि उच्चवर्णियांकडून जो छळ होईल, त्रास होईल, निंदा होईल, ती सहन करावयाची; हा एका स्त्रीने केलेला निर्धार महत्त्वाचा आहे. हा निर्धारही क्रांतिकारीच म्हटला पाहिजे. या एका प्रयत्नातून हजारो वर्षांपासून शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाचीच नव्हे तर ब्राह्मणांसह सर्वच स्त्रियांच्या शिक्षणाची कोंडी फुटली. धर्माच्या नावाने पुकारलेल्या शिक्षणबंदीला जाहीर नकार दिला. ही घटना युगप्रवर्तक मानली पाहिजे. म. जोतिबा फुले यांच्या प्रेरणेने, प्रोत्साहनाने सावित्रीबाईंनी एवढे धाडस दाखविले असले तरी, त्यांच्यात क्रांतिकारी विद्रोहाची ऊर्मी मुळातच असली पाहिजे. त्याशिवाय त्या एवढे धाडस दाखवू शकल्या नसत्या आणि पुढे आयुष्यभर व्रत म्हणून, वसा म्हणून कर्तव्य करीत राहिल्या नसत्या. अनेक क्रांतिकारकांच्या स्त्रिया पतीच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्याबरोबर संघर्षात उतरू शकलेल्या नाहीत. त्यासाठी अनेकविध स्वरूपाची कारणे असली तरी पतीचे संपूर्ण विचार आणि कार्य त्यांना पेलता आले नाही, हेही एक महत्त्वाचे कारण मानावे लागते. या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंचे स्वतंत्र व्यक्तिमत्व ठसठशीतपणाने लक्षात येते.

म. फुले आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीतही सावित्रीबाई त्यांच्या बरोबरीने सहभागी होत्या. शाळा काढणे (१८४८-१८५३); बालहत्या प्रतिबंधक गृह काढणे (१८५३); शेतकरी व शेतमजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रशाळा सुरू करणे (१८५५); म. फुले यांच्या भाषणांचे पुस्तक प्रसिद्ध करणे (१८५६); अनाथ बालकाश्रम चालविणे (१८६४); दुष्काळग्रस्तांसाठी चालविलेल्या अन्नछत्रात अग्रभागी राहून कार्य करणे (१८७५-७७); दत्तकपुत्र यशवंतराव यांचा आंतरजातीय विवाह घडवून आणणे (१८८९) म. फुले यांच्या निधनानंतर त्यांच्या भाऊबंदांनी वाद उपस्थित केला, तेव्हा धर्मशास्त्राच्या विरोधात जाऊन शिंकाळे/टिटवे धरणे (१८९०); म. फुले यांच्यानंतरही सत्यशोधक समाजाच्या कार्यात अखंड सहभागी होणे (१८९०-१८९७) या सर्व घटनांमधून सावित्रीबाईंच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा अनुभव येतो. या सर्व कार्यात त्या आपल्या पतीबरोबर अनिच्छेने फरफटत जात आहेत, असे कुठेही दिसत नाही.

## आदर्श गृहिणी

सावित्रीबाई फुले यांनी विविध जबाबदाऱ्या स्वतंत्रपणे पार पडल्या. सत्यशोधक समाजाच्या चळवळीत निरंतर सहभाग घेतला. शूद्रातिशूद्रांच्या हिताच्या बाजूने कार्य केले. लोकाभिमुखता विचलित होऊ दिली नाही. त्यांचे सत्यशोधक सहकारी ज्याप्रमाणे धडाडीने, धाडसाने, शौयनि, तत्वनिष्ठेने, अविचलतेने कार्य करीत होते; तसेच सावित्रीबाई पण कार्य करीत होत्या. हे सर्व करीत असताना, घरच्याही जबाबदाऱ्या पार पाडीत होत्या. पती हा जर लोकनेता, क्रांतिकारक, कृतिशूर, परोपकारी, दयाळू, त्यागी, सहिष्णू असेल तर त्याच्या पत्नीची किती ओढाताण व फरपट होते याचा आलेख लक्ष्मीबाई टिळक यांनी त्यांच्या 'स्मृतिचित्रां'त सविस्तरपणे चित्रित केला आहे. अशावेळी पत्नीही कर्तृत्वान, सहनशील, समजूतदार, संयमी, मनमिळावू असावी लागते. सावित्रीबाई तर यापेक्षा गुणाने आणखी जास्त आहेत. या संबंधीच्या काही हृद्य आठवणी त्यांच्या सहवासात राहिलेल्या काही सहकाऱ्यांनी लिहून ठेवल्या आहेत. त्यावरून त्यांच्या गृहकर्तव्यदक्षतेवर आणि सामाजिक, साहित्यिक कर्तृत्वावर प्रकाश पडतो. म. फुले यांना भेटावयास येणाऱ्या मंडळीत सामान्य माणसे, कार्यकर्ते, हितचिंतक, मित्र, सहानुभूतीदार असत. तसेच ख्रिस्ती मिशनरी, इंग्रज सरकारचे अधिकारीही असत. सयाजीराव महाराज आणि मामा परमानंद यांच्यासारखे राजर्षी आणि महर्षीही त्यांचे चाहते होते. सावित्रीबाई या सर्वांचे उचित आगत-स्वागत करीत. कार्यकर्त्यांना आग्रहाने भोजनाला थांबवून घेत. कामाचा कितीही ताण पडला तरी रागावत किंवा चिडत नसत. अशा आठवणी लक्ष्मण देवराव ढोसर, गोविंद गणपत काळे, महादू सहादू वाघोले, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांनी लिहून ठेवल्या आहेत.[१] सावित्रीबाईंचा लौकिक, स्वतंत्र बाणा, सात्त्विकपणा, दयाळूपणा, मनमिळाऊपणा, विनम्रता, निगर्वीपणा या गुणांमुळे त्यांच्याकडे सर्वसामान्य गरजू स्त्रियांपासून ख्रिस्ती मिशनरी बायका, तसेच पंडिता रमाबाई व डॉ. आनंदीबाई जोशी यांच्यासारख्या सर्व स्तरातील स्त्रिया भेटीसाठी येत असत.[२] शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्यात शिक्षण प्रसाराचे कार्य निष्ठेने केल्याबद्दल सावित्रीबाई फुले यांचा सत्कार, पुणे येथे विश्रामबागवाड्यात म. फुले यांच्याबरोबरच मेजर कँडी यांच्या हस्ते झाला होता, ही गोष्ट पुण्यातील सनातन्यांना रुचली नाही. यासाठी त्यांनी प्रखर विरोध केला. तरीही हा सत्कार झाला. ही गोष्ट साधीसुधी नव्हती. यानंतर सावित्रीबाईंनी आपल्या कामाचा आवाका विस्तारून व्यापक केला, हे लक्षणीय आहे.

म. फुले यांच्यापेक्षा एक निराळेपण सावित्रीबाईंच्या लेखनातून आढळते.

म. फुले वर्णजातिवर्चस्ववादी आणि स्त्रीदास्य समर्थक ब्राह्मणाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतात. त्याकाळात तो क्रमप्राप्त होता म्हणून त्यांना अटळपणे घ्यावा लागला; असे समतोल विचारवंत रा. ना. चव्हाणही म्हणतात[३] सावित्रीबाईंच्या लेखनात तेवढा प्रखर आक्रमकपणा नाही. विद्रोह मात्र प्रखर आहे. विद्रोहाने पेटलेल्या स्त्रिया पराभवाची तमा करीत नाहीत; म्हणूनच सावित्रीबाईंचा लढा युगप्रवर्तक ठरला आहे.

सावित्रीबाई फुले यांना शिक्षण, लेखन, वाचन यांचे महत्त्व पटले होते, त्यांची आवड होती, हे मुद्दाम वेगळे सांगण्याची गरज आहे. कारण त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा यामध्ये आहेत. शिवाय त्यांनी फक्त अध्यापनच केले नाही तर लेखनही केले. त्यांनी समाजशिक्षणाचा जणू विडा उचलला होता. त्यांच्या ग्रंथसंग्रहातील, त्यांनी वाचलेल्या ग्रंथसंग्रहाची यादी, त्या ग्रंथावरील सह्या, वाचताना केलेल्या खुणा याविषयीची माहिती डॉ. मा. गो. माळी यांनी उपलब्ध करून दिली आहेच.[४] शूद्रातिशूद्रांना खरे ज्ञान देण्यासाठी स्वत:च्या नियतकालिकाचे महत्त्वही त्यांना पटले होते. त्यावेळी उच्चवर्णियांच्या मालकीची व संपादकांची नियतकालिके होती. तसेच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेली नियतकालिके होती. सत्यशोधकी विचारांवर संपादकीय कात्री न फिरता ते जसेच्या तसे प्रसिद्ध होऊन, शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्यापर्यंत जावेत म्हणून त्यांनी म. फुले यांचे बालमित्र आणि सधन हिंतचिंतक मोरो विठ्ठल वाळवेकर या ब्राह्मण गृहस्थांना 'गृहिणी' नावाचे मासिक काढण्याचा आग्रह केला. या मासिकातून सावित्रीबाईंनी 'स्त्री शिक्षण' आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा' या विषयावर लेख लिहिले, अशी आठवण गोविंद गणपत काळे यांनी लिहून ठेवली आहे.[५] आजच्या स्त्रीवादी साहित्याने या लोकाभिमुख स्त्रीसाहित्याच्या प्रयत्नांकडे प्रेरणास्थान म्हणून पाहिले पाहिजे. 'गृहिणी' या नावावरून स्त्रियांच्या समस्यांविषयीचे साहित्य त्यामध्ये प्रकाशित व्हावे, अशीच योजना असली पाहिजे. या उपक्रमाला यश आले नसले तरी तो प्रयत्न दिशादर्शक होता.

सावित्रीबाई फुले या कृतिशूर लेखिका आहेत. सत्यशोधक चळवळीची स्वतंत्रपणे जबाबदारी सांभाळणे, स्वत: भाषणे करून जागृती करणे, लेखन करणे, गुंड आणि निंदकांचा धाडसाने मुकाबला करणे; या सर्व घटना आजही अशक्य वाटतात. कारण: (१) स्त्रियांच्या स्वतंत्र कर्तृत्वावर पुरुषप्रधान मानसिकतेचा विश्वास बसत नाही आणि (२) एक स्त्री आणि ती ही ब्राह्मणेतर-शिक्षणाची परंपरा नसलेल्या माळी जातीत जन्मलेली स्त्री, एवढे कर्तृत्व दाखवू शकते का? असा अविश्वास वाटतो. उच्चवर्णियांच्या वर्चस्ववादी, दबलेल्या मानसिकतेतून हा

अविश्वास निर्माण होऊ शकतो.

स्वतंत्रप्रज्ञेने कर्तृत्व गाजविलेल्या अनेक स्त्रिया आपल्या इतिहासाला ज्ञात आहेत. आणि ज्या कर्तृत्ववान स्त्रियांची नोंद घेतलेली नाही; त्या काळाच्या पडद्याआड दडलेल्या, उपेक्षेने दुर्लक्षिलेल्या स्त्रिया आणखीही जननिष्ठ इमानदार इतिहासकाराच्या प्रतिक्षेत आहेत. आधुनिक काळातील अशा स्वयंप्रज्ञ स्त्रियांचाही विचार करता येईल. 'स्त्री-पुरूष तुलना' या अद्वितीय ग्रंथाच्या कर्त्या सत्यशोधककन्या, बुलढाण्याच्या ताराबाई शिंदे यांची दखल म. फुले यांच्यानंतर आज काही प्रमाणात घेतली गेली आहे. अब्राह्मणी पत्रकारितेत वासुदेवराव बिर्जे यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी तानीबाई बिर्जे यांनी 'मराठा दीनबंधू' हे पत्र चार-पाच वर्षे चालविले.(६) नंतर १९२३ मध्ये ते बंद पडले. ध्येयनिष्ठा, वैचारिक स्पष्टता, जिद्द आणि धडाडी असल्याशिवाय ब्राह्मणेतर पत्र चालविणे शक्य नव्हते. सत्यशोधकांच्या परंपरेतून निघालेल्या अब्राह्मणी परंपरेत अशा कर्तृत्ववान स्त्रिया होत्या. 'जागृती' कार भगवंतराव पालेकर यांच्या पत्नी शांताबाई पालेकर यांनी ३२ वर्षे भगवंतरावांना वृत्तपत्रासाठी मजकूर लिहिणे, पत्राच्या घड्या घालणे, कामावर देखरेख ठेवणे या व अशा कामात मदत केली. इ. स. १९२९ च्या मंदीच्या काळात त्यांनी 'जागृती' साठी कागद खरेदीसाठी वीस तोळे वजनाच्या सोन्याच्या गोठपाटल्या दिल्या.(७) लेख लिहिण्यासाठी प्रतिभा, कल्पकता, वैचारिक बैठक इ. गोष्टी लागतात. त्या शांताबाई पालेकर यांच्याजवळ होत्या. परंपरेत जी कामे बसत नाहीत ती त्यांनी स्वीकारून भगवंतरावांना संपूर्ण सहकार्य दिले. स्त्रियांना दागदागिने प्रिय असतात, हा स्त्रीस्वभाव लक्षात घेतल्यावर त्यांचा त्याग फक्त मोठा वाटत नाही; तर तत्त्वनिष्ठ व ध्येयवादीही वाटतो. 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे यांना इ. स. १९२३ मध्य घोरपडे प्रेसच्या मालकीण श्रीमती राधाबाई यांनी आपला छापखाना भाड्याने दिला.(८) म्हणून ते पत्र पुढे चालू राहिले. आपला छापखाना, नफ्यात न चालणाऱ्या वृत्तपत्राला देण्याचा धोका हेतुत: पत्करणाऱ्या राधाबाई याही वैचारिक चळवळीतील पाईक आहेत. 'गावगाडा'चे चालक दादासाहेब झोडगे यांना फुलवंताबाई झोडगे यांनी अखेरपर्यंत साथ दिली. एवढेच नव्हे तर सौ. फुलवंताबाईनी सावित्रीबाईंचे छोटेसे चरित्रही लिहिले होते. सन १९३९ मध्ये शांताबाई रघुनाथराव बनकर यांनीही सावित्रीबाईंचे अल्पचरित्र लिहिले होते.(९) या स्त्रियांची ऊर्मी आंतरिक होती; कार्यनिष्ठा होती, स्वबांधवांच्या प्रगतीविषयी तळमळ होती, म्हणून त्यांनी त्या-त्या कार्यात सहभाग घेतला. सावित्रीबाई फुले यांचेही कर्तृत्व एवढ्या पार्श्वभूमीवर पाहिले तर अशक्य वाटत नाही.

सावित्रीबाई फुले यांच्या नावावर 'काव्यफुले' (१८५४) आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' (१८९१) हे दोन काव्यसंग्रह उपलब्ध आहेत. गद्यरचनेत म. फुले यांना लिहिलेली तीन पत्रे आणि भाषणाचे लहानसे पुस्तकही प्रसिद्ध झालेले आहे. त्यांच्या सर्व लेखनात सत्यशोधकी परंपरेतील विचार प्रकट झाले आहेत, पण ते त्यांच्या खास शैलीत प्रकट झाले आहेत. त्यांचे साहित्य वाचताना सात्विक, सोज्वळ, घरंदाज सावित्रीबाई, समाजशिक्षिका सावित्रीबाई, विद्रोही कार्यकर्त्या सावित्रीबाई आणि सत्यशोधक सावित्रीबाई असे पैलू सहज लक्षात येतात.

धार्मिक सामाजिक गुलामगिरीतून अज्ञानी शूद्रातिशूद्रांना मुक्त करण्याची तळमळ, अपार करूणा, त्यांच्या वेदनेविषयी कळवळा या त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा दिसतात. म. फुले यांच्यापेक्षा एक निराळा पैलू या लेखनात आहे. तो म्हणजे शिवभक्तीचा, शिवस्तुती, शिवप्रार्थना त्यांनी रचल्या आहेत. संस्कृत महिम्न स्तोत्राचे त्यांनी मराठी रूपांतर केल्याचाही पुरावा मिळाल्याचा उल्लेख डॉ. मा. गो. माळी यांनी केला आहे.[१०] म. फुले नास्तिक नव्हते. त्यांनी 'निर्मिक' मानला. पण १८५४ च्या दरम्यान ईश्वर, आदिनारायण त्यांनी मानलेले होते. 'गुलामगिरी' या ग्रंथात लोकदैवत, ग्रामदैवते यांची उपपत्ती आणि लोकमनातील त्यांच्या भक्तिभावाची चिकित्साही त्यांनी केली होती. धार्मिक ढोंग, कर्मकांड, पुरोहित-भटांची दलाली याला त्यांचा प्रखर विरोध होता. 'शिव 'हे दैवत मूळ रहिवाशांचे असले तरी त्याची भक्ती व पूजा करावी, असे मात्र त्यांनी कुठेही म्हटले नाही. शिव-पार्वती ही स्त्रियांच्या भावविश्वातील आदर्श पती-पत्नीची प्रतिमा आहे. शिवपार्वतीला बरोबरीचे स्थान देतात. अडचणीत सल्ला व मदत घेतात. ती त्यांच्या बरोबरच असते. त्यामुळेच स्त्रिया तुळशीवृंदावनात शिवाची पिंड पूजतात. सावित्रीबाई शिवभक्त आहेत. म्हणून त्यांच्या कर्तृत्वाला कमी लेखता येत नाही. आजही २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर पुरोगामी म्हणविणारे चोरून धर्मकार्य, पूजा-विधी करतात, तर पुरोगामी पुरूष आणि त्यांची देवभक्त पत्नी हे दृश्यही इतिहासजमा झाले नाही. इतिहासातील घटना पाहताना त्या काळातील इतर संदर्भ लक्षात घेणे आवश्यक ठरते. सर्व वारकरी संतांना आत्मबल त्यांच्या विठ्ठलभक्तीतून मिळाले; हा इतिहास आपल्यापुढे आहे. नायगाव या माहेराकडून शिखर शिंगणापूरच्या शिवाची भक्तीपरंपरा सावित्रीबाईकडे आली असेल. शिवभक्ती हा अडसर, व्यत्यय न होता त्यांच्या कार्याला प्रेरक, बळदायक ठरला असावा. सत्यशोधक समाजातील अनेकांची कुटुंबे पिढीजात वारकरी होती. धार्मिक दंभ, ढोंग, अहंकार, शोषण, कर्मकांड याविरूद्ध संघर्ष करणे; वारकरी

परंपरेशी सुसंगतच आहे.[११] शिवभक्तीची परंपरा तर अवैदिक आहे. येथे भक्ताचे समर्थन करण्याचा हेतू नाही. पण शूद्रातिशूद्रांचा मुक्तिलढा भक्तिपरंपरेतील व्यक्तीने पुढे नेला, असे म्हटल्यामुळे किंवा मान्य केल्यामुळे लढ्याला कमीपणा येत नाही किंवा नास्तिक इहवाद्यांचे श्रेय कमी होत नाही. सावित्रीबाई यांच्या बाबतीत शिवभक्ती हे त्यांचे सामर्थ्यही होते आणि वैचारिक मर्यादाही होती, असे मानता येईल. भक्ती परंपरेतील सर्वच स्त्रिया कर्तृत्ववान झाल्या नाहीत. वैदिक परंपरेतील, त्यांच्या काळातील एकही स्त्री-वर्णजातिस्त्रीदास्य लढ्यात तर नाहीच पण हा विचारही मांडीत नाही. पं. रमाबाई आणि लक्ष्मीबाई टिळक यांचे कार्य धर्मांतरानंतरचे आहे, हे लक्षात घेतल्यानंतर वैदिक परंपरेने मानवीबुद्धी, विचारशक्ती, तर्कशक्ती किती बंदिस्त केली होती हे स्पष्ट कळू शकते. म. जोतिबांनी त्यांना बरोबरीचे स्थान दिले. कर्तृत्वाला संधी दिली म्हणूनही सावित्रीबाईंची शिवभक्ती दृढ झाली असावी.

इ. स. १८५४ मध्ये सावित्रीबाई 'काव्यफुले' लिहितात, त्यावेळी म. फुले 'तृतीयरत्न' नाटक लिहीत असावेत. कारण इ. स. १८५५ मध्ये हे नाटक दक्षिणा प्राईस कमिटीकडे बक्षिसासाठी पाठविले होते.[१२] अशी माहिती स्वतः त्यांनीच दिली आहे. यावेळी आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांचा जन्मही झाला नव्हता. ते इ. स. १८६६ मध्ये जन्मले, त्यानी इ. स. १८८५ पासून काव्य लेखनाला प्रारंभ केला. इ. स. १८८५-१८९५ या काळातील त्यांची कविता, पंडिती परंपरेच्या बोजड क्लिष्टपणात आणि इंग्रजी भाषा आणि कल्पना-विचारात अडकलेली आहे. हा काळ जनजागृतीचा काळ मानला जातो. या काळात हिंदुस्थानात जे जे विचार प्रवाह होते; त्यांनी २० व्या शतकावर कायम प्रभाव टाकला. सुधारणावाद-सुधारणाविरोध, राजकीय की सामाजिक सुधारणा, ब्राह्मणी-अब्राह्मणी वैचारिक संघर्ष इ. विचारप्रवाह आजही अस्तित्वात आहेत. स्त्री शिक्षण, बालविवाह, केशवपन, देशाचे स्वातंत्र्य असे काही प्रश्न मिटलेले आहेत. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात हा कालखंड 'भाषांतर युग' म्हणून ओळखला जातो. संस्कृत किंवा इंग्रजी साहित्याची मराठी भाषांतरे होत होती. इंग्रजीची मराठी भाषांतरे आज हास्यापद आणि विनोदी वाटतात. केशवसुतांच्या काव्यलेखनाचा प्रारंभही भाषांतराच्या पांगुळगाड्याने झाला आहे.[१३] असे विधान केशवसुतांचे अभ्यासक प्रा. म. श्री. पंडित यांनी केले आहे. त्याकाळातील सर्वच उच्चवर्णीय विद्वानांप्रमाणे केशवसुतही इंग्रजीतून विचार करीत आणि मराठीतून व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे त्यांची अभिव्यक्ती सरळ व सुलभ नाही;[१४] असे स्पष्ट मत त्यांनी दिले आहे. ज्या काळात मराठी भाषा नीट

घडली नव्हती, त्याकाळात म. फुले, सावित्रीबाई फुले, इतर सत्यशोधक किंवा परमहंस सभेतील दादोबा पांडुरंग तर्खडकर हे सुबोध, रसाळ, प्रवाही मराठी रचना करीत होते. त्यांना येथील लोकमन कळलेले होते. लोकगीतांची परंपरा, संत साहित्याची परंपरा त्यांना माहिती होती. सत्यशोधकांना मानवतावाद पाश्चात्यांकडून शिकण्याची गरज नव्हती. कारण संत परंपरेत तो होताच. लोकपरंपरा, लोकनिष्ठा, लोकाभिमुखता यामुळे इंग्रजी वाघिणीचे दूध प्यायलेल्या मराठीचे शिवाजी विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांच्यापूर्वी सावित्रीबाईनी केलेले कव्यलेखन आधुनिकता सन्मुख जननिष्ठ जाणिवांचा आविष्कार करणारे आहे. त्यामध्ये सर्वच नव्हे, पण बहुतांश कवितांमध्ये काव्यात्मकता आहे. केशवसुतांचा सुधारणावाद, त्यांची सामाजिकता, आधुनिकयुग सन्मुखता यांचा अधिक्षेप करण्याचा येथे उद्देश नाही. केशवसुत इंग्रजी आणि संस्कृत मधील थोर थोर कवी आणि काव्य पंडिताच्या खांद्यावर उभे आहेत. सावित्रीबाईंना लोकपरंपरा आणि जन्मजात प्रतिभा आहे. पुढे बहिणाबाई चौधरीही याच परंपरेत सहभागी होतात.

'काव्यफुले'. या ४१ कवितांच्या संग्रहात प्रास्ताविका आणि अर्पणिका पद्यमय आहेत. प्रास्ताविकेत ही काव्यफुले सुगंधी आहेत. मजेची आहेत. त्यांच्या वासाने शांती मिळते. त्यामध्ये मनोरंजक उपदेश आहे. ती बुद्धिगम्य, रम्य, नीतीशिक्षण, सुबोध, ज्ञान देणारी आणि भावदर्शन घडविणारी आहेत असे म्हटले आहे. (सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय पृ.३) ती सुजन हितचिंतकांना अर्पण केली आहेत. (पृ.३) शिव प्रार्थनेत परंपरेप्रमाणे शिवाचे स्वरूपवर्णन आहे. जटा, गंगा, चतुर्दश विद्या, त्रिनेत्र, त्रिपुंड, गळ्यातील सर्प, नीळकंठ, हार इ. वर्णन करून तो अज्ञानाला ज्ञान देणारा आहे. ''नमस्कार तुज शिवप्रभो॥ आदिनिर्मिकस्वयंभुविभो'' (पृ. ४) (येथून पुढील सर्व पृष्ठांक निर्देश 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथातील आहेत.) शिवस्तोत्रातही शिवस्तुती करून 'माझ्या जिव्हेवरी बसून तू नामी काव्य रचना कर' असा वर मागितला आहे. शिवप्रार्थनात म. फुले यांच्या आदी निर्मिकाची कल्पना आली आहे. शिवाप्रमाणे सावित्रीबाईंचे श्रद्धास्थान म. जोतिबा फुले हे आहे. शिव हे पार्वतीचे पुरूष रूप आहे आणि पार्वती ही शिवाचे स्त्रीरूप आहे. एवढेच नव्हे तर 'अर्धांगी पार्वती', 'अर्धांगी नटेश्वर' या पारंपरिक शिवप्रतिमा म्हणजे पती-पत्नींचे परस्परांशी असलेले तादात्म्य, परस्पर समरसता यांचे मूर्तरूप आहे. म्हणून 'काव्यफुले' वर शिवपार्वतीचे छायाचित्र छापले असावे. सावित्रीबाईंना जोतिबा फुले यांच्यात शिवाचे दर्शन होत असावे. तसेच म. फुले यांचा लौकिक, त्याग, कर्तृत्व

इतरांनाही वंदनीय वाटत होते. त्यांचे नैतिक सामर्थ्यही तेवढे होते. पत्नी, सहकारी, अनुयायी, सखी म्हणून सावित्रीबाईंना म. फुले वंदनीय वाटणे स्वाभाविक आहे.

*''महार मांगाची। करते मी सेवा।। आवडीच्या देवा स्मरूनिया।।*
*....सेवेच्या भावाने। सेवा जे करिती।। धन्य पावती। मानवता।।*
*ऐसा बोध देती।। अनुभवे जोती।। मनात ठेविती। सावित्री मी।। ''*
(पृ.७)

याप्रमाणे म. जोतिबा फुले यांचा बोध आणि त्याविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांचे शिवानंतरचे भक्तीस्थान; पण 'शूद्रातिशूद्रांचा प्रभू' म्हणून त्यांना मनोभाव वंदन आहे. (पृ.५) संसार, प्रपंच, मानवी जीवन आणि त्यातील सुख, समाधान, शांतता स्वत: मानण्या ने मानण्यावर अवलंबून आहे. आपल्या गरजा, सुखेच्छा मर्यादित केल्या की सुख वाढते. हा सुखाचा मार्ग म. गौतम बुद्धांनी सांगितला. सावित्रीबाईही 'संसाराची वाट' मध्ये **'शांतता आपली। ठेवावी प्रपंची।। हीच वाट साची, संसारात।।** (पृ.८) असे म्हणतात. खरा संत कोणाला म्हणावे, त्यांची लक्षणे कोणती हे ज्ञानेश्वर नामदेवांपासून तुकाराम- एकनाथांपर्यंत सर्वांना सांगितले आहे. कारण लोकादराला पात्र झालेल्या व्यक्ती, जीवनसरणी, यांचे ढोंग करून समाजाला फसविणाऱ्यांची समांतर परंपरा सुरू असते. श्रमजीवी लोकांना खरे-खोटे याविषयी संशय येत नाही; आला तरी त्यांची पारख करण्यासाठी त्यांना वेळ नसतो. त्यांना जीवनसंघर्षात जखडून राहावे लागते. त्यांच्या कष्टावर, त्यांनी केलेल्या उत्पादन व निर्मितीवर ऐतखाऊ भट, पुरोहित, सावकार, श्रीमंत, व्यापारी, दलाल, आडते, पुढारी अधिकारी चैन करीत असतात. ऐश्वर्य भोगीत असतात. 'तेच संत' मध्ये सावित्रीबाई सांगतात

*''वाचे उच्चारी। तैसी क्रिया करी।। तीच नरनारी, पूजनीय।।*
*सेवा परमार्थ। पाळी व्रत सार्थ।। होई कृतार्थ। तेच वंद्य।।*
*सुख दु:ख काही। स्वार्थपणा नाही।। परहित पाही। तोच थोर।।*
*मानवाचे नाते। ओळखती जे, ते । सावित्री वदते। तेच संत।।''* (पृ.८)

कृती-उक्तीमध्ये संगती, सेवाकार्य, नि:स्वार्थीपणा, परहिताची तळमळ आणि माणुसकीच्या नात्याची ओळख ही संतांची लक्षणे त्या सांगतात. अभंग छंदात वारकरी विचार परंपरेशी नाते सांगणारी ही रचना अनेक अर्थानि महत्वपूर्ण आहे.

स्वत: कर्तृत्ववान असेलल्या सावित्रीबाईंना समानधर्म्या, पुरूषार्थ गाजविणाऱ्या कोल्हापूरच्या राणी छत्रपती ताराबाई यांच्याविषयी आंतरिक नाते

आहेसे वाटते. दुसरे कारण त्या शिवरायांच्या वंशज आहेत आणि तिसरे कारण नायगाव या त्यांच्या माहेराला कोल्हापूर जवळचे आहे

*''ही एकच शूर रणगाजी। छत्रपती ताराबाई*
*शिवबनू प्रतापी माझी। वीरांची रणदेवाई''* (पृ. १०)

म्हणून त्यांनाही सावित्रीबाई नमस्कार करतात, हे महत्त्वाचे कारण आहे. नायगाव, नेवसेपाटील या कुळाचा अभिमान व्यक्त करणारी एक कविता त्यांनी रचली आहे. (पृ.१०)

'मनू म्हणे' या कवितेत मनू आणि त्याची परंपरा ,बळी परंपरेची द्वेष्टी आहे असे म्हटले आहे.

*''नांगर धरती। शेती जे करती।। मठ्ठ ते असती। मनु म्हणे..*
*शूद्र जन्म घेती। पूर्वीची पापे ती।। जन्मी या फेडती। शूद्र सारे।।*
*विषम रचती। समाजाची रीती।। धूर्तांची ही नीती। अमानव।।''*
(पृ.१९)

कर्मविपाक, पूर्वजन्म-पुनर्जन्म, पूर्वसंचित या कल्पित आधारावर समाजाची विषम रचना करून अमानुष रीती, नीतींना धार्मिक पावित्र्याने स्थान दिले. तेच ईश्वर निर्मित आहे. असे पोथ्या, पुराणे स्मृतिग्रंथ यामधून लिहून ठेवले.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि शेतकरी कुटुंबात नांदावयास आलेल्या सावित्रीबाई यांनी 'ब्रह्मवंती शेती' लिहिली आहे. **''ब्रह्म असे शेती। अन्नधान्य देती। अन्नास म्हणती। परब्रह्म।।१।। शूद्र करी शेती। म्हणूनिया खाती। पक्वान्न झोडती। अहं लोक ।।२।। दारूडे बोलती। तैसे हे वागती। मतलब नीती। वाचाळांची।।३।। जे करिती शेती। विद्या संपादती तया ज्ञानवंती। सुखी करी।।४।।''** (पृ. २०) शेतीला ब्रह्म आणि अन्नाला परब्रह्म मानणारा हा दृष्टिकोन खास कृषि परंपरेत विकसित झालेला आहे. ज्या शेती आणि शेतकरी परंपरेचा द्रोह मनू-शंकराचार्यांची परंपरा करते. ती परंपरा शेती करते म्हणून अहंकारी, वर्चस्ववादी लोक पक्वान्ने झोडतात असे सांगून; जे शेतकरी शेती करून विद्या संपादन करतात. त्यांना ज्ञानवंती शेती सुखी करते, असे सावित्रीबाई म्हणतात. कृषिकर्म आणि ज्ञान यांची फारकत सनातन्यांनी हेतुत: केली होती. सावित्रीबाई या दोन्ही गोष्टींचा संयोग घडवितात. हा दृष्टीकोन द्रष्टेपणाचा आहे. स्वंयप्रज्ञेचा आहे. विद्येचे महत्त्व 'विद्येविना मति गेली.....' मधून सर्वपरिचित झाले आहे. सावित्रीबाई यांनी धनप्रेमी समाजाला विद्या हे 'श्रेष्ठ धन' असल्याचे आवर्जून सांगितले आहे. (पृ.२०)

कबीरपंथी साधूचे आणि फुले कुटुंबियांचे वैचारिक नाते जुळले होते.

संत कबीरांचा इहवाद, जीवननिष्ठा महत्त्वाची आहे. त्यांचा 'कल करे सो आज कर.....' हा दोहा सर्वपरिचित आहे. सावित्रीबाई 'बाळास उपदेश' करतात, **'करणे काम आजी ते। आताच कर खेचून।। जे दुपारी करावायचे। ते आताच कर जाऊन।। क्षणानंतरचे काम की नाही। या क्षणि कर ठोकुन।। झाले काम की नाही।। न पुसे मृत्यू कारण।।''** (पृ.२१) बोधवादी अशी ही रचना आहे. इंग्रजी राजवट आणि इंग्रजी भाषा हे १९ व्या शतकातील सर्व समाज सुधारकांना वरदान वाटले, हे सत्य सर्वज्ञात आहे.

*''इंग्रजी माऊली। इंग्रजी वैखरी।। शूद्रांना उद्धारी। मनोभावे।।''*

(पृ.२१)

असा गौरव सावित्रीबाईनीही केला आहे. कारण

*'इंग्रजी माऊली। तोडते पशुत्व।। देई मनुष्यत्व। शूद्रलोका।।*

पशूचे जिणे नष्ट करून माणसांना माणुसकी प्राप्त करून देण्याचे कार्य त्या राजवटीने आणि भाषेने केले. ही जागृती नव्या युगाची पहाट ठरली म्हणून 'इंग्रजी शिका' असा आग्रह त्या धरतात.

*''इंग्रजी शिकूनि। जातीभेद मोडा।। भटजी भारूडा। फेकुनिया।।''*

असा व्यापक दृष्टिकोन इंग्रजी शिकण्यामागे आहे. सावित्रीबाईंच्या या जीवननिष्ठा, मातीशी इमान राखणाऱ्या आहेत. ही कृषिकन्या 'मातीची ओवी' गाते (पृ.२४)

*''काळसर माती। पिकपाणी देती।। फळे फुले शोभती। शिवारात।।*
*पांढरीला मळून। कौले विटा करून।। राहती घरे बांधून। शिवारात।।*
*मातीचा महिमा। सांगावा किती हा।। मातीचे नाते अहा। शिवारात।।''*

मातीमुळे माणसांचे भरण पोषण होते, सौदर्य निर्माण होते आणि निवाऱ्यासाठीही मातीचा उपयोग होतो. सर्व शिवारात काळी, पांढरी, तांबडी अशी विविधरंगी माती असते. मातीचे स्तोत्र गाणारी ही कृषिकन्या 'शूद्रांचे परावलंबन' पाहून कळवळते आणि खेदाची बाब अशी की, आपण परावलंबी आहोत. याची अज्ञानामुळे त्यांना जाणीव नसते. म्हणून पशूप्रमाणे आहे त्या परिस्थितीत ते सुख मानतात. देव, धर्म रूढीग्रस्त लोक अज्ञानाने पछाडलेले आहेत. त्यांना

*''सुखाची नसे हाव। दु:खास सुख मानती।।*
*विधाते निर्मिले जैसे। रहावे बोध सांगती।।*
*...ज्ञानाचे नसती डोळे। म्हणोनि न दिसे दु:ख।।*
*स्वावलंबी नसे शूद्र। स्वीकारती पशू सुख।।''* (पृ.२५)

'जैसे थे' वृत्ती प्रगतीचा अडसर झाली आहे. म्हणून ते कायम परावलंबी झाले आहेत.

सावित्रीबाई फुले काय किंवा बहिणाबाई चौधरी काय या कवयित्री स्त्रिया रूढार्थाने तत्त्वज्ञानी नाहीत. विदुषी नाहीत. तरीही परंपरेने चालत आलेले, अनुभवाच्या विद्यापीठात आत्मसात केलेले मौलिक जीवनचिंतन त्या सांगून जातात. **तयास मानव म्हणावे का?'** (पृ.२७) या रचनेत मानव म्हणवून घेण्याची कोणकोणत्या माणसात पात्रता नसते, हे विस्ताराने सांगितले आहे. विद्या ज्ञान नाही, ते आत्मसात करण्याची गोडी नाही, बुद्धी असून ती चालत नाही, 'देरे रे हरी खाटल्यावरी' अशी ऐतखाऊवृत्ती, विचार-आचारांचा विधीनिषेध नाही; खूप संतती निर्माण केली. पण त्यांच्या निर्वाहाची काही तरतूद नाही, उद्योग नाही; कोणाची सहानुभूती, मदत मिळत नाही; कशाचीही पर्वा करीत नाही; जोतिष, रमल, स्वर्ग, नरक या कल्पनांवर विश्वास ठेवतो, पत्नी काम करीत रहाते. हा ऐतोबा खात राहतो, अशा; पशूत नाहीत त्या सवयी व गुणधर्म माणसात असतील तर त्याला माणूस म्हणू नये, असे सावित्रीबाईंचे स्पष्ट मत आहे. जनाई-मुक्ताई, कान्होपात्रापासून बहिणाबाई चौधरी यांच्यापर्यंत माणसातील माणूसपणाची चिंता वाहिलेली दिसते. 'अरे! मानसा, मानसा, कधी व्हशील माणूस' हा बहिणाबाईंचा प्रश्न सर्व मानव समाजाला उद्देशून आहे. ही गोष्ट सर्व अभ्यासकांना माहिती आहे. सावित्रीबाईंनीही दीर्घ रचना करून ही चिंता व्यक्त केली आहे.

'सामुदायिक संवाद पद्य' या रचनेत (पृ.३०-३१) वर

*''अज्ञानाची दारिद्र्याची गुलामगिरी तोडू चला*

युगायुगाचे जीवन आपले फेकून देऊ चला'' असे आवाहन केले आहे. सावित्रीबाईंची काव्यफुले गुलामगिरीची बेडी तोडण्यासाठी अवतरली आहेत, तसेच हे कार्य निष्ठेने करणाऱ्यांवर उधळण्यासाठीही! त्यांच्या गळ्यात या फुलांच्या माळा घालण्यासाठीही अवतरली आहेत.

इ. स. १८९१ मध्ये 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा छोटासा संग्रह प्रकाशित झाला. याचे स्वरूप खंडकाव्याचे आहे. शूद्रातिशूद्रांच्या शौर्याचा इतिहास, परकीय आर्यभटांचे आक्रमण, क्षेत्रजनांना गुलामगिरीत टाकणे. विषम समाजव्यवस्था निर्माण केली, मुसलमान, ख्रिस्ती यांनीही आक्रमणे केली, पेशवाईत अत्याचार झाले, इंग्रजी राजवट शूद्रातिशूद्रांच्या प्रगतीसाठी उपयोगी ठरत आहे, असा आशय या काव्याचा आहे. म. जोतिबा फुले यांची पती-परमेश्वर अशी संमिश्र प्रतिमा त्यांच्यासमोर आहे. **''जयाचे मुळे मी कविता रचिते॥ जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते॥ जयाने दिली बुद्धीही सावित्रीला॥ प्रणामा**

करी मी यती जोतिबाला।।'' असा आदरभाव आणि भक्तीभाव व्यक्त केला आहे. जोतिबांना त्यांनी 'यती' म्हटले आहे. हा त्यांचा गौरव आहे.

*''कुळाची कथा गीत ग्रंथी लिही मी।।*
*गुलामी जनाचा इतिहास नामी।।''*

'कुळाची कथा' असा उल्लेख वाचल्यावर नेवसे-पाटील-फुले यांपैकी एक किंवा उभय कुळांची कथा असावी असे वाटते, पण गुलामजनलोकांची ही कुळकथा आहे, व्यापक आणि विशाल दृष्टिकोन स्वीकारून ती लिहिली आहे, हे लक्षात येते. ही रचना त्यांनी कोणी करावयास लाविली, असाही प्रश्न निर्माण होतो.. काव्यहेतू, स्वरूप आणि प्रेरणा सांगताना उपसंहारात त्या म्हणतात,

*''मनी कल्पना छान गोष्टी रचावे,*
*जना ग्राह्य होईल ऐसेच गावे,*
*मनी इच्छुनी काव्य केले स्वभावे,*
*तुम्ही गाऊनी त्यातले सत्य घ्यावे।।''*

शूद्रातिशूद्रांचा स्वाभिमान जागृत होईल; ते ज्ञानी होण्याची त्यांना प्रेरणा होईल अशा गोष्टी रचण्याचे प्रेरणा काव्य आहे. ज्यांच्यासाठी ते लिहिले त्यांना रुचावे असे प्रयोजन आहे. ते सहज, स्वाभाविकपणे निर्माण झाले. असे स्वरूप आहे. एक्कावन्न चरणांचा हा बावन्नकशी सुबोध रत्नाकर आहे. आशयाच्या दृष्टीने रत्नाकराएवढी विशालता येथे आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या काव्याशयाचा विचार केल्यानंतर त्यांच्या काव्याच्या वैशिष्ट्यांचा विचार करणे प्रस्तुत ठरते. सावित्रीबाईंची कविता फार प्रगल्भ, प्रौढ, भारदस्त आहे असे नाही. पण आधुनिक मराठी साहित्यातील प्रारंभीचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहिले तर तिचे महत्त्व कळते. सावित्रीबाईंनी आपण कवयित्री आहोत; या जाणिवेने काव्यलेखन केले असण्याची शक्यता नाही; आणि तशी जाणीव असली तरी त्या काळातील बहुतेक लेखक साहित्याला समाजप्रबोधनाचे साधन मानतात. सावित्रीबाई फुले तर या चळवळीतील कृतिशील कार्यकर्त्या आहेत. 'साहित्य' या शब्दाचा अर्थही 'साधन' असाच होतो. साहित्य ही आत्माविष्काराची पद्धती आहे, साहित्यामुळे उच्च दर्जाचा आनंद होतो अशी साहित्यविषयक जाणीव त्यांना असण्याची शक्यता नव्हती. त्या काळातील निबंध वाङ्मय आणि ललित साहित्याने प्रबोधनाचे विचार लोकांपर्यंत पोहचविले. त्यामुळे महाराष्ट्रात वैचारिक मंथन झाले. सावित्रीबाईंना काव्यलेखनाची प्रेरणा झाली. लोकसाहित्याची पूर्वपरंपरा, संतसाहित्याची परंपरा, एवढ्या आधाराने त्यांनी जे काही आणि जसे काही लिहिले आहे. त्याचे मूल्यमापन करावे, असा

मर्यादित हेतू येथे आहे.

सावित्रीबाई फुले या ग्रामीण भागात जन्मलेल्या शेतकरी कन्या आहेत. म. फुले हे शेतकरी होते आणि मांजरी येथे त्यांची शेती होती.[१५] ते पुण्यात राहत असले तरी त्यांचे शेतीशी संबंध अतूट होते. त्यांचे कार्यक्षेत्र ग्रामीण भाग आणि ग्रामीण शेतकरी-कारागीर हेच होते. त्यांची भाषा, त्यांची जगण्याची पद्धती, प्रतिकूल परिस्थितीचे अनुकूल-प्रतिकूल परिणाम त्यांच्या भाषेवर झालेले दिसतात. लोकभाषा, लोकमन, लोकाचार, लोकरूढी याची नेमकी जाण लेखकाला असावी लागते. सावित्रीबाईंचा जन्म आणि जीवनही त्यांच्यातच असल्यामुळे ही जाणीव त्यांना होती. त्यांच्या काव्याच्या भाषेत शेत, शिवार, माती, कौले, विटा, बाईल, ऐतोबा, बलुते, आलुते, शेंदरी देव, नवस, बावन्नकशी, हे शब्द सहज येतात. तसेच फुलमाळी जीवनातील फुले, फुलमाळा, निरनिराळ्या फुलांची नावे आणि वैशिष्ट्येही त्यांच्या काव्यात येतात. एकार्थाने जीवन विश्व हेच काव्यविश्वही असते. प्रतिभा, कल्पकता, रचनाचातुर्य याबाबी त्यानंतर महत्त्वाच्या ठरतात. सासर-माहेरकडून त्या शेतकरी असल्यामुळे ग्रामजीवन, खेड्यातील शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया हा त्यांच्या काव्याचा विषय होता. नव्हे; शहरातीलही हाच समाज त्यांच्या काव्याचा विषय होता.

सावित्रीबाईंच्या काव्यात शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया, त्यांची गुलामगिरी, युद्ध, रणभूमी, रक्ताचे पाट, तलवार, मर्दानी, चंडिका, रणदेवी, बळीराजा या प्रतिमा येतात. उपरोधासाठी डोबकावळा, शेंदरी दैवते यासारख्या प्रतिमा येतात. शेती ही सुद्धा भरण पोषण करणारी, आसरा देणारी माता आणि विद्या देणारी प्रतिमा म्हणूनच आली आहे. माती ही सर्व शिवार व्यापणारी, सर्व मानवांना अन्न देणारी प्रतिमा म्हणूनच आलेली आहे.

लोकव्यवहारात भाषेचा जिवंत आविष्कार होत असतो. हा जिवंतपणाच भाषेला काव्यात्मकता प्राप्त करून देत असतो. सावित्रीबाई ज्या समाजस्तरासाठी, ज्या समाजस्तरांचे काव्य लिहितात, तो समाज गरीब, निरक्षर, भक्तीपरंपरा मानणारा, अंधश्रद्धाळू आहे. ऐतखाऊपणा, आळस यासारखे दोषही त्यांच्यात आहेत. स्त्रिया कष्टाळू आहेत. लोकव्यवहारातील भाषा आणि शब्द लयबद्ध असतात. अर्थपूर्ण असतात. मनातील विचार-भावना व्यक्त करण्यासाठी ते समर्थ असतात. त्यांना म्हणी आणि वाक्प्रचाराचा दर्जा प्राप्त होतो. यामुळे भाषेचे ऐश्वर्य वाढते. सावित्रीबाई यांनी 'देरे हरी पलंगावरी'; 'कोंबडा झाकला तरी उजडावयाचे थांबत नाही' इ. म्हणींचा वापर केला आहे. आभाळ ठेंगणे होणे, देव्हाऱ्यात टाक होऊन बसणे यासारखे समर्थ वाक्प्रचार वापरले आहेत.

*"धोंडे मुले देती।। नवसा पावती।।*
*लग्न का करती। नारी नर।।"* (प.२२)

संत तुकाराम आणि संत एकनाथांनी समाजापुढे उपस्थित केलेला प्रश्नच सावित्रीबाई ठाशीव शब्दात व्यक्त करतात. नवस करणे, 'धोंड्यांनी मुले देणे' हे वाक्प्रचार अर्थपूर्ण आहेत; तसेच अंधश्रध्दाळू समाजाला संत तुकारामाच्या दाहक भाषेत खडसावणेही आहे. सावित्रीबाई फुले यांनी काव्य रचण्यासाठी ओवी, अभंग, पोवाडे इ. लोकपरंपरेतील छंद स्वीकारले आहेत. वृत्त आणि अलंकारांचा अव्हेर केला नसला तरी त्यांचे स्तोमही माजविले नाही.

सृष्टी आणि मानव, निसर्ग आणि मानव यांचे संबंध अतूट आहेत. हे संबंध कधी सहकार्याचे तर कधी संघर्षाचे असतात याचे भानही त्यांना आहे.

*"मानवप्राणी निसर्गसृष्टी द्वय शिक्क्याचे नाणे*
*एकच असे ते. म्हणुनि सृष्टीला शोभवू मानव लेणे"* (पृ.१७)

'मानव आणि सृष्टी' या कवितेत या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, आणि सृष्टीला मानवरूपी अलंकारांमुळे शोभा येते, असे त्या म्हणतात. पिवळा चाफा, जाईचे फूल, गुलाबाचे फूल, फुलपाखरू व कळी, इत्यादी कवितांमध्ये सृष्टीला चैतन्यरुप दिले आहे. मानवी भावभावनांचे आरोपण सृष्टीवर, फुलांवर केले आहे.

सावित्रीबाई यांनी 'माझी जन्मभूमी' ही कविता नायगाव या त्यांच्या माहेरावर लिहिली. स्त्रियांना माहेराची ओढ असते. त्याकाळातील स्त्रियांमध्ये तर ती खूप होती. स्त्रीगीतामधून ती प्रभावीपणाने व्यक्त झाली आहे. सावित्रीबाई छत्रपती ताराबाई यांच्यावर कविता लिहितात, बळी स्तोत्रात बळीराजाची पत्नी विंध्यावली यांचा आवर्जून उल्लेख करतात. तसेच बोधपर कवितेतून त्यांच्या मातृहृदयाचा सतत आविष्कार होतो आणि त्यांच्यातील शिक्षिकाही तळमळीने अध्यापन करते.

सावित्रीबाई फुले यांनी काव्यलेखन केले हे मान्य केले, तरी त्यात काही शब्द, ओळी, किंवा संपूर्ण कविताच कोणीतरी घुसडली असण्याची शंका येते.' पिवळा चाफा' या कवितेवर बी कवीच्या 'चाफा' या कवितेचा प्रभाव दिसतो. गेयता, लय याबाबतीत तर प्रभाव आहेच पण त्या कवितेतील संकल्पनावर ही कविता बेतली आहे की काय अशी शंका येते. शिवाय चाफातील आशयघनता, सौदर्याविष्कार येथे नाही. 'फुलपाखरू व फुलाची कळी' या कवितेवर बालकवींच्या 'फुलराणी' या कवितेचा प्रभावच नव्हे तर तिचे ते अनुकरण वाटते. 'जाईचे फूल' बोलकी बाहुली ह्या कविताही अनुकरणात्मक वाटतात. भाषेच्या

दृष्टीने विचार केला तर आणखी काही कवितांच्या कार्याविषयीही संशय येतो. उदा. माझी जन्मभूमी, मानव व सृष्टी, द्रष्टा कवी इत्यादी.

भाषा तज्ञ, सही तज्ञ, कागद तज्ञ, संशोधक, अभ्यासक यांनी याविषयी संशोधन करून सत्यासत्याचा निर्णय घ्यावा, यासाठी जाणवले ते येथे प्रामाणिकपणाने नोंदविले आहे. पण काही कविता प्रक्षिप्ता असल्या आणि सावित्रीबाईंच्या कवितांची संख्या कमी झाली तरी त्यांनी आधुनिक मराठी साहित्याच्या प्रारंभकाळी साहित्यात जी कामगिरी केली, ती मौलिकच ठरेल, यामध्ये शंका नाही.

सावित्रीबाई फुले या शेतकरी कन्या आहेत. अंत:करणाच्या उर्मीमुळे त्या सत्यशोधक चळवळीत सहभागी होतात. सत्यशोधक विचारांच्या प्रसारासाठी साहित्य निर्मिती होऊ लागली. सावित्रीबाईंही त्यामध्ये सहभागी झाल्या आहेत. सर्वच-सत्यशोधकी वाङ्मय त्याकाळात आणि त्यानंतर प्रदीर्घ काळ मध्यवर्ती(?) साहित्य परंपरेने उपेक्षिते ठेवले. वाङ्मयेतिहासातही त्याची दखल घेतली गेली नाही. सावित्रीबाईंचे साहित्यही याला अपवाद नाही. केशवसुतांची प्रारंभीची कविता सुबोध, प्रवाही, अंत:स्पर्शी नाही. १८९५ नंतर ती प्रौढ व प्रगल्भ झाली. त्यांना पंडिती साहित्य आणि पाश्चात्य साहित्याची परंपरा होती. सावित्रीबाईंना लोकसाहित्य (त्यातही धार्मिक, सण समारंभादी गाणे, जात्यावरील ओव्या इ.) आणि संत साहित्य या परंपरांची पार्श्वभूमी आहे. ह्या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंच्या सामाजिक जाणिवा, आत्मविष्कार शैली, लोकाभिमुखता लक्षणीय वाटते. स्त्रीसाहित्याचा प्रारंभ त्यांच्यापासून मानता येईल एवढी योग्यता त्यांच्या काव्य रचनेत आहे.

## संदर्भ


१) आम्ही पाहिले फुले- पुरोगामी सत्यशोधक-संपादक-रायकर सीताराम; प. आ. १९८१ पृ.५, १९-२०, ३३, ३५, ४०

२) तत्रैव-काळे गोविंद गणपत, पृ. २०

३) रा. ना. चव्हाण, 'कर्मवीर भाऊराव पाटील: शोध आणि बोध' संपादक ठोके, मो.नी. मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे-३० प्रथमावृत्ती १९८७ पृ. १०३

४) माळी, डॉ. मा. गो. 'सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई; प. आ. १९८३ संपा. माळी, डॉ. मा. गो. परिशिष्ट -१ पृ. १०७-१०९

५) आम्ही पाहिलेले फुले, उति पृ. २०-२१ आणि पृ. ४०
६) फडके, डॉ. य. दि., पुरोगामी सत्यशोधक, ऑक्टो-डिसें. १९९६ 'ब्राह्मणेतर वृत्तपत्रांचे अर्थकारण' पृ. ५६
७) तत्रैव, डॉ. फडके य. दि. पृ. ५८
८) तत्रैव, डॉ. फडके, य. दि. पृ. ६०-६१
९) माळी, डॉ. मा. गो. माळी सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय, उनि, मनोगत पृ.१७
१०) तत्रैव संपादकाचे मनोगत, पृ. १८-१९
११) मोरे, डॉ. सदानंद 'तुकाराम दर्शन', गाज प्रकाशन, पुणे अ' नगर. प्र. आ. १९९६ पृ.२४९
१२) म. फुले समग्र वाङ्मय, संपा. कीर-मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प. आ. १९६९ पृ. १४० 'गुलामगिरी'
१३) समग्र केशवसुत, संपा.पंडित, प्रा. म. श्री; पंडित व्हीनस प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण १९७८ पृ. ४१
१४) तत्रैव पृ. ५१
१५) १) आम्ही पाहिलेले फुले, उनी, पृ. १०-११, पृ. ३३, पृ. ४०
२) महात्मा जोतिराव फुले: आमच्या समाजक्रांतीचे जनक, कीर, डॉ. धनंजय, पॉप्युलर प्रकाशन. मुंबई, पुनर्मुद्रण १९७५, पृ. १७९.

# सावित्रीबाईंची भाषाशैली

## डॉ. रा. गो. चवरे

१९ व्या शतकात म. फुल्यांची गद्य आणि काव्य या दोन्ही प्रांतांत विपुल लेखन केले. स्वत:ला मराठी भाषेचे शिवाजी संबोधणाऱ्या पढिक पंडितांच्या गतानुगतिकतेचे अंधानुकरण करून कृत्रिम साहित्य निर्माण करणाऱ्या बोरूबहाद्दरांची त्या काळात उणीव नव्हती. बोजड, गोळीबंद, मराठी भाषेचे अमाप पीक आले होते. त्याचवेळी जोतिरावांनी सरळ, स्वाभाविक, मार्मिक लेखणीने प्रस्थापितांच्या व्यवस्थेचा दंभस्फोट केला. तत्कालीन हस्तीदंती मनोऱ्यातील लेखकांच्या लेखणीपेक्षा फुल्यांची लेखणी सर्वस्वी वेगळी आहे. तिने संस्कृत व इंग्रजीच्या गुलामगिरीतून मराठीला मुक्त केले. स्पष्ट रोखठोक अशा लोकव्यवहाराच्या बोलभाषेत समर्थ निर्मिती केली. वि. रा. शिंदे, वि. द. घाटे, गं. बा. सरदार, स. गं. मालशे, भा. ल. भोळे, भालचंद्र नेमाडे आदी विचारवंतांनी त्यांच्या शैलीचा गौरव केला. जोतिरावांचे लेखन विपुल आहे. तुलनेने सावित्रीबाईंचे मोजके आहे. मात्र त्याची वैचारिक व वाङमयीन गुणवत्ता लक्षणीय म्हटली पाहिजे. सन १८५४ मध्ये त्यांचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह शिळाप्रेसवर छापून प्रसिद्ध झाला; तर 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हा दुसरा कवितासंग्रह सन १८९१ मध्ये प्रकाशित झाला. संग्रहांना दिलेल्या शीर्षकावरून त्यांच्या दृष्टीतल्या लालित्याची जाणीव होते. जोतिरावांना लिहिलेली त्यांची तीन पत्रे वैचारिक भाषेच्या दृष्टीने मौलिक वाटतात. या व्यक्तिरिक्त प्रसंगोपात त्यांनी दिलेली पाच भाषणे आहेत. त्यातून त्यांची तत्कालीन समाजप्रबोधनाची तळमळ स्पष्ट होते.

उपरोक्त लेखनात त्यांनी वापरलेली भाषा ही सामान्य जनांची आहे. लोकभाषेतून जनतेच्या हृदयापर्यंत जे साहित्य पोहोचते ते चिरस्थायी असते, यात शंका नाही. सच्च्या मनाने केलेली ही निर्मिती असल्याने त्यात वास्तवाचे प्रखर दर्शन घडते. उगीच हातचे राखून बोलणे, आडवळणाने सांगणे त्यांना जमत नाही. त्यांच्या प्रकाशित साहित्यातून याचा प्रत्यय येतो. त्यांच्या भाषणाचे विषय सुद्धा निम्नस्तरीय जनमानसाला उद्देशून आहेत. ही भाषणे त्यांना त्यांची हरवलेली अस्मिता शोधण्यासाठी विचारप्रवण करणारी आहेत. उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने, कर्ज या शीर्षकांवरून त्यातल्या आशयाची कल्पना यावी. 'उद्योग' या

विषयावरील भाषणात त्या म्हणतात, ''दैव, प्रारब्ध यावर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुसऱ्यांच्या गुलामगिरीत राहतो, याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय'' अलंकारविरहीत अशा या साध्या वाक्यात, मोजक्या शब्दात दैवाधीन वृत्तीवर प्रखर टीका केली आहे. ''उद्योग हा ज्ञानस्वरूप असून आळस हा दैवाचा मित्र आहे.'' अशीही विचारमौक्तिके अधूनमधून चकाकत असतात. इंग्रज सरकारला त्याही (जोतीरावांप्रमाणे) 'दयाळू' हे विशेषण लावताना दिसतात. बरेचदा त्यांच्या काही वाक्यांतून सुविचारांचा दरवळ येतो. ''कोणत्याही व्यसनाने मनुष्याचा विचारपिंड धुंद होतो.'' (व्यसने) तसेच विद्येचे महत्व सांगताना त्या म्हणतात- ''विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो.'' (विद्यादान) ही वाक्ये त्यांनी जाणीवपूर्वक घडविलेली नाहीत. अशी बरीच वाक्ये त्यांच्या लेखनात इतस्त: विखुरलेली आहेत. मूलत:च त्यांना शब्दाचे भान आहे. भाषेच्या आंतरिक वैभवाची थोरवी ज्ञात आहे. जोतिरावांच्या शैलीतला परखडपणाही येथे काही ठिकाणी जाणवतो. उदा. ''दारूबाज, जुवेबाज, व रंडीबाज ही मनुष्ये माणुसकीला लाथाडून लावतात. ती दुराचारी बनतात'' येथे समाजातल्या भेदक वास्तवाच्या दर्शनासाठी वापरलेली शैली आशयानुरूप नाही; असे कोण म्हणेल? त्यांचे साहित्य वाचताना आपण समाजप्रबोधकांचे सडेतोड, निर्भिड तेवढेच युगधारणेसाठी आवश्यक असलेले परखड विचार वाचीत असल्याची जाणीव होत राहते. मात्र कित्येक ठिकाणी जोतिरावांनी वापरलेले विधिनिषेधविरहित शब्द सावित्रीबाई टाळतात. तरी परिणामकारकतेच्या दृष्टीने त्यांचे लेखन उणे ठरत नाही.

मराठी काव्याला संपन्न अशी दीर्घ परंपरा आहे, तशी गद्याला नाही. (अपवाद केवळ महानुभाव साहित्याचा) आंग्लकाळात विचारप्रवर्तक गद्यलेखनाला सुरुवात झाली. त्यात सावित्रीबाईंचे गद्य, अभ्यासूना प्रेरणा देणारे मौलिक स्वरूपाचे आहे. कधी कधी त्यांची गद्यशैली विलोभनीय रूप धारण करते उदा. ''....एकाचे नाव होते खंडोबा व दुसऱ्याचे नाव होते पिरोबा. दोघांनाही चिलीपिली मुले होती. लग्नाला आलेल्या मुली होत्या. दोघांचाही संसार सुखाने चालला होता. दोन्ही घरे आनंदाने नांदत होती. गावातही त्यांचे वजन होते'' या लहान लहान वाक्यांतील प्रासादिक रचनेतून नकळंत 'लीळाचरित्रांतील गद्यखंडांचे' स्मरण होते. त्यांनी समाजप्रबोधनासाठी वैचारिक साहित्य लिहिले हे खरे असले तरी , उपरोक्त लेखनात कौटुंबिकता, भावनात्मकता व उत्कंठा जाणवते. ''शैली लेखकाचे सारे अंतरंग उघडे करून दाखविते.''[१] त्यांचे लेखन विचार विलासाने

समृद्ध आहे. त्या जेवढ्या जोमदारपणे गद्य लेखन करतात तेवढ्याच सामर्थ्याने ललित लेखनालाही सामोऱ्या जातात. असे असूनही "त्यांच्या वाङ्मयाला व कार्य-कर्तृत्वाला वाङमय म्हणून मान्यता अजून मिळावयाची आहे."[२] त्याचे कारण इथल्या समाजव्यवस्थेतली दबा धरून बसलेली वर्ण प्रवृत्ती हेच आहे.

त्यांनी जोतिबांना लिहिलेली तीनच पत्रे उपलब्ध झाली आहेत. पत्राच्या सुरुवातीला त्या दिनांक आणि नंतर 'सत्यरूप जोतिबा स्वामी यांस, सावित्रीचा शिरसाष्टांग नमस्कार" असे मोजके साधे, आदरार्थी शब्द वापरतात आणि शेवटी 'सावित्री जोतिबा' या स्वाक्षरीने समारोप करतात. त्यांचे रूढ शब्द अर्थवाही असतात. त्यांच्या माफक व्यय लेखनकृतीला कलात्मकता प्राप्त करून देतो. त्यांच्या लेखनाचे ते वैशिष्ट्यच आहे. गद्याची भाषा ही सहज, साधी आणि अकृत्रिम असते. तिच्यात नेमकेपणा असतो. "गद्यामुळे समाजात विवेकशीलता वाढते. अचूक आविष्कार करण्याची सवय लागते"[३] सावित्रीबाईंनी गद्यात्मक पत्राच्या माध्यमातून पतीशी साधलेला हृदयसंवाद हृद्य वाटतो. मात्र त्यात वैयक्तिततेऐवजी समाजमनस्कता सर्वत्र व्यापलेली असते. स्वत:च्या भावाविषयी त्या जोतिबांना पत्रात लिहितात- "भाऊ तसा दयाळू, पण कोत्या बुद्धीचा असल्यामुळे त्यांनी तुम्हास व मला दूषणे देऊन आपली निंदा करण्यास कमी केले नाही." त्यांना अज्ञानाविषयी चीड असली तरी अज्ञानी लोकांविषयी कणव आहे. जोतिबांच्या युगप्रवर्तक कार्याविषयी मनोमन आदर व स्वाभिमान आहे. त्याच पत्रात त्यांच्या आईच्या तोंडचे वाक्य त्या लिहितात- "सावित्री, तुझ्या जिव्हेत सरस्वती नांदत असावी. तुझे ज्ञान ऐकून मी कृतार्थ झालो." येथे वापरलेले क्रियापद पुल्लिंगी आहे. खरे तर ते स्त्रीलिंगी हवे होते. पण तसा बदल केला असता तर तो सत्यापलाप घडला असता. सावित्रीबाईंना क्रियापदाचे लिंग कळत नव्हते; असे नव्हे! येथे नकळत महानुभाव साहित्यातील सत्यान्वेषी दृष्टीचे स्मरण होते. पत्र क्र. ३ मध्ये आलेले महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे उद्भवलेल्या दयनीय अवस्थेचे वर्णन, मन विदीर्ण करणारे आहे. "अनेक लोक क्षुधित व तृषीत होऊन भूमीवर मरून पडत आहेत. कित्येक निवडुंगाची बोंडे अन्न म्हणून खातात व मूत्र पाणी म्हणून पितात व संतोष पावतात. देह त्यागापूर्वी भूकेची व तहानेची इच्छा पुरवितात व मृत्यूच्या स्वाधीन होतात." अलंकारादी गुणयुक्त भाषेशिवाय सत्य जीवनानुभव वास्तवाविष्कारातून प्रकर्षाने प्रतीत होतो. ऐतिहासिक दस्तऐवज म्हणूनही प्रस्तुत पत्राचे महत्त्व आहे.

विषयानुरूप शैलीची बदलती रूपे त्यांच्या लेखनात दृग्गोचर होतात. याच पत्राच्या समारोपातून त्या लिहितात- "तुम्ही जे लोककल्याणकारी कार्य करीत

आहात; त्यास माझ्या हातून सदासर्वदा सहाय्य होत जावो व मी आपल्या दिव्य कर्तव्यकर्म, सेवाकार्यास सहाय्यभूत होवो. एवढीच माझी इच्छा आहे. अधिक उणे काय वर्तावे, ही विज्ञापना.'' येथे त्यांनी आविष्कारात फापटपसाऱ्याला फाटा दिला. त्यांच्या प्रत्येक पत्रात तत्कालीन वर्तमान जीवनाच्या समस्यांचे आकलन व जोतीरावांविषयी असलेली निष्ठ नम्र शब्दात व्यक्त केल्याचे दिसून येते. क्वचित शुद्धलेखनाकडेही त्या दुर्लक्ष करतात, फुले व सावित्रीबाई जनसामान्यांचे प्रतिनिधी होते. आधी मध्ये आणि अंतीही जनसामान्यच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. लेखनातही त्यांची तीच दृष्टी कायम होती. तत्कालीन उच्चभ्रूंनी त्यांची अवहेलना केली तर निम्नवर्गीयांनी त्यांना साक्षात देवी मानले होते. पत्र क्र. २ मध्ये सावित्रीबाईंनी तसा स्पष्टोल्लेख केलेलाच आहे. त्यांच्या यशस्वी जीवनक्रमाचे श्रेय त्यांच्या कर्तृत्वाला आहे तसेच त्यांच्या प्रभावी लेखनशैलीला सुद्धा आहे. ''भाषा शैलीची स्वभावाशी पूर्ण समरसता झाली म्हणजे ती त्या माणसाची स्वाभाविक शैली बनते.'[४]

सावित्रीबाईंच्या विनयशील व्यक्तीमत्वाने जोतिरावांचे 'महानपण' मनोमन मान्य केलेच होते. परंतु कृती-उक्तीतूनही संधी सापडेल तेव्हा त्यांच्या आविष्काराला त्या अग्रक्रम देतात. एकदा कोणी त्यांची स्तुती केली तेव्हा त्या तत्परतेने बोलून गेल्या, ''अहो! माझे कसले कर्तृत्व? मी शून्य आहे. सारे कर्तृत्व यांचे. मी जे करते ते यांच्यासाठी! एखाद्या कुत्रीला शिकविले तर ती सुद्धा माझ्या सारखे काम करील.''[५] एकोणिसाव्या शतकातील एवढ्या अद्वितीय कर्तृत्ववान स्त्रीची ही पराकोटीची विनयशीलता अपवादात्मकच म्हटली पाहिजे. त्यांची पत्रभाषा अकृत्रिम आहे. ती पुस्तकी तर नाहीच नाही. फुल्यांएवढी ती झणझणीत नसली, तरी प्रतिपाद्य विषय नेमक्या शब्दात मांडण्यात ती यशस्वी होते. एवढेच नव्हे, वाचकाला केवळ अंतर्मुखच नव्हे, तर उत्तरकर्तव्योन्मुख करण्याचे तिचे सामर्थ्य वादातीत आहे. त्यांच्या पत्र क्र. २ मध्ये त्यांनी लिहिल्याप्रमाणे गणेश नामक ब्राह्मणाचे सारजा नावाच्या तरुण मुलीशी सूत जमले व पुढचा अनर्थ घडला. गावकऱ्यांना माहीत झाल्यानंतर त्यांनी त्या उभयतांस मारझोड करून त्यांची गावातून धिंड काढली. तेवढ्यात तेथे सावित्रीबाई गेल्या. त्या क्रोधाने पेटलेल्या गावकऱ्यांसमोर प्रभावी वाणीने आपले मनोगत व्यक्त करून त्या उभयतांची सुटका करायला त्यांनी भाग पाडले. म्हणजे सावित्रीबाईंची लेखणीच नव्हे, तर वाणी सुद्धा प्रभावी होती. भाषा ही हृदयसंवाद घडवून आणण्याचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी अनेकदा दाखवून दिले. त्यांच्या भाषेच्या माध्यमातून तत्कालीन जीवनांगांचा शोध घेता येतो. साधी ओघवती, अशी त्यांची

शैली आहे. 'पूर्वसूरींची अलंकारप्रचुरता यात कुठेही नाही'[६] म्हणून जनसामान्यांची त्यांच्या ठायी अतूट निष्ठा आहे. त्यांच्या कर्तृत्वाविषयी विश्वास आहे. स्वत:ला मराठी भाषेचे शिवाजी म्हणवणाऱ्यांची भाषा पंडिती थाटाची असुन वर्गवर्चस्वाचे समर्थन करताना ती संस्कृतप्रचुर होत गेली. दुसरे, आंग्लाळलेले मराठी लेखक आपली साहेबी थाटाची लेखणी परजण्यात धन्यता मानत होते. इंग्रजी शासन भरात असल्याने त्यांच्या भाषेचा बोलबाला वाढल्यास आश्चर्य नव्हे.'' त्या काळात प्रांतिक भाषांना इंग्रजीचा सासुरवास व दु:स्वास होता.''[७] त्याही परिस्थितीत सावित्रीबाईंनी आपले देशीपण अबाधित राखले. एतद्देशीय पांढरपेशांच्या सांकेतिक शैलीचे तकलादूपण त्यांनी जोखले होते. शूद्रातिशूद्रांना मातेच्या ममतेने त्यांनी आपलेसे केले. कधी त्यांच्यातल्या सामाजिक दुरवस्थेचे, तज्ज्ञ शल्य चिकित्सकाच्या नात्याने कठोर परीक्षणही केले. शोषितांना आपल्या गुलामगिरीची जाणीव झाल्याच्या आनंदाचे त्या कृतकृत्य झाल्या. 'बंधमुक्ततेचा हुंकार अपूर्व असतो '[८] सावित्रीबाईंच्या साहित्यांतून तो प्रतीत होतो. भाषा हे साधन मानल्याची प्रतीती येते. (त्याद्वारा त्यांनी युगसमस्यांना हात घातला व कित्येकांना प्रेरणा दिली.)

गद्यलेखनात स्वमतपुष्ट्यर्थ वाक्प्रचार आणि म्हणींचा त्या अधूनमधून वापर करतात. जोतीरावांच्या गुणग्राहकतेची भलावण करूनच त्या थांबत नाहीत; तर प्रसंगी त्यांना धीरही देतात. ''फुल्यांच्या जवळचे त्यांचे अनेक मित्र व हितचिंतक त्यांच्या भूमिकेशी पूर्णपणे तादात्म्य पावले नाहीत.''[९] कृष्णराव भालेकर, नारायणराव लोखंडे यांच्यासारखे एकेकाळचे निकटवर्तीय दूर गेले. फुले हा प्रसंगी आगीचा लोळ. त्याला कोणी शांतवावे? ते कार्य या सोशिक, धैर्यशील सावित्रीबाईंनी आपल्या प्रेमळ धीरोदात्त शब्दांनी केले. त्यांच्या पत्रावरून हे स्पष्ट दिसते. थोर पुरुषाची पत्नी होणे ही तारेवरची कसरत असते म्हणतात. सावित्रीबाईंनी ती भूमिका लीलया पेलल्याचे दिसते. भूतभविष्याचा वेध घेणारी शोधक दृष्टी त्यांच्या भाषणांतूनही व्यक्त होते. विशेष म्हणजे त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते. जोतीरावांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ यशस्वीपणे राबविण्यात त्यांच्यांतल्या कर्तृत्ववान युगस्त्रीचे दर्शन घडते. म्हणूनच केवळ ''ती पतीच्या क्रांतिकार्यात सहभागी झालेली शालीन गृहिणी होती.''[१०] हे मत चिंताजनक वाटते. वास्तविक पाहता जोतीरावांच्या किंवा त्यांच्या स्वत:च्याही साहित्यातून दिसणारा त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख स्पष्ट आहे. त्यांचे साहित्य म्हणजे टाकसाळी नाणे नाही. त्यात सुखवस्तू जीवनातील सूर्योदय, सूर्यास्त बघण्याचा वेळकाढूपणा किंवा पांढरपेशांचा औपचारिकपणा नाही. मोकळी,

टवटवीत, जिवंत बोलीभाषेचा बाज लाभलेली - वास्तवानुगामी अशी त्यांची शैली जोतीबांच्या शैलीइतकी झणझणीत व बोचरी नसेल; मात्र जोतीबाप्रमाणेच त्यांनीही सामाजिक दायित्व स्वीकारलेले असल्यामुळे क्वचित प्रसंगी विदारक, कटू सत्याचेही दर्शनि ती घडविते. उदा. ''मोगलाच्याही बापाचा हिंदुस्थान होता की काय कोण जाणे! जे त्यांनी आपले पाय येथे रोवले. तेथे इतिहास असा आहे की, हिंदुस्थान हा इंडियन लोकांचा असून त्याच्यावर परकीयांनी राज्य केले. त्याला कारण अज्ञान हेच होय. दोन हजार वर्षे इंडियन लोक अज्ञानात राहून पशूजीवन जगावेत हे महदाश्चर्य नसून भट भिक्षुकांचा तो कावा आहे. तो आपणास इंग्रजी ज्ञानाने उमगला''(११)

ग्रामीण माणूस इथल्या समाजाचा केंद्रबिंदू आहे. त्याला डावलून आंग्लकाळात उच्चभ्रूंनी विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती केली. त्यामुळे त्यांच्या साहित्याला प्रतिनिधिक स्वरुप प्राप्त होऊ शकले नाही. उच्चभ्रूंनी झिडकारलेला माणूस सावित्रीबाईंच्या साहित्यात अधिनायक आहे. त्यात त्याच्या आशा-आकांक्षा त्याच्याच बोलीतून मुखरित होताना दिसतात. व्यापक मानवतेला हे साहित्य साद घालते. ही त्याची स्वयंसिद्धता लक्षणीय आहे.

सन १८५४ मध्ये त्यांचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. त्यानंतर तीस वर्षांनी केशवसुतांनी कविता लिहिली. यावरून सावित्रीबाईंच्या कवितेत त्यांच्याच स्वतंत्र काव्यात्म जाणीवेचा प्रत्यय येतो. हे उघड आहे. उपरोक्त संग्रहात एकूण एकेचाळीस रचना असून त्यांची विभागणी ढोबळमानाने सात प्रकारांत करता येते. काव्यविषयक, प्रार्थनापर, बोधपर, आत्मपर, निसर्गपर, सामाजिक जाणीवपर आणि स्फुट. या कवितांतून त्यांच्या ठिकाणी असलेल्या प्रतिभेचे दर्शन घडते. ''काव्याचे जग हे उत्कट भावरंगात रंगून वाहून जाण्याचे जग असते''(१२) याचा प्रत्यय ही कविता वाचताना येतो.

*सरोवर मानस सुवासिक फुलांचे*
*तिथे बांधितो महाल कमळांचे*
*चार विद्येची चौसष्ट कलांची*
*सुबक नवरत्ने त्यावर रसांची*

कवयित्रीचे मानससरोवर हे सुगंधी फुलांचे बनलेले असून त्यात कमळाचे महाल बांधण्याची आकांक्षा त्या व्यक्त करतात. त्यांची काव्यदृष्टीच येथे व्यक्त होते. निसर्ग व मानवी जीवन यांतील अतूट कोमल नाते येथे रुपसिद्ध होऊ पाहते. कल्पनेला भावनेची जोड असली म्हणजे कवितेला उत्कटता लाभते. कवीविषयी त्या लिहून जातात.

*अनुभव घेतो स्वर्गाचा*
*भोग भोगतो नरकाचा*

कविता ही वीजेसारखी असते. तिला हातात धरू पाहणारे शेकडा नव्याण्णव जळून खाक होतात असे केशवसुत म्हणतात. तर सुरेश भट कवीचे जीवन कसे उद्ध्वस्त होते ते सांगताना म्हणतात.

*एकदा केव्हातरी मी वचन कवितेला दिले.*
*राखरांगोळीस माझ्या मज हसावे लागले.*

काव्यलेखन करणाऱ्या या तिघांच्याही विचारांचा सूर एकच येतो. कवी आपल्या जीवनात अन्याय, अत्याचार, मानहानी, दैन्य, वेदना यांचे हलाहल पचवून कवितेच्या रुपाने जगाला अमृत देतो. कवयित्री सावित्रीबाईंचे जीवन याच कोटीतले. आपल्या काव्याविषयी आत्मविश्वास व्यक्त करताना त्या लिहून जातात-

*'कधी कल्पी मी विश्वमित्र आहे*
*काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे.'*

सावित्रीबाईंच्या नंतर कविता लिहिणारे केशवसुत म्हणतात- 'आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे.' सावित्रीबाईंची अधिकतर कविता सामाजिक जाणीवपर आहे. 'केवळ कल्पनेचा बडेजाव ही कविता मिरवीत नाही तर ती स्वजीवनाप्रमाणेच जनजीवनाशीही एकरुप होत जाते.'[१३] केशवसुतांनी सामाजिक जाणीवेच्या कविता लिहिण्यापूर्वी तीस वर्षे आधी सावित्रीबाईंनी या विषयाची कवितेतून पायाभरणी केली होती. तत्कालीन जीवन- समस्यांचे त्यांना गाढ आकलन होते म्हणूनच; 'त्या श्रेष्ठ युगकवयित्री ठरतात.'[१४]

मराठी साहित्यातच कवितेला दैदिप्यमान परंपरा आहे. श्लोक, अभंग, ओवी, आर्या अशा विविध रुपांत ती प्रसवते. सावित्रीबाईंचा संतकवींच्या काव्याचा सखोल अभ्यास असावा असे दिसते.

*जगी सर्वसूखी असा कोण आहे*
*विचारी मना तूचि शोधूनी पाहे*
*मना त्वाचिरे पूर्वसंचित केले*
*तयासारखे भोगणे प्राप्त झाले*

या समर्थ रामदासांच्या कवितेत पुढीलप्रमाणे नेमके शब्द बदलून उत्तर देण्याचा त्या प्रयत्न करतात

*जगी सर्व सुखी असा एक आहे*
*विचारी मना तूच शोधून पाहे*
*मना त्वांचिरे ज्ञान संचित केले*
*तयासारिखे सौख्य हे प्राप्त झाले ॥*

शब्दात बदल करताना त्या अल्पाक्षर व नेमकेपणा याला महत्त्व देतात व काव्याच्या प्रेरणादायी व प्रभावी शब्दात आपले शिक्षणाविषयीचे ईप्सित समाजाच्या मनावर बिंबवितात. त्यांच्या सामाजिक जाणीवेप्रमाणेच शब्दांची जाणीवही प्रगल्भ आहे. नेमक्या शब्दातून अपेक्षित अर्थनिष्पत्ती साधण्यात त्यांचा हातखंडा आहे. म्हणून त्यांची कविता वाङ्मयीनदृष्ट्या समृद्ध आहे.[१५] हे मान्य करावे लागते.

सावित्रीबाईआजन्म संघर्षमय जीवन जगल्या. कधी परकीयांकडून तर कधी स्वकीय आप्तेष्टाकडून टीकेचा अव्याहत भडिमार सुरू असताना एखाद्या धैर्यवान वीर पुरुषाप्रमाणे न डगमगता प्रत्येक प्रसंगाला सामोरे जाण्यात त्यांचे जीवन व्यतीत झाले. आप्तेष्टांचा यशवंतरावांना विरोध असल्यामुळे जोतीरावांच्या प्रेतयात्रेपुढे त्यांनी टिटवे (मर्तिकापुढे धरावयाचे) धरण्याचे काम केले, असे हे संघर्षग्रस्त जीवन! मात्र या जीवनाच्या काठाकाठाने काव्याचे निर्झर अविरत वाहताना दिसतात. म्हणूनच सन १८९१ मध्ये त्यांचा दुसरा काव्य संग्रह- 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' प्रसिद्ध झाला. जोतीरावांच्या निधननंतर एक वर्षानि आणि त्यांच्या स्वत:च्या मृत्यूपूर्वी सहा वर्षे हा कविता संग्रह रसिकांपुढे आला. याचाच अर्थ असा की, त्या जीवनभर अधूनमधून कविता लिहीत असाव्यात. समाजक्रांतीचे असिधाराव्रत पत्करलेल्या या वीरांगनेची कविता इतर प्रसिद्धी माध्यमांतूनही प्रसिद्ध झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. '१९ व्या शतकात नवप्रबोधनाच्या नेत्यांनी लोकमाध्यमाच्या साधनांकडे दुर्लक्ष केले नाही.''[१६] सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा हा काव्यात्मपैलू महत्त्वाचावाटतो. 'बावन्नकशी...' मध्ये बावन्न कडवी आहेत. त्याच्या उपोद्घाताच्या पहिल्या कडव्यात त्या लिहितात-

*जयाचे मुळे मी कविता रचिते*
*जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते*
*जयाने दिली ही बुद्धी सावित्रीला*
*प्रणामा करी मी यती जोतीबाला ॥*

जोतीरावांविषयी पूज्य बुद्धीने कृतार्थता व्यक्त करताना स्वत: त्या कमालीची लीनता धारण करतात. येथील 'यती' हे जोतीबांना लावलेले विशेषण खूप बोलके आहे. (जोतिबा आजन्म व्यतीत करतात ते यतीचेच जीवन!) याच संग्रहातल्या शेवटच्या बावन्नाव्या कडव्यात काव्यप्रयोजन सांगताना त्या म्हणतात-

*जरी यातले थोडके ज्ञान झाले*
*तरी या श्रमाचे खरे चीज झाले*

या कडव्यातल्या शेवटच्या दोन पंक्तीत रसिकांना नम्रपणे आवाहन करतात-

*मला काव्य माझे कसे सत्य सांगा*
*मनोहर का रम्य तुम्हीच सांगा*

अशी ही विनयवती कविता आहे. प्राय: रूक्ष विषयही ओघवती प्रासादिक व भावुक शैलीमुळे उत्कट, विलोभनीय रूप धारण करतो. "काव्यात्म भाषा ही अपरिहार्यपणे सामान्य व्यावहारिक भाषेहून वेगळी" (१७) असणे हे तिचे अंगभूत वैशिष्ट्यच! समर्थ कवितेत ते केव्हाही जाणवतेच.

*जैसे रतीला। मदन खेळवी*
*तैसे कवीचे। मन चेतवितो*
*गूढपणे तो। मनात शिरूनी*
*काव्य कराया। उन्मुख करतो*

अशा मोजक्या शब्दातली ही सौदर्यवादी जाणीव कल्पनाजन्य शब्दबंधातून चित्तवेधक रूप धारण करते. तर -

*रात्री बनते जणू रती ती*
*सुगंध खेळवी कळी जाईची*

यातली गंधवेल्हाळ काव्यात्मता विलोभनीय भासते. बालकवींनी कवितेतून निसर्ग साकार करून रसिक मनाची दाद घेतली. त्यांच्या कित्येक वर्षे आधी सावित्रीबाईंनी केवळ सुंदरच नव्हे तर उत्कट निसर्ग कविता लिहिली. 'मानव आणि सृष्टी' या कवितेतील पुढील पंक्ती पाहण्यासारख्या आहेत.

*झिमझिम येई पाऊस पडतो बहरली सृष्टी सारी*
*फळाफुलांचा वेलबुट्टीचा नेसते शालू सारी*
*कोकिळ गाते कुहुकुहुनी मोर डोलुनी नाचे*
*फुलाभोवती आनंदाने फिरती भुंगे चाचे*

येथील 'भुंगे चाचे' ही प्रतिमा खूप बोलकी आहे. मात्र सावित्रीबाईंचा खरा पिंड समाजक्रांतिकारकाचा. त्याच्या अविष्कारात त्यांच्या काव्योर्मीला खरी झळाळी येते. समाजातील गतानुगतिकतेवर व अंधश्रद्धेवर त्या कवितेतून अस्त्र परजताना दिसतात.

*गोट्याला शेंदूर फासुनी तेलात*
*बसवी देवात दगड तो*

किंवा

*नवस करती, बकरू मारीन*
*नवस फेडती, बाळजन्मी*

येथे अंधश्रद्धाभंजक गाडगेबाबांचे स्मरण होते तर-

*धोंडे मुले देती, नवसा पावती।*
*लग्न का करती, नारीनर॥*

येथे तुकारामाच्या कवितेचे स्मरण होते

*''दुष्काळ ही पापाची गती। शूद्रादि अतिशूद्र भोगती*
*चमचमीत खाऊन वदती। पुण्यातले पुण्यवान॥''*

हे तत्कालीन विदारक सत्य आहे. 'पुण्यातले पुण्यवान' या शब्दांत व्याजस्तुती आहे. सामाजिक आशयाच्या कवितेत त्यांच्या शब्दाला अशी वेगळीच धार येते. सामाजिकता हे तर जणू त्यांचे जीवन पाथेयच होते. समाज प्रबोधन एवढेच त्यांचे कार्य नव्हते; तर समाजपरिवर्तनाची त्यांना ओढ होती. त्यासाठी त्या शिक्षणातून होणाऱ्या संस्कारावर अधिक भर देतात. ज्ञानविरहीत सामान्य माणूस पशुतुल्य जीवन जगत असल्याचे त्या स्पष्टपणे सांगतात. साध्या प्रवाही पद्धतीने त्यांनी आपल्या कवितेतून मांडलेले विचार युगायुगाला नवसंजीवन देणारे आहेत. उदा.

*जया जन्ममृत्यू कळेना जराही*
*म्हणोनी पशूसारखे कष्ट साही*
*नसे बुद्धी ज्याला नसे ज्ञान काही*
*अशा मानवाला कधी सुख नाही॥*
*म्हणे बांध शेती पहाया विहिरी*
*पहा पीक माझे कशी छान ज्वारी*
*मला गौरकांती तशी गोड पुत्री*
*असा दंभ ज्याला नसे तो सुपात्री*

उपरोक्त कडव्यातील त्यांची प्रसादगुणयुक्त ओघवती शैली थेट मनाला जाऊन भिडते. सामान्य माणसाच्या सामान्य जीवनकांक्षा असतात.आपल्यापलीकडे सर्वदूर पसरलेल्या समाजजीवनाशी त्याला काही कर्तव्य नसते, हे पाहून सावित्रीबाई व्यथित होतात. त्यांचे अज्ञानजन्य जीवन अधोरेखित करतात. मात्र त्यांच्या शब्दात कडवटपणा येत नाही. कोणत्याही विलक्षण शब्दाचा अवलंब न करता एकंदर वस्तुस्थितीचे त्या यथार्थदर्शन घडवितात. परिस्थितीजन्य वा परंपरेने चालत आलेल्या समाजाच्या मानसिकतेचे अलंकारविरहित सहज शब्दात त्यांनी घडविलेले दर्शन नेहमीच हृद्य वाटते. पेशव्यांच्या स्त्रैणवृत्तीचे, तत्कालीन स्त्रियांच्या उध्वस्त स्त्रीत्वाचे, क्रियाशून्य नवऱ्याच्या निर्लज्जवृत्तीचे त्यांनी कवितेच्या माफक शब्दात असेच रेखाचित्र साकार केले आहे. साध्या शब्दबंधातून त्या त्या

विषयाची परिणामकारकता साधण्यात त्यांच्या कवितेची कृतार्थता आहे. प्रबोधनकार्याच्या दृढीकरणार्थ आयुष्य वेचणाऱ्या या युगप्रवर्तक कवयित्रीला भावनेच्या सातत्याने आजन्म कार्यप्रवण ठेवले. याचे प्रतिबिंब या शब्दात उमटले आहे.

ओवी, अभंगामध्ये त्यांनी यशस्वीपणे रचना केल्या, उपमा, उत्प्रेक्षांचा त्या अधूनमधून अवलंब करताना दिसतात. त्यांच्या लेखनात अंत:करणाचा कळवळा, भावसधनता, नाट्यात्मकता, विषयानुरोधाने शैलीची बदलती रूपे यांचा प्रत्यय येतो. त्यांनी साहित्याकरिता साहित्य निर्माण केले नाही; तर समाजप्रबोधनाची अंत:स्थ आस्था समोर ठेवून त्यांची लेखणी झिजली. म्हणूनच तिच्यात जनप्रवर्तन क्षमता आहे. त्यांच्या काव्यातली रसवत्ता लक्षणीय म्हटली पाहिजे. 'पिवळा चाफा', 'मानव व सृष्टी', 'द्रष्टा कवी' या कवितांत ती जाणवते. सुबक नवरत्ने, दिव्यसृष्टीचे काव्य, सद्भावनांचा पर्जन्य, शिवार, मकरंद, अभिरूप या प्रतिमांतली/शब्दांतली आशयघनता त्यांच्या नेमक्या वापराने लक्षणीय वाटते. तत्कालीन जनजीवनाशी कृती, उक्तीने एकरूपलेखा सावित्रीबाईंच्या लेखनात बरकर, कामगिर, कितीएकास, यांसारखे तत्कालीन लोक जीवनातले रूढ शब्द आणि नेटीव्ह, इंडियन यांसारखे नित्याच्या व्यवहारातले इंग्रजी शब्द येतात. त्यांची भूमिका आदर्श शिक्षिकेची आहे. त्यानुरोधानेच त्यांचे लेखन झालेले दिसते. निसर्गविषयक, काव्यविषयक,सामाजिक जाणीवपर यांसारख्या विषयांवर सर्वप्रथम त्यांनीच काव्य लिहिले. त्यामुळे उद्याच्या चोखंदळ अभ्यासकांनी आणि साक्षेपी संशोधकांनी केशवसुतांऐवजी सावित्रीबाईंना मराठी कवितेच्या आद्य प्रवर्तिका म्हणून संबोधले तर आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही.

## संदर्भ सूची


१) डॉ. जान्हवी संत 'मराठी वाङ्मयीन निबंध', आ. ५ वी १९८९, पृ. ४८

२) डॉ. मा. गो. माळी 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', प्रस्तावना पृ. ४१

३) डॉ. भालचंद्र नेमाडे, 'टीकास्वयंवर' प्रथमावृत्ती, १९९०, पृ. २५३

४) ग. वि. केतकर 'म. फुल्यांचे विचार आणि कार्य वस्तुस्थिती आणि विपर्यास, लेखक प्रा. रमेश ढापरे, प्र. आ. १९८९, पृ. ५८

५) सौ. फुलवंताबाई झोडगे, 'पहिली भारतीय शिक्षिका: सावित्रीबाई फुले', द्वि. आ. १९९४ पृ. २७




वाय ४८-१०

६) कृ. पं. देशपांडे, 'म. फुले गौरव ग्रंथ' खंड १ ला, द्वि. आ. १९९१, पृ. ४७६
७) प्रा. भ. श्री. पंडित 'विदर्भ साहित्यसंघाची साहित्य संमेलने, अध्यक्षीय भाषणे', प्र. आ. १९८३, पृ. १८४
८) डॉ. गंगाधर पानतावणे, दलित साहित्य, 'संपादक शरणकुमार लिंबाळे प्र. आ. १९९१, पृ. १०४
९) गं. बा. सरदार, 'म. फुले व्यक्तित्व आणि विचार', तृ. आ. १९८८, पृ. २१३
१०) डॉ. स. गं. मालशे, तारतम्य, प्र. आ. १९८७, पृ. ४९.
११) सावित्रीबाई फुले 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', पृ. ९७
१२) रा. ग. जाधव, निळी पहाट, द्वि. आ. १९७९, पृ. ८५
१३) प्रा. जयंतकुमार बंड, 'अक्षरवैदर्भी', जा. फे. मा. ९७ संपादक डॉ. सुभाष सावरकर, पृ. ६
१४) डॉ. सुभाष सावरकर, 'अक्षरवैदर्भी' जू. जु. १९९७ पृ. ४५
१५) कृ. पं. देशपांडे, 'म. फुले गौरव ग्रंथ' खंड १ ला द्वि. आ. १९९१ पृ. ४७७.
१६) डॉ. रा. चिं. ढेरे, 'लोकसाहित्य शोध आणि बोध', प्र. आ. १९९०, पृ. ६४
१७) डॉ. सूर्यकांता अजमेरा, 'शोकात्मिका : काही विचार' प्र. आ. १९९३, पृ.११८

*

# जनप्रबोधनाचे आविष्कार: सावित्रीबाईंची पत्रे, भाषणे, संकलने

**निरंजन माधव**

अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाचा दिवा घेऊन दशदिशा उजळणारी व समाजाचे सर्वांगीण उत्थान घडवून आणणारी सावित्रीबाई, एक युगस्त्री होती. क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी इथली अमानुष व्यवस्था नाकारून शोषणाचे, अन्यायी दुष्ट रूढी-परंपरांचे बुरूज उद्ध्वस्त करण्याचा चंग बांधला. महात्मा जोतिबांच्या पावलावर पाऊल टाकणारी ही स्त्री कर्तृत्वाची चिन्मय मूर्ती होती. अज्ञानाच्या काळोखात खितपत पडलेल्या समाजाला नवजागृतीची, आत्मभानाची पहाट तिनेच दाखविली. आपल्या न्याय्य, मानवी हक्कांप्रति जागरूक राहून अत्याचारी, शोषक वृत्तीविरुद्ध संघर्षासिद्ध होण्याचा क्रांतिकारक विचार समाजापुढे ठेवला. पर्यायाने या समाजाला आपल्या अस्मिता रक्षणाचाच मंत्र देऊन विचारप्रवृत्त करण्याचा विडा त्यांनी उचलला होता. सावित्रीबाईंच्या प्रत्येक कृती-उक्तीमागे समाजकल्याणाची व्यापक व अत्यंत प्रबळ अशी कळकळ होती. केवळ पती सांगतात, म्हणून त्याचे आज्ञापालन करणारी व त्याला संतोष लाभावा, पतिनिष्ठेचे व्रत चालवावे म्हणून कार्य करणारी स्त्री; एवढ्याच सीमीत अर्थाने सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्व समजून घेणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. उलट सावित्रीबाई ही स्वतंत्र, स्वायत्त प्रतिभेचे देणे लाभलेली, विलक्षण बुद्धिमत्ता लाभलेली स्वयंप्रेरित, सेवाभावी, स्वयंप्रज्ञ कर्तबगार स्त्री होती. समाजक्रांतीचे निशाण खांद्यावर घेऊन समाजाला क्रांतीकार्यात सहभागी करून घेणारी उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवादी रणरागिणी होती. केवळ महात्मा फुल्यांची अर्धांगिनी म्हणून नव्हे तर 'भारतीय समाजक्रांतीच्या जननी' म्हणून सावित्रीबाईंची ओळख महाराष्ट्राला व्हायला हवी. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाचा इतिहासच सावित्रीबाई फुल्यांपासून खऱ्या अर्थाने सुरू होतो; हे आपल्याला मान्य केले पाहिजे.

क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे हे बुद्धिवैभव, अभिजात प्रतिभा आणि अन्यायावर, दुष्ट रूढींवर तुटून पडण्याची वृत्ती त्यांच्या वाङ्मयातून प्रतिबिंबित झालेली दिसते. त्यांचे लेख-कविता, त्यांची भाषणे, त्यांची पत्रे, त्यांचे अनुवादकार्य या गोष्टीची साक्ष देण्यास समर्थ आहेत. इतकेच नव्हे, तर सत्यशोधक समाजाच्या

गावोगाव स्थापन केलेल्या शाखांमधून व इतरत्र अनेकदा जोतिबांनी समाजोद्धाराच्या तळमळीतून जी ओजस्वी भाषणे दिलीत, त्या भाषणांचे संकलन-संपादनसुद्धा सावित्रीबाईंनी अत्यंत साक्षेपाने केले. या संपादित भाषणांतून, त्यांनी जोतिबांना लिहिलेल्या पत्रातून, स्वतंत्रपणे त्यांनी दिलेल्या भाषणांतून त्यांची प्रतिभा, त्यांचे बुद्धिवैभव आणि नव्या पद्धतीने विधायक जाणिवेतून जीवनाचा अर्थ सुनिश्चित करण्याची क्रांतिकारकता, या गुणांचे दर्शन घडते. या त्यांच्या स्फुट स्वरूपातील अभिव्यक्तीतून आपल्याला ठळकपणे सावित्रीबाईंचे ज्योतिर्मयी व्यक्तिमत्व प्रतीत होते. त्यांच्या स्वतंत्र, स्वायत्त, गुणसंपन्न युगप्रवर्तकत्वाचे तेजस्वी दर्शन घडते. सावित्रीबाईंची पत्रे, भाषणे, त्यांनी संपादित केलेली जोतिबांची भाषणे या त्यांच्या रचनाकर्तृत्वाच्या अंगाने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणे इथे अपेक्षित आहे.

सावित्रीबाईंचे साहित्य हे शूद्रातिशूद्र व स्त्रियांच्या जागृतीचे, प्रबोधनाचे साहित्य आहे. तत्कालीन समाजजीवनातील प्रतिगामी विचारांच्या कुजलेल्या, अमंगळ डबक्याला विरोध करणारा पुरोगामी विचारांचा प्रवाह यातून वाहताना दिसतो. विचारगर्भ आशयाने अलंकृत अशी शैली या रचनांमधून आढळते. क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी भाषणांसाठी जे विषय निवडले आहेत, त्यातूनही त्यांच्या बुद्धिची चुणूक जाणवते. प्रचलित समाजजीवन ज्या कारणांमुळे दुःख, दारिद्रय, अवमान व शोषण यांच्या गर्तेत सापडले होते; त्याची नेमकी कारणपरंपरा सावित्रीबाईंनी शोधून काढली व ती निर्भिडपणे समाजापुढे मांडली. या समाजाचे हे दैन्य, शोषण संपवायचे असेल तर त्यांच्यात कर्तृत्वनिष्ठा, उद्योगप्रीती निर्माण व्हावी, त्यांचे अज्ञान दूर सारले जावे, हा सर्वहारा-शोषित-वंचित-अज्ञानी समाज सदाचरण प्रवृत्त व्हावा, व्यसनमुक्त व्हावा अशी त्यांना आस लागून होती. कर्जाच्या खाईत खितपत न पडता, स्वकर्तृत्वावर, प्रामाणिक कष्टांवर ज्ञानाच्या सहाय्याने हा समाज विकसित, सुस्थापित, समृद्ध व्हावा या अपेक्षेतून सावित्रीबाईंनी ही भाषणे दिली. सामाजिक जीवनातील ही दारूण अवस्था, अपार दारिद्रय, शोषण, अज्ञानाची घनदाट पटलं उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांनी आपली कंबर कसली. जनजागरणार्थ त्यांनी जी भाषणे दिली, त्यांचे विषय असे:- १) उद्योग २) विद्यादान ३) सदाचरण ४) व्यसने ५) कर्ज हे विषय निवडून लोकांना उद्योगप्रवण करण्याचा यत्न त्यांनी आरंभिला. या भाषणांमधून सावित्रीबाईंचे समग्र जीवनचिंतनच जणू काही अर्करूपाने आविष्कृत झाले आहे. या भाषणातील ओळीओळीतून जनतेसंबंधी त्यांना वाटणाऱ्या कळवळ्याचे, सहानुभावाचे दर्शन आपल्याला घडते. साध्या-साध्या शब्दांच्या साहाय्याने सावित्रीबाईंनी अज्ञ

समाजापुढे आपला विषय मांडला. जनताजनार्दनाविषयी वाटणारा आंतरिक कळवळा, आपल्या विचारांच्या आविष्कारासाठी प्रगल्भ शब्दांची केलेली योजना, शोषितांच्या उत्थानाची तळमळ व त्यांच्या परिवर्तनाची अंतर्यामीची कळकळ यांनी ही भाषणे नटलेली आहेत. सामाजिक अस्वास्थ्याचे नेमके निदान करून त्या अस्वास्थ्याचे निराकरण करणारी प्रभावी उपाययोजनाही अत्यंत समर्पक पद्धतीने त्यांनी सुचविली आहे.

'उद्योग' या भाषणातून सावित्रीबाईंनी दैवशरण मनोवृत्तीवर आपल्या शब्दांचे आसूड उगारले आहेत. 'देरे हरि खाटल्यावरी' किंवा 'बाबा, हे जांभूळ माझ्या हाताजवळ पडले, ते माझ्या तोंडात टाक' अशा मनोवृत्तीच्या व्यक्तींवर अत्यंत तिखट शब्दांत त्यांनी टीका केली आहे. 'दिवसभर न थकता उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तमधर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. या मित्राशिवाय कल्याण करणारा दुसरा कोणी मित्र जगाच्या पाठीवर नसतो, याची प्रत्येकाने खूणगाठ बांधून ठेवावी' असे त्या म्हणतात. सावित्रीबाईंनी या भाषणात देव, दैव, यांच्याच आधीन राहून आपल्या प्रगतीला खीळ घालणाऱ्या लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. पूर्वसंचित, पापपुण्य, कर्मविपाक, प्रारब्धशरणता या सर्व वृथा- काल्पनिक विश्वातून मनुष्याप्राण्याने बाहेर पडावे आणि उद्योगी बनून स्वत:चे व समाजाचेही जीवन सुखी करावे, असे आवाहन करायला त्या विसरत नाहीत. सावित्रीबाईंनी उद्योगाचेही 'विचारी उद्योग' व विचार नसलेला उद्योग' असे वर्गीकरण केले आहे. त्यासाठी त्यांनी पुढील समर्पक उदाहरणे दिली आहेत. अभ्यास करणे हा एक विचारी उद्योग आहे. या उद्योगात डोळे, कान व बुद्धी या इंद्रियांची जरूरी असते. उलटपक्षी 'दे ग माई, भाकरी मला' असे ओरडत भीक मागणे हाही एक उद्योग पण त्यास विचार नसलेला उद्योग असे त्या म्हणतात. एखाद्या गोष्टीचा विचार करताना त्या किती सूक्ष्मतेने त्याचा अभ्यास करीत व त्याची सर्व अंगे-उपांगे ज्ञात करून घेत, हेच यातून स्पष्ट होते.

याच भाषणात सावित्रीबाईंनी अज्ञानी, दैवशरण भारतीय लोक व विज्ञानाची कास धरून प्रगती करून घेतलेले युरोपिअन लोक यांची तुलना केली आहे. युरोपियांनांनी दैववाद, देवभोळेपणा नाकारुन स्वत:ला उद्योगात जुंपून घेतले, म्हणून त्यांची प्रगती झाली हेही त्यांनी साधार स्पष्ट केले. इंग्रजांचे व्यापारार्थ इथे येणे, हळुहळू या देशाचे राज्यकर्ते बनणे हा त्यांच्या उद्योगाचा व बुद्धिशक्तीचा चमत्कार असून त्यात दैवाचा संबंध नाही; हेही त्यांनी लोकांना निक्षून सांगितले. 'दैव, प्रारब्ध यावर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून, त्यांचा देश

नेहमीच दुसऱ्याच्या गुलामगिरीत राहतो, त्याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय, असेही त्यांनी अत्यंत निर्भिडपणे सांगितले. इंग्रजी लोकांच्या आगमनाने येथील शूद्रादिअतिशूद्रांना हळुहळू विद्येची गोडी लागत असून, क्रमाक्रमाने त्यांचे पाऊल उद्योगाकडे पडत चालले आहे. यावरून आपण सारे शूद्रादिअतिशूद्र लोक पशुजीवनातून खऱ्या मनुष्यजीवनाकडे जात आहोत, असे खचित अनुमान करता येते; असेही त्या म्हणतात.

उद्योग हाच माणसाचा तारणहार आहे. उद्योगाशिवाय माणूस जीवनात यशस्वीच होऊ शकत नाही हे त्यांनी ओळखले होते. आपला अज्ञ-निरक्षर असंस्कृत-शोषित समाज उद्योगप्रवण व्हावा त्यासाठी त्याने विद्या घ्यावी हीच एक आस त्यांना लागून राहिली होती. 'उद्योग हा ज्ञानस्वरूप असून आळस हा दैवाचा मित्र आहे.' अशासारखी सुभाषितवजा वाक्ये या भाषणाच्या उत्तरार्धात आली आहेत. 'आळस हे दरिद्रीपणाचे लक्षण आहे.' असे त्यांचे निरीक्षण-चिंतन आहे.

'विद्यादान' या विषयावरील भाषणात सावित्रीबाईंनी सर्व दानांमध्ये विद्यादानाची महती श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. विद्यादानाचे महत्त्व प्रतिपादन करण्याआधी मानवाचे जीवन सुखी-संपन्न करणाऱ्या विविध गुणवैशिष्ट्यांविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले आहे. कुठलेही दान सत्पात्री पडणे कसे आवश्यक आहे हे पटवून दिले आहे. विद्यादानासंबंधी सावित्रीबाई म्हणतात, 'आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्‌गुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली, निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो.' असे विद्येच्या संदर्भातील अत्यंत मौलिक चिंतन सावित्रीबाईंनी व्यक्त केले आहे. विद्येकडे पाहण्याच्या त्यांच्या सखोल, व्यापक दृष्टीचीच साक्ष वरील विवेचनातून आपल्याला पटते.

'इंग्रज सरकारने ज्ञानदानासाठी शाळा काढल्या. पण त्या थोड्या असून त्या तेवढ्यावरच राहिल्या तर सारा हिंदुस्थान शिकलेला होण्यास आणखी दीडशे वर्षे लागतील, अशी माझी ठाम समजूत आहे.' सावित्रीबाईंच्या या उद्‌गारातून त्यांचे द्रष्टेपण केवळ वर्तमानाचाच नव्हे तर भविष्याचाही दूरगामी, विचार करू शकण्याइतकी प्रगल्भता सावित्रीबाईंच्या ठिकाणी होती. सावित्रीबाईंनी आपल्या सभोवतीच्या समाजाचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. माणसाची अवनती, अवहेलना त्यांना बघवत नव्हती. माणूस असूनही पशुतुल्य जीवन जगणाऱ्या या

समाजाला विकासोन्मुख व विचारप्रवृत्त कसे करता येईल हा एकच ध्यास त्यांना लागलेला होता. त्यांच्या विचारांचा, चिंतनाचा केंद्रबिंदू, सर्वहारा, शोषित, उपेक्षित असा समाजच होता. सर्वसामान्यांविषयीचा हा कळवळा व्यक्त करतांना त्या म्हणतात, 'महार, मांगादि शूद्र-अतिशूद्र, प्रत्येक गावात बारा बलुते, बारा आतुले व धनगर, माळी, कुणबी इत्यादी लोक राहत आहेत. त्या लोकांजवळ ज्ञान, कला, चिवटपणा वगैरे गुण आहेत. पण त्याचा उपयोग आजपर्यंत सरकारने करून घेतला नाही. त्यांच्या गुणांकडे हेळसांड व दुर्लक्ष करून राजेलोकांनी राज्ये केली.' आपल्या मनात जाचत असलेले शल्य सावित्रीबाईंनी असे बोलून दाखविले आहे.

'सदाचरण' या विषयावरील भाषणाची सुरूवातच सावित्रीबाई अशी करतात, 'सदाचरण हे मनुष्यास अधिक सुख प्राप्त करून घेण्याचे व्रत आहे. या व्रतामुळे सर्व संसारदु:खाचा नाश होतो' सावित्रीबाईंची प्रतिपाद्य विषयावरची पकड कुठेही सुटत नाही. पाल्हाळिकता त्यांच्या निवेदनात नसतेच. नेमकेपणा, मुद्देसूदपणा, आंतरिक तळमळ, विचारांची प्रगल्भता त्यांच्या या भाषणातून दिसून येते. त्या म्हणतात, 'सदाचरणावर पूर्ण निष्ठा पाहिजे. मनुष्याने सर्वकाळ काहीतरी परोपकार, सतकृत्ये करण्याचा मनात उद्देश धरून ते चिकाटीने तडीस जाण्याची काळजी घेतली पाहिजे! सदाचरणाविषयी विवेचन करताना त्यांनी पुण्यामधील बल्लाळपंत गोवंड्ये या सदाचारी गृहस्थाने उदाहरण दिले आहे. सदाचरणाचे व्रत घेतलेल्या या बल्लाळपंतांनी आपला मुलगा सदाशिव यालाही सदाचारी कसे बनविले याचे सुरेख वर्णन याठिकाणी केले आहे. वडिलांच्या संस्काराने सदाशिव सदाचारी बनून वेगवेगळ्या विषयांत कला-ज्ञानशाखात प्रवीण झाला. त्याचे व्यक्तिमत्व प्रगल्भ झाले. एवढेच नव्हे तर या सदाशिवाने लाच देऊन काम करून घेऊ पाहणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्याला खडसावले. पुढे त्याच्या नि:स्वार्थ प्रामाणिक सेवेने प्रभावित होऊन कलेक्टरने त्याचा सत्कार केला व आपल्या हाताखाली त्याला दप्तरदाराची जागा दिली, असे सविस्तर वर्णन सावित्रीबाईंनी प्रस्तुत भाषणात केले आहे. 'सदाचरणी आईबापांचा मुलगा दुराचारी क्वचित निपजायचा,' असेही एक वाक्य भाषणात आले आहे. सावित्रीबाईंनी मानवी जीवन-विकासाला अत्यावश्यक असलेली मूल्ये-सामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न यातून केलेला दिसतो. सदाचरणातून सामान्य माणूसही कशी उंची गाठू शकतो, याचे दिग्दर्शन करतांना लोकांना पटेल, आकळेल आणि त्यांचा विश्वासही बसेल असे मार्मिक उदाहरण त्यांनी निवडले आहे. लहानपणापासून विद्येचा ध्यास घेऊन सदाचरणाचे व्रत अंगिकारणाऱ्याला सत्कार्य व दुष्टकर्म कळू शकते, असे

त्या म्हणतात. भाषणांच्या विषय निवडीपासून तो त्यातील आशयापर्यंत सावित्रीबाई अत्यंत जागरूक दिसतात. एवढेच नव्हे तर, साध्या साध्या शब्दांतून आपल्या मनातील विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा तळमळीने प्रयत्न त्या करतात. प्रसंगी प्रगल्भ भाषाशैलीही वापरतात. अचूक, मार्मिक उदाहरणे देऊन आपला प्रतिपाद्य विषय ताकदीने फुलवितात आणि या सगळ्यांच्या मागे असते ती त्यांची जनकल्याणाची असीम तळमळ!

सावित्रीबाई हाडाच्या शिक्षिका होत्या, समाजाच्या सुखदु:खांची त्यांना पूर्ण जाण होती. सामाजिक जीवनात कार्य करताना त्यांना आढळून आले की, या देशातील शूद्रातिशूद्र समाज हा व्यसनांचा गुलाम आहे. या व्यसनांच्या राक्षसी मगरमिठीतून हा समाज सोडविल्याशिवाय त्याचा विकासच होऊ शकत नाही. त्यासाठी त्यांनी सविस्तरपणे लोकप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. व्यसने कशी घातक आहेत हे सांगताना त्या म्हणतात, 'व्यसनापासून मनुष्याची बुद्धी भ्रष्ट होते व माणुसकी नष्ट होते. तस्मात् व्यसन हे मनुष्याची प्रतिष्ठा वाढविणारे नसून मनुष्यत्वास बाध आणणारी खोड आहे, यास्तव ती विलंब न करता सत्वर सोडून द्यावी.' भाषणाच्या ओघात पुढे त्या म्हणतात की, 'कोणत्याही व्यसनाने मनुष्याचा विचारपिंड धुंद होतो. व्यसनाच्या कैफात तो आपले मनुष्यत्व विसरून जातो व कैफाच्या धुंदीत मी कोण, माझी योग्यता काय हे त्यास समजत नाही.' दारूच्या व्यसनापायी उसळी गावच्या पाटलाची कशी वाईट स्थिती झाली ते त्यांनी या भाषणात सविस्तर सांगितले आहे. दारू, भांग, अफू, विडी, चिलीम यामुळे मनुष्याची कशी हानी होते हेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

कर्ज घेऊन व्यर्थ उधळपट्टी करणे, वृथा वैभवाचा आभास निर्माण करणे किती चुकीचे आहे हे त्यांनी 'कर्ज' या विषयावरील भाषणातून स्पष्ट केले आहे. यामुळे 'ऋण काढून सण साजरा करण्याची वृत्ती' आत्मनाश करते हे त्या स्वत:च्या कवनाद्वारे सांगतात,

*'शेटजीचे कर्ज जो घेई*
*तयाचे सुख दूर जाई*
*संकटाने हैराण होई*
*बेजार होई कर्जदार॥*
*कर्जाने लागतसे चिंता*
*घालवी सारी मालमत्ता*
*संसारात वाढवी गुंता*
*आली अहंता ऋणकोची॥'*

'शहाण्याने कर्ज काढू नये' असे का म्हणतात, ते त्यांनी साधार स्पष्ट केले आहे. काही लोक कर्ज काढतात व आपल्या अंगी असलेले उद्योग चातुर्य, धाडस, बुद्धि, पराक्रम, उत्साह हे षड्गुण हरवून बसतात. असा, कर्जबाजाऱ्यांचा सर्व बाजूंनी होणारा ऱ्हास सावित्रीबाईंनी वरील विवेचनात समर्पकपणे टिपला आहे. कर्ज काढणे हे अनर्थाचे मूळ असून ते माणसाच्या सर्वस्वाचे कसे दिवाळे काढते ते स्पष्ट करण्यासाठी त्यांनी खंडोबा व पिरोबाजी नावाच्या शेतकऱ्यांचे उदाहरण दिले आहे. कर्जामुळे लोक कसे देशोधडीला लागतात याचा या उदाहरणावरून लोकांनी बोध घ्यावा, असे त्या सूचित करतात.

सावित्रीबाईंनी दिलेल्या या भावणांप्रमाणे त्यांनी जोतिबांना लिहिलेली जी पत्रे आहेत; तीसुद्धा तेवढीच महत्त्वाची व त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी आहेत. या पत्रातूनही त्यांची समाजसुधारणेची कळकळच दिसून येते. वैयक्तिक, खाजगी जीवनाचे उल्लेख त्यात नाममात्रच आहेत. काहीतरी महत्त्वपूर्ण, समाजातील अस्वस्थ करणारे वास्तव पतीला कळविण्यासाठी त्यांनी ही पत्रे लिहिलेली आहेत. पहिल्या पत्रातून स्वत:चा भाऊच आपल्या उभयतांच्या कार्याविषयी कसा अनभिज्ञ आहे, हे त्यांनी स्पष्ट केले आहे त्यालाही आपण आपल्या कार्याचे महत्त्व कसे पटवून दिले याचे वर्णन आहे. या पत्रातून त्यांनी मानवप्राण्याने दुसऱ्या मानवप्राण्यास अव्हेरणे, अपमानित करणे कसे मूर्खपणाचे आहे, हे स्पष्ट केले आहे. विद्याहीनता ही पशुत्वाची खूण आहे. भटलोकांच्या श्रेष्ठत्वास आधारभूत विद्या हीच होय. तिचा महिमा मोठा आहे. जो कोणी तिला प्राप्त करून होईल त्याची नीचता दूर पळून उच्चता त्याचा अंगीकार करील. अशाप्रकारचे विद्येच्या संदर्भातील मौलिक चिंतन या पत्रातून त्या व्यक्त करतात. प्राप्त परिस्थितीत शूद्रांच्या शिक्षणाचा आपला प्रयत्न कसा महत्त्वाचा आहे हे इंग्रजांना पटले, पण आपल्या भावासारख्यांना नाही, याची खंत या पत्रात व्यक्त झाली आहे. पतीला धीर देणाऱ्या सावित्रीबाई या पत्रात लिहितात,'पुण्यात आपल्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत, तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे?' जोतिबांना लिहिलेल्या दुसऱ्या पत्रामध्ये 'सारजा' नामक नुकत्याच वयात आलेल्या मुलीवर 'गणेश नामक ब्राह्मणाने आणलेल्या दुर्धर प्रसंगाचा उल्लेख आहे. गणेशपासून गरोदर राहिलेल्या सारजाची व त्याची दुष्ट टवाळांनी मारपीट करून गल्लीबोळातून फिरवत-मिरवत केलेली विटंबना व त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न आपण कसा हाणून पाडला; ते त्यांनी कळविले आहे. त्यात आपण कशा यशस्वी झालो व त्या उभयतांनी आपल्याला 'देवी' समजून कसे वंदन केले हेही कळविले आहे.

या पत्रातून सावित्रीबाईंची सेवाभावीवृत्ती, अचाट-अफाट धैर्यवृत्ती दिसून येते. कोणताही प्रसंग नेमक्या शब्दातून स्पष्टपणे मग तो पत्रातून का होईना; उभा करण्याचे कसबही या ठिकाणी दिसून येते.

तिसऱ्या पत्रातून सावित्रीबाईंनी ओतुर, जुन्नर परिसरातील १८७६ नंतरच्या दुष्काळी परिस्थितीचे इत्थंभूत वर्णन केले आहे. मानव, जनावरे, निसर्ग यांची पाण्याच्या अभावी कशी दैन्यावस्था झालेली आहे. त्याचे चित्रदर्शी वर्णन या पत्रात आले आहे. त्या लिहितात,'माणसांना अन्न नाही, जनावरांना चारापाणी नाही. यास्तव कित्येक, देशांतर करून आपले गाव टाकून जात आहेत. कित्येक पोटची पोरं व तरण्याताठ्या पोरी विकून परागंदा होत आहेत. नद्या, नाले, ओढे, शुष्क व कोरडे ठणठणीत होऊन मृगजळानी व्याप्त झाले आहेत.'

या दुष्काळात माणसे कशी हतबल झाली आहेत याचे वर्णन करताना त्या लिहितात,'कित्येक निवडुंगाची बोंडे, अन्न म्हणोन खातात, मूत्र पाणी म्हणोन पितात व संतोष पावतात. देहत्यागापूर्वीच भुकेची, तहानेची इच्छा पुरवितात व मृत्यूच्या स्वाधीन होतात असे इकडचे भयानक वर्तमान आहे.'

अशा परिस्थितीमध्ये सत्यशोधक मंडळीसह आपण दुष्काळी भागाचा दौरा कसा केला व त्या लोकांना कसे सहाय्य केले याचे सावित्रीबाईंनी वर्णन केले आहे. कलेक्टरने पकडून नेलेल्या ५० सत्यशोधकांना सोडण्याबद्दल व दुष्काळनिवारणाबद्दल आपण कलेक्टरला कसे निवदेन दिले, हेही सावित्रीबाईंनी या पत्रात लिहिले आहे. या पत्रातून सावित्रीबाईंनी समाजाबद्दल वाटणारी कणव, त्यांचे अतुल-असामान्य धैर्य आणि सकल समाजाविषयीचाच त्यांच्या अंतर्यामातील कळवळा प्रकट झाला आहे.

जोतिबांच्या भाषणांचे संकलन-संपादन करण्यातही त्यांनी आपल्या बुद्धिची चमक दाखविली आहे. नेमकेपणा, मुद्देसूदपणा ही वैशिष्ट्ये या संकलनातून जाणवतात. जोतिबांचा प्रतिपाद्य विचार जसाच्या तसा जनतेपर्यंत कसा पोहचविता येईल; याची काळजी घेऊन त्यांनी भाषणांचे संपादन केले आहे. भाषणातील वैचारिक गाभ्याला, मूलभूत अर्थवत्तेला, मूलगामी भावविश्वाला धक्का न लावता, तो विषय लोकांपर्यंत पोहचविण्याची काळजी त्यांनी घेतलेली आहे.'अतिप्राचीन काळी' या भाषणात मानव प्राण्याची उत्पत्ती कशी झाली, पशुपक्षी आणि मानव यांच्यातील साम्यभेद, रानटी, अवस्थेतील मानव, मानवाची सुधारणूक, बळीराजाचे बलिस्थान या शीर्षकांतर्गत प्रगल्भ विचार मांडण्यात आलेले आहेत. या संपादित भाषणांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, मूळ विचार जरी जोतिबांचे असले तरी या भाषणांची मांडणी, भाषाशैली ही सावित्रीबाईंचीच आहे. 'इतिहास'

या विषयावरील भाषणात 'बहामनियन नाईटस्' खोटा इतिहास लिहिणारे, 'भट बलिस्थानची सुधारणूक', 'ग्रीक-रोमन आणि गुलाम', 'बळीराज्य येईल तेव्हा' या मुद्यांतर्गत विचार व्यक्त झाले आहेत. 'सुधारणूक' या विषयावरील भाषणात प्राचीन काळचे आपले थोर पुरूष, अडाणी आर्यन टोळ्या, बलिस्थान ही आमची जन्मभूमी आहे, ग्रीकन, रोमन लोकांची सुधारणूक, गुलामगिरीचा इतिहास ध्यानी आणा, अशा मुद्यांच्या अंतर्गत चर्चा व आवाहन आलेले आहे. निद्रिस्त समाजाला जागे करू पाहणारे जोतिबा व त्याला सर्वतोपरी साहाय्य करणारी स्वयंप्रज्ञ, आत्मनिर्भर सावित्रीबाई या भाषणांमधून साक्षात प्रतिबिंबित झालेली आहे. 'गुलामगिरी' या भाषणामध्ये आडदांड पशू-कुत्र्याची एक गोष्ट, ॲरिस्टॉटल आणि ग्रीकांचे गुलाम, रोमन राज्यातील गुलामांचे हाल, अमेरिकन निग्रोंची गुलामगिरी अशा शीर्षकांतर्गत विचार स्पष्ट झालेले आहेत.

एकूणच जनप्रबोधनाच्या आत्यंतिक तळमळीतून सावित्रीबाईंनी हे संपादनकार्य केले, हे स्पष्ट आहे. प्रचलित समाजव्यवस्थेवर प्रहार करून आंतरराष्ट्रीय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांचे संदर्भ देत जनतेला जागे करण्याचा हा प्रयत्न अभूतपूर्व आणि समाजक्रांतीच्या इतिहासातही अनोखा असाच म्हणावा लागेल. जनप्रबोधनाची चळवळ सशक्त करणारी ही भाषणे आहेत. सावित्रीबाईंनी संपादित केलेल्या या भाषणातून त्यांची वैचारिक प्रगल्भता स्पष्ट होते. त्यांचा अद्ययावत व्यासंग व समाजशास्त्रीय दृष्टिकोनही आपल्याला प्रतीत होतो. उपेक्षितांच्या, वंचितांच्या विकासासाठी, उत्थानासाठी आपल्याला आपल्या सत्यशोधकांच्याद्वारे काय करता येऊ शकेल याचा ध्यास घेऊन जगणाऱ्या सावित्रीबाईंच्या भाव-विचार-स्पंदनांचा आलेखच जणू या भाषणांतून प्रकट झालेला आहे. जनजिव्हाळ्याच्या सूत्राने गुंफलेले विचार, भावना यांचे तेजस्वी दर्शन या भाषणांतून घडते.

क्रांतीज्योती सावित्रीबाईंची भाषणे म्हणजे मूल्यगर्भ आशयाने समृद्ध आणि समाजोद्धाराच्या तळमळीने अभिमंत्रित झालेल्या विचार-भावनांचा अनोखा-अर्थपूर्ण आविष्कार होय. मानवतेच्या प्रस्थापनेसाठी रूढ व्यवस्थेतील दोषस्थळांवर प्रहार करुन समाजाला चिंतनसन्मुख करण्यासाठी सावित्रीबाईंनी हा यत्न आरंभिला होता. त्यांच्या अंत:करणातील उपेक्षित-वंचितांच्या अभ्युदयाचा विचार त्यांना सतत चिंतनमग्न ठेवायचा. त्या चिंतनाची परिपक्व, सुजाण अभिव्यक्ती भाषणांमधून साकारली. सावित्रीबाईंच्या चिंतनाचा, कृतिनिष्ठेचा, विचारसृष्टीचा एकमेव घटक म्हणजे सर्वहारा समाजाचे उत्थान. त्यांच्या उत्थानासाठी त्यांनी अखंड शोध चालविला. त्यांच्या प्रश्नाचा सातत्याने वेध घेतला. त्यातून त्यांचे मानवकल्याणाचे

चिंतन आकारले. या चिंतनाची भरभक्कम पार्श्वभूमी त्यांच्या भाषणांना उपलब्ध झाली आहे. त्यांची भाषणे विलक्षण आशयसमृद्ध, समाजपुरुषाला विचारप्रवृत्त करणारी आहेत. दाहक वैचारिकता, सामाजिक दोषांचे अचूक निदान, जनजीवनाचा अपार कळवळा त्यात ओतप्रोत भरलेला आहे. वैचारिक दृष्ट्या सशक्त असलेली ही भाषणे प्रसंगी काव्यात्मक अंगानेही बहरलेली दिसून येतात. अभिव्यक्तीचे बहिरंग क्वचित सुडौल, सुंदर, वेधक नसलेही, पण आशयाचे अंतरंग मात्र प्रत्येक ठिकाणी नितांतसुंदर आहे. सहानुभूतीच्या, आत्मीयतेच्या अंतस्थ ओलाव्याच्या स्पर्श या भाषणांतील शब्दाशब्दाला लाभलेला आहे. त्यांचे हे वक्तृत्व व्यापक अशा मानवतेचे स्वप्न पाहणारे, दबल्या-पिचल्या वंचितांच्या वर्तमानयुगीन दु:खांतून त्यांना मुक्त होण्याचा संदेश देणारे आहे, मूल्यगर्भ, आशयसमृद्ध व मानवमुक्तीच्या विचारांनी अभिमंत्रित झालेली ही भाषणे पुरोगामी विचारयात्रिकांना आजही नवी दिशा देऊ शकतील, एवढी महत्त्वपूर्ण आहेत. तत्कालीन लोकजीवनाचे इतके सूक्ष्म परिशीलन करणारी, त्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात मूलगामी चिंतन करून त्यांना उत्तरे पुरविणारी सावित्रीबाई ही खरोखरीच अज्ञ-सर्वहारा वंचित समाजाची मार्गदात्रीच होती. 'सत्व' आणि 'स्वत्व' हरवलेल्या समाजाला आत्मजागृतीचे भान आणि अस्मितारक्षणाचे जीवनसंजीवक शिक्षणच या माऊलीने भाषणांच्याद्वारे दिलेलं आहे.

तळागाळातील समाजाचे उत्थान केवळ अविद्येच्या अंधाराचा नाश केल्यानेच होऊ शकते. या आशयसूत्राचा अत्यंत प्रसन्न आविष्कार विस्तार त्यांच्या पत्राच्या निमित्ताने आपल्याला अनुभवायला मिळतो. जनकल्याणाच्या तळमळीतून चिंतनप्रवृत्त झालेल्या सावित्रीबाईंच्या वैचारिकतेतील सखोलता, व्यापकता, प्रगल्भता या पत्रांतून सहज प्रतीत होते. मानवतेप्रति असलेली प्रगाढ श्रद्धा, व संकटांवर मात करण्याची अतुल धैर्यशीलता यांचेही या पत्रातून दर्शन घडते. वर्तमान कालीन सामाजिक, राजकीय प्रश्नांच्या गुंत्यातून सुटण्यासाठी सामान्यांनी नेमके काय करावे, या संपादित भाषणांमधून त्यांनी सूचित केलेल्या दिशाही अर्थपूर्ण आहेत.

*

# सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या चळवळींचे यशापयश

**प्राचार्य चंद्रकांत धुमटकर**

सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचे केवळ विहंगमावलोकन केले तरी हे व्यक्तिमत्व सामान्य नव्हते ते लक्षात येते. एका समाजक्रांतीकारकाची पत्नी एवढेच अस्तित्व त्यांच्या व्यक्तिमत्वात नव्हते. सावित्रीबाईंनी जोतिरावांच्या जीवनात अखेरच्या प्रवासापर्यंत साथ दिली. परंतु ती साथ केवळ एका पतिपरायण पतिव्रतेची नव्हती. सावित्रीबाईंची प्रेरणा स्वतंत्र होती.

शिरवळजवळच्या नायगाव (जि. पुणे) या खेड्यात माळी समाजातल्या नेवसे पाटील यांच्या घराण्यात सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. अज्ञानाची परंपरा असलेले घराणे. शिक्षणाचे शतकानुशतके संस्कार नाहीत. पण याच घराण्यात जन्मलेल्या मुलीने विवाहानंतर पतीच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरविले. शिक्षक-प्रशिक्षण घेतले आणि ही मुलगी ज्ञानदानाचे व्रत घेणारी ज्ञानयोगिनी बनली.

शिक्षणप्रसाराच्या विचाराने जोतीराव झपाटले होते. त्यांनी अहमदनगरला मिस् फेरॉर नावाच्या अमेरिकन मिशनरी बाईचे काम पाहिले होते. नगरहून परत आल्यावर लगेच त्यांनी पुण्यात १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा काढली. सुरूवातीला सहा मुली होत्या. शिकविण्यासाठी शिक्षक मिळेना. जोतीरावांनी मग ही जबाबदारी सरळ सावित्रीबाईंवर सोपविली.

सुनेने धर्म बुडवला, असा कांगावा सनातनी ब्राह्मणांनी केला. परिणामतः सासऱ्याने सुनेला-मुलाला घराबाहेर काढले. शिक्षणाच्या पवित्र कार्यासाठी या दांपत्याने भावनांचे नाजुक धागे तटातट तोडले. 'माझं घर, माझी माणसं' यात गुंतून न पडता घराचा उंबरठा ओलांडणारी ही स्त्री; स्त्री मुक्ती चळवळीची आद्य प्रणेती होती.

फुले पतीपत्नींनी नेटाने शाळा चालविल्या. १८४८ ते १८५२ या काळात हडपसर, ओतुर, सासवड, नायगाव, शिरवळ, शिरूर इत्यादी गावी शाळा

उघडून शिक्षणाच्या कार्याला गती दिली.

सनातनी ब्राह्मण मंडळींनी जोतीराव-सावित्रीबाईंना विरोध केला तरी पुरोगामी विचारांचीही काही ब्राह्मण मंडळी होती. त्यांनी जोतीरावांच्या कार्यास मदत केली. केशवराव भवाळकर यांनी सावित्रीबाईंना मार्गदर्शन केले होते. जोतीरावांनी व्यवस्थापनासाठी दोन समित्या नेमल्या होत्या. त्यावर जगन्नाथ सदाशिव, अण्णा सहस्रबुद्धे, विष्णु मोरेश्वर भिडे, बापू रावजी मांडे आदी उच्चवर्णीय मंडळी होती. या सुधारक विचारसरणीच्या मंडळींना रूढी-परंपरेच्या चौकटी कधीच मोडता आल्या नाहीत. पण विलक्षण धैर्य आणि धाडस दाखविणाऱ्या फुले-दांपत्याला त्यांनी मनापासून साथ दिली.

फुले-दांपत्याने शाळा काढून शिक्षणप्रसाराचे काम केले हे खरेच. स्वकीयांनी नाही पण परकीयांनी मात्र या कामाचे महत्त्व ओळखले. ब्रिटीश सरकारच्या शिक्षणमंडळाने त्यांच्या कार्याचा गौरव केला. विशेषत: प्रतिकूल वातावरणात सावित्रीबाईंनी जे शिक्षणाचे कार्य नेटाने केले, त्याचे अनेक गौरवपूर्ण उल्लेख शिक्षण-मंडळाच्या विविध अहवालांमध्ये पहावयास मिळतात. १८५२ मध्ये विश्रामबागवाड्यात ब्रिटिश सरकारने जोतीरावांचा सत्कार केला, त्यावेळी स्वत: जोतीराव सावित्रीबाईंना म्हणाले, ''हा तुझाच गौरव आहे. मी शाळा स्थापन करण्यास कारणमात्र आहे. पण त्या शाळा तू अनेक संकटांशी तोंड देऊन यशस्वीरीत्यास चालविल्यास त्याचा मला अभिमान वाटतो'' १८९१ साली नारो बाबाजी यांनी लिहिलेल्या म. फुल्यांच्या चरित्रात या नोंदी आल्या आहेत.

सावित्रीबाईंनी या शाळा चालविल्या. पण त्यांनी केवळ साक्षर करण्यासाठी शिक्षण दिले नाही. त्यांना शिक्षणातून समाजजागृती करावयाची होती. रूढी, परंपरा, अंध:श्रद्धा नाहीशा करायच्या होत्या. सामान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते. त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा विचार त्यांनी केला होता. सावित्रीबाईंनी 'शिक्षणाने येते मनुष्यत्व 'पशुत्व हाटते पहा' हा शिक्षणविषयक सिद्धांत मांडला. सव्वाशे वर्षापूर्वी हा मूलभूत विचार मांडणाऱ्या सावित्रीबाई या थोर शिक्षणतज्ज्ञ होत. लोकांना 'माणूस' बनविणे, ताठ मानेने त्यांना उभे राहायला शिकविणे, त्यांना स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याही पलीकडे माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे; एवढा शिक्षणविषयक माणूसकेंद्री व्यापक दृष्टिकोन या लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता.

सावित्रीबाईंनी शिक्षणाचे कार्य केले. त्यानंतर सामाजिक कार्य केले. १८७४ च्या दुष्काळात धनकवडी येथे अन्नछत्र उघडले. दुपारी-संध्याकाळी दोन हजार भाकरी नियमित वाटल्या जात. स्वत:च्या पदराला खार लावून

सावित्रीबाई-जोतीराव यांनी हे काम केले.

मृत्युपंथाला लागलेल्या हजारो जीवांना फुले दांपत्याने हे जीवनदान दिले, तसेच जिवंतपणी मरणाचे भोग भोगणाऱ्या अभागी जीवांना-विधवांना नवजीवन दिले. या अभागिनी आपल्या फुटक्या कपाळाला दोष देत, जळत्या जिण्यावर अश्रूंचे सिंचन करीत मनाची आणि शरीराची आग विझवू पाहत. १८९१ च्या शिरगणतीनुसार ० ते ४ वर्षे वयाच्या विधवा झालेल्या बालिकांची संख्याच १३,८७८ अशी होती. आईच्या अंगाखांद्यावर बागडण्याचे आणि नि:संकोचपणे स्तनपान करण्याचे हे वय. पण याच वयात या बालिकांच्या नशिबी वैधव्य येई. रूढीने काचलेला एखादा गरीब बाप आपल्या ९/१० वर्षाच्या कोवळ्या मुलीचे लग्न एखाद्या ६०/७० वर्षाच्या जख्खड म्हाताऱ्याशी लावून मोकळा होई. या म्हाताऱ्याने २/४ वर्षातच राम म्हटल्यावर ही न्हातीधुती पोर विधवा होऊन पुन्हा माहेरी येई. तो जन्मदाता त्या सुकुमार मुलीला केशवपनासाठी न्हाव्यापुढे बसवी. त्यावेळी ती पोर आक्रंदून म्हणे-

*"का हो बाबा, मी तुमची लाडकी*
*का करिता मला बोडकी।। "*

खरे पाहू जाता, केशवपनादी रूढींचा जाच ब्राह्मण समाजाला अधिक होत होता. या दुष्ट रूढींचा संताप न्या. रानडे, लोकहितवादी इ. ब्राह्मण सुधारकांना येत नव्हता असे नव्हे; परंतु त्यांच्या सुधारणांना परंपरानिष्ठ मर्यादा पडल्या. वडिलांच्या आणि आप्तेष्टांच्या धाकामुळे रानड्यांना आपल्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह करता आला नाही. आणि पहिली पत्नी वारल्यानंतर विधवेशी विवाह न करता स्वत: रानड्यांनी एका दहा वर्षाच्या कुमारिकेशी विवाह केला. 'तुम्ही प्रायश्चित घेतले नाही, तर मी तुमच्या मुलीला नांदवणार नाही.' अशी विहिणीने धमकी देताच लोकहितवादींनी निमूटपणे प्रायश्चित घेतले. आपल्या आप्तांना झळ पोहोचणार नाही अशा बेताने लक्ष्मणरेषा आखून त्यांनी सुधारणा केल्या. पांढऱ्यावर काळे करण्यातच त्यांनी धन्यता मानली. परंतु पांढऱ्या पायांच्या अभागिनींच्या दास्यशृंखला या सुधारकांना तोडता आल्या नाहीत. ते कार्य जोतीराव-सावित्रीबाईंनीच केले. खरोखरी या दांपत्याच्या कार्याचा रथ जमिनीपासून दोन अंगुळे वरच धावत होता.

त्या काळात उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रिया नव्हत्या, असे नाही. परंतु पंडिता रमाबाईंचा उज्ज्वल अपवाद वगळता, हळदी-कुंकवाचा कार्यक्रम, स्त्रियांच्या वक्तृत्वाच्या स्पर्धा इ. जुजबी सुधारणांच्या पलिकडे या माजघरातील सुधारणांची मजल कधी गेलीच नाही.

याच पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याला तोड नव्हती. जोतीरावांच्या प्रसूतिगृहात सावित्रीबाई परिचारिकेचे काम सेवावृत्तीने करीत होत्या. विधवांच्या अनौरस अपत्यांना आपली अपत्ये मानून त्यांना प्रेम-ममता देत होत्या. काशीबाई या पतित विधवेच्या पोटी जन्मलेल्या मुलाला सावित्रीबाईंनी आपल्या ओटीत घेतले. जन्मदात्री आई निघून गेलेली, बाप कोण होता हे माहीत नाही. कळू लागल्यावर या मुलाला काय वाटेल? जोतीराव-सावित्रीबाईंना याची काळजी वाटे. मोठा झाल्यावर त्याला सन्मानाने जगता यावे म्हणून जोतीरावांनी त्याचे लग्न कुलीन घराण्यातील मुलीशी लावून दिले. सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते ग्यानोबा ससाणे यांनी आपली मुलगी या दत्तक मुलाला-यशवंताला दिली. या लग्नाच्या वेळी साऱ्यांनीच गहजब केला. साऱ्या माळी समाजाने निषेध केला. ग्यानोबा ससाणेंची तर पुढील आयुष्यात सोयऱ्या-धायऱ्यांच्या जातीबहिष्काराच्या वणव्यात विलक्षण होरपळ झाली.

या मुलाच्या लग्नाच्या वेळी जोतीरावांनी वेळोवेळी आर्थिक परिस्थिती खालावली होती. जोतीरावांनी वेळोवेळी मिळवलेला पैसा दीनदुबळ्यांना मदत करण्यात खर्च केला होता. लग्नासाठी पैसा कसा उभा करायचा याची चिंता या दांपत्याला पडली. शेवटी मांजरीची जमीन विकून लग्नाचा खर्च केला.

म. फुल्यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंना सयाजीरावांनी आर्थिक मदत दिली. यातूनच यशवंतरावाने एल. सी. पी. एस्. हा वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला.

काही वेळा सत्य हे कल्पितापेक्षाही अद्भुत असते. सावित्रीबाईंच्या जीवनातील प्रसंग अद्भुत आदेश कल्पित वाटावेत एवढे नाट्य त्यात भरलेले आहे. बाईंचे जीवन म्हणजे धगधगते अग्निकुंड! जोतीरावांनी उभ्या आयुष्यात कधी चूल-बोळक्यांचा संसार मांडला नाही. सावित्रीबाईंना कधी तसा मांडावसा वाटला नाही.

म. फुले ह्यात असतानाही सनातनी समाजाशी बंडखोरी करण्यात बाई फुल्यांनाही हार गेल्या नाहीत. एवढेच नव्हे, तर फुल्यांच्या निधनसमयी अंत्ययात्रेच्या वेळी ही स्त्री बंड करून पेटून उठली. जोतीरावांच्या अंत्ययात्रेच्या वेळी जोतीरावांचे भाऊबंद, फुलेमंडळी आडवी आली. दत्तकपुत्र यशवंत हे कडू बेणे! त्याला टिटवे (गाडगे) धरू देण्यास फुलेमंडळींनी एकजात विरोध केला. त्याप्रसंगी सावित्रीबाईंच्या धैर्याचा कस लागला. उरावर धोंडा ठेवून बाईंनी पुरुषाच्या हिंमतीने प्रेतयात्रेपुढे स्वतः हातात गाडगे धरले. बाईंच्या एका बाजूस यशवंत व दुसऱ्या बाजूस गजानन (जोतीरावांचा आप्त) अशी ही अंत्ययात्रा

स्मशानभूमीवर पोहोचली. विचाराने आणि आचाराने ही स्त्री काळाच्या अनेक दशके-शतके अशी पुढे गेली होती.

जोतीरावांचे निधन झाले. क्रांतीसूर्याचा अस्त झाला. दशदिशा अंधारल्या, सावित्रीबाई आणि जोतीरावांनी एकमेकांच्या साथीने दीनदलितांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले होते. जोतीराव मध्येच निघून गेले. सावित्रीबाई एकट्या राहिल्या. पुढची वाट बिकट. अवघे जीवन उद्ध्वस्त झालेले. सनातन्यांच्या अग्निज्वाळांनी वेढलेले! छळ, अवहेलना, बहिष्कार यांच्या वणव्यात होरपळलेले! दारिद्र्याच्या दाहकतेने खचलेले! परंतु तरीही हार न मानणारे!

जोतीराव निवर्तले आणि सत्यशोधक समाज संपला; अशी कुजबूज सनातन्यांत सुरू झाली. पण फुल्यांच्या खांद्यावरची सत्यशोधक समाजाची पताका सावित्रीबाईंनी स्वत:च्या खांद्यावर घेतली आणि सत्यशोधक समाजाची लाट खेड्यापाड्यात पसरू लागली. सावित्रीबाईंच्या रूपाने जोतीरावाच बोलत आहेत, अशा वार्ता पसरू लागल्या.

म. फुल्यांची पहिली पुण्यतिथी १८९१ साली ओतूर येथे झाली. त्यावेळी सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते नारो बाबाजी यांनी म. फुल्यांचे चरित्र प्रसिद्ध केले. या पुस्तकाची अर्पणपत्रिका त्यांनी सावित्रीबाईंना अर्पण केली आहे. या अर्पणपत्रिकेत म्हटले आहे, "त्यांच्या अंगी असलेल्या सत्शीलता, सत्यपरायणता आणि सत्यशोधक, समाजप्रियता वगैरे सद्गुणांच्या गौरवार्थ हे पुस्तक ग्रंथकर्त्याने आदरभावाने व भक्तिपूर्वक नजर केले असे."

सन १८९३ साली सासवड येथे सत्यशोधक समाजाची २० वी परिषद भरली. या परिषदेच्या सावित्रीबाई अध्यक्ष होत्या. त्यानंतर पुरंदर तालुक्यात ठिकठिकाणी सभा भरविण्यात आल्या. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांसमवेत सावित्रीबाई खेड्यापाड्यातून फिरत होत्या. लोकांना भटपुरोहितांकडून होणाऱ्या त्रासाची, धार्मिक छळाची माहिती देत होत्या. या काळात ग्रामीण भागात शंभर लग्ने, विधवा पुनर्विवाह, इतर धार्मिक विधी ब्राह्मण पुरोहितांवाचून करण्यात आले. सासवड येथील माळी लोकांनी इतर ठिकाणी जाऊन पाटाखालच्या जमिनी घेतल्या. शेतकऱ्यांची स्थिती सत्यशोधक समाजाच्या तत्वविचारातून सुधारत चालली.

जुन्नर भागातही सावित्रीबाई भाऊ कोंडाजी धर्माजी डुंबरे, नारो बाबाजी या कार्यकर्त्यांसह फिरत होत्या. इंदापूर तालुक्यातही 'सत्यशोधक' समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. केशवराव संकोजी पाटील यांनी समाजाच्या प्रसारासाठी कार्य केले. सावित्रीबाईंच्या प्रेरणेतून या कार्याचे लोण सर्वदूर पसरत चालले.

कृष्णराव भालेकरांनी अहमदनगर जिल्ह्यात, डॉ. संतुजी रामजी लाड यांनी ठाणे जिल्ह्यात असे नगर, पुणे, कोकण, मुंबई, विदर्भ, मराठवाड्यात सत्यशोधक समाजाचे कार्य मोठ्या प्रमाणात पसरले. फुल्यांच्या कार्याची ज्योत सावित्रीबाईंनी अशी विझू दिली नाही. एक विराट सामाजिक इतिहास बाई घडवीत होत्या.

सन १८९६ साली पुन्हा दुष्काळ पडला. सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाचे मंडळ गव्हर्नरांकडे गेले. सरकारने मग दुष्काळी कामे काढली. शेतकऱ्यांना साऱ्यात सूट मिळावी म्हणून सावित्रीबाईंनी खूप खटपट केली. सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व ओळखून ख्रिस्ती झालेल्या पंडिता रमाबाईंनी त्यांना आर्थिक मदत दिली. बडोद्याच्या सयाजीरावांनी धान्य-कपडे-पैसा पाठविला. सनातन्यांनी बाईंच्याविरुद्ध काहूर उठविले, ''ती ख्रिस्ती आहे. माणसातून उठली आहे.'' सावित्रीबाईंना हा छळ नवीन नव्हता. 'अरे, स्त्रियांचे, गरिबांचे हाल पाहून तुम्हाला लाज वाटत नाही काय?' असे फटकारून बाईंनी त्यांची तोंडे बंद केली.

संकटेही एकटी-दुकटी येत नाहीत. दुष्काळापाठोपाठ प्लेग आला. या गोळ्याच्या आजाराने धुमाकूळ घातला. या काळात सावित्रीबाईंनी केलेले कार्य केवळ अद्वितीय होते. मदतीसाठी त्या गोऱ्या मिशनऱ्यांना भेटल्या. रोग पसरू नये म्हणून कोणते उपचार करावेत, याच्या सूचना देत त्या हिंडू लागल्या. रोग्यांसाठी तात्पुरते हॉस्पिटल काढावे असे त्यांच्या मनाने घेतले. सावित्रीबाईंचे व्याही ग्यानोबा ससाणे यांच्या वानवडी-घोरपडी परिसरातल्या माळरानावरच्या जागेत हॉस्पिटल उघडले. सावित्रीबाईंनी डॉ. यशंवतरावांना नगरहून बोलावून घेतले. तेथे ते लष्कराच्या वैद्यकीय नोकरीत होते. यशंवतराव रजा काढून हॉस्पिटलमध्ये काम करू लागले.

रोगाची साथ आटोक्यात येत नव्हती. सावित्रीबाई वाऱ्यासारख्या वणवण फिरत होत्या. अपार कष्टाने थकून जात होत्या. तरीही भ्रमंती चालू होती. मुंढवे येथे प्लेगने ठाण मांडले होते. तिथल्या हरिजन वस्तीतल्या पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुलाला प्लेगने विळखा घातला. सावित्रीबाईंनी धावपळ केली. त्याला पाठीवर घेतले. अंधार पडू लागला होता. पण मुलाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणे तर आवश्यक होते. हॉस्पिटलच्या वाटेवर सावित्रीबाईंनाच प्लेगने घेरले. दि. १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता त्यांचा थकला भागला देह मृत्यूच्या आधीन झाला.

तेजस्वी तारका निखळली! अवघे आकाश काळवंडून गेले. सावित्रीबाई आणि जोतीराव यांनी केवढे उत्तुंग कार्य केले! आकाशच थिटे पडावे अशी थेट आकाशालाच भिडणारी ही व्यक्तिमत्वे होती! बहिष्कृत आणि तिरस्कृत जीवन

जगताना हे दांपत्य भाजून होरपळून निघाले. पण दीन-दलितांच्या जीवनात सुखाचे झुळझुळ वाहणारे झरे त्यांनी आणून सोडले.

सावित्रीबाईंचे मोठेपण सनातन्यांना तर कधी कळलेच नाही; पण सोयऱ्या-धायऱ्यांनाही कधी कळले नाही. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर, साऱ्या देशातील जनतेला अभिमान वाटावा असे असामान्यत्व या स्त्रीमध्ये होते. ज्या राष्ट्रात अशा तेजस्वी ललना जन्मतात, ते राष्ट्र धन्य होय. पण याच भूमीत या स्त्रीचे कर्तृत्व असत्य ठरविले गेले. डॉ. मा. गो. माळी यांनी लिहिलेले सावित्रीबाईंचे विस्तृत चरित्र १५/१६ वर्षांपूर्वी प्रकाशात आले, तेव्हा टीकाकार बाईंच्या कर्तृत्वाने चक्रावले, संभ्रमित झाले, सैरभैर झाले. हे सर्व कर्तृत्व कल्पित आहे, असत्य आहे अशी टीका झाली. एका स्त्रीने आणि तेही माळी जातीच्या स्त्रीने यशस्वीपणे शाळा चालवून स्त्रीशूद्रांना विद्या शिकवावी, प्रौढ स्त्रियांसाठी रात्रशाळा चालवावी, पतित विधवांच्या निष्पाप मुलांना ओटीत घेऊन या विधवांचे अश्रू पुसावेत, म. फुल्यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे समर्थ नेतृत्व करावे, पुरोहितांशिवाय सत्यशोधक समाज पद्धतीने लग्नकार्ये करावीत, त्यासाठी कोर्टात खटले-दावे या कटकटींना सामोरे जावे, १९७४ आणि १८९६ च्या दुष्काळात मरणोन्मुख जीवांच्या मुखात घास भरवावा आणि प्लेगच्या साथीत दीन-दुबळ्यांची सेवाशुश्रूषा करताना प्राणांचीही कुर्बानी करावी-ही सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची विविध रूपे टीकाकारांना दिसली नाहीत. भावली नाहीत. प्रखर प्रकाशाचे झोतामागून झोत डोळ्यांवर आदळत यावेत, प्रखरतेने डोळे दिपून जावेत आणि काहीच दिसेनासे व्हावे असे या टीकाकारांचे झाले.

बाईंच्या असामान्य कर्तृत्वाचे स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने कृतज्ञतापूर्वक स्मरण करताना, त्यांनी केलेल्या चळवळीच्या यशापयशाचा विचार जेव्हा आपण करतो, तेव्हा काय दिसते?

सावित्रीबाईंनी आयुष्यभर अथक काम केले. त्यांनी केलेल्या कार्याच्या प्रेरणांची बीजे रुजली; अंकुरली, रोपे वाढली. समाजात शिक्षणाचा प्रसार झाला. विधवांचे पुनर्विवाह होऊ लागले. केशवपनासारख्या राक्षसी रूढी नष्ट झाल्या. बालहत्या प्रतिबंधक गृहांसारख्या सार्वजनिक संस्था निघाल्या. दलितांच्या उद्धारासाठी घटनेत तरतुदी करण्यात आल्या.

जोतीरावांच्यानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवली. ही चळवळ पुरोहितशाहीवर व वर्णव्यवस्थेवर आघात करणारी होती. परंतु ही ब्राह्मण विरोधी चळवळ आहे, अशी सनातन्यांकडून जाणून बुजून दिशाभूल करण्यात आली. खरे तर ही चळवळ म्हणजे पुरोगामी

आणि प्रतिगामी विचारांचा संघर्ष होता. या चळवळीत जातिनिर्मूलनाचे प्रयत्न झाले. उच्चवर्णियांची धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरी झुगारून देण्यात आली. ब्राह्मणेतर चळवळ म्हणून टीका झाली, तरी या चळवळीने पुढे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात अभूतपूर्व स्थित्यंतर घडवून आणले. या चळवळीने ब्राह्मणेतर समाजाचा स्वाभिमान जागृत केला. उच्चवर्णीयांच्या धार्मिक आणि सामाजिक वर्चस्वाला सुरुंग लावला. बहुजन समाजातले लोक आज विविध क्षेत्रांत सत्तास्थाने उपभोगीत आहेत, ते या सत्यशोधक चळवळीचे मोठे यश आहे. या चळवळीतून नवे बुद्धिवंत, नवे कार्यकर्ते निर्माण करण्याच्या पायाभरणीचे काम झाले. शिक्षणसंस्थांची जाळी महाराष्ट्रात निर्माण झाली. सहकारी चळवळी फोफावल्या. ग्रामपंचायती, जिल्हा परिषदांत आगळे चैतन्य खेळू लागले. सावित्रीबाईंच्या चळवळीचे हे फार मोठे यश आहे.

दि. १० मार्च १९९७ हा सावित्रीबाई फुले यांचा स्मृतिशताब्दी दिन! याच मार्च महिन्यात पुणे-मुंबई-ठाणे पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकात महापौरपदांवर महिलांची आणि तीही बहुजन समाजातल्या महिलांची निवड व्हावी; हा विलक्षण योगायोग! शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी ज्या स्वप्नांचा ध्यास घेतला होता, ती स्वप्ने साकारत आहेत याचा आनंद आणि अभिमान कोणास वाटणार नाही?

भारतीय लोकशाहीत स्त्रीशक्तीचा आता समर्थ आविष्कार पहावयास मिळत आहे. ही स्त्रीशक्ती आता गतिमान होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. पुरोगामी महाराष्ट्र शासनाने स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्याने स्थानिक स्वराज्य संस्थामधून स्त्रिया अहमहमिकेने पुढे सरसावत आहेत. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीमधील स्त्रीनेतृत्वाचा विचार केला तरी हे स्त्रीनेतृत्व अशिक्षित असूनही नेतृत्वात उणे पडत नाही ही मोठी कौतुकास्पद बाब आहे. वर्षानुवर्षे कोंडली गेलेली स्त्रीशक्ती आता वाफेप्रमाणे जोरकसपणे बाहेर पडताना दिसत आहे. सव्वाशे वर्षांपूर्वी सावित्रीबाईंनी जे महान कार्य करून प्रेरणा दिल्या, त्या प्रेरणांचा हा विजय आहे.

दोन-तीन दशकांपूर्वी उच्च शैक्षणिक स्तरावर स्त्रिया दुर्मिळतेने आढळत. कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथे मी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शंभर-सव्वाशे विद्यार्थ्यांच्या वर्गात केवळ दोन-तीनच विद्यार्थिनी तुरळक दिसत. परंतु आता ८० विद्यार्थ्यांच्या वर्गात ३०-३५ विद्यार्थिनी निर्भयपणे आणि मुक्तपणे वावरताना सर्रास आढळतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या आता वाढत आहे, हे स्वागतार्हच

आहे. कारण ज्यांना कसलाच सांस्कृतिक वारसा नव्हता, अशी मुले आता महाविद्यालयाच्या, विद्यापीठाच्या पायऱ्या चढत आहेत. उच्च शिक्षण घेतले तरच आधुनिक जीवनाच्या प्रेरणा त्यांनी समजून घेता येतील. जीवनातला आनंद आणि जीवनातले सौंदर्य यांचा त्यांना आनंद घेता येईल हे जीवन समृद्धतेने जगता येईल. आज लक्षावधी मुले शालान्त परीक्षेला बसत आहेत. हीच मुले पुढे हजारोंनी पदवीधर होणार आहेत. ही सहस्रावधी मुले उच्च शिक्षणाची दारे ठोठावणार आहेत. पदवी घेतलेले सारेच, संशोधक किंवा ज्ञानी होतील ही अपेक्षा नाही. तथापि यातून सांस्कृतिक परिवर्तन जरूर होणार आहे. ही पदवी घेतलेली मुले आपापल्या गावांतून जीवनाचे नवे प्रवाह आणणार आहेत.

या संदर्भात ग्रामीण स्त्रीचा विशेष विचार होणे आवश्यक आहे. जोतीराव आणि सावित्रीबाई यांच्या प्रेरणेतून ब्राह्मण स्त्रियांना शिक्षणाची अभूतपूर्व संधी मिळाली. त्यामुळे आज त्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने चमकत आहेत. परंतु बहुजन समाजातील आणि त्यातून ग्रामीण स्त्रियांची स्थिती कशी आहे? सावित्रीबाईंच्या चळवळींच्या यशापयशांचा विचार करताना त्या दृष्टीने अजूनही खूप वाटचाल करायची आहे, याचे भान राखणे आवश्यक आहे. ग्रामीण स्त्री अजूनही घरातच कोंडली गेली आहे. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत ती कष्ट उपसत असते. घराची झाडलोट, स्वयंपाकपाणी, कपडे धुणे, भांडी घासणे, मुलांचे संगोपन ही कामे करून शिवाय शेतात पुरुषांच्या बरोबरीने राबते, शेतात औत ओढते. या साऱ्या स्त्रिया अक्षरशून्य आहेत. कोठारी शिक्षण आयोगाने म्हटल्याप्रमाणे १९७६ साली ८० टक्क्यांवर साक्षरतेचे प्रमाण वाढायला हवे होते. पण प्रत्यक्षात काय दिसते? सक्ती शिक्षणाचे कायदे करून, प्रौढ शिक्षणाच्या योजना आखून, त्यासाठी अनुदानाच्या थैल्या मोकळ्या करूनही पदरात काहीच पडले नाही. आज खेड्यात १५/२० टक्केदेखील स्त्रिया साक्षर नाहीत. या स्त्रियांना शिक्षणाची हमी कोण देणार? केवळ साक्षरतेची नको! माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचीही हमी पाहिजे. स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी आणि सांस्कृतिकीकरणासाठी पूर्ण वेळ नोकरीची आणि व्यवसायाचीही हमी पाहिजे. शासनाने, समाजाने हे आव्हान आणि आव्हानाचे शिवधनुष्य पेलले पाहिजे. 'इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले' असे जोतीरावांनी लोकांना कळवळून सांगितले आणि 'शिक्षणाने येते मनुष्यत्व! पशुत्व हाटते पहा' हे शिक्षणाचे तत्त्वज्ञान सावित्रीबाईंनी मांडले. या दांपत्याने केवळ कोरडे तत्त्वज्ञान न सांगता स्वत:च्या पदराला खार लावून शाळा उभ्या केल्या. त्या शाळांत स्वत: शिक्षणाचे धडे दिले. 'पुणे वर्णन' कारांनी म्हटल्याप्रमाणे ''उभयतांना दोन प्रहरी भाकरी

खाण्यास देखील फुरसत नसे. एकेक दिवस संध्याकाळपर्यंत उपाशी राहावे लागे, तरी त्यांनी त्या परोपकारी कृत्याचा पिच्छा सोडला नाही.''

आज ग्रामीण भागातून गावागावात आणि शहरी भागात गल्ली बोळात विनाअनुदान शाळा महाविद्यालये पावसाळ्यातील छत्र्यांप्रमाणे उगवत आहेत. फुलेदांपत्याच्या प्रेरणेच्या हा विजय मानायचा की पराजय मानायचा? जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी घेतलेले जिवापाड कष्ट, त्यांची तळमळ, निष्ठा नि:स्वार्थीपणा या सगळ्याच मूल्यांना छेद देऊन होत असलेला आजचा शिक्षणाचा प्रसार(!) पाहिला की आनंद मानायचा की विषाद-हेच समजत नाही. कोण्या एके काळी शिक्षणक्षेत्र भ्रष्टाचारापासून अलिप्त होते, आज ते आघाडीवर आहे. शिक्षणक्षेत्रात स्वाहाकाराचे मूल्य आज विलक्षण तेजीत आहे. पूर्वी ब्राह्मणांकडून सर्वसामान्यांचे शोषण होत असे. आज हे शोषण बहुजन समाजातील नवब्राह्मणांकडून होत नाही काय? फुलेदांपत्याच्या प्रेरणांची पायमल्ली आज कोण करीत आहे? व्यवसायाच्या शिक्षणाची गरज सावित्रीबाई-जोतिरावांनी प्रतिपादली होती. आज शिक्षणाचा व्यवसाय करण्याची वहिवाट पडली आहे. ही दुर्दैवाची बाब आहे. पण वस्तुस्थिती आहे.

शंभर वर्षापूर्वी सावित्रीबाईंनी अंध:श्रद्धांवर कडाडून टीका केली. 'काव्यफुले' या ग्रंथात त्या म्हणतात-

***'धोंडे मुले देती, नवसा पावती***
***लग्न का करती, नारीनर?'***

बाईंनी जुनाट रूढी, परंपरांवर हल्ले चढविले. का? तर समाज खडबडून जागा व्हावा म्हणून! समाजाने स्वतंत्र बुद्धी वापरावी म्हणून! पण आज शंभर सव्वाशे वर्षानंतरही समाज आहे, तिथेच आहे. आजचा समाज गणरायाकडून दुग्धप्राशन करविण्याचा चमत्कार करीत आहे आणि समाजनेतेही त्या समाजाचे कौतुक करीत आहेत. सावित्रीबाईंनी केलेल्या चळवळीचे हे यश मानायचे का?

म्हणूनच सत्यशोधक समाजाच्या तत्वविचारांची, सामाजिक समतेची सावित्रीबाईंनी जागवलेली ज्योत अशी विझू देता कामा नये. ती अधिक प्रज्वलित करण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर, आजच्या युवकांवर/युवतीवर आहे. यासाठी अभ्यासूपणा, सचोटी, परिश्रम, प्रामाणिकपणा आणि आशावाद ही गुणसंपदा त्याला/तिला कमवावी लागेल. 'घाम गाळून कमावलेला एकच छदाम आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान असतो' असे वरकमाई करणाऱ्यांना सांगण्याची हिंमत त्याला/तिला दाखवावी लागेल. स्वार्थी प्रवृत्तीविरूद्ध संघर्षात्मक

पण त्याचबरोबर नवरचनात्मक असे दुहेरी कार्य या पिढीला करावे लागेल.

या कार्यातूनच सावित्रीबाई-जोतीराव फुले या क्रांतीज्योतीचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होणार आहे.

*

# शतकांची शिदोरी: सावित्रीबाई फुले

**हरि नरके**

*'जोतिबांपेक्षाही त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले व त्यांच्याबरोबर राहून वाट्यास येतील त्या हालअपेष्टा भोगल्या. उच्चवर्णीयांतील उच्चशिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशाप्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले' नारायण महादेव उर्फ मामा परमानंद दि. ३१ जुलै १८९०.*

महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे देशाच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातले एक आगळेवेगळे जोडपे होते. दीडशे वर्षांपूर्वी स्त्री-पुरूष समता आणि सामाजिक न्याय यांची चळवळ उभारण्यासाठी त्यांनी कडवी झुंज दिली. ज्ञान ही फार मोठी सत्ता असून स्त्रिया आणि दलित-बहुजन वर्गाची उन्नती त्याच्याशिवाय होऊ शकणार नाही, हे ओळखून प्रत्यक्ष शिक्षणप्रसाराच्या कार्याला त्यांनी स्वत:ला आयुष्यभर वाहून घेतले. पुण्यात मुलींची आणि संपूर्ण देशात अस्पृश्य मुलींची शाळा आणि 'नेटीव्ह लायब्ररी' सुरू करण्याचे श्रेय या पतीपत्नीकडेच जाते. देशातील 'साक्षरता अभियानाची' सुरूवात त्यांनीच १८५४-५५ मध्ये केली. फसविल्या गेलेल्या ब्राह्मण विधवांच्या बाळंतपणासाठी आणि त्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी १८६३ साली स्वत:च्या घरात त्यांनी 'बालहत्या-प्रतिबंधक गृह' काढले. 'सत्यशोधक समाज' स्थापन करून हुंड्याशिवायच्या कमी खर्चातील साध्या पद्धतीच्या 'सत्यशोधक विवाहांची' प्रथा त्यांनी सुरू केली. स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून जातीनिर्मूलनाच्या कार्यक्रमाला थेट हात घातला. बालविवाहांना विरोध करूनच ते थांबले नाहीत, तर विधवांचे पुनर्विवाह त्यांनी समारंभपूर्वक घडवून आणले. स्वत:ला मूलबाळ झाले नाही, तर एका ब्राह्मण विधवेचा मुलगा 'दत्तक' घेऊन त्याला वैद्यकीय शिक्षण दिले आणि त्याचा आंतरजातीय विवाह करून दिला.

देशातील स्त्री-शूद्रातिशूद्र वर्गाची समग्र सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळ उभारण्याचे क्रांतिकारक असे ऐतिहासिक काम या जोडप्याने केले. त्यांच्या कामाचे वर्णन करताना एका अनामिक पत्रकाराने 'दि पूना ऑब्झर्व्हर

ॲण्ड डेक्कन विकली' या वृत्तपत्रात लिहिले होते, 'हे काम म्हणजे हिंदू संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा आरंभ होय.' खऱ्या अर्थाने ही एका क्रांतिपर्वाची सुरूवात होती. स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या देशात 'आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय सुधारणा' यावर एक मोठा राष्ट्रीय वाद झालेला होता. इंग्रजांच्या रूपात शत्रू समोर दिसत असल्याने आपण स्वाभाविकच राजकीय स्वातंत्र्याला अग्रक्रम दिला. दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण राजकीय स्वातंत्र्य मिळविल्यानंतर, आता आपले सामाजिक प्रश्न आपसूक सुटतील, असा लोकांचा समज होता. परंतु जसजसे दिवस उलटू लागले तसतसा, लोकांचा भ्रमनिरास होऊ लागला. त्यातून हळूहळू सामाजिक चळवळी जोर पकडू लागल्या. विविध क्षेत्रांतील सामाजिक न्यायाच्या चळवळी संघटित करणाऱ्यांच्या हे लक्षात येऊ लागले की, या विषयाची जोतीराव-सावित्रीबाईंनी लिहिलेली 'विषयपत्रिका' आजही मार्गदर्शक आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचे समग्र क्रांतिकारी चिंतन आजही प्रस्तुत असल्याचे दिसून आल्यामुळे, फुले दंपतीचे जीवनकार्य आणि विचारबद्दल अभ्यासकांना विशेष रस वाटू लागला. आज जो त्यांचा अभ्यास चालू आहे, त्यामागे हे समाजशास्त्रीय वास्तव दडलेले आहे.

जोतीराव-सावित्रीबाईंवर आजवर दोनशेहून अधिक ग्रंथ लिहिले गेले आहेत. मराठीबरोबर हिन्दी, इंग्रजी, तेलगू, बंगाली, कन्नड, पंजाबी, उर्दू, सिंधी, गुजराती या भाषांमध्येही त्यांच्यातील ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. यातल्या सावित्रीबाईंवर लिहिल्या गेलेल्या छोट्यामोठ्या पुस्तकांची संख्या ४० आहे. त्यातील ललितेतर वैचारिक ग्रंथ लक्षात घेतले तर त्यात कु. शांताबाई रघुनाथ बनकर, मुंबई, यांची १९३९ साली प्रकाशित झालेली 'सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र' ही पुस्तिका त्यानंतर १९६६ साली सौ. फुलवंताबाई झोडगे यांनी लिहिलेले, 'क्रांतीदेवता साध्वी सावित्रीबाई फुले' हे चरित्र महत्त्वाचे आहे. त्यांनाच वाट पुसत डॉ. मा. गो. माळी यांनी, 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' हा चरित्रग्रंथ १९८० साली लिहीला, तर डॉ. कृ. पं. देशपांडे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन आणि साहित्यावर 'अग्निफुले' हा ग्रंथ १९८२ साली प्रकाशित केला. नंतरचे सगळे ग्रंथ याच माहितीवर आधारित असून त्यात नवीन काहीही नाही. मात्र सावित्रीबाईंचे एकही चिकित्सक चरित्र आजवर लिहिले जाऊ नये, हे दुर्दैव होय'

सावित्रीबाईंच्या चरित्रकारांनी त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाल्याची नोंद केलेली आहे. पुण्यापासून सुमारे ५० किलोमीटर दूर सातारा रस्त्यावरील शिरवळ पासून पाच किलोमीटरवर असलेले नायगाव हे त्यांचे

जन्मगाव.

सावित्रीबाई या खंडोजी नेवशे पाटील यांच्या ज्येष्ठ कन्या होत. १८४० साली वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा जोतीरावांशी विवाह झाला. दि. ११ एप्रिल १८२७ रोजी पुण्यात जन्मलेले जोतिराव त्यावेळी १३ वर्षांचे होते.

लग्नानंतर जोतीरावांनी सावित्रीबाईंना घरीच शिक्षण दिल्याचे शासकीय कागदपत्रांवरून दिसून येते. दि. १ मे १८५१ ते ३० एप्रिल १८५२ च्या शैक्षणिक अहवालात म्हटल्याप्रमाणे, 'जोतीरावांनी स्वत:च्या पत्नीला घरी शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. दि. २२ नोव्हेंबर १८५१ च्या ''बॉंबे गार्डीयन' या वृत्तपत्रातील बातमीवरून सावित्रीबाईंच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी जोतीरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर (जोशी) यांनी घेतल्याचे दिसते. सावित्रीबाईंनी अहमदनगर येथे फेरार बाईंच्या व पुण्यात मिचेलबाईंच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षणही घेतले होते. त्यामुळे सावित्रीबाई ह्याच आद्य भारतीय शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत, हे तत्कालीन दस्तावेजावरून स्पष्ट होते. त्यांनी शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पाहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या 'सार्वजनिक जीवनाची' सुरूवात होय!

आपल्या शैक्षणिक कामांची नोंद करताना जोतीरावांनी दि. १९ ऑक्टोबर १८८२ रोजी शासनाच्या 'हंटर शिक्षण आयोगाला' सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे, जिला स्वकीय म्हणता येईल, अशी एकही मुलींची शाळा त्याकाळी येथे नव्हती. म्हणून तशी शाळा स्थापन करण्याची प्रेरणा मला झाली. मी आणि माझी पत्नी अशा उभयतांनी कित्येक वर्षेपर्यंत त्या शाळेत काम केले. शिक्षण मंडळीने अध्यक्ष सर अर्स्किन पेरी आणि सरकारचे तत्कालीन सचिव लुम्सडेन यांनी मुलींच्या शाळांना भेटी देऊन शिक्षण क्षेत्रात सुरू झालेल्या या नव्या चळवळीबद्दल समाधान व्यक्त केले.'

दि. १५ सप्टेंबर १८५३ च्या 'ज्ञानोदय'ला दिलेल्या माहितीत जोतीराव म्हणतात, 'प्रथम मनात आले की, आईच्या योगाने मुलांची जी सुधारणूक होते ती फारच चांगली असते. जे लोक या देशाचे सुखाची व कल्याणाची काळजी बाळगतात, त्यांनी हा देश उत्तमावस्थेत यावा, यासाठी हिकडील बायकांच्या स्थितीकडे अवश्य लक्ष्य दिले पाहिजे. प्रथम प्रयत्न करून त्यांस विद्या शिकविल्यामुळे आमच्या जातवाल्यांस फार वाईट वाटले व प्रत्यक्ष माझ्या बापाने देखील आम्हाला घरातून घालविले. शाळेसाठी कोणी जागा देईना. बांधावयास रुपये नव्हते. लोक आपली मुले पाठवयास इच्छितात. परंतु त्यावेळेस लऊजी

बिन राघ राऊत मांग व राणबा महार यांनी शिकल्यापासून कसकसे लाभ आहेत हे आपल्या जातवाल्यास समजावून त्यांची खात्री केली.'

वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी जोतीरावांनी एका ऐतिहासिक कामाला हात घातला होता. त्यांना संपूर्ण साथ देणारी त्यांची पत्नी त्यावेळी अवघी १८ वर्षांची होती. हजारो वर्षे ज्ञानवंचित राहिलेल्या शूद्र समाजाने 'हे काय अरिष्ट आले?' म्हणून उच्चवर्णीयांच्या सांगण्यावरून जोतीरावांच्या कामाला विरोध करायला सुरूवात केली. घराबाहेर पडावे लागले तरी, या जिद्दी आणि ध्येयवादी पतीपत्नीने आपले कार्य सोडले नाही. उदरनिर्वाहासाठी मिशनच्या शाळेत अर्धवेळ नोकरी करून जोतीराव उरलेला वेळ शाळेला देत; तर सावित्रीबाई पूर्णवेळ विनावेतन शिकवण्याचे काम करीत असत. तत्कालीन वृत्तपत्रे म्हणतात, 'या पतीपत्नीना अनेकदा जेवायलाही फुरसद मिळत नसे! त्यांच्या या चळवळीत त्यांना मदत करणाऱ्या ब्राह्मण सहकाऱ्यांची दखल इतिहासाने घेतली आहे, परंतु त्यांच्या वरील दलित सहकाऱ्यांची मात्र उपेक्षाच झालेली आहे. वास्तविक पाहता हजारो वर्षे व्यवस्थेने ज्यांना शिक्षण नाकारले होते, त्या अस्पृश्य समाजातील या सहकाऱ्यांचे कार्य विशेष क्रांतिकारक मानले पाहिजे. जोतीराव-सावित्रीबाईंचे घर पूर्व पुण्याच्या गरीब दलित-कष्टकऱ्यांच्या वस्तीत होते. आजूबाजूच्या या सांस्कृतिक पर्यावरणाचा त्यांच्या जडणघडणीत मोठा वाटा होता. सनातनी भटजीच्या तक्रारीवरून लहानपणी जोतीरावांचे शिक्षण त्यांच्या वडिलांनी बंद केले असता, त्यांची हुशारी ओळखून मुनशी गफ्फार बेग आणि लिजिटसाहेब यांनी गोविंदरावांची समजूत काढून जोतीरावांचे शिक्षण पुन्हा चालू केले होते, ही कृतज्ञता जोतीराव विसरणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी १८४८ च्या मध्यावर प्रथम दलित-मुस्लिम मुलींसाठी शाळा काढली.

त्यामागची भूमिका सांगताना ते म्हणतात, 'या देशात अज्ञान, जातीभेद, भाषाभेद हे दुष्ट रोग आहेत. सारेच लोक दु:खात असताना, कोणास मदत करावी हा प्रश्न असला, तरी कोणालाच मदत न करता, उगीच बसावे यापेक्षा फार दु:ख ज्यावर असेल त्यांस आधी मदत द्यावी हे योग्य होय. जातीभेदांमुळे अनिवार्य दु:खे महार, मांग, यांस सोसावी लागतात. याजकरिता त्यांची विद्याद्वारानेच दाद लागेल यास्तव त्यासाठीच काम चालू केले.' महार-मांग यांना शिकविण्यासारखे देशाचे दुसरे कोणतेही हित नाही, अशी खूणगाठ बांधून त्यांनी कामाचा प्रारंभ केला. एक चांगला विचार एकट्याने करण्याऐवजी, समविचारी मंडळींनी एकत्र येऊन ते काम करावे, यासाठी त्यांनी संस्था (मंडळी) स्थापन केली. गेल्या शतकात संस्थात्मक कामांचे जाळे उभारले गेल्यामुळेच, देशात

असंख्य कामे उभी राहिली. 'मंडळीकरण' ही आधुनिक भारताची पायाभरणी ठरली. जोतीराव-सावित्रीबाईंनी 'नेटीव्ह फिमेल स्कूल्स-पुणे' व 'दि सोसायटी फॉर प्रमोटींग दि एज्युकेशन ऑफ महारस्, मांग्ड अँड एट्सेट्राज' अशा दोन शिक्षणसंस्था सुरू केल्या. या संस्थामार्फत त्यांनी पुणे परिसरात शाळांचे जाळे विणले.

जोतीराव-सावित्रीबाईंनी शैक्षणिक कार्य १८५१ साली सुरू केले, असा काही अभ्यासकांचा समज आहे. परंतु तो योग्य दिसत नाही. हे काम त्यांनी १८४८ सालीच सुरू केले होते, असे 'ज्ञानोदय' 'बॉंबे गार्डियन' या वृत्तपत्रांवरून सिद्ध होते. जोतीरावांच्या मृत्यूनंतर दि. १८ डिसेंबर १८९० रोजी 'ज्ञानोदयाने' जोतीरावांवर श्रद्धांजलीपर अग्रलेख लिहिला होता. त्यात त्यांनी १८४८ साली हे काय सुरू केल्याची स्वच्छ नोंद केली आहे. दि. २२ नोव्हेंबर १८५१ च्या 'बॉंबे गार्डियन' ने याबद्दल विस्तृत नोंद दिली आहे. १८४८ मध्ये सदाशिव बल्लाळ गोवंडे हे अहमदनगर येथे जज्जाच्या कचेरीत नोकरीस लागले. तेव्हा त्यांनी जोती गोविंद फुले या आपल्या मित्राला नगर येथे नेले होते. एके दिवशी ते दोघे मिस फॅरारच्या मुलींच्या शाळा पहावयास गेले. तेथील व्यवस्था बघून त्यांना आपल्या देशातील स्त्रियांना शिक्षण दिले जात नाही, याची खंत वाटली. फुले पुण्यास गेले व त्यांनी मित्रांना हे काम हाती घेण्याचा बेत सांगितला. त्यांच्या पत्नीला शिक्षण देऊन त्यांनी शाळा सुरू केली. मग पुण्यातील महारमांगांसाठी शाळा काढली. पण पुढे सहाच महिन्यात दुर्दैव ओढवले. लोकांच्या मूर्ख पूर्वग्रहांचा प्रभाव पडून त्यांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले व शाळा बंद पडली. गोवंडे पुण्यास आले व त्यांनी सावित्रीबाईंना नगरास नेले. पावसाळ्याच्या प्रारंभी त्या परत आल्या. मग केशव शिवराम भवाळकर यांनी त्यांना शिक्षण द्यायची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. शाळांतून शिकविण्यास उपयोगी होतील अशा तरुण स्त्रीशिक्षिकांचा वर्गही घेण्याचे ठरले. भवाळकरांनी खटपट करून पुण्यात स्त्रिया जमवून त्यांना शिक्षण दिले.

अशा प्रकारे दि. १५ मे १८४८ रोजी सुरू झालेले व १८४८ अखेरीस बंद झालेले हे काम १८५१ मध्ये पुनश्च सुरू झाले.

मुंबईच्या पुराभिलेखागारातील दस्तावेजांमध्ये जोतीरावांनी आपल्या शिक्षणसंस्थेला आर्थिक मदत मिळावी म्हणून शासनाकडे केलेला दि. ५ फेब्रुवारी १८५२ चा अर्ज आहे. याच्याच दुसऱ्या प्रतीसोबत पूना कॉलेजचे प्राचार्य मेजर कँडी यांचे शिफारसपत्र आहे. त्यानुसार मुलींच्या पहिल्या तीन शाळा अनुक्रमे दि. ३ जुलै १८५१, १७ सप्टेंबर १८५१ आणि दि. १५ मार्च १८५२ या

दिवशी अण्णासाहेब चिपळूणकरांचा वाडा, रास्ता पेठ व वेताळ पेठ येथे सुरू झाल्या. त्या शाळांमध्ये प्रत्येकी चार, तीन, व एक शिक्षक असल्याने आणि तेथे ४८, ५१, व ३३ इतक्या मुली शिकत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यातल्या पहिल्या शाळेत मुख्यशिक्षिका (Mistress) सावित्रीबाई फुले असून त्यांच्याबरोबर विष्णुपंत मोरेश्वर आणि विठ्ठल भास्कर हे उपशिक्षक शिकवीत असत. पहिल्या शाळेच्या पटावर पहिल्या दिवशी आठ मुली होत्या, त्यांची संख्या लवकरच ४८ वर गेली.

शाळांचे श्री. दादोबा पांडुरंग यांनी दि. १६ ऑक्टोबर १८५१ रोजी शाळेतील मुलींची परीक्षा घेतली. शाळा सुरू होऊन फार थोडा काळ जाऊनही मुलींची प्रगती लक्षणीय होती. शाळांची प्रथम वार्षिक परीक्षा दि. १७ फेब्रुवारी १८५२ रोजी झाली तर दुसरी वार्षिक परीक्षा पूना कॉलेजमध्ये दि. १२ फेब्रुवारी १८५३ रोजी झाली. या परीक्षा बघायला पुण्यात अभूतपूर्व गर्दी जमल्याची नोंद या अहवालांमध्ये आहे. कॉलेजच्या आवारात तीन हजारांहून अधिक लोक जमले होते तर त्याहून अधिक गर्दी बाहेर होती. यावेळी २३७ मुलींची परीक्षा घेण्यात आली. संस्थेच्या वार्षिक जमाखर्चाचे ऑडिट करून घेण्यात आले. वर्गणी आणि चालकांचा सहभाग याद्वारे १९७४ रुपये आठ आणे संस्थेने मिळविले होते. शासनाच्या दक्षिणा प्राईझ फंडाकडून वार्षिक नऊशे रुपये मदत मिळत असे. सार्वजनिक पैशाचा चोख आणि तात्काळ हिशोब जाहीरपणे देण्याचे ब्रीद जोतीराव सावित्रीबाईंनी आयुष्यभर पाळले.

अस्पृश्यांच्या शाळांच्या परीक्षांचा दि.२ फेब्रुवारी १८५८ चा सविस्तर छापील अहवाल पुराभिलेखागारात उपलब्ध असून ही परीक्षा दि. २९ ऑगस्ट १८५६ रोजी झाली होती. संस्थेच्या तीन शाळा होत्या. त्यात भर घालण्याची संस्थेची इच्छा असताना १८५७ च्या बंडानंतर युरोपियन मंडळींनी मदतीचा हात. आखडता घेतल्यामुळे संस्था आर्थिक संकटात सापडली होती. दक्षिणा प्राईज कमेटीकडून दरवर्षी तीनशे रुपये मदत मिळत असे. शाळेच्या इमारत निधीसाठी शासनाने पाच हजार रुपये मंजूर केले होते. अस्पृश्यवर्गामध्ये नुकतीच कुठे शिक्षणाची गोडी निर्माण होत असताना संस्थेवर शाळा बंद करण्याची पाळी येत असल्याबद्दल अहवालात दु:ख प्रकट करण्यात आले होते. तीन शाळांमध्ये एकूण २५८ विद्यार्थी शिकत होते. या शाळांमध्येही जोतीरावांचे सहकारी श्री. गणू शिवजी मांग व धुराजी आप्पाजी चांभार हेही शिक्षक म्हणून काम करीत होते. संस्थेच्या कार्यवाहांनी शासनाला पाठविलेल्या पत्रात म्हटले होते की, 'कार्यकारी मंडळाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे शिक्षकांना मोठे वेतन देता येत

नाही. म्हणून शिक्षक जेथे अधिक पगार मिळतो तिकडे जातात. मधूनमधून असे शिक्षक शाळा सोडून गेल्यामुळे शाळेचे नुकसान होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई ह्यांनी स्त्रीशिक्षणाचा सुधारणेसाठी उदारपणे जीवित समर्पित करण्याचे ठरविले आहे. ह्या बाई आपले काम विनावेतन करतात. जसजसा ज्ञानाचा प्रसार होईल, तसतसा स्त्रियांना शिक्षणापासून कोणता फायदा आहे, हे लोकांना कळून येईल अशी आम्हाला उमेद वाटते.'

शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नामदार जॉन वॉर्डन यांनी एका समारंभात जाहीरपणे सांगितले की, 'जेव्हा मी प्रथम १८५१ मध्ये पुण्यात न्यायालयाचा आयुक्त म्हणून गेलो त्यावेळी तेथील मुलींच्या शाळांना मी भेट दिली. ज्यूंच्या भितीमुळे वरच्या मजल्याचे दरवाजे बंद करून ख्रिश्चन लोकांच्या सुरूवातीच्या शाळा चालत, त्यांची आठवण मला तिथे झाली. त्या शाळेची शिक्षिका एका माळ्याची पत्नी होती. आपल्या देशबांधवांचे केविलवाणे अज्ञान दूर करून त्यांचा उद्धार करण्यासाठी स्वत:च्या पत्नीने साह्यभूत व्हावे म्हणून त्याने तिला शिकविले होते. माझ्या देखत तिने मुलींना काही प्रश्न विचारावेत, अशी मी तिला विनंती केली. काही तरुण विवाहित स्त्रियांचा प्रशिक्षण वर्गही तेथे चालविला जात होता.'

जोतीराव-सावित्रीबाईंच्या शाळांची प्रगती लक्षणीय होती. उच्चवर्णीय मुलांसाठी सरकारी शाळा असत. त्यातल्या एकाने 'पूना ऑब्झर्व्हर' मध्ये दि. २९मे १८५२ रोजी लिहिले होते, 'जोतीरावांच्या शाळांतील मुलींची पटसंख्या सरकारी शाळांतील मुलांपेक्षा दहापटीने मोठी आहे, त्याचे कारण मुलींना शिकविण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळांतील व्यवस्थेपेक्षा अनेक पटींनी श्रेष्ठ दर्जाची आहे... जर अशीच परिस्थिती चालू राहिली तर जोतीबांच्या मुली सरकारी शाळांतील मुलांपेक्षा वरचढ ठरतील. खरोखरीच येत्या परीक्षेमुळे आपण मोठा विजय मिळवू असे त्यांना वाटत आहे. जर शासकीय शिक्षण मंडळाने यावर उपाययोजना केली नाही तर स्त्रियांनी पुरुषांवर मात केली हे पाहून आम्हा पुरुषांना लाजेने माना खाली घालाव्या लागतील.' ब्रिटीश सरकारने जोतीरावांच्या ह्या ऐतिहासिक कामाचे मोल जाणून त्यांचा जाहीर गौरव केला. दि. १६ नोव्हेंबर १८५२ रोजी विश्रामबागवाड्यातील भव्य समारंभात त्यांना शालजोडी अर्पण करण्यात आली. जुन्या पिढीतील सनातन्यांनी मात्र, जोतीरावांसारख्या शूद्राला महावस्त्र अर्पण करण्यात आल्याबद्दल नापसंती दर्शवली होती.

जोतीराव-सावित्रीबाईंचा मुलामुलींना श्रमप्रधान शिक्षण देण्यावर भर होता. त्यांना विचारशील आणि स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी १८५२ च्या अहवालात

पुढील मत मांडले होते,'Industrial Department should be attached to the schools in which children would learn useful trades and crafts and be able on leaving schools to maintain themselves comfortably and independantly.' तशी व्यवस्था त्यांनी निर्माण केली.

शिक्षणातील गळतीचा प्रश्न हा एक चिंताजनक प्रश्न तेव्हा तर अधिक होता. त्यावर त्यांनी व्यावहारिक असे उपाय योजले. त्याची कारणे शोधून त्यामागे दारिद्र्य आणि अरूची ही मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याने त्यावर उपाययोजना शोधली. गरीब मुलामुलींना 'पगार' देण्याची व्यवस्था करून त्यांना आवडेल असा अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला. विद्याभासापासून 'लाभ व सुखे' कोणकोणती आहेत याची ओळख करून देऊन दलित-बहुजनांमध्ये जागरणाची मोहिम सुरू केली. पालकांसाठी साक्षरता अभियान हाती घेऊन समग्र शिक्षणाचा प्रकल्प उभारला. जमाखेत्रा, जातपंचायती, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य या साऱ्या कारणांवर जोतीरावांनी केलेली मात आजही मार्गदर्शक ठरावी अशी आहे. महाराष्ट्र शासनाने नुकतीच आदिवासी मुलामुलींची गळती थांबवण्यासाठी 'उपस्थितीभत्ता' देण्याची प्रथा सुरू केली आहे.

शिक्षणातून जीवनातील 'खरे खोटे' निवडण्याची क्षमता आली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. मुलामुलींची स्वतंत्र प्रतिभा मुक्तपणे उमलू लागावी यासाठी ते विशेष प्रयत्नशील असत. त्यांना त्यात मिळालेली यशही लक्षणीय आहे. त्यांच्या शाळेतील एका चिमुरड्या मुलीला पारितोषिक स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर बोलावण्यात आले तेव्हा ती अध्यक्षांना उत्स्फूर्तपणे म्हणाली,'सर मला बक्षिस म्हणून खाऊ खेळणी नकोत. आम्हाला शाळेचे ग्रंथालय हवे आहे. ही मुलगी दररोज रात्री १२ वाजेपर्यंत अभ्यासात बुडून जात असल्याची गोड तक्रार तिच्या पालकांनी केली. शाळेचे स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण, अभिरूची संवर्धन आणि चारित्र्यनिर्माण ह्या गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष दिले जात असल्याबदद्ल शासकीय निरिक्षकांनी शिक्षकांचे कौतुक केल्याचे आढळते.

सावित्रीबाईंच्या मुक्ता नावाच्या मातंग समाजातील एका विद्यार्थिनीने स्वत:चे आत्मकथन करणार निबंध लिहिला होता. १८५५ साली ११ वर्षाच्या या विद्यार्थिनीने लिहिलेला हा निबंध अक्षर वाङ्मयातला एक श्रेष्ठ मानदंड ठरावा, इतका महत्त्वाचा आहे. आधुनिक दलित साहित्याची ती सुरुवातच मानायला हवी. ती लिहिते, ''लाडूखाऊ ब्राह्मण लोक तर म्हणतात की, वेद ही आमचीच मत्ता आहे; ब्राह्मणेतरांस वेदांचा अधिकार नाही. यांजवरून जर आम्हांस धर्मपुस्तक पाहण्याची मोकळीक नाही. तर आम्ही धर्मरहित आहो असे साफ दिसते की

नाही बरे? हे भगवाना, तुजकडून आलेला कोणता धर्म आम्ही स्विकारावा, ते लवकर कळीव म्हणजे तेणेप्रमाणे तजवीज करता येईल!''अशी भेदक मांडणी करणारा हा निबंध त्या मुलींकडून 'ज्ञानोदय'च्या संपादकांनी ऐकला आणि ते चकित झाले. त्यांनी अहमदनगरहून प्रकाशित होणाऱ्या आपल्या वृत्तपत्रात दि. १५ फेब्रुवारी व दि. १ मार्च १८५५ रोजी दोन भागात तो छापला. हा निबंध त्या वर्षीच्या शैक्षणिक अहवालामध्ये शासनाने छापला असून ना. वि. जोशी यांच्या १८६४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'पुणे शहराचे वर्णन' या ग्रंथातही त्यांनी तो आवर्जून दिला आहे.

समाजाकडून होणारा कडवा विरोध सहन करीत आणि शिव्याशाप शांतपणे ऐकत सावित्रीबाई काम करीत होत्या. त्या शाळेत जातायेताना, टाळेभैरव मुद्दाम रस्त्यावर थांबत, अचकट-विचकट बोलत; कधीकधी दगड मारीत; अंगावर चिखल किंवा शेण टाकीत असत. शाळेत जाताना सावित्रीबाईंना सोबत दोन साड्या न्याव्या लागत. रस्त्याने जांताना खराब झालेली साडी शाळेत गेल्याबरोबर बदलावी लागे. दुसरी परतताना खराब होई आणि तरीही सावित्रीबाई आपल्या कामात खंड पडू देत नव्हत्या. हा छळ असाच चालू राहिल्याने त्यांच्या व लहान मुलींच्या संरक्षणासाठी संस्थेने एका शिपायाची नियुक्ती केली. त्याने लिहून ठेवलेल्या आठवणीनुसार सावित्रीबाई आपल्या अंगावर दगड किंवा चिखल फेकणारांना म्हणत, 'मी माझ्या भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करीत असताना तुम्ही माझ्यावर शेण अगर खडे फेकीत आहात ही मला फुलेच वाटतात. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो!'' बळवंत सखाराम कोल्हे यांच्या याविषयीच्या आठवणी सावित्रीबाईंच्या धैर्यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

१८६३ साली जोतीराव-सावित्रीबाईंनी विधवांसाठी सुरू केलेल्या 'बालहत्या प्रतिबंधक गृहाबाबत'ची अस्सल माहिती अलिकडेच उपलब्ध झाली आहे. एक तर हे गृह फक्त ब्राह्मण विधवासाठीच सुरू करण्यात आलेले होते. आणि त्यात सावित्रीबाईंचा पुढाकार होता. दि. ४ डिसेंबर १८८४ रोजी जोतिरावांनी मुंबई सरकारच्या अवर सचिवाला लिहिलेल्या पत्रात याबाबतची सगळी माहिती नोंदवलेली आहे.

जोतीरावांचे ब्राह्मण मित्र गोवंडे यांच्या घरी काशीबाई नावाची एक ब्राह्मण विधवा स्वयंपाकिणीचे काम करीत होती. ही गरीब काशीबाई एका चांगल्या घरातील सुंदर आणि चारित्र्यसंपन्न तरुण विधवा होती. शेजारच्या एका कावेबाज शास्त्रीबुवाने या अशिक्षित विधवेला फसविले आणि ती गरोदर राहिली. गर्भपाताचे सर्व प्रयत्न फसल्यावर तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. शास्त्रीबुवाने हात

झटकल्यामुळे काशीबाई मोठ्या काळजीत पडली. समाज आपल्याला जगू देणार नाही, या भितीपोटी तिने त्या निरागस बाळाचा सुऱ्याने गळा कापला आणि त्याची हत्या केली. गोवंड्यांच्या परसातल्या विहिरीत टाकलेले हे प्रेत फुगून वर आले. पोलिसांनी काशीबाईवर खटला भरला. तिला जन्मपेठेची काळ्या पाण्याची (अंदमानची) शिक्षा झाली. इतकी गंभीर शिक्षा देशात प्रथमच एका स्त्रीला सुनावण्यात आली होती. १८६३ सालची ही घटना.

या खटल्यामुळे सावित्रीबाई-जोतीराव कळवळले. त्यांची मिळकत फारशी नव्हती. खरेतर त्यांचे स्वत:चेच खाण्यापिण्याचे हाल होते. पण त्यांचे हृदय विशाल होते. त्यांनी तात्काळ आपल्या स्वत:च्या राहात्या घरी (३९५, गंजपेठ,पुणे येथे) अशा ब्राह्मण विधवांसाठी आश्रम सुरू केला. देशभर गाजलेल्या खटल्याची इतरजन फक्त चर्चा करीत राहिले, सावित्रीबाई-जोतीरावांनी नडल्या गेलेल्या विधवांसाठी काम सुरू केले, हा फरक होता त्या दोघांत आणि इतर लोकांमध्ये! त्यांनी शहरभर आणि इतरही तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जाहिरातील लावल्या-''काळे पाणी टाळण्याचा उपाय'' आणि असा आश्रम सुरू केल्याची माहिती सर्वत्र पोचवली. अनेक ठिकाणांहून ३५ ब्राह्मण विधवा १८८४ पर्यंत त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे स्वत: सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली अशीच एक दुसरी काशीबाई त्यांच्याकडे आली होती. तिचा मुलगा त्यांनी स्वत: दत्तक घेतला. त्याला वैद्यकीय शिक्षण देऊन डॉक्टर बनविले. त्याने जोतीराव-सावित्रीबाईंचे काम पुढे चालविले. दि. १० जुलै १८८७ रोजी जोतीरावांनी आपले मृत्यूपत्र करून ते उपनिबंधकांच्या कार्यालयात नोंदविले. त्यात त्यांनी सावित्रीबाईच ही सारी बाळंतपणे पोटच्या मुलीसारखी करीत असत, असे नमूद केले आहे.

ब्राह्मणविधवांच्या केशवपनाविरूद्ध नाभिकांना संघटित करून त्यांचा संप घडवून आणण्याचा कल्पक उपक्रम 'दीनबंधू' चे संपादक, कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी घडवून आणला. त्यामागची प्रेरणा सावित्रीबाईच होत्या. नाभिकांच्या या ऐतिहासिक सभेला दि.२३ मार्च १८९० रोजी पाचशे न्हावी उपस्थित होते. त्या सभेचा वृत्तांत लंडनच्या 'दि टाईम्स' या वृत्तपत्राने दि. ९ एप्रिल १८९० च्या अंकात प्रसिद्ध केला. इंग्लंडमधल्या स्त्रियांनी त्यांना अभिनंदनाचे पत्र पाठविले.

१८७७ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडलेला होता. कोणत्याही संकटात मदतीला धावून जाणारे सावित्रीबाई-जोतीराव शांत राहणे शक्य नव्हते. त्यांनी गावोगाव फिरून निधी जमवला. डॉ. शिवाप्पांसारख्या आपल्या मित्रांच्या

मदतीतून धनकवडी येथे 'व्हिक्टोरिया बालाश्रम' सुरू केला. त्याठिकाणी दररोज एक हजार गोरगरीब मुलांना जेवण घातले जाई. सावित्रीबाई आपल्या मैत्रिणीच्या मदतीने स्वत: हा स्वयंपाक करीत असत. मराठीतील अन्य 'युगकर्ते' विचारवंत याववेळी मराठी भाषेच्या बिघडलेल्या व्याकरणावर निबंध लिहिण्यात गर्क होते.

जोतीराव-सावित्रीबाईंनी स्वत:च्या घरात एक वसतीगृह चालविले होते. दूरदूरच्या ठिकाणांहून मुले शिक्षणासाठी तिथे येत असत. लक्ष्मण कराडी जाया ह्या मुंबईच्या विद्यार्थ्याने या वसतीगृहात राहून सावित्रीबाईंच्या मायेची पाखर अनुभवली होती. त्याने आठवणीत म्हटले आहे की, 'सावित्रीबाईंसारखी दयाळू व प्रेमळ अंत:करणाची स्त्री मी अजूनसुद्धा कोठे पाहिली नाही. त्या आम्हा मुलांवर आईपेक्षासुद्धा जास्त प्रेम करीत असत.'

दुसऱ्या एका मुलाने आपल्या आठवणींमध्ये सावित्रीबाईंचा स्वभाव, त्यांची साधी राहणी आणि जोतीराव-सावित्रीबाईचे परस्परांवरील अपार प्रेम यांची विलक्षण सहृदय नोंद केली आहे. हा महादू सहादू वाघोले लिहितो, 'सावित्रीबाई फारच उदार होती. तिचे अंत:करण दयेने भरलेले होते. गोरगरीबांवर ती फार दया करी. ती अन्नदान पण फार करी. ती कोणासही जेऊ घाली. गरीब बायांची अंगावरची फाटलेली लुगडी पाहून त्यांना ती आपल्या घरातील लुगडी देई. त्यामुळे तात्यांचा खर्च फार होत असे. एखादेवेळी तात्या तिला म्हणत, 'इतका खर्च करू नये.' त्यावर ती शांतपणे बारीक हसत असे व 'बरोबर काय न्यायचे आहे?' असे तात्यांना विचारीत असे. त्यावर तात्या शांत मुद्रेने थोडावेळ गप्प बसत असत. ते दोघे एकमेकांवर अतिशय प्रेम करीत असत. सावित्रीबाईंना स्त्रीजातीच्या उन्नतीची फार कळकळ असे. त्या सुस्वरूप व माध्यम बांध्याच्या होत्या. त्यांची मुद्रा नेहमी शांत असे. राग म्हणून काय चीज आहे ती या बाईच्या गावीच नव्हती. ती नेहमीच हसतमुख असे. मात्र तिचे हसू गालांवर तेवढे दिसून येईल इतकेच ते मर्यादित असे. सावित्रीबाईंना सर्व लोक 'काकू' म्हणत असत. पाहुणे मंडळी घरी आली म्हणजे तिला कोण आनंद होत असे. त्यांच्याकरिता मोठ्या आवडीने ती गोडधोड जेवण तयार करीत असे. जोतीराव सावित्रीबाईंना मोठा मान देत असत. तिला ते बोलताना, 'अहो-जाहो' या बहुमानदर्शक शब्दांनी हाका मारीत असत. सावित्रीबाई तात्यांना 'शेटजी' म्हणत. या दोघांत पती पत्नीत्वाचे खरे प्रेम भरलेले होते. सावित्रीबाईंनी नको म्हटलेले काम तात्या कधीही करीत नसत. सावित्रीबाई सुविचारी आणि दूरदृष्टीची होती. तिच्याविषयी आप्तजनात मोठा आदर होता. मुलींच्या शाळांतून तिने शिक्षिकीणीचे काम केलेले असल्यामुळे स्त्रीशिक्षणाचा विस्तार झाल्यानंतर सुशिक्षित बायांत तिच्याविषयी

पूज्यभाव वाढलेला दिसत होता. तिच्याकडे आलेल्या मुलींना व स्त्रियांना ती नेहमी सदुपदेश करीत असे. पुण्यातील मोठमोठ्या सुशिक्षित बाया पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी आणि रमाबाई रानडे तिच्या भेटीस येत असत.

सावित्रीबाईचा पोषाख तात्यांप्रमाणे अगदी साधा असे. तिच्या अंगावर अलंकार नसत. तिच्या गळ्यात एक पोत व मंगळसूत्र असे. कपाळावर भले मोठे कुंकू लावलेले असे. रोज सकाळी सूर्योदयापूर्वी स्नान करून त्या सडासंमार्जन उरकून घेत. त्यांचे घर नेहमी स्वच्छ असून टापटीपीने ठेवलेले असे. त्या स्वयंपाक स्वत: करीत. तात्यांच्या खाण्याची व प्रकृतीची त्या फार काळजी घेत.

प्रत्यक्ष त्यांच्या सहवासात वावरलेल्या व्यक्तीने केलेले हे वर्णन आहे. कोणत्याही काल्पनिक वर्णनापेक्षा अस्सल दस्तावेजांमधील हे 'सावित्रीदर्शन' विलक्षण प्रत्ययकारी असल्याने ते विस्ताराने उद्धृत केले आहे. एक क्रांतिकारक स्त्री तिच्या घरगुती जीवनात कशी होती ह्याचा हा पुरावा होय.

'सत्यशोधक समाजा'ची स्थापना दि. १४ सप्टेंबर १८७३ रोजी करण्यात आली. सावित्रीबाई समाजाच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या. समाजाने पुरोहित नाकारून साध्या पद्धतीचे, हुंड्याशिवायचे, कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह दि. २५ डिसेंबर १८७३ रोजी लावण्यात आला नंतर ही चळवळ देशव्यापी झाली. देशाच्या हजारो वर्षातल्या धार्मिक परंपरा नाकारून त्याविरूद्ध विधायक विद्रोह करणारे हे क्रांतिकारी पाऊल समाजाने उचलले त्यात सावित्रीबाईचा पुढाकार होता, असे समाजाच्या पहिल्या अहवालात अभिमानाने नोंदवण्यात आले आहे. सावित्रीबाईची मैत्रिण बजूबाई ग्यानोबा निंबणकर यांची कन्या राधा आणि फुल्यांचे कार्यकर्ते सीताराम जबानी आल्हाट यांचा हा विवाह होता. या ऐतिहासिक विवाहाचा खर्च सावित्रीबाईनी स्वत: केला. नोंदणी विवाहासारखी असणारी ही विवाहपद्धती आजही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अमलात आहे. या विवाहांना भटजींनी देशभर विरोध केला. कोर्टकचेऱ्या झाल्या. सावित्रीबाई-जोतीरावांना अपार त्रास सोसावा लागला. पण ते डगमगले नाहीत. दि. ४ फेब्रुवारी १८८९ रोजी वयाच्या १६ व्या वर्षे त्यांनी आपल्या दत्तक पुत्राचा विवाहही याच पद्धतीने केला. हा भारतातला आधुनिक काळातला पहिला आंतरजातीय विवाह होय. या पद्धतीमध्ये बोहल्यावर चढलेल्या नवऱ्यामुलाने स्त्रीशिक्षणाची आणि स्त्रियांना समान हक्क देण्याची प्रतिज्ञा करायची असते, यातली मंगलाष्टके स्वत: नवरा-नवरी म्हणतात. मंगलाष्टके म्हणजे दुसरे तिसरे काही नसून प्रतिज्ञा आहेत. सत्यशोधक समाजाचे एक नेते ग्याणोबा कृष्णाजी ससाणे यांची कन्या राधा उर्फ लक्ष्मी हिच्याशी यशवंतचा विवाह करण्यात आला

होता. लग्नाआधी त्यांचा परस्पर परिचय व्हावा आणि त्यांच्या आवडीनिवडी एकमेकांना कळाव्यात, यासाठी राधाला सावित्रीबाईंनी आपल्या घरी ठेवले होते. तिचे शिक्षणही त्यांनीच केले. याकाळात सावित्रीबाई तिच्याशी कसे वागत याचे वर्णन जोतीरावांच्या दि. २४ सप्टेंबर १८८८ च्या पत्रातून मिळते. ते ससाण्यांना लिहितात, 'सौभाग्यवतीने एकदाचे सर्व काम सांभाळून लक्ष्मीस अगदी मोकळी ठेविली आहे. त्यामुळे तिचा अभ्यास सुरळीत होत आहे.' सावित्रीबाई या सासुरवास करणाऱ्या नव्हेत तर स्वत: सर्व काम करून सुनेला शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या सासूबाई होत्या.

जोतीरावांना जुलै १८८७ रोजी पक्षाघाताचा आजार झाला. त्यांचे संपूर्ण उजवे अंग लुळे पडले. आजारपणात सावित्रीबाईनी त्यांची अहोरात्र शुश्रुषा केली. जोतीराव त्याही आजारातून सावरले. लेखन करू लागले. ह्याकाळात त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवलेले होते. 'पूजा कमर्शियल अँण्ड कॉंट्रॅक्टीग कंपनी' चा व्यवहार थंडावला होता. उत्पन्नाचे मार्ग बंद झालेले आणि खर्च तर भरमसाठ. वसतीगृह, बालहत्या प्रतिबंधक गृह, सत्यशोधक समाज, मुलाचे शिक्षण आणि आजारपणे यामुळे हे पतीपत्नी बेजार झाले होते. एकवेळ तर अशी आली की औषधपाण्यालाच पैसे नव्हते. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी मोफत उपचार केले. जोतीरावांचे स्नेही आणि थोर विचारवंत, सुधारक आणि लेखक महर्षि मामा परमानंद यांनी जोतीरावांना व सावित्रीबाईंना आर्थिक मदत देण्याबाबत बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांना पत्रे लिहिली. दि. ३१ जुलै १८९० च्या पहिल्या पत्रात मदतीची शिफारस करताना त्यांनी जोतीराव-सावित्रीबाईंच्या क्रांतिकारक योगदानाची ऐतिहासिक नोंद केलेली आहे. एका समकालीन ब्राह्मण विचारवंताने केलेले हे मूल्यमापन लक्षणीय आहे. "त्या विपरीत काळात जोतीरावांनी आपल्या पत्नीला शिकवून तिच्याद्वारे ब्राह्मणांच्या मुलींना शिक्षित केले, तेही कुठे? सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात! महार-मांग या वर्गातील लोकांसाठी शाळा स्थापन करून त्या चालविणे व त्यांना समाजात बरोबरीचे स्थान मिळवून देणे हे त्यांचे कार्य म्हणजे सिंहाच्या गुहेत शिरून त्याची आयाळ पकडण्यासारखेच होते. जोतीरावांपेक्षा त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले व त्याच्याबरोबर राहून वाट्याला येतील त्या सर्व हालअपेष्टा भोगल्या असे उदाहरण उच्चजातीमध्ये सुद्धा आढळत नाही. ह्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले."

या पत्रापाठोपाठ मामांनी दि. १९ ऑगस्ट १८९० रोजी दुसरे पत्र लिहून

तातडीने आर्थिक मदत करण्याबद्दल विनंती केली. ''जोतीबांनी अनेक वर्षे नि:स्वार्थीपणे जनसेवा करण्यात घालविली आणि सध्या ते असहाय्य स्थितीत काळ कंठीत असून अशावेळी त्यांना मदतीची नितांत गरज आहे.''

महाराजांना जोतीरावांच्या कामाबद्दल आदर होता, परंतु मधल्या नोकरशहानी ही पत्रे महाराजापर्यंत जाऊ दिली की नाहीत याचीच शंका आहे. दरम्यान दि. २८ नोव्हेंबर १८९० रोजी जोतीरावांचे आजारपणातच निधन झाले. डिसेंबर १८९० च्या पहिल्या आठवड्यात मामांनी तिसरे पत्र लिहिले, 'त्या पुण्यात्म्याने स्वत:च्या सुखदु:खाची पर्वा केव्हाही केली नाही. त्यांना चिंता वाटत असे ती पत्नीसंबंधी व आपल्या दत्तक पुत्रासंबंधीच होय. तेव्हा अजूनही त्यांच्या कुटुंबियांस तरी मदत देण्यात यावी.'' असे मामांनी लिहिले. जिद्दी मामांनी निराश न होता सलग दीडवर्षे पाठपुरावा केला. दरम्यानच्या काळात यशवंतच्या नावे त्यांनी नवीन अर्ज सादर केला. मामा व जोतीरावांचे स्नेही रामचंद्रराव धामणस्कर यांच्या अल्पस्वल्प मदतीवर सावित्रीबाई आणि यशवंत कसेबसे गुजराण करीत होते.

अखेरीस दि. १० फेब्रुवारी १८९२ रोजी सयाजीमहाराजांनी सावित्रीबाईंच्या मदतीसाठी एक हजार रुपयांचा धनादेश धामणस्करांकडे दिला. तुकाराम तात्या पडवळ यांच्या एस. नारायण कंपनीत ही रक्कम गुंतवून व्याजातून दर तिमाहीस पन्नास रुपये सावित्रीबाईंनी पाठविले जात. दि. २ मार्च १८९२ च्या पत्रातून धामणस्करांनी 'महाराजांच्या मते जोतीरावांचे भव्य स्मारक उभारले जावे त्यासाठी महाराज भरीव मदत करतील' असे मामांना कळविले. सावित्रीबाईंची चौकशी महाराजांनी आस्थापूर्वक केल्याचेही त्यांनी लिहिले हे स्मारक मात्र काही झाले नाही.

जोतीरावांच्या निधनसमयी सावित्रीबाई जवळ होत्या. जोतीरावांनी आपल्या मृत्यूपत्रात आपले दहन न करता आपल्याला मिठात घालून पुरावे अशी इच्छा व्यक्त केले होती आणि त्यासाठी घरामागच्या बखळ जागेत एक खड्डाही खोदवून घेतला होता. परंतु नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी निवासी जागेत दफन करण्याची परवानगी न दिल्याने, नाईलाजाने जोतीरावांवर अग्निसंस्कार करावे लागले. अंत्ययात्रेच्या समयी जो टिटवे धरतो, त्याला वारसाहक्क मिळत असल्याने जोतीरावांचे चुलत पुतणे आडवे आले आणि यशवंतला विरोध करू लागले. अशा वेळी सावित्रीबाई धैर्याने पुढे झाल्या आणि त्यांनी स्वत: हाताने जोतीरावांच्या पार्थिवाला अग्नि दिला. भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात एका स्त्रीने अग्नि देण्याचा हा पहिलाच प्रसंग असावा. दि. ३० नोव्हेंबरला वाजतगाजत अस्थि

घरी आणून त्या जोतीरावांनी तयार केलेल्या जागेत पुरण्यात आल्या. त्या जागेवर सावित्रीबाईंनी तुळशी वृंदावन उभारले. आजही हे तुळशीवृंदावन तिथे असून त्याच्या पायाशी ओबडधोबड दगडाच्या पादुका उभारण्यात आल्या आहेत. जोतिरावांचे चिरंतन स्मारक सावित्रीबाईंनी त्यांच्या घरामागच्या बखळ जागेत असे साधेसुधे उभारले.

जोतीरावांच्या पश्चात् सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व केले. शेवटपर्यंत त्या काम करीत राहिल्या. यशवंत डॉक्टर झाल्यानंतर मिल्ट्रीत नोकरीला लागला. त्याला नोकरी निमित्त अनेक देशांत जावे लागले. त्याची पत्नी राधा उर्फ लक्ष्मी हिचे दि. ६ मार्च १८९५ रोजी निधन झाले. सावित्रीबाई घरी एकट्या उरल्या. यशवंत नोकरीनिमित्त परदेशात असे.

१८९३ साली सासवड येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षस्थान सावित्रीबाईंनी भूषविले होते. १८९६ च्या दुष्काळात सावित्रीबाई खूप राबल्या. १८९७ साल उजाडले. तेच प्लेगचे थैमान घेऊन. पुणे परिसरात दररोज शेकडो माणसे मरू लागली. सरकारने रँड या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली प्लेगच्या बंदोबस्त करण्याचे काम हाती घेतले. सावित्रीबाईंनी यशवंतला रजा काढून बोलावून घेतले आणि ससाण्यांच्या माळरानांवर त्यांनी यशवंतला दवाखाना घालायला लावला. त्या स्वत: आजारी माणसांना उचलून दवाखान्यात आणीत, त्यांच्यावर उपचार करीत. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही त्या सेवाशुश्रुषा करीत होत्या. मुंढवा गावाच्या गावकुसाबाहेर दलित वस्तीत पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुलाला प्लेगची लागण झाल्याचे कळताच सावित्रीबाई तिकडे धावल्या. मुलाला पाठीवर घेऊन धावतपळत त्या दवाखान्यात पोचल्या. त्यातच सावित्रीबाईंना प्लेगची बाधा झाली आणि दि. १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता त्यांचे प्लेगमुळे निधन झाले. त्यांच्या मृत्यूची बातमी 'दीनबंधू'ने शोकाकुल होऊन दिली.

सावित्रीबाई १८४८ ते १८९७ अशी सलग ५० वर्षे लोकांसाठी राबत होत्या. सेवा आणि करुणेचा एक अनोखा आदर्श त्यांनी घालून दिला.

त्यांच्यानंतर एकाकी डॉ. यशवंत सैरभैर झाले. त्यांनी १९०३ साली दुसरा विवाह केला. त्यांना एक मुलगी झाली. हॉंगकॉंग, आफ्रिका, चीन येथे त्यांनी लष्करात नोकरी केली. दि. १३ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांची पत्नी चंद्रभागा आणि मुलगी सोनी उर्फ लक्ष्मी यांच्या अनाथपणाला पारावार राहिला नाही. त्यांनी सर्वप्रथम जोतीरावांची सगळी पुस्तके रद्दीत विकली. त्यानंतर भांडीकुंडी विकून गुजराण केली. आणि शेवटी दि. २८ ऑक्टोबर

१९१० रोजी जोतीराव-सावित्रीबाईंचे घर त्यांनी अवघ्या शंभर रुपयांना मारुती कृष्णाजी देडगे यांना विकले. बाई मुलीसह रस्त्यावर आल्या. बेवारस म्हणून रामेश्वराच्या दारात वारल्या! मुलीने पुढे बाबूराव गंगाराम होले यांच्याशी विवाह केला. त्यांना दोन मुले झाली. मुलगा दत्तात्रय बाबूराव होले हा असून मुलगी मथुरा ही कोंद्रे यांना दिली. लक्ष्मीबाई १९३८ साली वारल्या. डॉ. यशवंतरावांच्या पत्नी चंद्रभागाबाई त्याआधीच १९३०-३१ च्या सुमारास वारल्या होत्या. एका क्रांतीकारक घराण्याची अशी ही चटका लावणारी वाताहात झाली. हजारो विधवांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश आणणाऱ्या जोतीराव-सावित्रीबाईंच्या विधवा सुनेला मात्र बेवारस म्हणून एका मंदिराच्या दारात मरावे लागले !

सावित्रीबाईंनी मौलिक लेखन केल्याची माहिती चरित्रकारांनी दिली आहे. या साहित्याच्या अस्सलपणाविषयी डॉ. स. गं. मालशे यांनी गंभीर आक्षेप उपस्थित केले होते. मात्र मालशे यांचे आक्षेप अनुमानावर आधारित असल्याने व त्यांच्या मताला दुजोरा देणारे फारसे कोणी पुढे न आल्यामुळे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ऑगस्ट १९८८ मध्ये प्रकाशित केलेले "डॉ. माळी संपादित सावित्रीबाई फुले: समग्र वाङ्मय" जनतेने स्वीकारले आहे. आजवर सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील अनेकांची प्रस्थापितांनी केलेली उपेक्षा लक्षात घेऊन जनसामान्यांनी हे वाङ्मय उचलून धरले आहे. त्याच्यामुळे समूह मनामध्ये एक विलक्षण चेतना निर्माण झालेली दिसते.

हे साहित्य पुढीलप्रमाणे आहे-

१) काव्यफुले- कवितासंग्रह, १८५४
२) जोतिबांची भाषणे, संपादक-सावित्रीबाई फुले, २५ डिसेंबर १८५६
३) सावित्रीबाईंची जोतिबांस पत्रे
४) बावन्नकशी सुबोध रत्नाकर- कवितासंग्रह, ७ नोव्हेंबर १८९२
५) मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे, १८९२

हे सर्व वाङ्मय १९४ पृष्ठांच्या 'समग्र वाङ्मय' या ग्रंथात एकत्रित करण्यात आलेले आहे. ग्रंथाला सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांची प्रस्तावना आहे.

'काव्यफुले' ह्या १८५४ साली प्रकाशित झालेल्या सावित्रीबाईंच्या पहिल्या काव्यसंग्रहात एकूण ४१ कविता आहेत. त्यात निसर्गविषयक, सामाजिक, बोधपर आणि ऐतिहासिक अशा कविता आहेत. ग्रंथाच्या मुखपृष्ठावर शंकरपार्वतीचे चित्र आहे.

'जोतिबांची भाषणे' हे पुस्तक सावित्रीबाईंनी संपादित केलेले असून त्याचे शब्दांकन चार्लस् जोशी यांनी केलेले आहे. हे पुस्तक दि. २५ डिसेंबर १८५६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले असून त्यात जोतीरावांची पण भाषणे आहेत.

'सावित्रीबाईंनी जोतीरावांना लिहिलेली पत्रे' यात एकूण तीन पत्रे असून नायगाव व ओतूरहून लिहिलेली आहेत.

'मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे' या पुस्तिकेत उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने, कर्ज या विषयांवरील त्यांची भाषणे शास्त्री नारो बाबाजी महाधर पाटील यांनी संपादित करून १८९२ साली वत्सल प्रेस, बडोदा येथून प्रकाशित केलेली आहेत.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या कवितासंग्रहात देशाचा इतिहास काव्यरूपाने सांगितला असून जोतीरावांच्या कार्याचे चित्रण त्यात केले आहे. यात सलग ५२ रचना आहेत. हे काव्य जोतीरावांच्या मृत्यूनंतर १८९१ साली केले असून पुस्तकरूपाने ते १८९२ साली प्रकाशित करण्यात आले.

सावित्रीबाईंनी आयुष्यभर जोतीरावांना दिलेली साथ अजोड होती. त्यांनी घालून दिलेला स्त्रीपुरूष समतेचा आणि शांततामय सहजीवनाचा आदर्श कालातीत होता. शिक्षण, सामाजिक न्याय, जातीनिर्मूलन, पुरोहित हटाव, या क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान इतिहासाबरोबरच वर्तमानालाही उजळून टाकणारे, आजही प्रस्तुत असणारे असे योगदान आहे. सावित्रीबाईंनी दिलेली ही शिदोरी आपले जीवन सदैव समृद्ध करीत राहील! आपली साथ करील!

## संदर्भ सूची


अ) शासकीय पुराभिलेखागार, मुंबई येथील अनेक दस्तऐवज

आ) वृत्तपत्र संचिका- दीनबंधु, दीनमित्र, ज्ञानोदय

इ) महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे दप्तर

ई) केशवराव विचारे संग्रह

उ) श्री. शाहू संशोधन केंद्र, कोल्हापूर


### ग्रंथ


१) कु. शांताबाई रघुनाथ बनकर, 'सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र', मुंबई १९३९

२) फुलवंताबाई झोडगे, 'क्रांतिदेवता साध्वी सावित्रीबाई फुले' पुणे, १९६६.

३) डॉ. मा. गो. माळी, 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' गारगोटी, १९८०

४) डॉ. कृ. पं. देशपांडे, 'अग्निफुले', पुणे, १९८२

५) डॉ. मा. गो. माळी, संपा. 'सावित्रीबाई फुले: समग्र वाङ्मय', मुंबई, १९८८
६) डॉ. य. दि. फडके, संपा- 'महात्मा फुले: समग्र वाङ्मय', मुंबई १९९१.
७) हरि नरके, संपा. 'आम्ही पाहिलेले फुले', मुंबई १९९३.
८) हरि नरके, डॉ. य. दि. फडके, 'संपा. महात्मा फुले गौरव ग्रंथ- खंड-१, मुंबई, १९९१.
९) जोतीराव फुले, 'गुलामगिरी', दुसरी आवृत्ती, मुंबई, १९११ (रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांची प्रस्तावना)
१०) चिपळूणकर विष्णु शास्त्री, 'निबंधमाला,' पुणे १९२६
११) नरके हरि, 'महात्मा फुले बदनामी: एक सत्यशोधक,' पुणे, १९८९.
१२) पाटील पंढरीनाथ सीताराम, 'महात्मा जोतीराव फुले', चिखली, १९२७
१३) पाटील पंढरीनाथ सीताराम, 'महात्मा जोतीराव फुले यांचा अल्प परिचय', चिखली, १९३८
१४) मालशे स. गं. 'तारतम्य', मुंबई, १९८७
१५) माळी गजमल, 'ग्यानोबा कृष्णाजी ससाणे,'औरंगाबाद, १९९६
१६) आढाव बाबा, 'सत्यशोधनाची वाटचाल', पुणे, १९८९.
१७) हरि नरके, 'महात्मा फुले यांचा स्त्रीविषयक विचार', अस्मितादर्श, आनोडि १९९०. (वर्षे २३ अंक ४) लेख
१८) कुलकर्णी पु. बा. 'मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड,' मुंबई, १९६०
१९) जोशी ना. वि. 'पुणे शहराचे वर्णन', पुणे, १८६४.

*

# सावित्रीबाईंच्या कार्याचे द्रष्टेपण

**मनोहर कदम**

महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांच्या अभूतपूर्व क्रांतिकारी कार्याविषयी आता आपल्या देशातच नव्हे; तर अनेक पाश्चात्य देशातही विविध अंगाने संशोधन होत आहे. ज्या पुणे शहरात जोतीरावांनी दीडशे वर्षापूर्वी सामाजिक क्रांतीचे बीज रोवले होते. तिथे ५०-६० वर्षापूर्वी त्यांचा पुतळा बसविण्यावरून केवढा वादंग झाला होता. पण आज मात्र त्याच पुणे शहरात जोतीरावांचे स्मारक ही अभिमानास्पद राष्ट्रीय वास्तू म्हणून जतन केली जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजापुढील समस्या आणि जोती-सावित्रीचे विचार-कार्य यांचा धागा पुन्हा जुळून आला आहे. या पार्श्वभूमीवर जोति-सावित्रीच्या कर्तृत्वाचा विविध अंगांनी पुन्हा-पुन्हा मागोवा घेतला जाणे, आणि त्यातून त्यांच्या मोठेपणाचा नवनवा पैलू गवसणे, हे महत्कार्य गेल्या दोन-दशकांत अत्यंत डोळसपणे चाललेले आहे.

जोतीरावांनी विपुल प्रमाणावर लेखन केले. ते आज उपलब्ध आहे. स्त्रीदास्य विमोचन आणि दलितोद्धाराच्या ज्या चळवळी त्यांनी उभारल्या, त्यांचीही त्या काळात आदी ठोसपणे दखल घेतली गेली. जोतीरावांचं लेखन आणि त्यांच्या कार्याविषयी जेवढी कागदपत्रे आणि अन्य अस्सल सामुग्री आज उपलब्ध आहे, तेवढी सामुग्री गेल्या शतकातील फारच थोड्या पुढाऱ्यांबाबत उपलब्ध आहे. त्यामुळे सामाजिक लढ्यांच्या अभ्यास करणाऱ्याना जोतीरावांचं मोठेपण मान्य करावेच लागते.

सावित्रीबाईंचे मोठेपण जोतीरावांच्या कार्यात एकरूप झाल्याचे त्याचे वेगळेपणं वैशिष्ट्य ठोसपणे पुढे येत नाही. भारतीय संस्कृतीतल्या 'शंकर-पार्वती', 'विठ्ठल-रखुमाई', 'लक्ष्मीनारायण' अशा जोड्यांप्रमाणे 'जोति-सावित्रीचा' जोडा वंदनीय मानण्याची शक्यता अधिक आहे. कारण सावित्रीबाईंनी जगाची पर्वा न करता पतीच्या कार्यात झोकून दिलं, ही 'पतीनिष्ठा' भारतीय समाजाला अधिक प्रिय आहे. म्हणूनच सावित्रीबाईंनी किती क्रांतिकारी कार्य केले, यापेक्षा त्यांनी 'पतीच्या पावलावर पाऊल' टाकून काम केले, हे आवर्जून सांगितले जाते. भारतीय संस्कृतीतल्या पुरुषप्रधान प्रवृत्तीने एक प्रकारे सावित्रीबाईंवर केलेला हा अन्यायच आहे. ह्या अन्यायकारी प्रवृत्तीचा धोका अनेक

मान्यवरांना जाणवत होता. म्हणूनच प्रा. गं. बा. सरदार यांनी सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाविषयी स्पष्टपणे म्हटले आहे 'समाज परिवर्तनाच्या कार्यात त्या केवळ त्यांची (जोतीरावांची) सावली होऊन राहिल्या नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्व जोतीरावांच्या व्यक्तिमत्वाशी संवादी असले, तरी स्वतंत्र होते. त्यांचे विचार त्यांनी डोळसपणे ग्रहण केले होते. त्यांची तत्वप्रणाली त्यांनी तत्परतेने आत्मसात केली होती. सावित्रीबाईंच्या चरित्रात त्यांची कार्यनिष्ठा व नीतीधैर्य यांची ग्वाही देणारे कितीतरी प्रसंग आढळून येतात. सनातनी लोकांनी कितीही अडथळे आणले, तरी शेवटी आपल्या तत्त्वांचाच विजय होणार, याबद्दल त्यांना शंका नव्हती.'

सावित्रीबाईंच्या कार्याचे मूल्यमापन करताना ज्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्य केले. त्या समाजस्थितीचे डोळसपणे अवलोकन केले तर सावित्रीबाईंच्या कार्याचे द्रष्टेपण तीव्रतेने जाणवते. विसावे शतक हे स्त्री-सुधारणेच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पर्व म्हणून मानले जाते. गेल्या शतकातील स्त्री-जीवनाशी स्थिती इतकी बिकट होती की आज त्यावर विश्वास ठेवणे कठीण व्हावे. अशा काळात सावित्रीबाईंच्या विचारांची आणि आचारांची जी क्रांतिकारकता प्रकट झाली; तिचे मूल्यमापन काळाच्या कसोटीवर करणे अधिक उचित ठरेल.

१८१८ साली पेशवाई संपुष्टात आली आणि महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीचा अंमल सुरू झाला. नव्या शासकांनी पाश्चात्य संस्कृतीवर आधारित नवी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. सर्वांना समान लेखणारा कायदा, नवी महसूल पद्धती आणि सार्वत्रिक शिक्षण अशा नव्या सुधारणांमुळे इथल्या समाज जीवनातला बंदिस्तपणा मोकळा होऊ लागला. ब्रिटिश येण्यापूर्वी महाराष्ट्रात उच्चवर्णियांकडे विद्येची मक्तेदारी होती. अन्य जातीतील लोकांनी शिक्षण घेतल्यास त्यामुळे ब्राह्मणांच्या जन्मजात वर्चस्वास हादरा बसेल आणि लिखापढीच्या व्यवसायात स्पर्धा निर्माण होईल, अशी भीती त्यांना वाटत होती. म्हणूनच कनिष्ट जातीच्या शिक्षणाला उच्चवर्णियांनी वेळोवेळी उघडपणे विरोध दर्शविलेला आढळतो. दादोबा पांडुरंगांनी यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात लिहिलेली एक आठवण अतिशय बोलकी आहे. मुंबईच्या नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळात प्रारंभी शूद्रांच्या मुलांना प्रवेश मिळत असे. पण १८२६-२७ च्या सुमारास मराठे, कोळी, कुणबी, भंडारी या जातीच्या मुलांना शाळेतून काढून टाकण्याचा निर्णय झाला. दादोबा लिहितात-'धाकजी दादाजी हे त्या वेळेस वयातीत व मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांचे म्हणणे असे पडले की,'जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढे हुशार झाले, तर उंच जातीच्या

लोकांस इंग्रेजीत रोजगार मिळणार नाही व त्यांची आपली बरोबरी होत जाईल.'[१] हे त्यांचे म्हणणे त्या काळच्या बहुतेक लोकांस मोठे शहाणपणाचे व दूर अंदेशीचे असे वाटले, व त्यांची हिंदू लोकांत बरीच वाहवा झाली. त्यांत त्यांच्या जातीत तर फारच झाली.[२] याच नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतील एक व्यासंगी शिक्षक बापूशास्त्री शुक्ल यांनाही परभू, शेणवी, सोनार, वैश्य अशा जातीच्या मुलांस मराठी व्याकरण शिकवण्याचे काम फारच हलक्या प्रतीचे वाटत असे.''[३]

जिथे ब्राह्मणेतर जातींतील पुरुषांच्या शिक्षणाला संधी नव्हती, तिथे 'पाप योनी' म्हटलेल्या स्त्री जातीच्या शिक्षणाबद्दल तर कमालीची प्रतिकूलता होती. अधर्म नको, स्त्रिया कुमार्गास लागू नयेत म्हणून त्यांना शिक्षण नको, या समजुती बरोबरच, स्त्रिया शिकल्या तर त्या अल्पवयात विधवा होतील, ही भीतीही त्या वेळच्या समाजात रूढी होती. अशाही वातावरणात जर कोणी स्त्री शिकू लागलीच तर,''आमची अमर्यादा केलेली आम्हांस खपायची नाही.'' अशी समज घरातील मोठ्या माणसांकडून मिळत असे.[४] स्त्रीशिक्षणापासून संभाव्य धोके कोणते, हे दाखवण्याचे काम काही नियतकालिकांनी अगदी हिरीरीने केले. शिक्षणाने स्त्रिया बिघडतील, मर्यादा ओलांडतील, स्वच्छंदी-खर्चिक बनतील, कथा कादंबऱ्या वाचून अनैतिक प्रणय चाळे करू लागतील, अशा प्रकारच्या ठराविक आक्षेपांपलिकडे कोणताही गंभीर मुद्दा त्यात नसला तरी त्यामुळे स्त्री-शिक्षणाला होणारा विरोध टिकून राहिला, हे खरे.

जोतीरावांनी १८४८ साली सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला, तेव्हा त्यांना प्रथम स्त्रियांच्या आणि अतिशूद्रांच्या शिक्षणाचे कार्य हाती घ्यावे असे वाटले. त्या काळात महाराष्ट्रात काही ठिकाणी ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्यातर्फे शाळा चालविल्या जात होत्या. त्यापैकी अहमदनगर येथील फरार मडमेच्या शाळेची कार्यपद्धती जोतीराव आणि त्यांचे मित्र सदाशिवराव गोवंडे यांनी स्वत: जाऊन प्रत्यक्ष पाहिली. पुण्यास परतल्यावर त्यांनी बुधवार पेठेतील भिडेवाड्यात मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली. मुलींच्या शिक्षणाला धर्माची परवानगी नसलेल्या काळात जोतीरावांच्या ह्या कृतीने निश्चितच खळबळ मानली असणार. अशा अवस्थेत शाळेत पुरूष शिक्षक असल्यास शाळेची वाढ होणार नाही. याची जाणीव जोतीरावांना झाली. पण स्त्री शिक्षिका आणणार कोठून? जोतीरावांनी त्यासाठी प्रथम सावित्रीबाईंना पुरेसे शिक्षित केले. सावित्रीबाई स्वत: शिकल्या, आणि आपल्यासारख्या अनेकींना शिकवण्यासाठी त्या शाळेत जाऊ लागल्या. चूल आणि मूल यात गुंतून न पडता घराचा उंबरठा ओलांडून, सामाजिक कार्यात

झोकून देणारी सावित्रीबाई ही महाराष्ट्रातील पहिली स्त्री. दिडशे वर्षापूर्वी सावित्रीबाईंनी हे पाऊल निर्धारपूर्वक उचलले नसते, तर कदाचित भारतातील स्त्रियांना आजची स्थिती मिळवायला अनेक वर्षे जावी लागली असती! सावित्रीबाईंचे शिकवण्यासाठी घराबाहेर पडणे, ही कृतीच त्यांच्या स्वतंत्र, बंडखोर व्यक्तिमत्वाची ओळख करून देते.

त्यांच्या ह्या कृतीने पुढे त्यांना अत्यंत बिकट प्रसंगांना तोंड द्यावे लागले, आणि ते त्यांनी धैर्याने दिले. ही ध्येयनिष्ठाच त्यांच्या जीवनात पदोपदी जाणवते. भारतातल्या बहुजन समाजात वाढलेली एक स्त्री म्हणून सावित्रीबाईंनी त्यावेळी स्वत:शीच किती विचारमंथन केले असेल, याची कल्पना आज करता येणे शक्य नाही. परंतु असीम कार्यनिष्ठा आणि प्रचंड आत्मविश्वास यामुळेच कोणत्याही आव्हानापुढे सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. भारताच्या इतिहासात, त्या काळातले तरी असे दुसरे उदाहरण सापडत नाही. सावित्रीबाईंवर शाळेत येता-जाताना उच्चवर्णियांकडून शिव्या-शापांचा, दगडधोंड्यांचा वर्षाव झाला. अर्थात अशा विरोधाला जुमानण्याएवढी त्यांची ध्येयनिष्ठा ठिसूळ नव्हती. पण ज्या माळ्या-मांगाच्या मुलींना शिकवून ती ज्ञानी करीत होती, त्याच आप्त-स्वकीयांनी तिच्या विरोधात उठाव, तिच्या सासऱ्यांवर दडपण आणावे आणि प्रेमळ सासऱ्यांने जोती-सावित्रीला घराबाहेर काढावे, याच्या प्रचंड यातना एक विवाहित स्त्री म्हणून सावित्रीबाईंनी मोठ्या प्रमाणावर सहन केल्या. परक्या माणसांनी दिलेल्या यातना सहन करणे, तसे सोपे असते. परंतु आप्त-स्वकीयांच्या वर्तनाने होणाऱ्या यातना अधिक त्रासदायक असतात. फुले दंपतीला वडिलांचे घर सोडावे लागले, ते सावित्रीबाईंच्या घराबाहेर पडण्यामुळे! केवळ जोतीरावांनी शिक्षण प्रसाराचे, शाळा चालविण्याचे कार्य केले असते तर कदाचित एवढा प्रखर विरोध झाल्याही नसता. पण 'न स्त्री-स्वातंत्र्यमर्हति' वचनाप्रमाणे चालणाऱ्या समाजात एक बहुजन समाजातील स्त्री घराबाहेर पडून अस्पृश्यांच्या मुलींना शिकविते, हे एक मोठेच पाप होते. त्यासाठी स्वकीयांकडूनच सजा मिळाली होती.

सावित्रीबाईंनी या ठिकाणी थोडी जरी चलबिचलता दाखवली असती तर कदाचित घराबाहेर पडण्याची वेळ तिच्यावर आली नसती. ज्या समाजाला शिक्षित करायचे आहे, तो समाजच अद्याप बदलायला तयार झालेला नाही, समाजाच्या कलाप्रमाणे सुधारणा व्हायला हव्यात यासारखा व्यवहारी विचार करणाऱ्या त्या काळातील अनेक सुधारकांप्रमाणे सावित्रीबाईंना सावधपणाचा पवित्रा घेता आला असता. पण आपली झेप काळाच्या पलिकडची आहे, ती घेताना सर्वत्र विरोध होणार, याची पक्की खूणगाठ सावित्रीबाईंनी बांधलेली होती. त्यामुळे कसल्याही

विरोधाची त्यांनी कधी पर्वा बाळगली नाही. माहेराहून जोतीरावांना पाठविलेल्या एका पत्रात त्यांनी लिहिले,'पुण्यास आपल्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदासर्वदा कामात गुंतावे, भविष्यातले यश आपलेच आहे.'' (५) ह्या उपजत आशावादामुळेच जोतीरावांच्या मृत्यूनंतरही कोणत्याही प्रकारे खचून न जाता सावित्रीबाईंनी आपले सार्वजनिक कार्य अधिक जोमाने चालू ठेवले.

फुले दांपत्याने चालविलेले शिक्षण प्रसाराचे कार्य हे आजवर शिक्षणाची, विकासाची संधी नाकारलेल्याना केवळ साक्षर करण्यापुरते मर्यादित नव्हते; तर त्यांच्या आयुष्याला नवा अर्थ देणारे क्रांतिकारक कार्य होते. परंपरेने ज्यांना कधी तोंड उघडू दिले नाही, त्यांना बोलते करणारे होते. जोतीरावांनी चालविलेल्या शाळेत तीन वर्षे अभ्यास केलेल्या एका चौदा वर्षाच्या मांग मुलीने जो निबंध सादर केला, तो वाचला म्हणजे आजही अंगावर काटे उभे रहातात. ती मुलगी लिहिते-'जर वेद ब्राह्मणांसाठी आहेत, तर वेदाप्रमाणे वर्तन करणे हा ब्राह्मणांचा धर्म होय. जर आम्हांस धर्मासंबंधी पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही, तर आम्ही धर्मरहित आहो असे साफ दिसते की नाही?..... इमारतीच्या पायात तेल शेंदूर पाजून पुरण्याचा व आमचा निर्वंश करण्याचा क्रम चालविला होता. त्या समयी महार अथवा मांग यातून कोणी तालीमखान्यापुढून गेला असता गुलटेकडीच्या मैदानात त्याच्या शिराचा चेंडू व तलवारीचा दांडू करून खेळत होते. अशी जर सोवळ्या राजाच्या दारावरून जाण्याची बंदी तर विद्या शिकण्याची मोकळीक कोठून मिळणार?''(६) हा निबंध वाचणाऱ्या मांग मुलीविषयी 'ज्ञानोदय' कर्त्यांनी लिहिलं.-'राजश्री जोतीबा माळी, पुण्याच्या अतिशूद्रांच्या शाळेचे स्थापक. यांनी या मुलीकडून तो आमच्यापुढे वाचविला. त्यावेळी राजश्री जोतीबा यांनी मन:पूर्वक केलेल्या श्रमाचे फळ आमच्या दृष्टीस पडले. 'ज्ञानोदय'कर्त्यांनी सावित्रीबाईंच्या श्रमाचा वेगळा उल्लेख केलेला नसला, तरी सावित्रीबाईंच्या धडाडीमुळेच ह्या कोवळ्या मुलीला त्यांच्याप्रमाणे आपणही आपणाला जे वाटतं ते करावं, बोलावं, लिहावं असं वाटलं असणार.

अतिशय प्रतिकूल वातावरणात सुरू केलेल्या ह्या शिक्षणकार्याला हळुहळू उत्तम प्रतिसाद मिळत गेला. अनेकांनी मदतीचा हात दिला. शिक्षणाच्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल ब्रिटिश सरकारने दोनशे रुपयांची शालजोडी देऊन विश्रामबाग वाड्यात फुल्यांचा जाहीर सत्कार केला. दि. १७ फेब्रुवारी १८५२ रोजी ह्या शाळांच्या परीक्षा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडल्या. मुलींनी दिलेली

उत्तरं ऐकून लोक खूष झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी जज्ज ब्रौनसाहेब हे होते. त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या महत्त्वविषयी माहिती देऊन म्हटले-''आजचा हा जो प्रसंग मी ह्या ठिकाणी प्रथमच पाहिला, त्यावरून माझी खात्री होते की, ह्या देशातील लोक काहीतरी विचार करून स्वदेश सुखी करण्याचा प्रयत्न करू लागले. हे पाहून मला अतिशय संतोष होत आहे.''(७)

गेल्या शतकातील स्त्रियांच्या समस्यांसंबंधी विचार करताना अधिक गांभीर्य जाणवते ते बालविवाहाची समस्या आणि त्या पाठोपाठ स्त्रीला येणाऱ्या अकाली वैधव्याचे. वैधव्य म्हणजे महापाप वाटावे अशा तऱ्हेचे अपमानास्पद आयुष्य विधवेच्या वाट्याला येत असे. विधवा स्त्रियांच्या दु:स्थितीविषयी लोकहितवादींनी म्हटलं आहे- ...ती बिचारी जन्मापर्यंत विधवा; तिकडून सासरा, दीर, सासू, जावा यानी म्हणावे की, करंटी, अवदसा, नवरा मारून तोंड कशास दाखविते? बाप आपले घरी का ठेविना? बरे, रस्त्यात फिरले तर लोक म्हणतात की, बोडकी पुढे आली. आता पाऊल पुढे कसे टाकावे?....याप्रमाणे खाटकाचे घरी मेंढरीची देखील दुर्दशा नाही. तो एक वेळ सुरी लावतो त्यावेळेस मात्र काय दु:ख होते तेवढेच; परंतु तेथपर्यंत तो हाल करीत नाही. आणि हे हिंदू लोक किती दुष्ट आहेत की, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा करतात. यांस जगात तरी कोठे दुसरी तुळणा मिळे की काय?'' बालविधवांची समस्या ही मुख्यत: ब्राह्मण जातीमध्ये होती. 'ब्राह्मणांच्या स्त्रियांपैकी तिसरा हिस्सा विधवा असतात.'' असं आगरकरांनी नमूद केलेलं आहे. १८८८ साली बालविवाहासंबंधी टिपण लिहिणारे मलबारी म्हणतात, ''या क्षणी हिंदुस्थानामध्ये तीस वर्षाखालील २१ लाख स्त्रियांना विधवा रहावे लागते.'' विधवा विवाहास बंदी असल्यामुळे त्या काळात तरुण विधवांकडून व्यभिचार झाल्याच्या घटना चर्चिल्या गेल्या. १८६७ सालच्या 'पुनर्विवाह प्रकरण' लेखात तैलंग ब्राह्मण म्हणतो,''....स्त्रियांनी पुरुषांशी संबंध करू नये असा जो; तो एकीकडेस राहून लक्षावधी बालहत्या व भ्रूणहत्या मात्र संकेत करणाऱ्यांच्या पदरात पडत आहेत व तशा स्त्रियांचे तळतळाटही याच रीतीने मिळताहेत. दु:सह कामाच्या योगाने उघड व्यभिचारास प्रवृत्त होऊन कुळांसहित नरकास जातात.''(९)

भ्रूणहत्या, बालहत्यासंबंधी बातम्या तत्कालीन वृत्तपत्रातून सातत्याने आलेल्या आढळतात. बालहत्या हा गुन्हा ठरविला गेल्यामुळे गर्भपात फार मोठी जोखीम घेऊन करावा लागत असे. ही समस्या जरी उच्चवर्णियांची असली तरी ती मानवतेला काळीमा फासणारी होती. परंतु कुणाही उच्चवर्णियाने त्या काळी त्याविरुद्ध प्रत्यक्ष कृती केलेली आढळत नाही. यातून उद्भवणाऱ्या भ्रूणहत्येच्या

समस्येला भिडण्याचं पहिले पाऊल उचलले, ते जोतीराव फुले यांनी! इ. स. १८६८ मध्ये पुण्यातील जुन्या गंजपेठेत स्वत:च्या घरातच त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' काढले. कोणत्याही विधवेची प्रसूतीची व्यवस्था तिथे करण्यात आलेली होती व त्याबाबत पूर्ण गुप्तता राखण्यात येत होती. या बालहत्या प्रतिबंध गृहाची जबाबदारी स्वत:ला अपत्य नसलेल्या सावित्रीबाईंनी स्विकारली होती. अर्थात हे काम फुले दांपत्याने अगदी डोळसपणे स्वीकारलेले होते. म्हणूनच ह्या कामाची माहिती देणारी भित्तीपत्रके पुण्यातल्या घराघरांवर लावली. ''विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हावे. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल.''

सावित्रीबाईंनी बालसंगोपनाची आधुनिक पद्धती आत्मसात केलेली होती. म. फुलेंचे चरित्रकार धनंजय कीर लिहितात- ''जोतीरावांच्या पत्नी सावित्रीबाई, या बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांची अविरतपणे वात्सल्याने सेवा करीत, लालनपालन करीत. त्यांना स्वत:ला अपत्य नव्हते. तथापी त्या माऊलीने आपल्या दयाळू, उदार स्वभावाला अनुसरून त्या अर्भकांचे अत्यंत प्रेमाने आणि वात्सल्याने संगोपन केले. ती देवातातुल्य साध्वी शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांना अधूनमधून जेवायला बोलावी. मुलांना भोजन देण्याचा तिचा परिपाठच होता. मुलांना ती जीव की प्राण करीत असे. मुलांमध्ये वावरताना तिला अत्यंत सुखसमाधान लाभे.''

बालहत्येची समस्या साऱ्या भारतातील असली तरी तिला प्रतिबंध करणारी 'बालहत्या प्रतिबंध गृह' ही भारतातली अशा प्रकारची पहिली संस्था होती. या अनाथाश्रमात दाखल झालेल्या काशीबाई नावाच्या ब्राह्मण स्त्रीच्या पोटी यशवंत नावाचा पुत्र जन्मला. या मुलाला जोती-सावित्रीने आपला दत्तक पुत्र बनविले. त्याकाळी दत्तक म्हणून स्वत:च्या नात्यातील किंवा जातीतील मुलांना स्वीकारण्याचा रिवाज होता. अशा काळात परक्या जातीच्या बालविधवेच्या पोटी जन्मलेल्या मुलास दत्तक म्हणून स्वीकारणे, हे फारच मोठे क्रांतिकारक कार्य होतं. त्यात समाजातल्या हीन गणल्या जाणाऱ्यास प्रतिष्ठा देण्याचा विचार होता. त्याचप्रमाणे रक्ताच्या, जातीच्या पलिकडे जाऊन मानवतेचं नातं दृढ करण्याचा विचार होता. यशवंताला पुत्र म्हणून त्यांनी चांगल्याप्रकारे घडविलाच, परंतु त्याला कायद्याने आपला वारस म्हणून हक्क देण्यासाठी आपल्या मृत्यूपत्रात स्पष्टपणे नोंद करून ठेवली.

फुले दंपतीने चालविलेल्या 'बालहत्या प्रतिबंधक गृहा' च्या कायनि

उच्चवर्णियांच्या अंगाचा तिळपापड झाला असला, तरी अभागी विधवांच्या समस्यांबाबत समाज सुधारकांना अंतर्मुखही केले. या अनाथाश्रमाच्या स्थापनेनंतर सात वर्षांनी म्हणजे १८७५ साली एक नामवंत सबजज्ज व प्रार्थनासमाजाचे पुढारी रा. ब. लालशंकर उमियाशंकर यांनी पंढरपूरला बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. पुढे याच संस्थेची एक शाखा नाशिक येथे काढण्यात आली. या कामी लालशंकर यांच्याबरोबर लोकहितवादींचा पुढाकार होता. प्रार्थना समाजातील मंडळींनी चालविलेले हे अनाथाश्रम दूर तीर्थक्षेत्री होते. त्यांच्या या कामाविषयी जनतेच्या मनात बरेच गैरसमज होते. या पार्श्वभूमीवर पुण्यात भर वस्तीत, जाहीर प्रचार करून फुले दांपत्याने चालविलेल्या पहिल्या अनाथश्रमांचं महत्त्व अधिक डोळ्यांत भरतं, ते त्यातील दोन स्त्रियांच्या कर्तृत्वामुळे! त्यातील पहिली स्त्री म्हणजे सगुणाबाई क्षीरसागर. ही जोतीरावांच्या वडिलांची मानलेली बहीण होती. जोतीरावांची आई ते लहान असतानाच वारली. सगुणाबाईने जोतिरावांचं संगोपन तर केलंच, पण जोतीरावांच्या सार्वजनिक कार्यातही ती त्यांच्यासमवेत राहिली. विशेषत: बालसंगोपनाच्या कामात सगुणाबाई-सावित्रीबाई या दोन स्त्रियांनी खूपच मोठी कामगिरी केली. परजातीच्या विधवा स्त्रियांबाबत ममत्व बाळगून त्यांचं बाळंतपण करणं आणि त्यांच्या मुलांना आईच्या मायेनं मोठं करणं हे अतिशय बिकट काम या दोन स्त्रियांनी ज्या आत्मीयतेने केलं, त्याला तोड नाही. कारण त्यामुळेच नंतरच्या अनाथाश्रमांवर जी टीका झाली, तशी टीका बालहत्या प्रतिबंधक गृहाच्या विषयी करण्याची कुणाची हिंमत झाली नाही. आणि त्यातून अनेकांना या समस्येला भिडण्याची प्रेरणा लाभली.

या कामाचा एक महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे अशा प्रकारच्या अनैतिक संबंधातून जन्मणारी अनाथ मुले, पूर्वी जी खिस्ती मिशनऱ्यांकडे जात होती, ती जाणे बंद झाले. ब्राह्मणांच्या समाजविघातक चालीरीती आणि अघोरी वर्तनाला जोतीरावांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहाने जो विधायक आणि मानवतेला उजाळा देणारा पर्याय दिला, तसं उदाहरण भारताच्या इतिहासात क्वचितच आढळतं. समाजसुधारणेच्या इतिहासाचा आढावा घेतला तर, सर्वसाधारणपणे स्वत:ला किंवा स्वत:च्या समाजाला जे दु:ख भोगावे लागते. ज्या समस्यांना सामोरे जावे लागते, त्या समस्यांना छेद देण्याचे, त्याविरुद्ध बंड करण्याचे काम समाजसुधारकांनी केल्याचे आढळते. परंतु इथे तर ज्या समस्येमुळे स्वत:ला नुकसान पोचत नसले, तरी मानवी मूल्यांची विटंबना होत असल्याचे जाणवून फुल्यांनी त्याविरुद्ध बंड केल्याचे आढळते.

म. फुले यांनी त्यांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यात आपले ब्राह्मण सहकारी,

त्याचप्रमाणे सरकारचे सहाय्य घेतलेले होते. परंतु बालहत्या प्रतिबंधक गृहाच्या कार्यात त्यांनी सरकारी मदत किंवा आपल्या ब्राह्मण सहकाऱ्यांची मदत बुद्ध्याच टाळलेली दिसते. यासंबंधीचा जोतीराव आणि धोंडिबा यांचा संवाद 'गुलामगिरी' मध्ये आढळतो.

''धों.- यावरून, आपण विधवा भट -स्त्रियांनी गर्भपात वगैरे अघोर कर्मे करू नयेत, म्हणोन त्यांस गुप्तपणे बाळंत होण्याकरिता आपल्या घरी सोय केली आहे. त्या कामी आपण आपल्या सरकारजवळ कोणत्याही प्रकारची मदत न मागता व त्याचप्रमाणे त्या कामात नावालासुद्धा भट सभासद न घेता, ते काम आपण आपल्या खर्चाने चालविले आहे.

जो.- आपले सरकार जर म्हणावे तर जिकडे घुगऱ्या तिकडे उदय म्हणणारे आहे. कारण अतिशूद्रांस स्पर्श करण्याची बंदी असल्यामुळे त्यास सहजच सर्व रोजगारधंद्याचे द्वार बंद झाले व त्याजमुळे त्यांजवर पोटाच्या आगीमुळे चोऱ्यामाऱ्या करण्याचा प्रसंग गुजरतो व त्यांनी चोऱ्यामाऱ्या करू नये, म्हणोन आमच्या सरकारने त्यांच्या हजेऱ्या घेण्याची वहिवाट घातली हे बरे केले. परंतु भटांच्या निराश्रित अनाथ विधवा स्त्रियांस पाट लावण्याची बंदी असल्यामुळे, त्या व्याभिचार करून गर्भपात व बालहत्या करतात, हे आमचे न्यायी सरकार उघड्या डोळ्यांने पहात असून त्यांजवर मात्र मांग रामोशांसारखी चौकशी ठेवीत नाही. हे मोठे आश्चर्य होय! काय? आमच्या सहकारास गर्भपात व बालहत्या करणाऱ्या बायांपेक्षा दरोडेखोर मांगमहार जास्ती दोषी आहेत असे वाटते काय? दुसरे असे की भटांचे 'खाणे थोडे परंतु मच मच फार.'' अरे ज्यांच्याने एकचित्त होऊन आपल्या बालबहिणींच्या हजामती करणाऱ्या नापिकांच्या हातून वस्तरा छिनाऊन घेववत जर नाही, तर तसल्या लोकांस अशा कामी सभासद करून काय फळ होणार आहे? (१०)

साहजिकच ह्या महत्त्वपूर्ण संस्थेची जबाबदारी फुले यांचे निकटचे सहकारी आणि मुख्यत: सावित्रीबाई आणि सगुणाबाई यांच्यावरच पडली, आणि त्यांनी ती यशस्वीरित्या निभावली, ''सुतिकागृह तर त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात त्यांचे घरी होते.'' असे फुले यांचे एक अनुयायी तुकाराम हनुमंत पिंजण यांनी आपल्या आठवणींमध्ये लिहिले आहे. (११)

सन १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यानंतरच्या काळात महाराष्ट्रात ठिकठिकाणी या समाजाच्या शाखा आणि प्रचार कार्य जोरात सुरू झाले. धार्मिक कार्यातील भट-भिक्षुकांच्या वर्चस्वाला तडाखा देण्याचे काम सुरू झाले. बहुजन समाजातील अनेक तरुणांनी या कार्यात झोकून दिले. गावोगावी

संघर्ष उभे राहू लागले. एक प्रकारचे वैचारिक मंथन ह्या चळवळीने सुरू झाले. १८७५ साली सत्यशोधक समाजाचा अहवाल सर्वत्र पाठविण्यात आला. त्यावर अनेक उच्चवर्णियांनी टीका केली. १८७७ च्या प्रारंभी फुल्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधू' नावाचे ब्राह्मणेतरांचे पहिले मुखपत्र सुरू केले. सत्यशोधक चळवळ अशी जोरात सुरू असतानाच १८७७ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळाने ग्रामीण भागात मोठाच हाहा:कार उडवून दिला. नैसर्गिक आपत्तीच्या ह्या काळात सत्यशोधक समाजातर्फे 'व्हिक्टोरिया बालाश्रम' स्थापून दुष्काळ निवारणाचे कार्य करण्यात आले. म. फुले यांनी आपल्या सर्व सभासदांना विनंतीपत्रक पाठविताना लिहिले- 'आपणास विनंतीपूर्वक असे कळविण्यात येते की, समाजाचे मार्फत ''व्हिक्टोरिया बालाश्रम'' स्थापन केला आहे. घरात दुष्काळपिडीत लोक आपली मुले सोडून जाऊ लागले आहेत, व त्याप्रमाणे इंदापूर व मिरज व तासगांवकडील ब्राह्मणजातखेरीज करून बाकी सर्व जातीतील कित्येक अनाथ लोक आपली मुलेबाळे घेऊन जमले आहेत. कधी कधी दोन-दोन,तीन-तीन दिवसांचे उपवास काढून त्यांची हाडे मात्र उरली आहेत...तरी आपण सर्व सभासदांनी व इतर दयावंत गृहस्थांनी कृपाळू होऊन, आपल्या शक्तीनुसार काही-ना काही तरी ही जाहिरात पाहतांच, मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपले कर्तव्यकर्म अशा वेळी बजावल्याचे श्रेय होणार आहे.' [१२]

या अन्नछत्राबाबतची आठवण गोविंद गणपत काळे यांनी लिहून ठेवली आहे. ''सन १८७७ साली दक्षिण प्रांतात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी लहानमुले व आंधळे पांगळे यांच्या बचावासाठी महात्मा जोतीरावांनी 'धनकवडी' येथे एक अन्नछत्र उघडले होते. तेथे रोज दुपारी व संध्याकाळी दोन हजार भाकरी नियमितपणे वाटल्या जात असत; व त्या भाकरी तेथेच बसून खाव्या असा त्यांनी निर्बंध घातला होता. मुलांनी भाकरी बाहेर नेल्यास त्यांची भाकरी कोणी जबरीने नेईल अथवा मुलांचे आईबाप स्वत:च खातील या भीतीमुळे ते तेथून भाकरी बाहेर नेऊ देत नसत.'' [१३] दुसऱ्या एका आठवणीत श्री. महादू सहादू वाघोले यांनी लिहिलं आहे. ''या कँपवर माझी आई व आणखी काही बाया स्वयंपाकासाठी असत. सावित्रीबाईकडे या कँपची व्यवस्था सोपविलेली होती. हा खर्च तात्यासाहेब (फुले), रामशेट उरवणे, व डॉ. शिवप्पा हे तिघे करीत असत.''

जोतीरावांच्या सार्वजनिक आयुष्याकडे पहाताना स्त्रीशिक्षणाचं कार्य, बालहत्या प्रतिबंधक गृह आणि व्हिक्टोरिया बालाश्रम या तीन कार्यात सावित्रीबाईंनी

अतिशय महत्त्वाची जबाबदारी पेललेली आढळते. जोतीराव आणि सावित्रीबाई यांच्या कार्याचे विभाजन करून त्यांचं स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे कठीण असलं तरी, तसं न करणे हेही सावित्रीबाईंच्या कर्तृत्वावर अन्याय करण्यासारखे ठरेल असे वाटते. सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाचा एक महत्त्वपूर्ण पैलू प्रकट झाला; तो महात्मा फुलेंचे निधन झाले तेव्हा! आयुष्यभराचा जोडीदार निघून गेल्याच्या दु:खात असतानाच भाऊबंदांच्या वर्तनापुढे त्या झुकल्या नाहीत. आयुष्यभर फुल्यांना विरोध करणाऱ्या त्यांच्या भाऊबंदाना त्यांनी खांदा धरू दिला नाही. यशवंत आपल्या रक्ताचा नाही. म्हणून त्याला टिटवं धरून देणार नाही, असा भाऊबंदांनी आग्रह धरला. सावित्रीबाईंनी भाऊबंदांचा कोणताच आग्रह जुमानला नाही. निरनिराळ्या जातीतल्या लोकांनी फुल्यांना खांदा दिला. पण टिटवे कोण उचलणार? सावित्रीबाई जिद्दीने पुढे झाल्या. टिटवे त्यांनी स्वत: उचलले आणि यशवंत व गजाननाला समवेत धरून त्या प्रेतयात्रेपुढे चालू लागल्या. एका स्त्रीने टिटवे उचलण्याची ही पहिलीच आणि एकमेव घटना असावी. फुल्यांच्या अंत्ययात्रेत स्त्रियाही मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या होत्या. आज शतकाच्या वाटचालीनंतरही अंत्ययात्रा, अंत्यसंस्कार याबाबत सावित्रीबाईइतकी झेपही आपला समाज घेऊ शकलेला नाही, यातच त्यांच्या कृतीचे द्रष्टेपण आहे.

जोतीरावांच्या मृत्यूनंतरही सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाचे कार्य नेटाने केलेले आढळते. प्लेगच्या साथीत १० मार्च १८८७ रोजी त्यांचे निधन झाले. म. फुल्यांनी स्त्री-पुरूष समानतेचा जो विचार मांडला, त्याचा प्रत्यय सावित्रीबाईंच्या कर्तृत्वातून साकार झाला. आज शतकानंतर जेव्हा 'सावित्रीबाई झाल्याच नसत्या तर' असा विचार डोक्यात येतो, तेव्हा त्यांच्या कार्याची महानता जाणवते. पण त्याबरोबरच त्या होऊनही आपल्या समाजाने फार मोठी मजल गाठली; असे म्हणता येत नाही. त्यांचे कर्तृत्व आठविताना आजच्या स्त्री-जीवनाला पडलेल्या आणखी मर्यादा पाहिल्यानंतर खजील व्हायला होते. भारतीय राज्य घटनेने दिलेला स्त्री-समानतेचा अधिकार इथे जेव्हा मन:पूर्वक स्वीकारला जाईल, तेव्हाच सावित्रीबाईंच्या स्मृतीला वंदन करायला आपण खऱ्या अर्थाने सुपात्र ठरू.

## संदर्भ :


१) म. फुले व्यक्तित्व आणि विचार- गं. बा. सरदार, पृ. ६३

२) महाराष्ट्रातील समाजविचार- डॉ. गोविंद मोरेश्वर रानडे, पृ. २५०

३) म. फुले व्यक्तित्व आणि विचार- गं. बा. सरदार, पृ. १३

४) स्त्री प्रश्नांची चर्चा: एकोणिसावे शतक- प्रतिभा रानडे, पृ. ४


५) म. फुले व्यक्तित्व आणि विचार- गं. बा. सरदार, पृ. ६३
६) महात्मा फुले- धनंजय कीर, पृ. ४७
७) आम्ही पाहिलेले फुले- संपा. हरि नरके, पृ. १४१
८) लोकहितवादीकृत निबंधसंग्रह- संपा. अ. का. प्रियोळकर, पृ. २२७
९) दोन पुनर्विवाह प्रकरणे- संपा. स. गं. मालशे, पृ. १३
१०) म. फुले समग्र वाङ्मय- संपा. य. दि. फडके, पृ. १८४
११) आम्ही पाहिलेले फुले- संपा. हरि नरके, पृ. ५७
१२) म. फुले समग्र वाङ्मय- संपा. य. दि. फडके, पृ. २२७
१३) आम्ही पाहिलेले फुले- संपा. हरि नरके, पृ. ३

*

# परिशिष्ट-१

## सावित्रीबाई फुले: जीवन, कालपट व कार्य

| | | |
|---|---|---|
| दि. ३ जानेवारी | १८३१ | नायगांव, ता. खंडाळा, जि. सातारा, येथे जन्म. |
| | १८४० | जोतीराव फुले यांचेबरोबर लग्न. |
| | १८४१ | शिक्षणास आरंभ. |
| | १८४७ | नॉर्मल स्कूलमधून शिक्षक प्रशिक्षण. |
| दि. १ जानेवारी, | १८४८ | पुणे येथील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात शिक्षित म्हणून कार्यास सुरूवात. |
| दि. १ मे, | १८४९ | पुणे येथील उस्मानशेख यांचे वाड्यात प्रौढांसाठी शाळेची स्थापना आणि अध्यापन कार्य. |
| | १८४९-१८५० | पुणे, सातारा व नगर जिल्ह्यात काही शाळांची सुरूवात व काही शाळांत शिक्षिका म्हणून कार्य. |
| | १८४९ | शूद्र-अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी पतीबरोबर गृहत्याग. |
| | १८५३ | बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना आणि सावित्रीबाईचे संगोपन कार्य. |
| | १८५४ | 'काव्यफुले' कवितासंग्रह प्रसिद्ध. |
| | १८५५ | शेतकरी व शेतमजूर यांसाठी रात्रशाळांची स्थापना व अध्यापन. |
| | १८८४ | घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला. |
| | १८७५-१८७७ | पुणे परिसरात अन्नछत्रे उघडून दुष्काळ- निवारण कार्य. |
| दि. १० मार्च | १८९७ | प्लेगने क्रांतिज्योतीचे महानिर्वाण. |



(सावित्रीबाई फुले यांची स्वाक्षरी)